श्री. विक्रम सावरकर अभिनंदन ग्रंथ

संघर्ष पर्व



म. ग्रं. सं. ठाणे.
वर्ग निबंध
३४८

संपादक:
डॉ. श्री. प्र. कुळकर्णी

REFBK-0026673

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक प
न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदि
वर्गणी भरावी लागले.

OCT 1992


NOV 1992

MAR 1993

6 MAR 1993

(क्र. मा. पहा)
०००-११-८९

शेखर जिवंधी
३४८४
२६६७३
१०।८।८२



श्री. विक्रम सावरकर अभिनंदन ग्रंथ

संघर्ष पर्व

संपादक
डॉ. श्री. प्र. कुळकर्णी


REFBK-0026673

लाखे प्रकाशन
मुकुंदराज पथ, महाल, नागपूर - २.

प्रकाशिका
सौ. संध्या चंद्रकांत लाखे
मुकुंदराज पथ, महाल, नागपूर - २.

मुद्रक
सौ. कल्पना घाडगे
सचिन बुक बाईंडिंग वर्क्स,
गोकुलपेठ, नागपूर - १०

प्रथमावृत्ती
कार्तीक कृ. १२ (भागवत अेकादशी)
दि. २ डिसेंबर १९९१

मुखपृष्ठ
जयंत गायकवाड
पाताळेश्वर मार्ग,
नागपूर - २.

© सौ. संध्या चंद्रकांत लाखे.

रुपये ६०

प्रमुख विक्रेते - निशिगंध ऐजन्सी,
कॅनेरा बँके समोर,
वाकर रोड, महाल,
नागपूर - २.

अंतरंग

व्यक्तिमत्त्वदर्शन

*	विक्रमीय अर्धशतक	डॉ. श्री. प्र. कुळकर्णी	३
*	अेका महापुरुषाच्या सहवासात	डॉ. वि.स. जोग	७
*	आमचे सहजीवन	सौ. स्वामिनी सावरकर	२५
*	अेक तप	जगदीशप्रसाद उपाध्याय	३४
*	हिंदूमहासभेचे नेते विक्रमराव सावरकर	रामभाऊ तांबट	४०

प्रज्वलंत पर्व

संपादकीय विवेचन		डॉ. श्री. प्र. कुळकर्णी	५४
१)	राजकारणाच्या फिरता रंगमंच	विक्रम सावरकर	६४
२)	१५ नोव्हेंबरच्या हुतात्म्यांना वंदन	– " –	६५
३)	देशाच्या दुर्दशेस सर्व निधर्मी पक्षच कारणीभूत	– " –	६७
४)	भारतात हिंदूना स्वसंरक्षणाच्या मागणीचा अधिकारच नाही काय?	– " –	६९
५)	लाखमोलाचा संदेश	– " –	७०
६)	संघात मुसलमानांना प्रवेश	– " –	७२
७)	हिंदुत्त्वनिष्ठानो सावधान	– " –	७३
८)	खबरदार संघावर बंदी घालाल तर खबरदार	– " –	७९

९)	पुरुषोत्तम भास्कर भावे यांची उणीव	विक्रम सावरकर	८३
१०)	सिंधुमुक्तीचा काळ जवळ आला	- " -	८९
११)	हिंदुसभा विचारसरणीचे राज्य निर्माण करावे (भाषण)	- " -	९२
१२)	पापस्थानी सापांच्या पिल्लांना ठेचावे	- " -	९४
१३)	धोकादायक नेत्यांपासून सावधान	- " -	९७
१४)	विधानसभा निवडणूकीनंतर	- " -	१००
१५)	राजकारणाचा परिपाक	- " -	१०७
१६)	विषाची परीक्षा कशाला घ्यायची	- " -	११२

हिंदुत्व मीमांसा

*	डॉ. आंबेडकर यांच्या संदर्भात बॅरिस्टर सावरकर	डॉ. सौ. सुहासिनी वंजारी	११७
*	हिंदुधर्माची समन्वयनिष्ठ विश्वात्मकता	डॉ. श्री. भा. वर्णेकर	१२३
*	माझे हिंदुत्व	श्री. राम शेवाळकर	१३३
*	हिंदुत्वाचे राजकीय भवितव्ये	प्राचार्य श्री. मं. पांडे	१३६
*	हिंदु राष्ट्र म्हणजे काय	श्री. मा. गो. वैद्य	१४१
*	हिंदुत्वाची ॲलर्जी	श्री. विद्याधर गोखले	१५०
*	मार्क्सवाद धर्म - हिंदुत्व	श्री. ए. बी. बर्धन	१५३

निवेदन

"माझे हजारो अनुयायी नसतील, पण माझ्या आंदोलनांत सहभागी होणाऱ्या लोकांचा फार मोठा जमाव नसेल परन्तु जे काही लोक आंदोलनात सहभागी झाले असतील ते प्रखर हिंदुत्वनिष्ठेनी भारावून गेलेले असतील," असे माझ्याशी झालेल्या वेळोवेळीच्या संभाषणात सांगणारे **श्री विक्रम सावरकर** हे एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्या निमित्याने अनेक वर्षे मी योजलेला ग्रंथ प्रकाशनाचा संकल्प पूर्णत्वास जात आहे याचे मला सर्वाधिक समाधान होत आहे. मी नागपूरला सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालयात शिक्षक असताना डॉ वि. स. जोग मला शिक़वावयाचे. एखादा मराठी पाठ शिकवत असताना त्या विषयाला धरून कधी स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. आंबेडकर, पूज्य महात्मा गांधी ह्यांच्यातील वैचारिक संघर्षाचे उदाहरण देत ते आपले स्वतःचे मत मांडीत. त्यामुळे मराठीचा तास हा कंटाळवाणा न होता, इतरही माहिती भरपूर मिळून तो एक वैचारिक ज्ञान प्रबोधनाचा तास ठरे. पुढे डॉ. जोगांचा परिचय वाढत गेला. परिचय वाढता वाढता डॉ. जोगांचा घनिष्ठ आवडते नातेवाईक असलेल्या श्री. विक्रमरावांची ओळख झाली. शाळा व महाविद्यालयाच्या इतर मित्र परिवारा बरोबर आम्ही 'झंपु' मध्ये सहभागी झालो.

'झंपु' म्हणजे झुंजार पुरोगामी संघटना, त्या काळात श्री विक्रमरावांनी काढलेली हिंदुत्वनिष्ठ पुरोगामी विचारसरणीची संघटना. या संघटनेत काम करीत असताना श्री विक्रमरावांची एक अपेक्षा होती कीं, "संघटनेत जास्तीत जास्त तरूण मुले असावीत. नागपुरात होणाऱ्या कोणत्याही अन्याया विरूद्ध ह्या संघटनेचे पाऊल पुढे असावे "घडतही असंच होते.

यशंवत स्टेडियमचे अपुरे बांधकामामुळे स्लॅप पडून तीन लोक मृत्युमुखी पडले होते. हा पांढरा हत्ती महानगर पालिकेने कोणत्या कारणाकरिता स्विकारला होता हे समजायला मार्ग नसला तरी त्यात हजारो रूपयांचा भ्रष्टाचार - झाला होता, ह्याच भ्रष्टाचारापायी तीन लोकांचा जीव गेला. ह्या बाबतीत नागपुरकर लोकांच्या मनात असंतोष निर्माण झाला होता. महानगरपालिकेने ह्या प्रकरणातून मार्ग कसा काढावा ह्या साठी सभा बोलावली होती. आधल्या दिवशी टिळक पुतळ्या जवळील झंपुच्या कार्यालयात श्री विक्रमरावांनी झंपुच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली. संघटनेने या बाबतीत काहीतरी प्रखर आंदोलन करावे अशी सगळयांचीच इच्छा होती. कोणीतरी सुचविले की "उद्या आपण निदर्शने करू" श्री. विक्रमराव म्हणाले की, "निदर्शनानी काय काम होणार, आंदोलन असे करा की ज्या आंदोलनाने महापौरांना सुद्धा धास्ती बसावी" आंदोलनाचे स्वरूप पक्के झाले. ठरल्या प्रमाणे सभागृही कडेकोट पोलीस बंदोबस्त असताना त्यांना चुकवून आम्ही कार्यकर्ते जवळच्या महाल टपाल कार्यालयात लपून राहिलो. महापौरांची गाडी येताक्षणी सर्व कार्यकर्त्यांनी महापौरांच्या गाडीला घेराव घातला. त्याकाळी महापौर श्री. बाळासाहेब तिनखेडे होते. पोलीसांना ही घटना अनपेक्षित होती. धावपळ

माजली. कार्यकत्यांना अटक झाली. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रातून ह्या बातमीला विशेष महत्व देण्यात आले.

त्या काळाचे झुंपुचे हे प्रथम आंदोलन डॉ. वि.स.जोग व श्री. विक्रमरावांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनासह यशस्वी झाल्या नंतर अनेक आंदोलने झुंपु ने उभारली, त्यात मोहता सायन्स कॉलेजमध्ये अतिरिक्त फी चा, बोझा, विद्यापीठातील सावळा गोधंळ इत्यादी.

लक्षात रहाणारे एक आंदोलन म्हणजे जिल्हा परिवेक्षक अधिकारी श्री जहिरूद्दीन ह्यांच्या विरूद्धचे.

पाकीस्तानवर निष्ठा असणाऱ्या ह्या माणसाने १५ ऑगस्टच्या दिवशी स्वातंत्र्य दिनाचा सोहळा साजरा न केल्यामुळे ह्याच्या विरूद्ध सतत त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना घेराव करून त्याच्या बदलीची मागणी करण्यात आली होती. सरकार दरबारी व पोलीसांमध्ये त्यांचे वजन असल्यामुळे त्याच्या विरूद्ध चालविलेल्या आंदोलनात पोलिस त्यांची बाजू घेवून 'झंपु' च्या कार्यकर्त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत असत. परन्तु श्री विक्रमरावांचे योग्य मार्गदर्शन व अचूक निर्णय ह्या मुळे पोलीसांना कधीही झुंपुच्या कार्यकर्त्याला अडविता आले नाही. हे विशेष असे आंदोलन झुंपुनी त्या काळात लढविले आणि अन्याया विरूद्ध दाद मागण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनात कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष श्री कृष्णा इंगळे हेही आमच्या बरोबर होते. नागपुर भागातील दलित सुजाण नेत्यांशी श्री विक्रमरावांचे असलेले सौहार्द्राचे संबंध त्या निमित्ताने आम्हाला कळले.

'झुंपु' ही संघटना फक्त आंदोलन उभारणारी नव्हती तर लोकांमध्ये हिंदुत्वाचा विचार रूजावा व ढोंगी राज्यकार्यकर्त्यानी मांडलेल्या चुकीच्या विचारांचे खंडन व्हावे हाही त्या मागचा उद्देश होता. म्हणूनच मदनलाल धिंग्रा जयंती, १४ ऑगस्ट ला अखंड भारत दिवस इत्यादी कार्यक्रम या संघटनेने केले होते 'अखंड भारत दिना' निमित्त नागपुरात मध्यरात्री निघालेला पहिला मशाल मोर्चा 'झुंपु' चा होता, तो कार्यक्रम असा होता की, रात्री अकरा वाजता श्री विक्रमरावांच्या नेतृत्वाखाली आमच्या संघटनेचे दोनशे कायकर्ते हातात पेटत्या मशाली घेवून 'अखंड भारता'च्या समर्थनार्थ नारे लावत महाल, इतवारीतून फिरत. रात्री बारा वाजता टिळक पुतळयाच्या कार्यालयापाशी श्री विक्रमरावांचे अखंड भारतावर भाषण होत असे.

भारताच्या फाळणीला जबाबदार कोण, हिंदुची दुर्दशा कां, ह्या विषयावर श्री विक्रमरावांचे सडेतोड, युक्तिवादानी भरलेले भाषण असे. आजही माझ्या सारख्या अनेक कार्यकर्त्यांच्या मनात तसल्या कार्यक्रमांची आठवण कायम आहे.

झुंपुचे काम करीत असताना श्री विक्रमरावांनी मला कल्याण मुद्रणालयातील व्यवस्थापकाचा भार सांभाळण्याविषयी विचारले, व मी त्यांना होकारार्थ उत्तर दिले.

नुकतीच आणिबाणी लागली होती, वृत्तपत्रांवर नवीन निर्बंध आले होते. अनेक

हिंदुत्ववादी विचारसरणीचे लोक तुरुंगात बंद होते; योगायोग असा की, श्री विक्रमराव बाहेर होते. कल्याण मुद्रणालयातून प्रज्वलंत प्रसिद्ध होत असे, प्रज्वलंतच्या काही लेखांमधून वृतपत्रीय निर्बंधनाला हुलकावण्या देत आणिबाणी विरूद्ध लेखन करण्याचा श्री विक्रमरावांनी प्रयत्न केला इतकेच नव्हे तर ऐन आणिबाणीत शंकर नगर मधील सावरकर चौकाचे नामकरण करत असतांना बंडु शिंगरे याचे जहाल नेत्याचे आणिबाणी विरूद्ध भाषण त्यांनी आयोजित केले होते.

प्रज्वलंत काढत असताना श्री विक्रमरावांचा आर्थिक संघर्ष मी बघत होतो. कधी कागदाची टंचाई. तर कधी मुद्रणालयातील कामगार अवेळी येणे. तर कधी श्री विक्रमरावांचे हिंदुमहासभेचे दौरे. तरीही अंक काढण्याची त्यांची तडफदारी, त्या साठी करावे लागणारे कष्ट आणि त्यात सौ. स्वामिनीबाईंची अजोड साथ. हे श्री विक्रमरावांचे हिंदुत्वनिष्ठेचे 'प्रज्वलंत' साप्ताहिक हे एकमेव साप्ताहिक आहे की, ते अखंडपणे चोवीस वर्षे विदर्भात चालवलेले आहे. त्या वेळेला सामान्याच्या मनात हिंदुत्वाचा विचार आजच्या प्रमाणे रूजला नव्हता, आर्थिक बाजूची कुठलीही मदत नव्हती ज्या निष्ठेने त्यांनी साप्ताहिक अंक काढले त्याच निष्ठेने त्यांनी दिवाळी अंकही काढले, दिवाळी अंकाचा पसारा मोठा असतो. दोनशे पानाचा हा अंक काढत असताना त्यात जाहिराती मिळविण्याकरीता सेवकांची एक यंत्रणा उभी करावी लागते. श्री विक्रमरावांजवळ अशी कोणतीही यंत्रणा नसायची. एक खांबी श्री विक्रमराव जाहिराती मिळवीत, आतला मजकूर गोळा करत. ले आउट ही तेच ठरवत पण कुठल्याही वर्षी कंटाळा न करताना कधी 'बंदा बैरागी' चे चित्र देवून तर कधी 'रामजन्मभूमि ' मुक्त व्हावी असे चित्र देवून दिवाळी अंक काढले.

ह्या साप्ताहिकानी किंवा ह्या दिवाळी अंकांनी कधी ही फायदा तर करून दिलाच नाही, झालाच तर तो तोटा झालेला आहे; पण तो तोटाही सहन करून त्यांनी त्यांचा हिंदुत्वाचा विचार सोडला नाही; ही त्यांची जमेची बाजू आहे.

श्री विक्रमरावाशी चर्चा करताना अनेक गोष्टींची माहिती मिळते. एरवी या माहिती बद्दल आपण अज्ञानी असतो. माहिती सांगत असताना ते साल, दिनांक, वेळ त्यावेळी इतरांनी व्यक्त केलेली मते, आणि मग स्वतःचे मत सांगतात. चर्चा रंगली की तासतास वेळ कसा जातो याचा पत्ताच लागत नाही. त्यात त्यांच्या जवंळून युकॅरिस्ट कांग्रेसची चळवळ, वंदेमातरम् आंदोलन, अंग्रेजी हटाओ, गोहत्याबंदी, शंकराचार्यां चे उपोषण अशा अनेक आंदोलनातील विस्तृत माहिती मिळायची.

हे सर्व 'झुंपु' मध्ये काम करित असताना त्यांच्या स्वभावाच्या अनेक वैशिष्ट्यांशी मी परिचित झालो. कार्यकर्ता असो की कामगार असो त्यांच्यावर ते सारखेच प्रेम करतात, मनात काहीही न ठेवतां राग आला असेल तर रागावून आणि चांगले काम केले असेल तर ते कौतुक करीत. कोणाला काय वाटेल ह्याचा विचार न करता किवा चार चौघात त्याची काय प्रतिमा

निर्माण होईल ह्याचा विवेक न सांभाळता मिळालेल्या (कधी कधी अपुऱ्या माहिती वर ही) ते कार्यकर्त्यांना रागावीत. त्यामुळे कधी कधी कुणाचे नुकसान झाले आहे, असो,

त्यांच्या सहवासामुळे माझा तरी नक्कीच फायदा झालेला आहे. कल्याण मुद्रणालयातील प्रज्वलंतचे काम, दिवाळी अंकाचे काम बघत असताना माझ्यामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. मुद्रण व्यवसायाची माहिती झाली. प्रकाशन क्षेत्राची माहिती झाली. पुस्तक कसे काढावे, त्याचा ले-आउट कसा असावा, त्याचे चित्र चित्रकाराकडून कसे करून घ्यावे ह्याची बारिक सारिक माहिती मला त्यांच्या कडून मिळाली, त्याच माहितीच्या आधारे मी माझा प्रकाशन व्यवसाय सुरू करू शकलो येथपर्यंत आलो.

अनेक अडचणींना तोंड देत प्रकाशन व्यवसायात मी जरा स्थिरावलो तेव्हा अग्रक्रमाने ठरविले की, श्री विक्रमरावांच्या संबंधीचे एक पुस्तक काढावयाचेच. याच ग्रथांची पहिली योजना थोडी वेगळी होती. साप्ताहिक प्रज्वंलत मधील निवडक अग्रलेख आणि त्यावरील विस्तृत समीक्षा असे हे स्वरूप होते. निवड आणि समीक्षेचे काम डॉ. श्री. प्र. कुळकर्णी यांच्या सारख्या प्रतिभाशाली चोखंदळ विद्वानावर सोपविले. त्यांनी ते चोखपणे पार पाडले. त्याना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.

दरम्यानच्या काळात श्री. विक्रमरावांच्या एकसष्ठी समारंभाची योजना निश्चित झाली. तेव्हा डॉ. वि. स. जोग यांनी या ग्रंथाचे स्वरूप अधिक व्यापक करण्याची सूचना केली, व मला ही ती पटली.

डॉ. वि.स. जोग यांनी या संदर्भात साहाय्य ही केले, मी त्याचा अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथा साठी श्री. जयंत गायकवाड यांनी आकर्षक मुखपृष्ठ काढून दिले व तसेच श्री अशोक घाडगे, महिमा प्रिटंर्स यांनी उत्तम छपाई केली, तसेच माझी पत्नी सौ. संध्या हिने ही प्रकाशनाचे दायित्व घरकामातून वेळ काढून व्यवस्थित साभांळली, तांत्रिक दृष्टया प्रकाशक तीच आहे. प्रकाशन व्यवसायात माझे तीर्थरूप श्री. शंकरराव लाखे, ह्याचे प्रोत्साहन मला सतत लाभले. त्यांच्याच प्रोत्साहनामुळे व आशीर्वादाने अनेक संकटांना तोंड देत माझी ही वाटचाल चालूच ठेवली आहे, ह्या बद्दलची कृतज्ञता व्यक्त करून, मी पूर्ण विराम घेतो.

धन्यवाद

कार्तिकी एकादशी
सोमवार दिनांक
१८-११-९१

श्री. चंद्रकांत शंकरराव लाखे.
मुकुंदराज पथ
महाल, नागपूर २

व्यक्तिमत्व दर्शन



▲ रणझुंजार वक्ता

लढावूनेता ▼





चिकाटीचा कार्यकर्ता

लौकिक जीवनातील रसिकता होलिकात्सवात कै.डॉ.ना.भा. खरे यांना गुलाल लावतअसतांना



मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
वा. क्र. 3814
दि. 9/11/82

'विक्रमी' य अर्धशतक

डॉ. श्री. प्र. कुळकर्णी

(श्री. विक्रम नारायण सावरकर यांच्या वयाला दि. २ डिसेंबर १९८२ रोजी पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमिताने त्यावेळी लिहिलेला लेख.)

न्याय आणि नीतीचे शब्दशः पालन करण्याच्या अट्टहासापायी पाऱ्चालीचाच नव्हे, तर अखिल स्त्रीजातीचा व मानवता धर्माचाच अवमान उघडया डोळयांनी पहात बसणाऱ्या धर्मावतार युधिष्ठिराचे हात जाळायला निघालेल्या भीमाचे तत्त्वज्ञान आणि अतरंग ज्यांना उलगडले आहे, त्यांना स्वा. सावरकरप्रणीत हिंदुत्वाचा वसा घेतलेल्या निष्ठावंतांचे जीवन सहज कळून येईल. अखिल भारतीय हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. विक्रम नारायण सावरकर हे अशांपैकीच एक हिंदुत्वनिष्ठ नेते. दोन डिसेंबरला ह्या कठोर आयुष्यातील पाच दशकांचा प्रवास ते पूर्ण करीत आहेत. त्यापैकी गत दशकातील काही क्षण. एक मित्र व प्रज्वंलत परिवारातील एक लेखक ह्या नात्याने विक्रमभाऊंच्या सहवासात घालविण्याचे भाग्य प्रस्तुत लेखकाला लाभले आहे. त्या अनुभवातून जाणवले तेवढे विक्रम सावरकर येथे शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न आहे. त्यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त हे नम्र अभिवादन आहे.

बालपणात तात्यांच्या अंगाखांद्यावर किती खेळायला मिळाले ह्याविषयीच्या त्यांच्या आठवणी पुसट आहेत व त्या सांगायला त्यांचे निवृत्तीचे दिवस आले नाहीत असे त्यांना व आम्हा सर्व मित्रानाही पटले आहे, इतके ते शरिराने व मनाने तरुण आहेत. शिवाय महत्त्वाचे म्हणजे तात्यांचे बोटधरुन हिंदुत्वाच्या विश्वात ते उतरले नाहीत. तर स्वतः च्या महत्त्वाकांक्षेने त्यांना त्या स्वप्नांचा ध्यास लावला आहे. स्वतः स्वा. सावरकरांचा नेतृत्वाचा वारसा 'तयार' करण्यावर विश्वास नव्हतो व विक्रमभाउंच्या उमेदीच्या काळात तात्यांनी एकांतवास अधिक पसंत केला होता. त्यामुळे तात्यांची विद्या एकलव्याच्याच मार्गाने ग्रहण करणे शक्य होते. विक्रम सावरकरांनी तोच मार्ग अनुसरला. तात्यांच्या विचारधनाला आपल्या कृतीची जोड दिली.

सारेच युद्धपातळीवर

सहिष्णुतेच्या नावाने इतरांच्या धर्मभावना जपताजपता आम्ही हिंदूधर्माला त्या द्रौपदीप्रमाणेच दुर्योधन-दुःशानाच्या हवाली करतो आहे. ह्या शंकेपोटी पोटतिडीक निर्माण होऊन स्वधर्मीयांना जागे करण्यासाठी धर्मांतराच्या नावाने राष्ट्रांतराची येऊ घातलेली संकटे टाळण्यासाठी, लेखणीचे, शब्दाचे व वेळ प्रसंगी खरेखूरे आसूड उडविण्याचे कार्य कुणीतरी करावेच लागते. आपणच ते करावे असे प्रमाणिकपणे वाटल्यावरून पांचगणी ते कन्याकुमारी ही वाट तुडवीत मिशनरी वृत्तीने विक्रम सावरकरांची भ्रमती चालू असते. अन्याय आणि आक्रमण ह्याचा त्वरित प्रतिकार झाला पाहिजेच ह्याच जिद्दीने, राष्ट्रीय स्वंयसेवक संघावरील

बंदीचा प्रश्न असो अगर शिवाजी महाराजांच्या सन्मानाचा, आंदोलनाच्या आघाडीवर भगवाध्वज घेऊन जाण्यासाठी हा सेनापती केव्हाही तयारच. 'अंग्रेजी हटाव' सारखी चळवळ असो अथवा झांशी राणीच्या पुतळयावरील जाहिरातपत्रके हटविण्याचा स्थानिक प्रश्न असो, युद्धपातळी वर त्याचा पाठपुरावा करणे ही विक्रम सावरकराची रीत.

नेतृत्वासाठी लागणारे कुशल योजकत्व व धडाडी ह्या गुणांबरोबर भारतीय जनमानसला आवश्यक वाटणारे देखणपण त्यांना सढळपणे लाभले आहे. नुकत्याच घडलेल्या कल्याणच्या आंदोलनात त्यांच्या योजकतेचा प्रत्यय सर्वानी घेतलाच आहे. पोलिसांची संपूर्ण बटालियन अटकाव करण्यास तत्पर असताना अचानकपणे उपस्थित होऊन शिवप्रतिमेला हार घालण्याचे काम त्यांनी करून दाखविले. जेमतेम पाच फूट दोन इंच उंची, गोरापन चेहरा, भेदक डोळे व त्याला शोभेशी काळी कुळकुळीत दाढी व भारदस्त आवाज - या साऱ्यांना जोड आहे ती विचारांच्या करडेपणाची. त्यामुळे प्रस्तुत लेखकाने त्यांना संभाजीची भूमिका करावी असे गमतीने सुचविलेही होते. भाई बर्धन ह्यांना मात्र त्यांनी दाढी ठेवूच नये असे वाटते.

एकांडा शिलेदार

ते काहीही असो, उठावदार व्यक्तिमत्वाचा हा संघटनवादी नेता 'एकांडा शिलेदार' बनून आपल्या लढाया आखतो आहे आणि आपणच लढतो आहे. 'आलात तर तुमच्यासह' वगैरे प्रभाव साहजिकच तेथे आहे. त्यामुळे केवळ अनुयायांची संख्या किंवा मतपेटीतील गणसंख्या ही कसोटी लावून मोठेपण मोजले, तर कुठल्याही आडगावचा सरपंच भारी ठरावा. मात्र त्या सरपंचाला श्री. बाळासाहेब देवरस ते भाई बर्धन. श्री. पु. भा. भावे ते आचार्य अत्रे, मा. गो. वैद्य ते विद्याधर गोखले ह्यांचे प्रेम, मैत्री, साहचर्य, सहकार्य व आशीर्वाद लाभणे शक्य नाही. विक्रम सावरकरांना ते सर्व मिळाले आहे. हा परिवार एकजिनसी नाही हे उघड आहे. साम्यवाद्यांपासून तर नं - वाद्यापर्यत सर्वांचाच आदर अथवा प्रेमभाव विनाकर्तृत्वाने मिळत नाही. ही, मैत्री, हे प्रेम आहे निष्ठेचे. विक्रम सावरकर ह्या व्यक्तीने जपलेल्या निष्ठेचे ते कौतुक आहे म्हणून त्या कौतुकासाठी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक पु. भा. भावे आपले 'मंदिर' हे पुस्तक विक्रम सावरकरांना अर्पण करतात. तर नारायण सुर्वे पहिल्याच भेटीत रंगून जातात. विश्वासार्ह मित्र म्हणून खात्री बाळगून असणारे असे अनेक आहेत. प्रा.वि. घ. देशपांडे यांनी हिंदुत्वाचे दुसरे भावंड जवळ केल्यावरही दोघात वितुष्ट नाही, किंवा साहित्य संमेलनाच्या आखाडयात भाव्यांची बाजू घेऊन ग.वा. बेहरे ह्या खंद्या पत्रकाराशी दोन हात केल्यावरही मैत्री कायमच दिसते. नाहीतर विक्रम सावरकरांच्या सत्कारात ग.वा. बेहरे यांचे नाव दिसून न येते.

तारेवरची कसरत

अर्थात ही तारेवरची कसरत असते. तात्त्विक संबंध आणि वैयक्तिक मैत्री ह्यांचा समतोल नेहमीच साधतो असे नाही. विशेषतः त्यांनी घेतलेले व्रतच असे आहे की, तेथे

तडजोडीला वावच नाही. त्यामुळे सुखावणाऱ्यापेक्षा दुखावलेले जास्त असू शकतात. पण त्या दुखावण्यातही हळहळ असते, चांगला मित्र गमावण्याची. वस्तुतः पन्नास वर्षाने खरा ठरणारा आजच्या युगातला नसतोच. त्यामुळे व्यवहार्य जगात समजुतीचे घोटाळे होतात. आप्त, स्वकीय, जाणकार किंवा इतराना दिसतो तो फक्त हटवाद ! तडजोड करावी म्हणून त्यांचे प्रयत्न असतात. निवडणूक लढवू नका, अमक्या-तमक्या समविचाराच्या पक्षात विलीन व्हा, व्यर्थ बळ खर्चू नका वगैरे, वगैरे. ह्या उपदेशाने भले-भलेही बहकले आहेत. आपल्या राहुटीतून दुसऱ्या राहुटीत गेले आहेत. अल्पकालीन यशाने बरोबरही ठरले आहेत, तर काहींचे स्वगृह चुकलेही आहे. काही नाउमेद होऊन राहुट्या लपेटून बसले आहेत. विक्रम सावरकर ह्यातले काहीच करीत नाहीत. तडजोड करा असे सांगणारा माझ्यासारखा असेल तर खांद्यावर थाप मारतील. मिष्किल हसतील, तब्येतीची चौकशी करतील. एखादा उपदेशक हटवादी असेल तर (आणि असेच बहुतेक असतात) तो बरोबर आहे, असे दाखवून सद्यः परिस्थितीत बदल अशक्य कसा ह्यावर दोन तास व्याख्यान देतील, हट्ट धरणारा बिचारा मूळ विषयच विसरून जाईल. हे आपले उभे त्याच जागेवर.

मस्तीत जगणारा माणूस

माणसाची मूस एकदाच घडते. विक्रम सावरकरांची ती घडली आहे. मार्ग ठरला आहे. आता त्यात बदल संभाव्य नाही, काळाच्या उदरात अर्थातच काय आहे ते सांगणे कठीणच. तसेच आज न बदलणे हे चूक किंवा बरोबर आहे हे ही काळच ठरवील. आपले भाष्य फार उशिराचे किंवा फार घाईचे ठरेल. तरीपण एक जाणवते, ही माणसे न बदलण्यातच मौज आहे. - मस्ती आहे. अर्थात त्याची धग त्यांनाच लागते, चुटकेही त्यानांच बसतात. तरीही वाटते, त्यांनी बदलू नये. आगीशी मैत्री केल्याचा आपला खोटा स्वार्थी अभिमान त्यात असू शकतो. पण तत्त्व म्हणूनही हे यज्ञकुंड विझू नये, नाहीतर ज्वालाचा काय, पण ठिगण्याही उडणार नाहीत. भगतसिंग - राजगुरूचे गायन होणार नाही.

विक्रम सावरकरांनी मदनलाल धिग्रांची गोष्ट सांगून हजारभर कॉलेज तरूणांना मंत्रमुग्ध केल्याचा अनुभव प्रस्तुत लेखकाने घेतला आहे. सांगलीच्या दहासहस्र लोकांना वीर सावरकरांचे चरित्र सांगून तीन तास खिळवून ठेवल्याचे ऐकले आहे. त्यांचे बेधडक आणि रोखठोक अग्रलेख सर्वाच्या परिचयाचे आहेत तसेच वेळ प्रसंगी शैलीदार लिखाणही ते करतात. त्यांच्या सारखे निर्भय पत्रकार आज महाराष्ट्रात बोटावर मोजण्याइतकेच असतील. आसामातील धोका ओळखणारे, काश्मीरची समस्या ओळखणारे कडक भाषेतील त्यांचे अग्रलेख त्या घटनांच्या किती तरी पूर्वीच येऊन गेले आहेत. म्हणूनच वाटते काळ कधीतरी योग्य-अयोग्य निवाडा करीलच.

धावपळीचे जीवन

घराण्याची आसने अनेकांना मिळतात, पीठाच्या गाद्याही लाभतात. विक्रम सावरकरही

त्या भाग्यवंतापैकी एक आहेत. क्रांतिवीर सावरकरांचा समाजाला काहीतरी देत राहण्याचा वारसा आणि काटेरी सिंहासन त्यांनाही मिळाले आहे. त्यांच्या 'राजप्रासादाचा' दरवाजा उघडतो तोच मुळी तुरुंगात. त्यामुळे त्यांना बेळगावला अटक झाल्याची बातमी चिरंजीव रणजितला कळते ती महाराष्ट्र - टाईम्समधून. हे जीवन स्वेच्छेचे आहे. हा वारसा स्वेच्छेने घेतला आहे. पण सुखाचा निश्चित नाही. हा धीर आणि हे धैर्य रक्तात असेल, पण त्याचाही मोबदला रक्तानेच कधी द्यावा लागेल याचा नेम नाही. नावाचा ट्रेडमार्क वापरून सहज सुखे मिळवता यावी, त्या जमान्यात वेड लागल्याप्रमाणे चोख व्यवहार व उदार हस्त ह्यांनी झपाटून प्रपंचाचे गणित सोडवत बसणे सोपे नाही. पण संकटाच्या क्षणी विचलित न होणारेही विरगुंळयाच्या क्षणी उदास होताना आपण बघतो. येथे उदासीनता ठाऊकच नाही. तुरुंग आणि अभियोग ह्यातून वेळ मिळेल त्यावेळी निवांत वेळा हसत-खेळत घालवायचा.

येणाऱ्या दु-खाच्या चिंतेत सुखाचे क्षण वाया जाऊ द्यायचे हे करंटेपण नाही काय? त्याहूनही महत्त्वाचे आपल्या दुःखाचे इतराना त्रासदायक ठरेल असे रडगाणेही नाही. कुणाविरूद्ध वैयक्तिक तक्रार नाही. अगदी सरकारविरूद्ध देखील. खाजगीत कुणाची निंदा नाही की नालस्ती नाही. निर्भेळ कौटुंबिक आनंद घेऊन ताजेतवाने व्हायचे, खिशात कुठले तरी आरक्षण व पाठीला गुप्त आरक्षी असे घेऊन जीवनातला व जीवनाचाच प्रवास सुरू ठेवायचा. त्यात जो भेटेल त्याला जवळ करायचे. दुर्बळांच्या खाद्यांवर मायेचा हात ठेवायचा तर सबळांच्या खांद्यावर बंदूक. सांप्रत कोल्हापूर, सांगली हे कार्यक्षेत्र. नागपूरला यायचे ते केवळ प्रज्वंलतची घडी बसवून देण्यासाठी.

अजब किमया

अर्थात जाहिरातीविना चाललेले ध्येयनिष्ठ साप्ताहिक, नाना अडचणी पण वागणूक एकच. शांत, उदारतेची, चुका सांभाळून घेण्याची. पैसा उभा करणे ही किमया त्यांनाच ठावे. आर्थिक व्यवहार मित्रांपर्यत पोहचला नाही हयातच त्यांचे कसब. लेखकांना समान न्याय. जी वागणूक पु.भा. भावे यांना तीच लहानांना. पूर्ण स्वातंत्र्य. औध्दत्त्याची खोड असलेला माझ्यासारखा त्यांच्या धोरणावर, आरक्षण विरोधावर टीका करील, तरी ती छापून येईल, त्यांचे हितसंबंध दुखावले, हिंदुत्ववादी नाराज झाले तरी लेखकांचे स्वातंत्र्यावर बंदी नाही. उत्तेजन आणि गुणग्राहकता ह्यामुळे अनेक लहानथोर लेखक प्रज्वलंत परिवारात आहेत. प्रस्तुत लेखकावर असाच लोभ दाखवून. कोणताही वादी नसूनही प्रज्वलंतच्या प्रथम पानापासून शेवटच्या पानापर्यंत लिहून घेतले आहे. अनेकाना वाव दिला आहे. संधी मिळाली आहे. मैत्रीचा हातही खांद्यावर ठेवला आहे.

कालपरवाच असाच हात खांद्यावर टाकून स्वा. सावरकर पुतळयाच्या निमित्त छोटी सहल आम्ही दोघांनी केली आहे. त्यावेळी लक्षात आले विक्रम सावरकरांना काठीच्या आधाराची कधीच गरज भासणार नाही. निदान यापुढची पन्नास वर्षे तरी।

* दि. २८ नोव्हे. १९८२

अेका महापुरूषाच्या सहवासात

डॉ. वि. स. जोग,

नमस्कार त्या विक्रम नारायणाशी

श्री. विक्रम नारायण सावरकर उपाख्य आमच्या विक्रमभाऊंशी मी मावसबंधुत्वाच्या नात्याने जन्मापासून जुळलो आहे. पण बारातेराच्या माझ्या पोरवयापासून आज परिपक्वतेची अपेक्षा असणाचा माझ्या प्रौढावस्थेपर्यंत, तेहत्तीस वर्षे माझी त्यांच्याशी घनिष्ठ मित्रता आहे. त्यावरून मी अभिमानाने म्हणेन की या महापुरूषाच्या सहवासाने माझे जीवन सतत प्रकाशमान राहिले. ध्रुवप्रदेशात अहोरात्र सूर्य पेटतो. माझ्या आयुष्यात हा सावरकर सूर्य सतत अंधारनाश करीत राहिला. "असे सारथी पांगुळा ज्या रथासी।नमस्कार त्या सूर्यनारायणाशी" असे कवीनी सूर्य स्तवन केले आहे. मी कवी नाही पण, "हिंदूमहासभा नावाचा पांगळा राजकीय पक्ष ज्याच्या रथाचा सारथी आहे, नमस्कार त्या विक्रम-नारायणाशी" असे नव-काव्य मलाही स्फुरते.

अनेक युग्मे असलेले व्यक्तिमत्व

विक्रमभाऊंचे साठ वर्षाचे आयुष्य स्फुट कवितेच्या कुडीत मावणारे नाही. तो आहे महाकादंबरीचा विषय. महाकाव्याने महाकादंबरीचे रूप घेतले आहे म्हणून त्यांच्या जीवनाला महाकांदबरी म्हणायचे. एरवी त्याला महाकाव्य म्हणायलाही हरकत नाही. महानायका प्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. परिशुद्धता आणि प्रमाद, प्रतिभा आणि पांडित्य, विवेक आणि विकृती, पराक्रम आणि चक्रमेनिक्रम, दारिद्रय आणि दानत, मौलिकता (Originality) आणि मूलानुसरण (Copy मग ती तात्यांची का असेना) अशी अनेक युग्मे विक्रमभाऊंच्या व्यक्तिमत्वात आहे. भारतीय अध्यात्माला प्रिय असणारा 'युग्म' हा शद्ध मुद्दाम वापरला. मार्क्सवादाला मान्य असणारा 'द्वंद्व' शद्ध नाही वापरला. 'युग्म' या शद्धात परस्परविरोधी गुणांचे आकर्षण सूचित आहे. विक्रमभाऊंच्या स्वभावात अशा काही परस्परविरोधी गुणांचे एकरुपता आहे. व्दंव्द या शब्दात परस्परविरोधी गुणांची संघर्षमय उपस्थिती गृहित आहे ती विक्रमभाऊंसारख्या स्वयंभू महापुरूषांना मान्य होणारी नाही.

महापुरूषांना महापुरूषत्व केवळ हा 'युग्मे' किंवा 'द्वंद्वे' देत नाहीत. प्रत्येक महापुरूषाचे काही व्यवच्छेदक लक्षणे असतात. ही लक्षणे त्यांना इतर महापुरूषांपासून वेगळे अस्तित्व देतात. विक्रमभाऊंच्हीही काही व्यवच्छेदक लक्षणे आहेत. अखंड संघर्षरतता हे एक लक्षण. चिंरजीव स्वाभिमान हे दुसरे लक्षण. पार्थिव सर्वनाशाला वाकुल्या दाखवणारी कृतज्ञता हे तिसरे लक्षण. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची सार्वभौमता अबाधित राखणे हे चौथे लक्षण. या चतुर्विध पुरूषार्थामुळे त्यांनी त्यांच्या सिंह राशीची खऱ्या अर्थाने सार्थकता केली.

विद्यार्थ्यांचे आदर्श पुरूष

नात्याची सीमारेषा ओलांडून विक्रमभाऊंची पहिली ओळख मला झाली आमच्या नागपूरच्या न्यू इंग्लिश हायस्कूलच्या मुख्य शाखेत विक्रमभाऊंनी शिक्षकाची नोकरी दोन वर्षे केली. त्यातही सी. पी. अँड बेरार शाळेच्या अडचणीच्या नोकरीपेक्षा विक्रमभाऊ रमले ते तत्काळीन प्रतिष्ठाप्राप्त न्यू इंग्लिश स्कूल मध्ये. या शाळेच्या स्वतंत्र आणि निर्भय वातावरणात विक्रमभांऊच्या केवळ अध्यापनालाच नव्हे तर व्यक्तिमत्वालाही धुमारे फुटले. गोऱ्यापान कांतीचा, निळया डोळयांचा, मोहक मुद्रेचा हा तरणाबांड शिक्षक विद्यार्थ्यांचा स्वप्नपुरूष झाला. पुरूषाच्या ठिकांणी पराक्रम नसेल तर त्याचे स्वप्नपुरुषत्व तकलादू ठरते तो आदर्श पुरूषाची जागा घेत नाही. विक्रमभाऊंचे असे झाले नाहीं. आनुवांशिक तेजाने त्यांच्या सौंदर्याला प्रखरता दिली. ध्येयवादाने त्यांच्या सौंदर्याला सामर्थ्य दिले. आंम्हा विद्यार्थ्यांचे ते आदर्श पुरूष झाले.

नवव्या वर्गात ते आम्हाला सोशल स्टडीज हा विषय शिकवित. इतिहास, भुगोल आणि नागरिकत्व या तिहीचे मिश्रण करून हा विषय सिद्ध झाला होता. अध्यापनाच्या आपल्या पाहिल्याच तासात, हनुमंताने कोटीच्या कोटी उड्डाणे करीत जावे त्याप्रमाणे त्यांनी भारतीय इतिहासाचे अनेक पर्वत लांघले आणि थांबले १८५७ पाशी. त्यावेळेस त्यांनी विघार्थ्यांना प्रश्न विचाराला.

"१८५७ चे महत्व काय ?"

"१८५७ मध्ये ब्रिटीशांच्या विरूद्ध बंड झाले"

अेक चुणचुणीत विद्यार्थी लगेच उत्तरला.

"बंड?" भिवयांनी निसटता रोष व्यक्त करीत विक्रमभाऊ म्हणाले, "बंड नव्हे! स्वातंत्र्ययुद्ध स्वातंत्र्यसमर! मग त्यांनी बंड आणि स्वातंत्र्यसमरामधला फरक समजावून सांगितला स्वातंत्र्यसमराचा रोमहर्षक इतिहास सांगितला. तास संपल्याची घंटी संपल्यावर, मंत्रमुग्ध विद्यार्थ्यांची समाधि संपली पण जाताजाता, 'पुन्हा बंड म्हटलेस तर शिक्षा करेन' असा इषारा द्यायलाही ते विसरले नाहीत

स्वातंत्र्य मिळाले नाही तर मिळवले

न्यू इंग्लिश हायस्कूलमध्येच स्वातंत्र्यदिनाच्या सोहोळयात विक्रमाभाऊचे वक्तृत्व मी प्रथम ऐकले . स्वातंत्र्य हे मिळाले नाही तर मिळवले हे त्यांचे सुभाषितही मी प्रथम ऐकले त्यानंतर गेली तेहतीस वर्षे त्यांचे वक्तृत्व मी ऐकतो आहे. त्या वक्तृत्वाची शैली कायम मैदानी आहे. मैदान म्हणजे खेळायचे मैदान नव्हे. तर रणमैदान. त्यामुळे या वक्तृत्वात शब्दांची बेगड़ी कलाकुसर नाही या वक्तृत्वात शब्दांचे खेळ सुद्धा नाहीत. या शब्दांचे एकमेव उद्दिष्ट म्हणजे लढणे. हिंदुत्वासाठी लढणे!

माणूस सदासर्वदा लढत असतो का? नाही! सामान्य माणसे सदासर्वदा लढत नाहीत. पण संत लढतात आणि सेनापतीही लढतात. 'रात्रदिन अम्हा युद्धाचा प्रसंग' असे संत तुकाराम सागंतात. अल्पायुष्यात दीडशे लढाया पहिल्या बाजीरावाच्या नावावर जमा आहेत. मस्तानीच्या अंतःपुरात रसपान करतानाही थोरल्या बाजीरावाच्या मनाच्या कुरूक्षेत्रावर नादीरशहा आणि जुनाट ब्राह्मणत्व यांच्याशी एकाच वेळी युद्ध सुरू असेल. विक्रमभाऊंच्या व्यक्तिमत्वात संतत्व आणि सेनापतित्व यांचे मिश्रण आहे. त्यामुळे वक्तृत्वाच्या वेळेस त्यांचे शब्द ठिणग्या बनतात. ज्वाला बनतात, तोफगोळे बनतात. शत्रुला जाळणे हेच या शब्दांचे इतिकर्तव्य . म्हणूनच की काय विक्रमभाऊंच्या साठ वर्षांच्या सार्वजनिक जीवनात त्यांच्यावर जे शेकडो अभियोग चालले त्यापैकी बहुतेकांना कारण झाले त्यांचे दाहक वक्तृत्व

विक्रमभाऊंचे वक्तृत्व .

काही लोक म्हणतात, विक्रमभाऊचे वक्तृत्व त्यांचे एक राजकीय आदरस्थान (आदर्श स्थान नव्हे) कै. प्रा. वि. घ. देशपांडे यांच्याप्रमाणे आहे. मला नाही तसे वाटत. एखादी लकब, त्यांच्यासारखी असेल. पण विक्रमभाऊंच्या शब्दनाद वाघासारखा. शब्दझेप चित्यासारखी. विक्रमभाऊंची व्याख्याने नागपुरात दुमदुमत होती त्यावेळेस तो काळ मी अनुभवलेला वक्तृत्वाचा सुवर्णकाळ होता. आचार्य अत्रे यांच्यासारखा सव्यसाची, डांग्यासारखा उपरोधसम्राट आणि पुरूषोत्त म भास्कर भावे यांच्या सारखा, सारे अलंकारशास्त्र अवगत असलेला वक्ता या मराठ वक्त्यांच्या व्याख्यानानी चटावलेला आमच्या कानांना विक्रमभाऊंनी स्वतःचे व्याख्यान ऐकायला लावले. मंत्रमुग्ध होऊन ऐकायला लावले. क्वचित प्रसंगी, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात, उपरोक्त वक्त्यांच्या बरोबर विक्रमभाऊ व्यासपीठावर असत. अशा वेळेस त्यांचा क्रम अगोदर असो की नंतर, विक्रमभाऊ मैदान दणाणूनच सोडत.

विश्वसनीयता

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत विदर्भ जागता ठेवणारे तीन अग्रणी वक्ते त्याकाळी नागपुरात होते. कम्युनिस्ट पक्षाचे भाई अर्धेन्द्रूभूषण बर्धन. प्रजा सामाजवादी पक्षाचे श्री वसंतराव साठे आणि हिंदूमहासभेचे श्री विक्रम सावरकर. भाई बर्धन यांच्याप्रमाणे चारपाच भाषातले अस्खलित अभ्यासू वक्तृत्व विक्रमभाऊंचे नव्हते. वसंतराव साठंयाप्रमाणे बनावटी शैली विक्रमभाऊंपाशी नव्हती. लोकशाही लढयांमध्ये विशेषतः त्याकाळातल्या नागपूरच्या मागासलेल्या 'मासेस' मध्ये वसंतराव या बनावटी शैलीमुळे भाव खाऊन जात. पण विक्रमभाऊंच्या वक्तृत्वात या दोघांपाशी नसलेला एक गुण अवश्य होता. निःशंक ध्येयवादाची घट्टविण त्यांच्या शब्दाशब्दात होती. त्यामुळे त्यांचे वक्तृत्व विश्वसनीय वाटे.

विक्रमभाऊंचे वक्तृत्व त्याकाळातील अन्य काही वक्त्यांप्रमाणे गणेशोत्सवी नव्हते. याचा अर्थ ते गणेशोत्सवात बोलले नाहीत असे नाही. नागपूरच्या गणेशोत्सवातील वादविवादांचे

बहुतांश फड विक्रमभाऊंनीच जिंकले. कधीकधी अशा गणेशोत्सवाची आयोजक मंडळी विक्रमभाऊंना 'पाडण्या' चा राजकीय मत्सरबुद्धीने प्रयत्न करीत. पण ठोस युक्तिवाद, विश्वसनीय माहिती आणि आक्रमक शैली यांच्या बळावर विक्रमभाऊंनी हे वादविवाद किंवा परिसंवाद जिंकले.

गणेशोत्सवासारखी प्रासंगिक निमित्ते, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासारखी विराट पण तात्कालिक आंदोलने, गोवा मुक्ति संग्रामासारख्या राष्ट्रीय महत्वाच्या छोट्या चकमकी यामध्ये आपल्या वक्तृत्वाचा सहभाग देत विक्रमभाऊंचे वक्तृत्व पुढेपुढे जात होते. नागपूर हिंदूमहासभेचे सर्वेसर्वा झाल्यावर त्यांची एकट्याचीच स्वतंत्र व्याख्याने नागपूरात होऊ लागली. वातावरणात प्रक्षोभ वाढवू लागली.

अेक अविस्मरणीय सभा

मला आठवते विक्रमभाऊंची ती एक अविस्मरणीय सभा. नागपूरच्या संघभवनासमोरच्या मोकळ्या पटांगणात ती सभा होती. विषय प्रक्षोभक. एका मुसलमान गुंडाने एका बौद्ध बालिकेवर बलात्कार केला. जबलपूरच्या दुदैवी उषा भार्गव प्रकरणानंतरची ती घटना. पण बौद्धांसह नागपूरातल्या सर्वच राजकीय पक्षांच्या छावण्या स्वस्थ होत्या. एकटे विक्रमभाऊ पेटून उठले. त्या सभेला अध्यक्ष कोण होता ? छत्रपती शिवाजी महाराज ! होय, छत्रपती शिवाजी महाराजांचे, शिवाजी मंडळासाठी विक्रमभाऊंनीच सिद्ध करवून घेतलेले लाकडी मानचित्र, व्यासपीठावर होते. तेच अध्यक्ष. लाकडी मानचित्राची (कट आऊट्स) तऱ्हा आता राजकारणात सर्वरूढ झाली पण नागपुरात तिची ओळख करून देण्याचे काम बहुधा विक्रमभाऊनींच केले.

विक्रमभाऊंनी सुरूवात केली, "आजच्या सभारंभाचे अध्यक्ष श्री शिवाजी महाराज आहेत. कारण स्त्रीच्या शीलाचे रक्षण करण्यासाठी भावी काळात प्रतिज्ञाबद्ध होणे हाच या सभेचा हेतू आहे. आजच्या सभेचे प्रयोजन स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना देहदंड देणे हे आहे. अशा सभेला श्री शिवाजी महाराजांशिवाय अध्यक्ष कोण योग्य होणार?" विक्रमभाऊंच्या या घनगंभीर प्रारंभाने सभा स्तब्ध झाली. मग त्यांनी छत्रपतींच्या जीवनातील प्रसंग सांगून श्रोत्यांची मानसिकता प्रयोजनाला अनुकूल करून घेतली. मग काय? सगळे शब्द त्वेषाचीच पेरणी करत गेले.

शब्दांचा लाव्हा

विक्रमभाऊंचे असेच एक ज्वालग्राही भाषण मी १९६४ च्या मे महिन्यात खामगांवच्या 'फरशी' वर ऐकल. जरी वेळ रात्री आठची होती तरी वायुमानात विदर्भातल्या कुख्यात झावा वाहात होत्या. त्यात भर पडली विक्रमभाऊंच्या शब्दांच्या 'लाव्हा' ची. झावा लाव्हाच्या या विळख्यात त्या फरशी वर एखादा मुसलमान सापडला असता तर तो तेथल्या तेथे मरून

पडला असता इतके ते भाषण यवनविरोधी होते. त्याहीवेळेस मार्क्सवादाचे कवच माझ्या मेंदूभोवती होते म्हणून बरे नाहीतर विक्रमभाऊंच्या त्या शब्दाचा लाव्हा माझ्या मेंदूत शिरून कायमचा घट्ट झाला असता.

भावना भडकावणारा वक्ता म्हणून हळूहळू त्यांचे नाव नागपुरात आरक्षीमध्ये कुख्यात होऊ लागले. विक्रमभाऊंना त्यांची क्षिती नव्हती. मुसलमानांच्या पक्षपाती शासनाच्या लेखी आपण अपराधी झालो तरी चालेल पण संगिनीच्या छायेखाली जे मज गावया लावतील पवाडे, वाणी तयांना विकेन तर मी गुन्हेगार ठरेन ! अशा धारणेने ते आपल्या पद्धतीने भाषणे करितच राहिले. कधी ते नागपूरच्या सीताबर्डी किल्यावरील देशद्रोही कर्नल ईस्माईलची दुष्ट नीती रामदासपेठेतील आपल्या प्रकट सभेत मूठभर जनतेच्या निदर्शनास आणत. कधी ते शिवछत्रपतींचाअपमान करणाऱ्या जहि रुद्दिन या वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्याच्या शिस्तेसाठी आपले शब्दसंधान उपयोगात आणत. निवडणुकीच्या काळात हा आपला शब्दशस्त्रसाठा त्यांनी संघ-जनसंघ- भाजप यांच्यावर भाडिमार करण्यात (या) घालवला. त्यावेळच्या त्यांच्या चौकसभा एका बाजूला त्यांच्या मतांची संख्या कमीकमी करीत गेले. दुसऱ्या बाजूला संघ विरोधी कांग्रेस, सामाजवादी पक्षात त्यांच्या चाहत्यांची संख्या वाढवित गेले हे चाहते पुढे त्यांना व्यावहारिक आणि सार्वजनिक जीवनात उपयुक्त ठरले.

वक्तृत्वाचे ऐतिहासिक योगदान

विक्रमभाऊंच्या आयुष्यातील प्रज्वलंत पर्व सूरू झाले. नागपूरला निधडा संपादक मिळाला. पण बेधडक वक्ता आठवणीत गेला. विक्रमभाऊंचे व्यक्तिमत्व स्थानिक चौकटीतून बाहेर पडले. हिंदूमहासभेच्या राजकारणामूळे ते प्रांतिक पातळीवरून राष्ट्रीय परिघापर्यंत पोचले. मुंबई , पुणे, सातारा, सांगली, नांदेड, सोलापूर, पंढरपूर, पाचगणी, महाबळेश्वर ही शहरे आता त्यांच्या शब्दांनी दणाणू लागली. त्या त्या शहरातील संवेदनाक्षम वस्त्या त्यांच्या शब्दांनी हादरून गेल्या. आजच्या महाराष्ट्रातील शिवसेनेच्या प्रभावक्षेत्राची आपण ऐतिहासिक दृष्टिने तपासणी केली तर आपल्या हे लक्षात येईल की ज्या ठिकाणी विक्रमभाऊंचे शब्द वातावरणात टिकले त्या ठिकाणी पुढे शिवसेनाच वाढली. तिने क्रूापतखोर मुस्लिम आणि लाडावलेले दलित यांच्यामुळे बिघडलेला सामाजतोल सावरला. ज्या ठिकाणी विक्रमभाऊंचे शब्द विरले ती ठिकाणे पंचमस्तभीयांची बिळे म्हणून सुरक्षितच राहिली.

महाराष्ट्राच्याबाहेर, देशाच्या अन्य भागात थोडे वेगळे घडले. अटलबिहारी बाजपेयी किंवा अर्धेन्द्रू भूषण बर्धन यांच्याइतकी अपूर्व हिंदी भाषिक वक्तृत्व गुणवत्ता विक्रमभाऊंना कधीच प्राप्त करता आली नाही. त्यामुळे त्यांचे वक्तृत्व साध्वी ऋतंभरा किंवा उमाभारती यांच्या प्रमाणे 'भडकाऊ' श्रेणीचेच राहिले. पुन्हा साध्वी ऋतंभरा किंवा उमाभारती यांच्या शब्दांची पत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आजन्म प्रचारकांमुळे राखली गेली. विक्रमभाऊंच्या

हिंदूमहासभा पक्षात अशा चिकाटीच्या मानसिकतेचे कार्यकर्ते नव्हते. त्यामुळे विक्रमभाऊंच्या भाषणात ध्वनीनाद झाले. फटाक्यातल्या लडीप्रमाणे त्यांचे सहकारी नेते कार्यकर्तेही केव अनुकरणात्मक आवाजच काढीत राहीले. आवाजाच्या आकर्षणात भाषणातील प्रस्फोटक मूलद्रव्य वाया गेले. तरीही, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नंतर हिंदूमहासभा या राजकीय पक्षाच्या नावाचा उच्चार भारताच्या कानाकोपऱ्यात केवळ विक्रमभाऊंच्या भाषणामुळेच झाला, हे सत्य स्वीकारावेच लागेल.

देशभक्तीचे बीजारोपण करणारे वक्तृत्व

१९७० पुढच्या काळात विक्रमभाऊंच्या वक्तृत्वाला नागपूर बहुशः मुकले. तरीही आणिबाणी काळात त्यांच्या अमोघ शब्दशक्तीचा पडताळा एकदा आलाच. संदर्भ होता हुतात्मा मदनलाल धिंग्रांचा अस्थिकलश भारतात आणला गेला त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा. स्थळ होते. सी पी अँड बेरार महाविद्यालयाचे सभागृह. तरूण विद्यार्थ्यांनी खच्चून भरलेले. उथळ वक्ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर बोलताना प्राधान्याने सोयीस्कर ठरणाऱ्या हास्यरसप्रधान शैलीचा अंगिकार करतात. पण मदनलालजींचे रोमहर्षक जीवनचरित्र सांगताना विक्रमभाऊंनी अविष्कार घडवला तो वीर, रौद्र आणि करूण रसाचा. आपल्या धीरगंभीर वाणीने मदनलालजींचे मृत्युपत्र विक्रमभाऊंनी ऐकवले. तरुण श्रोते अश्रू ढाळू लागले. भाषणाच्या शेवटी या शब्द सेनापती ने विद्यार्थी सैनिकांना आवाहन केले, मदनलाल धिंग्राच्या जयजयकाराचे. तात्काळ मदनलाल धिंग्रा अमर रहे अशा वक्ता - श्रोत्याच्या सादप्रतिसादात्मक घोषणा सुरु झाल्या. महाविद्यालयाच्या भींतीना अलीकडच्या काळात आर्केस्ट्राच्या मागर्णासाठी अमुक तमुक मुर्दाबाद अशाच घोषणा ऐकण्याची सवय. त्या भींती या 'अमर रहे' च्या घोषणांनी रोमांचित झाल्या. वातावरणाचे क्षणात शुद्धीकरण करण्याचा चमत्कार विक्रमभाऊंनी घडवून आणला. देशभक्तीचे नसानसात बीजारोपण केले.

प्रतिशोधाची भावनाही आवश्यक

विक्रमभाऊंचे आणखी एक भाषण माझ्या लक्षात अगदी वेगळया कारणांकरिता राहीले आहे. ती सभा नगरभवनाच्या पटांगणांत झाली. बहुदा अखंड भारत दिना निमित्त असावी. मुख्य वक्ता म्हणून विक्रमभाऊंनी, ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याकरिता आपल्या देशभक्तांनी केलेल्या स्वातंत्र्यलढयाचे रोमहर्षक वर्णन पूर्वार्धात केले. फाळणीची शोकांतिका चित्तथरारक शैलीने सांगितली आणि नेहमीच्या शैलीत, 'पाकिस्तान नष्ट करून समर्थ बलवान अखंड भारताची निर्मिती केल्याशिवाय आपला स्वातंत्र्य लढा पूर्ण होणार नाही,' असे प्रतिपादन केले. पण या भाषणाची अखेर मात्र असामान्य पद्धतीची होती. ते म्हणाले, "केवळ अखंड भारताची निर्मिती करून आपल्या पिढीचे कर्तव्य संपणार नाही," अशी जरब आपण साऱ्या जगात निर्माण केली पाहिजे. 'ग्रेट ब्रिटनने' भारताला दिडशे वर्ष गुलाम

गिरीत डांबले. याची शिक्षा म्हणून, आता दुर्बल झालेल्या 'ग्रेट ब्रिटन' ला बलवान भारताने भविष्यातील एखादी संधी साधून जिंकले पाहिजे. प्रतिशोध म्हणून! सूड म्हणून !

मात्र ज्या प्रमाणे आपल्या हिंदु तत्वज्ञानाला दास्यता स्विकारणे मान्य नाही. त्या प्रमाणे अन्य लोकांना आणि देशांना दास्यात डांबणे ही मान्य नाही! परंतु दास्यता गुलामगिरी कशी असते आणि तिच्या वेदना किती तीव्र असतात याची जाणीव ग्रेट ब्रिटनला घडावी म्हणून, दिडशें वर्ष नाही तरी प्रतिकात्मक किमान दिड दिवासाच्या दास्यात भारताने डांबले पाहिजे! म्हणजे पुन्हा अन्य कोणाचीही भारतावर आक्रमण करण्याची हिम्मत होणार नाही!! प्रतिशोधनाची - सूडाची भावनाही जिवंत पणाचे लक्षण म्हणून आवश्यक असतेच असते. समारोपाच्या या वाक्यावर उपस्थितांनी टाळयांचा कडकडाट केला, हे वेगळे नमुद करावयास नको.

प्रगाढ खोली धीरगंभीर वाणी

अलिकडच्या काळात विक्रमभाऊंची दोन चांगली भाषणे ऐकण्याचा योग आला. पहिले होते नागपूरच्या ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या सभेतील स्वा. सावरकरांच्या आठवणी सागणारे. प्रक्षुब्ध सागराचे लाटांचे तांडव थांबावे पण प्रगाढ खोली आणि धीर गंभीर वाणी हे आपले गुणधर्म त्याने विसरु नये याचा प्रत्यंतर देणारे ते भाषण होते. तात्यांचं घरगुती दर्शन, फुलामुलांना त्यांचे जपणे (उदा. विहीरीत अधिक वाकून पाहू नका हे मुलांना बजावणे इ.) इ. आठवणीनी विक्रमभाऊंनी सहजगत्या शैलीत घडविले "आपल्या पुढच्या सात पिढयांना पुरेल एवढी देशभक्ती आम्हा तिघा भावांनी केली आहे. त्यामुळे तू ती न केलीस तरी चालेल. माझ्या पत्राचा उपयोग होऊन तुला एखादी चांगली चाकरी मिळेल" हा तात्यांचा उपदेश सांगून काकाने पुतण्याची काळजी कशी वाहिली हे विक्रमभाऊनी सूचविले. शांतरसाने सुरू झालेले भाषण पुढे सावरकरी राजकारणावर येताच देशभक्ती रसाने ओतप्रोत भरून गेले. "सावरकर कुळात मी जन्माला आलो. हा केवळ योगायोग आहे. तसे झाले नसते तरीही आम्ही सावरकरांना थोरच मानले असते आणि देशभक्तीचे सतीचे वाण मुद्दामच घेतले असते. आजच्याप्रमाणेच सुरू ठेवले असते. कारण हिंदुराष्ट्राची ती अपरिहार्य मागणी होती." असे विक्रमभाऊंनी शेवटी आत्मविश्वासाने सांगितले

म्हणजे हे काही महापुरूषाच्या सावलीत वाढलेले नाजुक झाड नव्हते. तो होता महापुरूषाच्याच बीजाचा त्याच्याच रांगेत पण काही अंतरावर स्वतंत्रपणे वाढलेला महावृक्ष. तेवढी प्रचिती मला या भाषणाने नक्कीच दिली.

विक्रमभाऊंचे दुसरे भाषण होते साहित्य सभारंभातील माझ्या 'संहार' या कादंबरीच्या प्रकाशनसभारंभात वक्ता म्हणून त्यांची प्रमुख उपस्थिती होती. आचार्य सतीश शास्त्री यांचे अभ्यासपूर्ण वक्तृत्व, सरदार अटल बहादूर सिंह यांचे अंतरीच्या उमाळयातून उमटलेले भावुक शब्द, अर्धेन्दूभूषण बर्धन यांचे नेमके भाष्य यांच्या प्रमाणेच ठाम प्रतिपादन ठोस मुद्दे आणि

सहृदय टीका यामुळे विक्रमभाऊंचेही ते भाषण साहित्यरसिकांची वाहव्वा घेते झाले. ग्रंथसमीक्षेच्या दालनात एका नव्या गुणग्राहकाचा प्रवेश झाला होता. शल्य इतकेच होते की राजकारणाच्या रणधुमाळीमुळे साहित्यिकांच्या सभेत यायला विक्रमभाऊंना खूप उशिरा सवड मिळाली.

प्रज्वलंत - पर्व

माझे हे विधान मौखिक समीक्षेपुरते मर्यादित आहे. एरवी विक्रमभाऊंनी उत्तम कलासमीक्षा केली आहे. प्रसंगाविशेषी साप्ताहिक प्रज्वलंत मधून. प्रज्वलंत पर्व हे विक्रमभाऊंचे महापुरूषत्व सिद्ध करणारे कार्य आहे. अखंडपणे, ध्येयवादी निष्ठेने आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याइतपत व्यवहारीपण सांभाळून विक्रमभाऊंनी गेल्या पंचवीस वर्षात प्रज्वलंतचे सहस्रो अंक काढले. 'सोबत' प्रमाणे 'प्रज्वलंत' महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर आपला ठसा उमटवू शकले नाही हे खरे आहे. पण सोवत प्रमाणे फुले आंबेडकर यांच्यावर चिखलफेक करणारी अभिरूचिहीनताही प्रज्वलंत ने दाखवली नाही. बाटगेपणा आणि कोडगेपणा ही 'सोबत' च्या संपादकांची विकृती प्रज्वलंतच्या संपादकाच्या ठिकाणी कधीही उद्भवली नाही. 'सा. माणूस' ने अल्पकाळ जिवंत राहून मराठी वाचकांसमोर आव्हानांची नवनवी क्षेत्रे उभी केली. जेणेकरून मराठी वाचकांची पराक्रमशीलता वाढली. सा. माणूस ने लेखकांना उड्डाणासाठी नवी क्षितीजे उपलब्ध करून दिली. विजय तेंडूलकर, अनिल बर्वे, पारगावकर, माजगावकर ही लेखक मंडळी माणूसमधूनच बलवान झाली तिने इतरांना बलवान केले. प्रज्वंलत चे तेवढे ऐतिहासिक कार्य नाही. पण परिस्थितीशरणतेने 'माणूस' ला गाडले. 'माणूस' चे संपादक दुबळे निघाले म्हणून गाडले गेले. उलट 'प्रज्वलंत' चा संपादक आर्थिक झंझावातातही मातीत मिळाला नाही. विदर्भातील नियतकालिकांच्या 'कावळया च्या छत्र्यां' शी तर 'प्रज्वलंत' ची तुलनाच नको. प्रज्वलंतच्या स्थापना तिथीपासून आजतागायत विदर्भात किती साप्ताहिके निघाली, त्यांनी किती बढाया मारल्या होत्या, त्यांच्या पाठीमागे पैशाचे पाठबळ असूनही त्यांना बैठका का माराव्या लागल्या. इत्यादीची माहिती काढली तर नुसत्या 'टिकण्या ' मध्येही प्रज्वलंतची श्रेष्ठता सिद्ध होते.

चांगल्या प्रेमकथा लिहिल्या

प्रज्वलंतच्या निमित्ताने विक्रमभाऊंच्या मी आधिकाधिक सहवासात येत गेलो. कारण पत्रकारिता हे माझेही एक स्वप्न होते. 'प्रज्वलंत' ची काही वर्षे माझ्या दृष्टीने खरोखरच मंतरलेली वर्षे होती. 'प्रज्वलंत' मध्ये विक्रमभाऊंनी माझ्यासाठीच एक चित्रपट परीक्षणाचे सदर सुरू केले. माझे चित्रविजय हे नामकरणही त्यांनीच केले. पण अपवादात्मक प्रसंगी त्यांनीही चित्रपट परीक्षणे केली. राजकपूर च्या 'मेरा नाम जोकर' चे प्रज्वलंत मधून त्यांनी जे परीक्षण केले ते एक ललितमधुर भावकाव्यच होते. विक्रमभाऊंचा पिंड मूलतः

साहित्यिकाचा नाही. अस्वस्थ झाले आणि ललित लेखन केले असे त्यांच्याबाबतीत सहसा घडले नाही. तो त्यांचा प्रकृतीधर्म नव्हता. काकापेक्षा पुतण्या चा स्वभावधर्मच भिन्न होता. तात्या मूलतः संवेदनाक्षम साहित्यिक होते, विक्रमभाऊ मूलतः प्रक्षुब्ध राजकारणी आहेत तरीही वेळेची मागणी म्हणून त्यांनी टोपणनावाने काही चांगल्या प्रेमकथा लिहिल्या आहेत. शृंगारात त्यांची लेखणी रमू शकते हे मला माहित आहे. संभाषणात किंवा भाषणात प्रसंगी औचित्य न पाळताही स्त्रीपुरूषसंबंधाबाबत त्यांनी मुक्तचिंतन केले. तेच त्यांनी ललित लेखक म्हणून प्रकट केले असते तर विजय तेंडुलकरी वळणाचे किंवा जयवंत दळवी यांच्या तोडीचे 'प्रौढ' लेखक म्हणून ते गाजले असते पण तसे झाले नाही.

मात्र प्रज्वलंत ला साहित्यरूप देण्यासाठी ज्या ज्या सूचना केल्या गेल्या त्या त्या त्यांनी अंमलात आणल्या त्यामुळे प्रज्वलंत मध्ये चित्रपट नाटकांची परिक्षणे येत गेली. कविसम्मेलनाचे वृत्तांत येत गेले. कथा, कविता, कादबंऱ्या प्रसिद्ध होत गेल्या. प्रभाकर पणशीकर, रमेश देव, आशा काळे, मनोजकुमार, दिलीपकुमार या ख्यातनाम कलावंताच्या मुलाखतीही येत गेल्या. प्रज्वलंत च्या एका दिवाळी अंकासाठी तर चक्क त्यांनी स्वतः विनोद सम्राट राजा गोसावीशीही वार्तालाप केला

मथळ्यांमधील मार्मिकता

एक परिपूर्ण प्रतिष्ठित साप्ताहिक म्हणून प्रज्वलंत टिकवण्याचा त्यांनी काही काळ प्रयत्न केला. चौफेर पाहाणारी संपादकीय दृष्टी त्यांच्यापाशी आहे. संपादकापाशी अपेक्षित धडाडी त्यांच्यापाशी आहे. प्रसंगविशेषी दाखवावे लागणारे व्यावसायिक किंवा व्यावहारिक कौशल्य त्यांच्यापाशी आहे. दै. मराठा मध्ये आचार्य अत्र्यांच्या सहवासात काही काळ घालवल्यामुळे लेखांना किंवा वार्तांना आकर्षक शीर्षक देणे त्यांना साधते. १९७१ मध्ये ज्यावेळेस संपूर्ण देशात इंदिरा विरोधकांचे पानिपत झाले. त्यावेळेस नागपूर मध्ये श्री. जांबुवंतराव धोटे कॉंग्रेसला पराभूत करून निवडून आले. जनसंघाच्या कुजबुज अभियानात त्यावेळी मोकळेपणाने इंदिराजींना श्रेय न देता, 'ही काहीतरी मतपत्रिका ना लावण्यात येणाऱ्या शाईची किमया आहे' असा प्रचार होत होता. त्यावेळेस श्री बाळ ठाकरे हे देखील या प्रचारात सामील होते. इंदिरा कॉंग्रेसचे त्यावेळेस निवडणूक चिन्ह गायवासरू होते, याचेही काही लोकांन वैषम्य होतेच. हे सर्व संदर्भ लक्षात घेऊनही नागपुरात जांबुवतराव धोटे निवडून आले, त्यावेळेस विक्रमभाऊंनी प्रज्वलंत मध्ये मार्मिक मथळा दिला. "शाईचा, गाईचा नि बाईचा पराभव करून जांबुवंतराव धोटे निवडून आले." कधी विजय तेंडुलकरांच्या सखाराम बाईंडर य नाटकाचा निषेध करण्यासाठी लिहिलेल्या लेखाला त्यांनी आत्रेय पद्धतीने मथळा दिला. "सखाराम बाईंडर आणि त्याचा बाप". महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी नागपूर अधिवेशनाचा म्हणजे हुर्डापार्टी अधिवेशनाचा चुरचुरीत शैलीत समाचार घेणाऱ्या आपल्या एका अग्रलेखाला त्यांनी मथळा दिला, "आली आली वसंत सेना आली," त्यावेळचे महाराष्ट्राचे

मुख्यमंत्री रसिक श्री वसंतराव नाईक हे होते. हे माहित करून घेतले की या शीर्षकाची खुमारी अधिक वाढते. नागपूरचे हिस्लॉप महाविद्यालय म्हणजे एकेकाळचे पवित्र ज्ञान मंदिर. पण प्राचार्य भगत यांच्या कारकीर्दीत या मंदिराचे 'मालखान्या'त परिवर्तन झाले. जेथे गुरूवर्य डॉ. शं. दा. पेंडसे आणि गुरूवर्य डॉ. अ.ना. देशपांडे यांनी ज्ञानयज्ञ चालविले तेथे राक्षस प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांच्या आणि तशाच काही प्राध्यापकांचा हैदोस सुरू झाला. त्याला आशीर्वाद होता प्राचार्य भगत यांचा. विक्रमभाऊंनी प्रज्वलंतच्या माध्यमातून हे प्रकरण धसाला लावले. तडीस नेले. प्राचार्य भगतांना त्यागपत्रच द्यावे लागले. हिस्लॉप चे शुद्धीकरण झाले. विक्रमभाऊंनी प्रज्वलंत च्या पुढच्या अंकात मथळा दिला, "भगतासुराचा अंत".

तात्पर्य, संपादकाच्या ठिकाणी अपेक्षित असणारी कल्पकता विक्रमभाऊंच्या ठिकाणी आहे. पण दुर्दैव पुढे पुढे हिंदुमहासभेच्या कुंडीत प्रज्वलंत पूर्णपणे बंदिस्त झाल्यामुळे पुनरुक्तीमय घोषणावाक्याचे मथळे 'प्रज्वलंत' मध्ये इतके यायला लागले की प्रज्वलंत हे नाव नसलेला कागदा चा तुकडा जरी एखाद्या घोषणावाक्यासह हातात आला तरी निश्चिती व्हावी की हा प्रज्वलंत चा अंक आहे.

धर्म कुळ-गोत्र सारे हिंदुसभा

मला माहित आहे की मी हिंदुमहासभेवर करीत असलेली टीका स्वतः विक्रमभांऊना आवडणार नाही. एकवेळ व्यक्तिशः त्यांच्यावर कोणी राग व्यक्त केला तर ते शांतपणे गिळून टाकतील. पण हिंदुमहासभा! त्यांचे गोत्र, कुळ धर्म सारे काही हिंदुमहासभा. अगदी चितेपर्यंत सुद्धा आपल्याला सोबत करील तो अन्य कोणी नव्हे तर हा कृपाण कुंडालिनी स्वस्तिक अंकित हिंदुमहासभेचा भगवा ध्वज अशी, त्यांची निश्चिती आहे. ही त्यांची निष्ठा महाराणा प्रताप, छत्रपती संभाजी महाराज, गुरू गोविंद सिंह, हुतात्मा भगतसिंह या महापुरूषांच्या पंक्तीत त्यांना बसविणारी निश्चित आहे. पण मी तरी काय करू? आमच्या सारख्या 'का पुरूषां -' ना या निष्ठेचे तेज सहन होत नाही.

हिंदुमहासभेच्या तिकीटावर त्यांनी १९७३ मध्ये लढवलेली मुंबई लोकसभेची पोटानिवडणूक हा, चांगले गुटगुटित होऊ लागलेल्या प्रज्वलंतला झालेला अपघात होता. असे मला वाटते. या अपघातात प्रज्वलंत दगावला नाही हे खरे पण तो कायमचा पंगू झाला हे ही खरेच.

विक्रमभाऊचे हिंदुमहासभेचे राजकारण हा एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. गौरवपर लेखात त्याची विस्ताराने चर्चा अप्रासंगिक आहे. कदाचित तो विस्तार विक्रमभाऊंना अन्याय करणाराही ठरू शकेल.

या विषयावर त्यांची माझी एकांतात किंवा काही मोजक्या मित्रांसमवेत तासन तास चर्चा झाली आहे. कडाक्याचे वादही झाले आहेत. पण माझी मते मी त्यांना पटवुन देऊ शकलो नाही. त्यांची धोरणे मी कधीच स्वीकारू शकलो नाही.

राजकारणात ग्लासनोस्त नाही.

झुंझार पुरोगामी या त्यांनीच स्थापन केलेल्या युवक संघटनेत मी काही काळ काम केले. पण या संघटनेला हिंदुमहासभेची बंधुशाखा यापेक्षा वेगळे रूप येणे शक्य नाही हे दिसताच मी त्या झुंपु पासून वेगळा झालो. प्रसंगोपात्त माझ्या सूचनांचा आदर राखला गेला तरी हिंदुमहासभेचे मुखपत्र ही प्रज्वलंतची सीमारेखा ओलांडायला विक्रमभाऊ कधीच तयार होणार नाहीत हे अनेकदा सिद्ध झाल्यावर माझी प्रज्वलंत शी बांधिलकी (कमिटमेंट) तुटली. गांधी आणि गोडसे या व्यक्तीबद्दल त्यांचे नि माझे आकलन मुळातच भिन्न आहे. उद्या विक्रमभाऊंच्या हाती महाराष्ट्राची सत्ता आली आणि गावागावात नथुराम गोडसे चे पुतळे उभारण्याची श्री. छगन भुजबळ यांची इच्छा त्यांनी पूर्ण केली तरी मी कधीही गोडसे ला हुतात्मा मानणार नाही. अर्थात गांधीजींना मान देण्याचे सोडणार नाही. मी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा सक्रीय सहानुभूतीदार असूनही राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणि कम्युनिस्ट यांच्या संबधाचे पुनरावलोकन व्हावे असे लेखी मत मी मांडत असतो. कम्युनिस्ट आंदोलनात माझ्या मताची आता कुचेष्टा होत नाही. पण विक्रमभाऊसारख्या हिंदुत्ववाद्याच्या मनात आणि गेल्या अनेक वर्षापासून केवळ त्यांचा प्रतिध्वनी असलेल्या हिंदुमहासभा पक्षात मात्र यासंबंधात अद्यापही हवा तितका ग्लासनोस्त (ओपन माईंडेडनेस - मनमोकळेपणा) आणि पेरेस्ट्रोईका (पुनर्मूल्याकन) नाही याचे मला आश्चर्य वाटते.

प्रच्छन्न कम्युनिस्ट

आज, आम्हा दोघांच्या राजकीय वाटा वेगवेगळ्या आहेत. अर्थात, आज मार्क्सवादाच्या पडत्या काळातही विक्रमभाऊ त्याची अवहेलना करीत नाही यांची मला जाण आहे. कम्युनिस्ट पक्षांविषयी त्यांच्याही मनाच्या एका कोपऱ्यात कायमची सहानुभूती आहे. हिंदुमहासभेच्या व्यासापीठावरून केलेल्या एका अध्यक्षीय भाषणात त्यांनी कम्युनिस्टापुढे सहकार्याचा हात पुढे केला. हिंदुत्वाचा विटाळ मानणाऱ्या कम्युनिस्टांनी त्या भाषणाची दखल घेतली नाही. पण त्या दुर्लक्षित भाषणासाठी विक्रमभाऊंना प्रच्छन्न कम्युनिस्ट म्हणणारे महाभागही काही कमी नाहीत.

अनेकांना व्यवसाय चाकरी साठी सहकार्य

'आम्हाला कोणतेही काम द्या, नाहीतर एकवेळचा भोजन भत्ता द्या,' ही घोषणा करून नागपुरात सन १९६७ मधे बेकारी हटविण्यसाठी संघटीत करण्यात आलेल्या जन आंदोलनात विक्रम भाऊंचा सिंहाचा वाटा होता. कोणतेही काम करण्यास सिद्ध असलेल्या १५ ते ३५ वयोमर्यदितील शेकडो व्यक्तींना या चाकरीमुळे खाजगी क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या. पुढे जन आंदोलनाचा मार्ग राजकीय वळणाने गेला. जिल्हा कचेरीवर मोर्चा, मोर्चावर लाठीहल्ला, नेत्यांची अटक कालांतराने सुटका इत्यादी टप्पे पार पडले. या आंदोलनाचे प्रतिसाद त्यानंतर नागपुरला

संपन्न झालेल्या विधान सभेत उमटले. वाढत्या बेकारीकडे शासनाला लक्ष द्यावे लागले. काही तुटपुंज्या - तात्पुरत्या योजनांची 'घोषणा' झाली. नेहमी प्रमाणे आश्वासना वर ते प्रकरण थांबले.

परंतु गरजु व्यक्तीला नोकरी-व्यवसाय मिळवून देण्यासाठी विक्रमभाऊंनी सदैव आपल्यापरी संपूर्ण सर्वांगीण सहकार्य देण्याचे काम सतत चालविले. कोणाला दूरध्वनी करून आवश्यक तर काही बडया व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून तर आवश्यकते नुसार संबंधितांना चिठ्ठया पत्रे देऊन त्यांनी गरजु व्यक्तींना सहाय्य केले. तेही निरपेक्षपणे. आपले काम झाल्यावर विक्रमभाऊंना तसे कळविण्याचीही आवश्यकता काहींना वाटली नाही. मात्र काही जाणीव ठेवणाऱ्या व्यक्ती विक्रमभाऊंना धन्यवाद देण्यासाठी येत तेव्हा, 'तुमच्या गुणवत्तेमुळे तुमची निवड झाली. पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा,' असे उत्तर देऊन ते मोकळे होत!

सावरकर समितीचे कार्य

पक्षानिष्ठेच्या मर्यादा त्यांच्या राजकीय कर्तृत्वाला पडल्या तरी व्यक्ती म्हणून त्यांचे महापुरूषत्व कायम राहिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे त्यांना सर्व राजकीय पक्षात मित्र मिळाले. नागपूरच्या शंकरनगर चौकाचे स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, असे नामकरण झाले ते तत्कालीन महापौर भाई भगंवतराव गायकवाड यांच्याशी विक्रमभाऊंचा असलेल्या घनिष्ठ मैत्रीमुळे. या चौकात स्वातंत्र्य वीरांचा पुतळा उभारला जावा म्हणून सर्व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीच्या स्वाक्षऱ्या मिळाल्या या केवळ विक्रमभाऊंच्या त्यांच्याशी असलेल्या घनिष्ठ वैयक्तिक संपर्कामुळे. महापालिकेतील काही 'विघ्न' संतोषी सनदी नोकरांनी या जागेवर काही काळ अतिक्रमण केले. त्यावेळेस विक्रमभाऊंनी प्रा. प्रमोद सोवनी या आणि बाबुराव देशपांडे, आनंदराव दामले इ. झुंजार सहकाऱ्यांसह (आजचे सावरकर समितीचे महासचिव) तेथे धरणे दिले. अतिक्रमण हटवताना तत्कालीन महापौर सरदार अटलबहादुर सिंह यांनी पत्रपरिषदेत घोषित केले की, "विक्रम सावरकर यांची आणि माझी मैत्री इतकी घनिष्ठ आहे की त्यांनी मला नुसता दूरध्वनी केला असता तरी अतिक्रमण हटवण्याचा आदेश मी दिला असता." श्री अटलबहादुरसिंह हे जयप्रकाशजी आणि डॉ. लोहियांचे अनुयायी, कै. पु. भा. भावे यांच्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पर्वात पुण्याच्या समाजवादी उपटसुंभानी भाव्यांना खूप मनस्ताप दिला. पण नागपुरात मात्र विक्रमभाऊंशी असलेल्या व्यक्तिगत संबंधामुळे अटलबहादूर सिंह यांनी भाव्यांच्या नागरी सन्मानात तनमनधनाने सहभाग दिला. जसा आचार्य अत्र्यांशी छत्तीसाचा आकडा असूनही एकेकाळचे कट्टर कॉंग्रेसी महापौर श्री. त्र्यं. गो. देशमुख यांनी केवळ विक्रमभाऊंवरील वैयक्तिक आत्मीयतेपोटी, विक्रमभाऊंनी अत्र्यांच्या हस्ते आयोजित केलेल्या डॉ.ना. भा. खरे दर्शन या पुस्तक प्रकाशन समारंभात तनमनधनाने सहभाग दिला तसा।

सावरकर पुतळा उभारणीचे काम अंतिम टप्प्यात होते. पैसा जमत होता. पण आम्हा

कार्यकर्त्यांची दमछाक होत होती. नागपूर महानगरपालिकेने निदान पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेला चौथरा उभारून द्यावा म्हणजे आमचा वीसपंचवीस सहस्रांचा व्यय वाचेल अशी आमची अपेक्षा होती. पण गुलाम नोकरशाही आमची उपेक्षा करत होती. त्या वेळेस श्री. रामराव आदिक नगर विकास खात्याचे मंत्री होते.

वास्तविक मुंबईत १९७३ मधे झालेल्या लोकसभा मध्यावधी पोट निवडणुकीत श्री. रामराव आदिकांच्या विरोधात हिंदुमहासभेच्या वतीने विक्रमभाऊंनी निवडणुक लढविली होती. त्या काळातच त्यांची औपचारिक ओळख झाली परंतु, कार्याचे महत्व आणि आत्मविश्वासाच्या बळावर, एक दिवशी सकाळीच विक्रमभाऊ श्री रामरावांना त्यांच्या निवासस्थानी भेटले. कामाची माहिती सांगितली. रामराव आदिकांनी तेथल्या तेथे, समितीकडून आलेल्या पत्रावर लेखी आदेश दिला, 'धिस शुड बी डन' मग मग्रूरांना या महापुरूषाची किंमत कळली.

आमचे महापुरूष तुम्हीच

पुतळा उभारणीतील नाटयाचा कळस म्हणजे प्रत्यक्ष पुतळा अनावरणाच्या दिवशी सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस आणि कॉंग्रेसमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांची एका व्यासपीठावरील उपस्थिती. महाराष्ट्राच्या इतिहासात असा चमत्कार सर्वप्रथम घडला याचे कारण सुशीलकुमारांचा विक्रमभाऊंवर असलेला पक्षनिरपेक्ष लोभ. यादिवशी श्री. बाळासाहेब देवरस आणि विक्रमभाऊ यांची सकाळी दीर्घ भेट आटोपल्यावर मी त्यांना म्हटले, "दोन महापुरूषांची भेट मी अनुभवली. आमचे महापुरूष तुम्हीच." तेव्हा ते नम्रपणे म्हणाले, "मी महापुरूष नाही पण एखाद्याने चुकून मला महापुरूषाच्या पंक्तीला बसवले तर दुसऱ्या कुणाला मला तेथून उठवण्याची इच्छा किंवा धारिष्टय होणार नाही. तेवढावेळ महापुरूष मी निश्चित सांभाळेन."

सर्वमित्र

राजकारणासारख्या असहिष्णु आणि संशयी वातावरणात स्वतःच्या विशुद्ध वैयक्तिक वर्तनाने विक्रमभाऊंनी, इतके मित्र मिळवले मग कौटुंबिक किंवा अन्य सामाजिक वातावरणात "जो लोकांशी न कंटाळे । ज्यासी लोक न कंटाळे" असे उत्तमपुरूषपद विक्रमभाऊंनी मिळवले यात आश्चर्य नाही. विक्रमभाऊंसाठी अजातशेत्रु च्या ऐवजी सर्वमित्र हा शब्द मी योजेन. कारण शक्य आहे की काहींनी त्यांचा अकारण राग केला. पण त्यांनी स्वतः मात्र वैयक्तिक पातळीवर माणसे जोडण्याचेच काम केले.

'नारायणा' ची भूमिका

वैयक्तिक संपर्कात ते अष्टावधानी आहेत. तीनचार पिढया एकत्र वावरणारा आमचा विशाल संयुक्त परिवार. प्रत्येकांचे स्वभाव वेगवेगळे. पण विक्रमभाऊ प्रत्येकाशी बोलतील

त्याच्या त्याच्या आवडीच्या विषयावर. त्यामुळे सूनबाईच्या (म्हणजे माझ्या आईच्या) नातेवाईकांच्या भेटीबाबत उदासीन असणारे आमचे ऐंशी वर्षाचे आजोबा विक्रमभाऊ आले की खुशीत विडी पेटवून त्यांच्याशी गप्पा मारीत. आमच्या वडिलांना युद्ध, क्रिकेट आणि स्वतःची प्रकृती याविषयी अन्य संभाषणात रस नाही हे जाणून विक्रमभाऊ त्यांच्याशी केवळ त्याच विषयावर गप्पा मारीत. घरातील महिला वर्गाशी ते मंगळागौरी सारख्या विषयावर सुद्धा चवीने बोलतात. आज मी सांगितले तर लोकांचा विश्वास बसणार नाही पण हे अगदी खरे आहे की आम्हा सर्वच नातेवाईक व महिला वर्गासाठी अनेक वर्षे विक्रमभाऊंनी पु. ल. देशंपाडे यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' मधील 'नारायणा' ची भूमिका वठवली. मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम आहे. मग विक्रमभाऊंना आमंत्रण. कारण वरपक्षाकडील मंडळीशी त्यांच्या इतके चतुराईने बोलणार कोण? मुलासाठी मुलगी पसंत केली. मुलीची बाहेरुन गुप्तपणे चौकशी करायची. कठीण काम "सांगा विक्रमला कारण तो लवकरात लवकर नक्की खरी माहिती काढेल." लग्नांच्या वाटाघाटी तुटू नयेत म्हणून विक्रमभाऊंची उपस्थिती अपरिहार्य. इतरांचे कशाला सांगत बसू? माझे जगावेगळे लग्न नागपूर रेल्वे स्थानकावर पक्के झाले. तेव्हा मी आपले विक्रमभाऊंना बोलावून घेतले म्हटले सगळयानाच सांभाळणारा माणूस आपल्याही जवळ असू द्यावा.

संकटग्रस्तांचे सारथ्य

अडचणींना मंगलप्रसंगाचे संदर्भ असोत की दुःखाचे सगळयांना आधार वाटतो तो विक्रमभाऊंचा. आज ते थोडे थकले आहेत पण ज्या वेळेस त्यांच्यापाशी, त्यांची काळी घोडी म्हणजे जावा फटफटी होती , त्यावेळेस तर त्यांच्या परोपरकार क्षमतेला सीमाच नव्हती. कृष्णाने सारथ्य केले ते अर्जुनाचे. पण विक्रमभाऊंनी सर्वच संकटग्रस्तांचे वेळीअवेळी सारथ्य केले. दूरध्वनीवर अक्षरशः पाच मिनिटांची पूर्वसूचना दिल्यावर एकदा त्यांनी आपली काळी घोडी काढली होती एका आप्तभगिनीला घेऊन सत्तरऐंशी किलोमीटरची एक मजली दौड केली. एका कन्येला आपल्या पित्याची अंतिम भेट घेता आली. कधी रणरणत्या उन्हाळयात रखरखत्या क्हाडचा दौराही त्यांनी फटफटी वरून केवळ लोकहितार्थ केला. पंढरपूरच्या पांडुरंगाने वेळप्रसंगी धुणी धुतली. दळण दळले. कुणाचा आवा पेटवला नागपूरच्या या पांडुरंग जामातानेही कधी कुणाला परीक्षा केंद्रावर पोचवून दिले. कधी कुणा रुग्णाईताचे डबे पोचविले तर कधी कुणाचे "मला ताप झाला म्हणून अमुकअमुक ठिकाणी कळवाल?" असे चतुर अजीजीचे क्षुल्लक निरोपसुद्धा. आपल्या उमेदीच्या काळात त्यांनी जावा वरून केलेल्या अंतराचे मापन करायचे झाले तर पृथ्वीला एक प्रदक्षिणा होईल.

तात्यांचा प्रसाद

या जावावर विक्रमभाऊंचे विशेष प्रेम होते कारण तो प्रत्यक्ष तात्यांचा प्रसाद होता.

तात्यांनी मृत्युपत्रान्वये पारितोषिक दिलेल्या द्रव्यातून त्यांनी जावा घेतली त्यामुळे वापरून वापरून तिचे 'भंगार' झाले तरी ती टाकण्याचा मोह त्यांना होईना. नंतरनंतर त्या जावाच्या दुरूस्तीसाठी त्यांनी मेकॅनिक ला वेळोवेळी इतके पैसे दिले की, तेवढ्या पैशात एक नवी कोरी स्वयंप्रेरिका आली असती.

अलौकिक दानत

मेकॅनिकने दहा रूपये मागितले की त्यांला वीस रूपये द्यायचे, विक्रमभाऊंचा हा स्वभावच आहे. नागपुरात सायकलरीक्षावाल्याने, पाच रूपये मागायचे तेवढ्या अंतरासाठी दहा रुपये मागितले तरी विक्रम्भाऊ म्हणतील 'हां बरोबर सांगितलेस, प्रत्यक्षात चिल्लर नसतील तर त्याला वीस रूपयांची नोट खुशाल देऊन टाकतील. वेगवगेळ्या लोकहितकारक कार्यासाठी पैसा उभा करण्याची, स्वतःजवळचा पैसा गरजूंना देण्याची त्यांची दानत मोठी. नागपूर प्रज्वलंत छापणारे कल्याण मुद्रणालय नेहमीच तोट्यात चालले, पण तिथले कामगार चैनीत जगले. कारण नोकराने दिवाळीसाठी शंभर रुपये अग्रीम मागितले तर 'साहेबां' नी त्याला दोनशे रूपये दिलेच म्हणून समजा. मुद्राणालयात एखाददुसऱ्या जुळाऱ्याचे वेतन निघण्याची खऱ्या अर्थाने मारामार पण मी तेथे माझे अनेक गरजू विद्यार्थी आणून पोचते केले की ज्यांचे कल्याण मुद्रणालयाने चांगल्या अर्थाने कल्याण केले. दारिद्रयाने ज्यांचे पंख कापले अशा कित्येकांना कल्याण मुद्रणालयाने नवे पंख दिले. आतां त्यातील बहुतेक मंडळी आर्थिक अवकाशात गरूडभराऱ्या मारीत आहेत.

अलौकिक दानत

विक्रमभाऊंच्या दानतीला अलौकिकतेचा स्पर्श आहे. ही अशा माणसाची दानत आहे की, स्वतःला कडकडून भूक लागली असताना खाणावळीत भाताची चौदा आण्याची थाळी बारा आण्याला मिळू शकत नव्हती म्हणून ज्याला भरल्या भातावरून आपली उपाशी नजर बळेबळे काढून परतावे लागले. ही अशा माणसाची दानत आहे की या कट्टर हिंदुसभावाल्याने आपण एक दिवासाचा उपाशी आहोत तर समोरचा कट्टर कम्युनिस्ट पक्ष कार्यकर्ता दोन दिवासाचा उपाशी आहे या भावनेने खिशातली सगळी नाणी त्याच्या खिशात बळेबळेच कोंबली ही अशा माणसाची दानत आहे की स्वतः आभाळाखाली झोपून, भावाने हाकलून दिलेल्या एका सज्जन युवकाला त्याने सुभाष कुंज चे छप्पर दिले. ही अशा माणसांची दानत आहे की आपल्या आईला नागपूर - मुंबई प्रवासात वाट व्ययासाठी जो दोन रूपयेही देऊ शकत नव्हता, त्याने काळ बदलल्यावर महाराष्ट्रातील अनेक नामवंत वक्त्यांना रेल्वे स्थानकांवर निरोप देताना वाटव्ययासाठी हिरव्या नोटा काढून दिल्या. माझ्या प्रत्येक विधानसाठी मी नावाचा पुरावा देऊ शकेन पण अखेर हा नामनिर्देश ज्याचा त्यानेच करायचा असतो. नाही का?

विक्रमभाऊंची दानत ही उधळपट्टी नव्हे. पैसा वेचण्याच्या आपल्या कृतीवर आक्षेप घेईल

त्याच्या त्याच्या आवडीच्या विषयावर. त्यामुळे सूनबाईच्या (म्हणजे माझ्या आईच्या) नातेवाईकांच्या भेटीबाबत उदासीन असणारे आमचे ऐंशी वर्षाचे आजोबा विक्रमभाऊ आले की खुशीत विडी पेटवून त्यांच्याशी गप्पा मारीत. आमच्या वडिलांना युद्ध, क्रिकेट आणि स्वतःची प्रकृती याविषयी अन्य संभाषणात रस नाही हे जाणून विक्रमभाऊ त्यांच्याशी केवळ त्याच विषयावर गप्पा मारीत. घरातील महिला वर्गाशी ते मंगळागौरी सारख्या विषयावर सुद्धा चवीने बोलतात. आज मी सांगितले तर लोकांचा विश्वास बसणार नाही पण हे अगदी खरे आहे की आम्हा सर्वच नातेवाईक व महिला वर्गासाठी अनेक वर्षे विक्रमभाऊंनी पु. ल. देशंपाडे यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' मधील 'नारायणा' ची भूमिका वठवली. मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम आहे. मग विक्रमभाऊंना आमंत्रण. कारण वरपक्षाकडील मंडळीशी त्यांच्या इतके चतुराईने बोलणार कोण? मुलासाठी मुलगी पसंत केली. मुलीची बाहेरुन गुप्तपणे चौकशी करायची. कठीण काम "सांगा विक्रमला कारण तो लवकरात लवकर नक्की खरी माहिती काढेल." लग्नांच्या वाटाघाटी तुटू नयेत म्हणून विक्रमभाऊंची उपस्थिती अपरिहार्य. इतरांचे कशाला सांगत बसू? माझे जगावेगळे लग्न नागपूर रेल्वे स्थानकावर पक्के झाले. तेव्हा मी आपले विक्रमभाऊंना बोलावून घेतले म्हटले सगळयानाच सांभाळणारा माणूस आपल्याही जवळ असू द्यावा.

संकटग्रस्तांचे सारथ्य

अडचणींना मंगलप्रसंगाचे संदर्भ असोत की दुःखाचे सगळयांना आधार वाटतो तो विक्रमभाऊंचा. आज ते थोडे थकले आहेत पण ज्या वेळेस त्यांच्यापाशी, त्यांची काळी घोडी म्हणजे जावा फटफटी होती , त्यावेळेस तर त्यांच्या परोपरकार क्षमतेला सीमाच नव्हती. कृष्णाने सारथ्य केले ते अर्जुनाचे. पण विक्रमभाऊंनी सर्वच संकटग्रस्तांचे वेळीअवेळी सारथ्य केले. दूरध्वनीवर अक्षरशः पाच मिनिटांची पूर्वसूचना दिल्यावर एकदा त्यांनी आपली काळी घोडी काढली होती एका आप्तभगिनीला घेऊन सत्तरऐंशी किलोमीटरची एक मजली दौड केली. एका कन्येला आपल्या पित्याची अंतिम भेट घेता आली. कधी रणरणत्या उन्हाळयात रखरखत्या व्हाडचा दौराही त्यांनी फटफटी वरून केवळ लोकहितार्थ केला. पंढरपूरच्या पांडुरंगाने वेळप्रसंगी धुणी धुतली. दळण दळले. कुणाचा आवा पेटवला नागपूरच्या या पांडुरंग जामातानेही कधी कुणाला परीक्षा केंद्रावर पोचवून दिले. कधी कुणा रुग्णाईताचे डबे पोचविले तर कधी कुणाचे "मला ताप झाला म्हणून अमुकअमुक ठिकाणी कळवाल?" असे चतुर अजीजीचे क्षुल्लक निरोपसुद्धा. आपल्या उमेदीच्या काळात त्यांनी जावा वरून केलेल्या अंतराचे मापन करायचे झाले तर पृथ्वीला एक प्रदक्षिणा होईल.

तात्यांचा प्रसाद

या जावावर विक्रमभाऊंचे विशेष प्रेम होते कारण तो प्रत्यक्ष तात्यांचा प्रसाद होता.

तात्यांनी मृत्युपत्रान्वये पारितोषिक दिलेल्या द्रव्यातून त्यांनी जावा घेतली त्यामुळे वापरून वापरून तिचे 'भंगार' झाले तरी ती टाकण्याचा मोह त्यांना होईना. नंतरनंतर त्या जावाच्या दुरूस्तीसाठी त्यांनी मेकॅनिक ला वेळोवेळी इतके पैसे दिले की, तेवढ्या पैशात एक नवी कोरी स्वयंप्रेरिका आली असती.

अलौकिक दानत

मेकॅनिकने दहा रूपये मागितले की त्यांला वीस रूपये द्यायचे, विक्रमभाऊंचा हा स्वभावच आहे. नागपुरात सायकलरीक्षावाल्याने, पाच रूपये मागायचे तेवढ्या अंतरासाठी दहा रुपये मागितले तरी विक्रम्भाऊ म्हणतील 'हां बरोबर सांगितलेस, प्रत्यक्षात चिल्लर नसतील तर त्याला वीस रूपयांची नोट खुशाल देऊन टाकतील. वेगवगेळ्या लोकहितकारक कार्यासाठी पैसा उभा करण्याची, स्वतःजवळचा पैसा गरजूंना देण्याची त्यांची दानत मोठी. नागपूर प्रज्वलंत छापणारे. कल्याण मुद्रणालय नेहमीच तोट्यात चालले, पण तिथले कामगार चैनीत जगले. कारण नोकराने दिवाळीसाठी शंभर रुपये अग्रीम मागितले तर 'साहेबां' नी त्याला दोनशे रूपये दिलेच म्हणून समजा. मुद्राणालयात एखाददुसऱ्या जुळाऱ्याचे वेतन निघण्याची खऱ्या अर्थाने मारामार पण मी तेथे माझे अनेक गरजू विद्यार्थी आणून पोचते केले की ज्यांचे कल्याण मुद्रणालयाने चांगल्या अर्थाने कल्याण केले. दारिद्रयाने ज्यांचे पंख कापले अशा कित्येकांना कल्याण मुद्रणालयाने नवे पंख दिले. आता त्यातील बहुतेक मंडळी आर्थिक अवकाशात गरूडभराऱ्या मारीत आहेत.

अलौकिक दानत

विक्रमभाऊंच्या दानतीला अलौकिकतेचा स्पर्श आहे. ही अशा माणसाची दानत आहे की, स्वतःला कडकडून भूक लागली असताना खाणावळीत भाताची चौदा आण्याची थाळी बारा आण्याला मिळू शकत नव्हती म्हणून ज्याला भरल्या भातावरून आपली उपाशी नजर बळेबळे काढून परतावे लागले. ही अशा माणसाची दानत आहे की या कट्टर हिंदुसभावाल्याने आपण एक दिवासाचा उपाशी आहोत तर समोरचा कट्टर कम्युनिस्ट पक्ष कार्यकर्ता दोन दिवासाचा उपाशी आहे या भावनेने खिशातली सगळी नाणी त्याच्या खिशात बळेबळेच कोंबली ही अशा माणसाची दानत आहे की स्वतः आभाळाखाली झोपून, भावाने हाकलून दिलेल्या एका सज्जन युवकाला त्याने सुभाष कुंज चे छप्पर दिले. ही अशा माणसांची दानत आहे की आपल्या आईला नागपूर - मुंबई प्रवासात वाट व्ययासाठी जो दोन रूपयेही देऊ शकत नव्हता, त्याने काळ बदलल्यावर महाराष्ट्रातील अनेक नामवंत वक्त्यांना रेल्वे स्थानकांवर निरोप देताना वाटव्ययासाठी हिरव्या नोटा काढून दिल्या. माझ्या प्रत्येक विधानसाठी मी नावाचा पुरावा देऊ शकेन पण अखेर हा नामनिर्देश ज्याचा त्यानेच करायचा असतो. नाही का?

विक्रमभाऊंची दानत ही उधळपट्टी नव्हे. पैसा वेचण्याच्या आपल्या कृतीवर आक्षेप घेईल

त्याला ते सांगतील "अगदी बाजारातली भाजीसुध्दा घासाघीस करून स्वस्तात मी आणू शकतो. कोथींबिरीच्या फुकट जुडीसह. रीक्षावाल्यालाही मी स्वस्तात हेलपाटवू शकतो. चार पैसे वाचतील पण लाखमोलाचा वेळ फुकट जाईल त्याचे काय? पुन्हा कमावलेल्या चार आण्यांनी किंवा दहारूपयांनी आपले काहीच भागणार नाही. पण तेवढेच पैसे भाजीवालीला किंवा रिक्षेवाल्याला जीवनमोलाचे उपयुक्त ठरतील."

माझ्या स्वतःपुरते मी सांगतो की राजा हरिश्चंद्राच्या तोडीची सत्वपरीक्षा दिलेल्या या महापुरूषाने आपल्या दानतीने माझ्यासारख्या हिशेबी माणसाला अनेकदा लाजवले आहे. विक्रमभाऊ स्वतः अडचणीत, त्यावेळेस नेमकी माझीही अडचण उद्भवायची मग विक्रमभाऊ सांगत "माझ्याजवळ थोडेसे आहेत तेवढे आता घेऊन जा मला काय? जिथे दहा हजार उभे करायचे तिथे अकरा हजार उभे करेन."

आमचे संबंध

माझ्या आणि विक्रमभाऊंच्या मैत्रीचे अनेकांना आश्चर्य वाटते मला वाटतं जीवनाचा आस्वाद घेण्याचा त्यांचा माझा दृष्टिकोण समान आहे. जीवनाला कर्तव्य म्हणून राबवण्याची त्यांची माझी इच्छा एकच आहे. म्हणून त्यांचे माझे अखंड तेहत्तीस वर्षे जमले असावे. अर्थात काही बाबतीत जीवनाचा उपभोग घेण्याची त्यांची क्षमता माझ्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. काही बाबतीत त्यांची रसिकता माझ्या पेक्षा वेगळी आहे. त्यांची रसिकता लौकिक जीवनात उतरू शकते. मी माझ्या रसिकतेला वाट करून देतो, माझ्या साहित्यातून!

माझ्या साहित्याची काहीएक जडणघडण विक्रमभाऊंनी केली. कथापुरूषोत्तम भाऊभास्कर भावे यांचे पहिले दर्शन मला झाले विक्रमभाऊंमुळे. नागपूरच्या धनवटे रंगमंदिरात विक्रमभाऊंच्या शिवाजी मंडळाने तिकीट लावून भाव्यांची व्याख्याने आयोजित केली होती. त्यावेळेस मला मात्र पहिल्या रांगेची विशेष अ वर्गीय आमंत्रणपत्रिका होती. नवव्या वर्गातला मी ऐटीत ज्येष्ठीश्रेष्ठींच्या रांगेत बसलो. (विक्रमभाऊंच्या ओळखीमुळे पुढे एकदा मला लताबाई मंगेशकरांचे गाणेही पहिल्या रांगेत बसून ऐकता - पाहता आले) भाव्यांचा नि माझा पुढे घनिष्ठ परिचय ही विक्रमभाऊ मुळेच झाला. माझ्या लेखनाचे त्यांनी सदोदित कौतुक केले. माझ्या 'आई' कादंबरीत वैद्यराज करमरकरांचे एक पात्र आहे. ते पात्र ज्या एका डॉक्टरवरून मी बेतले त्यांची माझी ओळख विक्रमभाऊंनीच करून दिली. या वैद्यराज करमरकरानी घेतील तितके दिवस विक्रमभाऊंना औषध फुकटच दिले. इतक्या फटकळ शिव्यांबाज माणसाचा विक्रमभाऊवर लोभ होता.

विक्रमभाऊंचे तत्वज्ञान

मला स्वतःला सर्वाधिक प्रिय असलेल्या माझ्या 'आम्ही' कांदबरीत तर कित्येक संवाद माझ्या आणि विक्रमभाऊंच्या खाजगी बैठकातील आहेत. उदा. "टु बी. ऑर नॉट टु बी मध्ये

नेहमी टु बी ला मत द्याव." अतिविचार शेवटी स्वार्थाकडे झुकतो शेवटी तो सुरक्षिततेचं बीळ शोधतो. विचारकृती हातात हात घालून चालले पाहिजेत. कृती छोटी की मोठी हे इतिहास ठरवेल. कृतीला यश की अपयश हे काळ ठरवेल. पण कृती केल्याची नोंद तर होईल. डीसीजन प्लस ॲक्शन इज लाईफ. निर्णय आणि त्यानुसार कृती हेच आयुष्य. जीवन म्हणजे कर्म. कर्म हेच जीवन. कर्म अगोदर भाष्ये नंतर (पृ ९६, ९७) हे विचार मुळात विक्रमभाऊंचे आहेत "आपण लढलो नाही लढाईची वेळ आली नाही हे खर पण अशी सवय वाईट मग सदा सर्वदाच संघर्षाशिवायच केवळ डावपेचांनी केवळ टॅक्टीसनी यश मिळवण्याची सवय लागते. ही सवय हळुहळु संघर्षाची धारच बोथट करून टाकते. पुढे पुढे यश मिळाले नाही, तरी संघर्ष करवत नाही आणखी पुढेपुढे अपयश मिळाले, तरी डावपेचांवर विश्वास ठेवण्याची आत्मवंचना सूरूच राहाते. प्रत्यक्ष संघर्ष टाळण्याची वृत्ती निर्माण होते" (प्र. ९९) या शब्दांवर नैतिक अधिकार विक्रमभाऊचा आहे.

आमच्या खाजगी बैठकात तर त्यांनी मला जीवन जगण्याचे अनेक पाठ दिले. कधी ते सांगतात, " 'अ' ने 'ब' ला मदत केली. आणि 'ब' ने त्याची परतफेड नाही केली तरी 'अ' ची मदत कधीच वाया जात नाही. कूणीतरी 'क' येऊन त्याला मदत करतो की ज्या 'क' ला 'अ' ने कधीच मदत केली नसते." कधी ते सांगतात, 'जेवढी परी मोठी तेवढी उडी मोठी' असा उडया मारण्यात ते अर्थातच पटाईत आहेत. ढोंगाचा त्यांना कमालिचा तिटकारा. एका प्रसंगात ते उद्‌गारले होते, "समाजकारणात किंवा राजकारणात वेड पडली तर गुरूने शिष्या वर सरळ प्रहार केले तरी चालतील. पण कपटनाट्य आणि मानभावीपणा करू नये."

स्वतः विक्रमभाऊंच्या व्यक्तीमत्वात दंभाचा लवलेशही नाही. राजकारणी पुरूषाच्या ठिकाणी प्रसंगविशेषी गोपनीयता असावी, नाट्यही असावे पण दंभ त्यालाही क्षम्य नाही असे विक्रमभाऊंचे म्हणणे.

आज एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या विक्रमभाऊंवर किती लिहावे? लेखक म्हणून मला विक्रमभाऊंवर चरित्रात्मक कादंबरीसुद्धा लिहिता येईल. विक्रमभाऊंना लक्ष्मणाप्रमाणे साथ देणारे त्यांचे धाकटे बंधू श्रीहर्ष भाऊंवर आणि आमच्या अतिसोशिक मूक - त्यागी मानिनीवहिनींवरही खूप काही लिहिता येईल. त्यांचे थोरले बंधू श्री अशोकदादा आणि सौ. हिमानी वहिनींविषयी ही लिहीता येईल.

लिहिता येणार नाही विक्रमभाऊंना सतत तेहत्तीस वर्षे साथ देणाऱ्या त्यांच्या सहधर्म चारिणी सौ. स्वामिनीवाहिनीवर. ते का लिहिता येणार नाही? कारण त्यांची योग्यता इतकी मोठी आहे की त्यांच्या बद्दल लिहिण्यासाठी चौदाशे वर्षे जगून कोरे राहणाऱ्या चांगदेवासारखी भांबावलेली स्थिती होते. रामाच्या सीतेसारख्या संकटाचा वनवासच पुन्हा पुन्हा त्याच्या वाट्याला आला. हरिशचंद्राच्या तारामतीसारखी त्यांचीही पुन्हा पुन्हा सत्वपरीक्षाच

झाली. संभाजी पत्नी महाराणी येसूबाई सारखा शहाणपणा त्यांना पुन्हापुन्हा दाखवावा लागला. प्रत्यक्ष सावरकर कुळातल्या तिन्ही महास्त्रीयांचा एकवटलेला सत्वांश म्हणजे आमच्या सौ. स्वामिनीवहिनी. येसूवाहिनींप्रमाणे चिरंजीव वेदना वाट्याला येऊनही त्यांनी सदोदित वडीलधारेपण जपले. माईं प्रमाणे सुखाचे दिवसही त्यांनी भोगले आणि आमच्या ताईमावशीप्रमाणे अखंड अन्नपुर्णेची भूमिका त्यांच्या वाट्याला आली. त्यांचे वर्णन तात्यांच्याच शब्दात असे करता येईल.

श्री पार्वती तप करी हिमपर्वती ती
की विस्तवात जळल्या बहूराजपुती
ते भारतीय अबला - बलतेज काही
अद्यापि या भरतभूमित लुप्त नाही.

विक्रमभाऊंचे दोन्ही सुपुत्र स्वतंत्रपणे आपल्या क्षमतेवर जीवनांत स्थिरावले आहेत. मोठा पृथ्वीराज स्वतंत्र व्यवसाय करीत आहे. धाकटा रणजीत मेल्ट्रॉन मधे अपुव्यवस्थापक (समन्वय विभाग) म्हणून सेवा करतो. देश कार्यात सर्वस्व अर्पण केलेल्या आपल्या वडिलांपासून त्यांनी कधी अवाजवी अपेक्षा केल्या नाहीत. मात्र शक्य ते सहकार्य करण्याचे आपले दायित्व दोघेही व्यवस्थित पणे पार पाडीत असतात.

असो. त्यांच्या सकट विक्रमभाऊंना या पुढील आयुष्य सुख शांती आणि वैभवाचे जावो हीच प्रार्थना.

* * *

आमचे सहजीवन

सौ. स्वामिनी सावरकर

कर्तृत्ववान व्यक्तिच्या वयाची साठ वर्षे पूर्ण झाली की, त्याच्या गतजीवनाच्या व कार्याच्या यशापयशाच्या बेरीजवजाबाकीचा ताळमेळ त्याने जोडावा व त्या शिदोरीवर पुढील आयुष्याची वाटचाल करावी, अशा हेतूनेच बहुदा षष्ठब्दीपूर्तीचा संभारभ योजून, व्यक्तीच्या कार्याचा गौरव करणारे ग्रंथही तयार केले जातात. पुढील पिढीसाठी योग्य ते आदर्श असावेत हाही उद्देश या मागे असू शकतो. वयाच्या साठ वर्षांच्या या वाटचालीत खूप जणांचा सहभाग व विविध आठवणींचा साठा यांनी त्या व्यक्तिला खूप साथ दिली असते. आयुष्यातील कर्तबगारीचा काळ आता साठीच्या वळणावर, विसा व्यासाठी थांबावयास आतुरलेला असतो. गतजीवनातील कार्य, मिळालेले समाधान, वागणुकीतील गुण, दोष, स्वाभावातील धारदार कंगोऱ्यांची झालेली झीज आणि त्यामुळे आपोआप जवळिक दाखविणारा शांतपणा या साऱ्या गोष्टींना या विसाव्याच्या वेळी उजाळा मिळत असतो

अशीच एक उजाळा मिळवून देणारी संधी मलाही प्राप्त झाली. श्री विक्रम सावरकर षष्ठब्दीपूर्ती निमित्ताने लाखे प्रकाशनाने एक गौरवग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरविले. श्री विक्रम सावरकरांच्या सामाजिक, राजकीय व पत्रकारितेच्या कार्याचा परिचय करून देणारे लेख सिद्ध झाले. पण त्यांच्या व्यक्तिगत जीवनाचा, त्यांच्या आवडीनिवडीचा त्रोटक का होईना पण परिचय करून देणारा लेख मी लिहून द्यावा, अशी डॉ. वि.स. जोगांनी इच्छा व्यक्त केली. तेहत्तीस वर्षांच्या आमच्या वैवाहिक जीवनातील अनेक कडुगोड आठवणी माझ्या मनात साकार होऊ लागल्याने मी परिचय लेख देण्याचे मान्य केले.

दि. ११ मे १९५८ ला नागपूर मुक्कामी माझा विवाह झाला आणि कु. मंदाकिनी पांडुरंग गोखले या माझ्या नावासकट सारे आयुष्य बदलवून टाकणारे सौ. स्वामिनी विक्रम सावरकर हे नांव धारण करून मी सावरकर कुलात प्रविष्ट झाले. विवाहित स्त्रीच्या जीवनात येणारा विवाहयोग तिच्या आयुष्याला कलाटणी देणारा असतो. हा सुयोग की कुयोग यावर तिचं सारे भवितव्य अवलंबून असते. अर्थात पुढील आयुष्यात समाधान जास्त की दुर्दैवाचे फटकारे जास्त हे काहीही त्यावेळी कळणारे नसते.

माझ्या सुदैवाने माझा विवाह रीतसर चारचौघीं प्रमाणे दाखवून झाला होता. तरीही मी भाग्यवानच ठरले. वयाच्या अठराव्या वर्षी, शिक्षण चालू असतानाच माझे वडील श्री. पांडुरंग बळवंत तथा आबाजी गोखले ह्यांनी माझ्या संमतीने मुंबईला सावरकरांचे घरी लग्नासंबंधात पत्र पाठविले. वास्तविक मी ह्यांना कधीच पसंत केले होते. १-१॥ वर्षापूर्वीच आम्ही दोघीतिघी मुली (मॅट्रीकला असताना) नागपूर - पुणे व्हाया कल्याण प्रवासात होतो. त्यावेळी आमच्यासोबत असलेल्या एक शिक्षिका प्रा. कुमुद विंझे (आता सौ. केतकर) यांच्याशी गप्पा मारण्याचा निमित्ताने दुसऱ्या डब्यात असलेले 'हे' इगतपुरी ते कल्याण पर्यंत आमच्याच

डब्यात येऊन बसले होते. त्यावेळी त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्व आणि सावरकर या नावातील जादू यामुळे मी भारले होते. पुढेही नागपूरला मी त्यांना २-३ वेळा पाहिले होते. पण अशा काही योगायोगाची मलाही कल्पना नव्हती आणि म्हणूनच वडिलांना हे ठिकाण कळल्यावर, त्यांनी मला विचारताच मी तत्काळ पसंती दिली.

मुंबईहून पत्र येताच वडिल व मोठा भाऊ यांचे बरोबर दादरला सावरकरांच्या घरी मला दाखविण्याचा कार्यक्रम झाला आणि त्यांची पसंती येऊन ११ मे १९५८ ला विवाह संपन्न झाला.

सावरकर बंधूंचे क्रांतीकार्य, त्यांचा त्याग, त्यांच्या कुटुंबियांनाही भोगावा लागलेला त्रास हा सारा इतिहास आमची आई, सौ. मनोरमाबाई तथा वहिनी गोखले हिने आम्हां भावडांना सांगितला होता. त्यांचेवरील पुस्तकेही वाचायला दिली होती आणि एकदा तर नागपूर स्थानकावर आईने स्वातंत्र्यवीर सावरकरांचे दर्शन ही आम्हांला घडविले होते. त्यामुळे सावरकर परिवाराविषयी विलक्षण आदर मनात निर्माण झाला होता.

विवाहानतंर माझ्या सासूबाई म्हणजेच देशभक्त कै. डॉ. नारायणराव सावरकर यांच्या पत्नी श्रीमती शांताबाई तथा ताई यांचेसह आम्ही दोघे दादरला सावरकर सदनात जाऊन स्वातंत्र्यवीर ती. तात्या आणि सौ. माई यांना भेटून आलो. सौ. माईंनी माझी ओटी भरली. ती. तात्यांनी माहेरची व माझीही माहिती विचारली. मला भाषाशुद्धीवरील एक पुस्तकही भेट म्हणून दिले.

स्वातंत्र्यवीरांच्या या प्रत्यक्ष भेटीने मी पूर्णतः समाधानी झाले. पुढे प्रसंगानुरूप त्यांच्या वा घरच्यांच्यासोबत अनेकवेळा मी सावरकर सदनात तात्या-माईंना भेटायला गेले. नागपूरला आले की इतरांना या भेटीचे वर्णन रंगवून सांगतांना मला फार अभिमान वाटत असे. सावरकर या नांवातील जादूचा मलाही अनुभव येत होता. माझ्या व्यक्तित्वात नकळत तसा बदल घडत होता.

वयाच्या अठराव्या वर्षी विवाह झाल्याने, तशा अर्थाने विवाहोत्तर जीवनाचा फारसा विचार केलेला नव्हता. तशात हे एम. कॉम होऊन भिवंडीला दांडेकर मशिन वर्क्समध्ये उत्तम नोकरीत होते. ह्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक आणि दुसऱ्यावर छाप पाडणारे. वास्तव्य नागपूरपासून मला हवे होते तसे दूर होते. त्यामुळे माझ्या दृष्टीने तर हे स्थळ उत्तम होतेच पण व्यवहारच बघणाऱ्या काही नातेवाईकांना सुद्धा यात कुठे खोड काढता आली नव्हती.

लग्नानंतर थोड्याच दिवसांनी ह्यांनी माझ्यावर हळूहळू सावरकरी संस्कार करायला सुरवात केली. त्यांच्या माझ्याबद्दलच्या अपेक्षा त्यांनी सांगितल्या आणि संधी मिळताच ते भिवंडीची दांडेकर मशीन वर्क्सची नोकरी सोडून राजकीय, सामाजिक चळवळीत काम करणार हे ही सांगून टाकले. हे सारे पचवायलाच काय पण ऐकायलाही मला कठीण वाटत होते. पण मी तसे काहीच दर्शविले नाही. नोकरी सोडतील तेव्हा बघू हा विचार मनात होता. सावरकर कुलात आलेय तेव्हा थोडीफार धग सोसावी लागणार ही जाणीव होतीच. शिवाय कोणत्याही

परिस्थितीत घराचे घरपण संपू न देण्याची जबाबदारी स्त्रीवर असते, या मोलाच्या विचारां बरोबरच अनेक सुसंस्कार आईवडिलांनी केलेले होते. संस्कारांचं हे देणं मनावर पक्के रुजल्याने पुढील आयुष्यात खूप तडजोड करावी लागली तरी त्याचा फारसा त्रास करून न घेण्याचे वळण माझ्या मनाला आपोआपच लागले.

ह्यांचे योग तसे जबरदस्तच! मला म्हटल्याप्रमाणे लग्नानंतर ३ महिन्यांतच नागपूरला निघणाऱ्या दै. मराठात अल्पवेतनावर ह्यांनी नोकरी धरली आणि आम्ही नागपूरला आलो. पुढे वर्षभरात मराठा बंद झाला आणि नकोशा वाटणाऱ्या नोकरीला ह्यांनी कायमचा रामराम ठोकला. मराठातील ह्यांच्या नोकरीचा काळ खूपच गडबडीचा होता. नवीन बस्तान असल्याने हे वेळीअवेळी घरी येत. मी खरं म्हणजे कंटाळून जात असे. चारचौघी प्रमाणे सिनेमाला, नाटकाला जाणे, फिरायला जावे असं मलाही वाटत असे. पण ह्यांच्या धावपळीत त्यांना ते जमत नसे. आणि तशी त्यांना ओढही नसे. मी फारच नाराज दिसले तर क्वचितच ते मला बाहेर घेऊन जाण्याचे कर्तव्यकर्म करीत. बरं काही म्हणायचीही मला सोय नव्हती. कारण ह्यांनी त्यांच्या जीवनक्रमाची पूर्णतः कल्पना दिलेली आणि मी त्यांना बेसावधपणे का होईना पण सहकार्य देण्याचे मान्य केलेले.

ह्यांच्या आणि माझ्या स्वभावात, आवडीनिवडीत खूप विरोधाभास होता. (अजूनही आहे) हे अतिशय रागीट. पटकन संतापतात. (आता खूपच शांत झाले आहेत) मी मात्र शांत राहाण्याचे धोरण स्वीकारलेले. ह्यांच्या रागाचा आविष्कार पूर्ण झाला की नंतर ते बरेच शांत ही होतात. माझे विश्व ह्यांच्याभोवती असल्याने ह्यांच्यातील या बदलांची जाणीव मला लगेच होते. पण त्यांचे सगळे लक्ष त्यांच्या कामातच असल्याने घरी आले तरी ते त्यातच मग्न असतात. प्रारंभी काही वर्ष मला, कधी कधी ह्यांचा खूप राग येत असे. पण तो बोलून दाखवायला भीती वाटे. मग मी चार-चार दिवस ह्यांच्यासी बोलत नसे पण त्यांच्या ते लक्षातही येत नसे. माझा राग चार दिवसांनी थंडावून मी बोलायला लागले तर तेही त्यांच्या गावी नसे. शेवटी बऱ्याच वर्षांनी का होईना, या गृहस्थावर रागविण्यात काहीही अर्थ नाही हे मला कळले आणि रागावून अबोला धरणे मी सोडून दिले. या संदर्भात ह्यांच्या संतापी स्वभावाची झलक दाखवणारी एक घटना सांगूनच टाकते.

लग्नानंतर काही वर्षे गेली आणि ह्यांना बहुतेक माझ्याविषयी विश्वास वाटू लागला. मग ते मला त्यांच्या कामाच्या अनेक गोष्टी घरी आल्यावर सांगू लागले. मलाही त्यात रस वाटत होताच. असेच एकदा रात्री १० ।।/११ ला हे घरी परतले. मोठा पृथ्वीराज आणि धाकटा रणजीत दोघेही झोपले होते. दिवसभर घरातली कामे; मुलांचे अभ्यास, प्रज्वलंतचे काम या दगदगीने मीही थकले होते. ह्यांचे जेवण कधी होते आणि मी अंथरूणावर कधी पडते असे मला झाले होते. पण हे घरी आले ते निराळ्याच मूडमध्ये. जेवायला बसले पण जेवणा ऐवजी त्यादिवशी घडलेल्या एका विशेष प्रसंगाची हकीकत मला सांगण्यात ते गर्क होते. मी १-१ वेळा हळूच, "अहो, जेवताय नं," असं म्हणाले आणि पोळी, आमटी वगैरेपैकी पानांत काही

तरी वाढत गेले. परत तिसऱ्या वेळी मी, "अहो काय वाढू?" म्हणून विचारले आणि एकदम ह्यांचा सगळा नूरच बदलल्याचे मला जाणवले. हातातला घास खाली टाकून ह्यांनी पाण्याने भरलेले भांडे उचलेले आणि ते फटकन समोर फेकून दिले. "काही सांगितले तर ऐकायला देखिल अक्कल लागते, हे आज कळलं मला." असे म्हणत पानावरून उठून, हात धुवून ते रागातच झोपायला निघून गेले. मी मनात तशी हादरलेच. पण त्यावेळी गप्पच राहिले.

सकाळी ह्यांचा चांगला २-३ कप चहा पिणे झाले (ह्यांना चहा फार प्रिय आणि सकाळी पहिल्या कपापाठोपाठ आणखी दोन कप तरी चहा हवा असतो) आणि मग मी हळूच रात्रीची अपूर्ण हकीकत विचारली. रात्री मी किती दमले होते हेही पाठोपाठ सांगितले. अर्थात नेहमीप्रमाणे ह्यांचा राग गेलेला होताच. आणि आपण इतके संतापायला नको होते हेही त्यांना जाणवले होते.

रागाच्या भरात ताडकन समोरच्या व्यक्तिला बोलण्याचा ह्यांचा स्वभाव. ह्यांनी समजावून दिलेल्या कामात निष्काळजीपणाने चूक केली तर ह्यांना ती सहन होत नाही. पण आपल्या या बोलण्याने समोरची व्यक्ती दुखावते हे ह्यांच्या आधी ध्यानीच येत नाही. मग मात्र ते पुन्हा समजावतातही .पण समोरची व्यक्ति नवीन असली तर नाराज होते. अन्य नेहमीपैकी असणाऱ्यांना ह्यांच्या रागासोबत त्यांच्या निरपेक्ष सहाय्याची ओळख असल्याने ते ह्यांचा राग मनावर घेत नाहीत. कामाच्या वेळी कार्यकर्त्यांकडून कामे करवून घेणारे हे, त्यांच्या अडचणीतही त्यांच्या पूर्णतः पाठीशी असतात. तनमनाप्रमाणे धनानेही वेळप्रंसगी ते सहकार्य करतात ही गोष्ट अनेकांच्या अनुभवास आली आहे.

सिनेमा, नाटक वा अन्य करमणुकीच्या कार्यक्रमांची ह्यांना नावड नाही. पण एखाद्या कामाच्या आड या गोष्टी ते येऊ देत नाहीत. एरवी वेळ मिळाला तर मुकेशची, अरूण दातेंची गाणी ऐकायला तीही मोठ्या आवाजात, ह्यांना फार आवडते. कधी जमले तर चित्रपट पहायलाही ते तयार असतात.

त्यातल्यात्यात राजकपूर ह्यांचा आवडता नायक ५-६ वर्षापूर्वी दूरदर्शन घेतल्यापासून त्यांचा आवडता गायक मुकेश व चित्रगीत हा कार्यक्रम बघायला त्यांना फार आवडते.

खाण्याच्या बाबतीत तश्या निवडी मोजक्याच आहेत. पण पानात वाढलेले असेल त्यातील आवडीचे पदार्थ खायचे, नाडणारे असतील तर बाजूला ठेवायचे पण त्याविषयी कुठलीही तक्रार करायची नाही, हे ह्यांचे धोरण, आमटी, वरण वा रस्साभाजी असा एखादा पातळ पदार्थ असला की त्यांचं जेवण होतं. भाजी विषयी खास आवड नाही. मात्र खूप वर्षापर्यंत त्यांना गोवारीची भाजी फार आवडत असे. त्यामुळे अद्यापही सर्व नातेवाईक व जवळच्या परिचयातील मंडळीत, गोवारीची भाजी केली की, आज 'विक्रमची भाजी केलीय' म्हणूच ऊल्लेखिले जाते.

या भाजीवरून एक गंमत आठवली. ह्यांच्या लहानपणी ह्यांचे मोठे काका, कै. क्रांतीवीर बाराव सावरकर ह्यांचे या भावडांवर खूप चांगले संस्कार झालेले. कधीतरी बाबांनी सांगितले

होते, "तोंडली खाऊ नका, त्याने जीभेला जडपणा येतो." वास्तविक आता मोठेपाणी जिभेला जडपणा येण्याचा प्रश्नच नाही पण तरीही हे तोंडल्याची भाजी मुळीच स्पर्शत नाही. अर्थात भाज्यांचे फारसे प्रेम नसल्याने ही गोष्ट ह्यांच्या पथ्यावरच पडली.

आर्थिक दृष्टीने खूप काटकसरीत घर चालवावे लागले तरी मला त्याचा ताप वाटला नाही. कारण ह्यांचा हात तसा उदार. हातात पैसे असले तर ते मला कधीच नकार देत नाहीत. शिवाय हे पैसे मी कसे खर्च केले, हेच का घेतले वा असाच अहेर कां केला अशा प्रकारचे कोणते प्रश्नही मला विचारीत नाहीत. खर्च कसा करावा याचे त्यांनी मला स्वातंत्र्य दिले तसेच मुलांचे बाबतीत ही निर्णय मी घेतले तर ते रागवत नसत. अर्थात मी ह्यांच्या कानावर योग्यते सर्व घालत असे. पण ह्यांना घरात लक्ष द्यायला आवड वा सवड नसल्याने ते हस्तक्षेपही करीत नसत. मुले लहान असताना मी निर्णय घेत असे आता दोघेही मोठे झाल्यावर त्यांचा निर्णय ते घेतात व ह्यांच्या कानावर घालतात. सल्ला विचारतात पण त्यांच्यावर कोणत्याही बाबतीत ह्यांची जबरदस्ती नसते.

मोठा पृथ्वीराज त्याला राजकारणाची आवड नाही. पण त्याला जमेल तशी मदत तो अजूनही करतो. ह्यांनीही त्याच्या मनाविरूद्ध त्याला आपल्या कामाला ओढले नाही. तो प्रथमपासून ह्यांच्या जरा दूरदूरच असे.

धाकटा रणजीत त्याला संभावतःच सामाजिक कामाची आवड असल्याने तो त्यातल्या त्यात ह्यांच्या जास्त निकट आला. लहानपणी तो कधी-कधी ह्यांना त्याच्या मताप्रमाणे वागायला लावत असे. एकदातर चक्कपैकी त्याने ह्यांना लहान मुलांच्या सिनेमाला त्याला घेऊन जायला लावले होते. त्याने कधीतरी कुठल्याशा यशाप्रित्यर्थ ही मागणी केली होती. आणि तशी वेळ येताच ह्यांनी ती मान्यही केली.

कुठलेही काम स्वीकारले की ते तडीला नेण्याचा स्वभावामुळेच अनेकदा ह्यांना खूपच त्रास भोगावा लागे. हिंदुमहासभेच्या वतीने परधर्मात गेलेल्या व्यक्तिना परत हिंदुधर्मात घेऊन त्यांचे विवाह करून देण्याच्या कामातही ह्यांचा पुढाकार असे. प्रसंगी ३-४ वेळा या शुद्धीकृत व्यक्ती आमच्या घरीही वास्तव्यास होत्या.

एकदा एका मुस्लीम तवायफ तरूणीची शुद्धी करून तिला हिंदुधर्मात घेऊन तिचा विवाह करून देण्याचा कामात ह्यांनी पुढाकार घेतला होता. ती तरूणी लिहिणे, वाचणे शिकली नसली तरी अतिशय बुद्धीमान व आपल्या विचारांशी पक्की होती. तिच्या घरच्या मंडळींनी गुंड आणि पोलिसांच्या मदतीने तिला व तिच्या पतीला त्रास देण्यास सुरवात केली. हिला परत घरी नेण्यासाठी ते वाट्टेल ते करण्यास तयार होते. ह्यांच्यावरही त्यांचा राग होताच. त्यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने ह्यांनी तिला आमच्या घरीच रहावयास आणले. एक सुंदर तरूणी आमच्या घरी राहते, प्रसंगी कामानुसार ह्यांच्या सोबत रात्रीही बाहेर जाते ही गोष्ट काहींना खटकली.

अर्थात मला ह्या साऱ्या गोष्टींची कल्पना होती. ह्यांचा स्वभाव माहित होता. ते मला याबाबतीत अनेकदा कल्पनाही देत. त्यामुळे मी निश्चिंत असे.

या मुस्लीम तरूणीच्या वास्तव्यातील तिचे, ह्यांचे सोबत येणे जाणे बघून, शेवटी एका बाईंनी मला त्याबाबतीत विचारलेही, आणि वरती हेही म्हणाल्या की; अहो, "तुम्ही नसतांना एक दोघी मुली तुमच्या घरी येतात; चहापाणी घेतात" अर्थात मी त्यांना म्हटले की, "तुम्हांला वाटतो तसला काहीही प्रकार नाही. आमच्याकडे कोण येते, जाते याची मला पूर्ण कल्पना असते तुम्ही निश्चिंत रहा."

या मुस्लीम तरूणीचे जीवन पुढे छानच मार्गी लागले. पण त्यासाठी त्या दोघांप्रमाणेच ह्यांनीही खूप मनस्ताप भोगला. एखाद्या कादंबरीचा विषय व्हावा अशी ती घटना होती. ह्यांच्या निर्भयतेची कसोटी लागण्याच्या या घटनेची मी साक्षीदार होते. त्या प्रसंगामुळे मला ह्यांच्या कणखरपणाची जास्त ओळख झाली.

ह्यांना चाकरी नसल्याने व सामजिक कार्याच्या व्यापामुळे घरासाठी नियमित स्वरूपात कधीच पैसे देता येत नसत. त्यामुळे त्यातल्या त्यात प्रथम आवश्यक वस्तू आणि थोडीफार मुलांची हौस यांचा मेळ मला घालावा लागे. अनेकदा लहान लहान प्रसंगासाठी लागणारे थोडेसेही द्रव्य नसे. कधी-कधी आपण चुकीचा मार्ग स्वीकारला नाही ना अशी शंका वाटावी असे आर्थिक ताण ह्यांनाही भोगावे लागत. पण काहीतरी सोय होत असे . अडचणींवर मात करण्याचे शिक्षण ह्याच्याप्रमाणे मला व मुलांनाही मिळत असे. सुर्दैवाने मुले समंजस होती. त्यांनी कधीही अवास्तव मागणीचा हट्ट् धरला नाही. पृथ्वीराज प्रमाणेच रणजीत ही समजुतदारपणाने वागत असे. मात्र आर्थिक तणावामुळे झालेल्या मनस्तापाच्या काही आठवणी मनावर कायम कोरल्या गेल्या आहेत. सहज आठवलेला एक प्रसंग सांगते.

गुढीपाडव्याचा दिवस होता तो. हे त्यावेळी हिंदुमहासभेच्या कामासाठी परगावी गेले होते. घरी मी व मुलेच होतो. मुलांसाठी त्यांच्या आवडीचा स्वयंपाक मी केला. आंघोळ करून चि पृथ्वीराजला हाताशी धरून दाराला फुलांचे तोरण लावले. व त्याच्या हातून भगवा ध्वज लावून गुढी उभारली. तो हे काम करून बाहेर निघून गेले. मी आहे त्या परिस्थितीत आनंदाने गुढीपाडवा होणार या समाधानाने दारातच उभी होते. तेवढयात एक गृहस्थ घरी आले. ह्यांनी काही दिवसांपूर्वी त्यांच्याकडून काही रक्कम उसनी घेतली होती. ते परगांवाहून परतल्यावर ती वापस करणार होते. मधल्या काळात तीन महिने पूर्ण झाल्याने ते गृहस्थ व्याजाचे तीस रूपये मागायला आले. मला ब्रह्मांड आठवले. सणाचा दिवस. सकाळची वेळ. बरं पैसे न घेता जाण्याचा त्या गृहस्थाचा विचार नाही, हे माझ्या लक्षात आले होते. शेवटी मी आमच्या वाडीतच राहणाऱ्या, परिचित बाईंकडे गेले आणि त्यांना कांहीतरी अडचण सांगून तीस रूपये मागितले. त्यांनीही ते चटकन् दिले. प्रसंग निभावला पण माझ्या मनावर त्याचे खूप ओरखडे उमटले.

हे गांवाहून आल्यावर ह्यांना मी ही घटना सांगितली. त्यावर त्यांनाही वाईट वाटले. व पुन्हा दाराशी पैसे मागायला कोणी येणार नाही याची मी काळजी घेईन असे त्यांनी मला आश्वासन दिले.

बाहेरच्या कामांचा ह्यांना कधी विसर पडत नाही. पण घरात समारंभ असले की वेळेवर येण्याविषयी हे हमखास विसरत. मुलांचे वाढदिवस, सणवार येणारे पाहुणे या साऱ्या गोष्टींची आठवण देऊनही, ते बाहेर पडले की, वेळेवर येतीलच याची खात्री नसे. सुरवातीला मी फार नाऊमेद व्हायची. पण मुले मोठी झाली आणि त्यांच्या उत्साहात मी समरस होऊ लागले. हे आले तर आनंदच वाटे पण नाही आले तर फारसे दुःख होत नसे. हे असेच घडायचे ही जाणीव ह्यांनी माझ्यावर पूर्णपणे बिंबवली.

त्यांच्या या विसराळूपणामुळे रणजितसह घरा बाहेरच थांबण्याची मला एकदा चांगलीच शिक्षा भोगावी लागली. एकदा घराला कुलुप घालून मी शेजारी किल्ली ठेवून रणजितसह महालात काही समारंभाला गेले होते. मधल्या काळात हे घरी आले. आणि काम आटोपून घराला कुलुप लावून बाहेर निघून गेले. माझ्या व मुलांसाठी शेजारी किल्ली देण्याचे त्यांच्या लक्षातच आले नाही. संध्याकाळी मी रणजीत सह घरी आले. घरात कामाचा खूप पसारा पडला होता. तो लवकर आवरून थोडा स्वयंपाकही करायचा होता. घरी येताच शेजारी (खाली राहणाऱ्यांना) किल्ली विचारली. त्यावेळी त्यांनी 'हे' येऊन किल्ली घेऊन गेल्याचे सांगितले .बर घराला लागून राहाणारे सौ. ताई व मामा गणपुले हे दोघेही चाकरीवरून उशीरा घरी परतणार होते. शेवटी दीड दोन तास वाडीतच खाली थांबले. शेवटी शेजारचे श्री. मामा गणपुले आल्यावर रणजितने डोके चालवून त्यांच्या घरातून जाऊन आमचे मागचे दार चिमटा घालून कडी काढून उघडले मग आम्ही घरात शिरलो.

रात्री हे घरी आल्यावर रणजितने ह्यांना सर्व हकीकत सांगीतल्यावर आपण किल्ली देण्याचे विसरलो हे ह्यांच्या लक्षात आले.

लग्नानंतर आम्ही भिवंडीला असताना एकदा हे घराला बाहेर कुलुप लावून, आरामात फॅक्टरीत गेले. मी आणि सासुबाई आत अडकलेल्या, पण त्या घराला मागील बाजूनेही खाली येण्यास जीना होता आणि घराला गॅलरी होती. त्यामुळे आमचे काही अडले नाही. सायंकाळी कुलुप उघडल्यावर आम्ही घरात असल्याचे ह्यांच्या लक्षात आले.

चि. पृथ्वीराज ९- १० महिन्यांचा असतांना आम्ही महालातील स्वतंत्र घर सोडून केळकर वाड्यात त्यांच्या मामांकडे रहावयास गेलो. त्यांच्या सौ. विजया केळकर अनपेक्षित निवर्तल्या होत्या. घरांत ह्यांच्या ती. कमलमावशी, ती. मनोहर मामा व मामांची अभय व वैजयंती ही ६ व ३ वर्षे वयाची दोन मुले होती. पृथ्वीराजसह आम्ही दोघे साधारण चार वर्षे तिथे एकत्र राहिलो. ह्यांच्या मावशींच्या हाताखाली त्या कालावधित सुग्रणपणाचे आणि टापटीपीचे मिळालेले धडे आजही मला उपयोगी ठरतात. त्यावरूनच आपण घेतलेले निर्णय किती

अचूक असतात याची मला पदोपदी हे जाणीव करून देतात. अनेक सुखदुःखाचे प्रसंग आठवत असतानाच ह्यांच्या सार्वजनिक कामांमुळेच अनेक प्रतिष्ठित मान्यवरांच्या सहवासाचाही आनंद मला लाभला. कै डॉ. ना. भा. खरे, हिंदुमहासभा नेते श्री नित्यनारायण बॅनर्जी, प्रा. रामसिंह, प्रा. वि.घ देशपांडे, श्री. गोपाळराव व सौ. सिंधुताई गोडसे, नागपुरातील कै डॉ. श्री. ल. काशीकर, सुप्रसिद्ध लेखक कै. पु. भा. भावे, कै ग. त्र्यं. माडखोलकर, कै. माननीय बाळशास्त्री हरदास, श्रीमती वीणाताई हरदास, श्रीयुत विद्याधर गोखले, प्राचार्य राम शेवाळकर, कै. ग. वा. बेहेरे, श्रीमती वसुंधराबाई पटवर्धन, श्री. जांबुवतराव धोटे, श्री. अटलबहादूरसिंह, श्री भाई बर्धन, गोवावीर मोहन रानडे, सुप्रसिद्ध गायक श्री.सुधीर फडके, श्री अरूण दाते, श्री ह्दयनाथ मंगेशकर ह्या सारख्या अनेक नामवंताचा परिचय झाला. त्यांच्या चर्चा, त्यांची मते ऐकावयास मिळाली ह्या व्यतिरिक्तही विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांशी संपर्क आला. त्याचा उपयोग मला वैचारिक क्षमता व मानसिक शांतता मिळविण्याचे दृष्टीने खूप झाला.

नागपुरात ह्यांनी प्रसंगानुरूप विविध आंदोलनांचे नेतृत्व केले. काही आंदोलने यशस्वीही झाली. या साऱ्या प्रकारांमुळे ह्यांना अनेकवेळा कारावासात जावे लागले. पक्ष प्रचारासाठी ह्यांनी अनेक निवडणुकाही लढविल्या. ह्या सर्व धावपळीत माझे वडील ती. आबाजी व आई सौ.मनोरमा गोखले ह्यांनी शक्य ती सर्व मदत केली. ह्यांच्या निवडणुका किंवा आंदोलने असतील त्यावेळी घरात कार्यकर्त्यांची खूप वर्दळ असे. त्यामुळे माझी खूप धावपळ होई. अशावेळी माझी आई घरी येऊन भाजी, पोळी करणे, मुलांचे खाणे व अन्य कामातही मदत करत असे. मुलांना लहानपणापासूनच फिरायला नेणे, त्यांच्या बाल सुलभ वृत्तीनुसार त्यांना प्राणी पक्षी दाखविणे, किल्ल्यावर नेणे, विविध शर्यती दाखविणे हे काम माझ्या वडिलांनी केले. मुलांसाठी ह्या गोष्टी करणे ह्यांना शक्य नाही हे आबाजींच्या लक्षात येताच त्यांनी मुलांमधील साहस, उत्सुकता, निरीक्षणशक्ती जोपासून त्यांचेवर हे संस्कार करण्याचे दायित्व पार पाडले. हे सर्व करत असता या दोघांनी कधीही नाराजी व्यक्तविली नाही.

माझा मोठा भाऊ श्री. केशव (अण्णा) व २ वहिनी सौ. प्रमिला, मोठी बहीण सौ. सुधा कमलाकर रानडे व धाकटी बहीण सौ. अरुंधती अरविंद घारपुरे ह्यांना तर मी हक्कानेच माझ्या अडचणी सांगून त्यांच्यावर माझी काही कामे सोपवत असते आणि अद्यापही सोपविते. ह्या साऱ्यांसोबतच अन्य नातेवाईक व मित्रमंडळीचाही समयानुरूप सहभाग लाभत असे.

माझ्य सासरच्या मंडळीनीही आम्हाला नेहमीच समजून घेतले. ह्यांच्या आई श्रीमती शांताबाई, (त्या चार वर्षा पूर्वी निवर्तल्या) वडील बंधू श्री. अशोक व वहिनी सौ. हिमानी, धाकटे बंधू श्री. श्रीहर्ष व वहिनी सौ. मानिनी आणि बहिणी सौ. स्नेहलता सदाशिव साठे व सौ. वर्षा विजय काळे ह्या साऱ्या कुटुंबियांनी, ह्यांनी उभारलेल्या कार्यात आपल्या सर्वतोपरी सहकार्याची साथ सदैवच दिली. देशकार्यार्थ साऱ्या कुटुंबियाचे सहकार्य हा मागील पिढीने स्विकारलेला वसा पुढील पिढिनेही चालविलेला पाहून स्वर्गात असलेल्या कै. सौ.येसुवहिनी व क्रांतीवीर गणेश दामोदर सावरकर, कै.सौ. यमुनाबाई व स्वातंत्र्यवीर विनायक

दामोदर सावरकर आणि कै. श्रीमती शांताबाई आणि कै. देशभक्त डॉ. नारायण दामोदर सावरकर ह्या त्रिवर्ग सावरकर बंधुनांही खचितच समाधान वाटले असणार.

विक्रम नारायण सावरकर याच्या वतीने चालू असलेले हे राष्ट्रकार्य यशदायी व फलदायी ठरो अशीच सदिच्छा ते व्यक्त करीत असणार ।

३३ वर्षांच्या वैवाहिक जीवनातील अनंत आठवणीचा हा प्रवास। प्रारंभी खडतर वाटणाऱ्या संसाराची ही वाट सरावामुळे सुसह्य वाटत गेली. अनुभवाची व वयाची जेष्ठता येता - येता तर ती सरळच वाटू लागली.

हळू हळू कष्टाचे, चिंतेचे, आर्थिक ताणाचे दिवस सरत गेले. दोन्ही मुले चांगल्याप्रकारे मार्गी लागली. गतवर्षी चि. पृथ्वीराज चा विवाह नागपूरच्या डॉ. मृणालिनी गंगाधर बापटशी संपन्न झाला. आता पर्यंत सारी शिल्लक राहीलेली माझी हौस ह्या निमित्ताने ह्यांनी पूर्ण केली. अत्यंत आनंदाने, कौतुकाने व हौसेने हा विवाह समारंभ पार पडला. चांगली सून मिळाली. आता नात चि. भाग्यश्री घरात आली. आणि सर्वाथाने संसारपरिपूर्तीचे समाधान मिळाले.

कटू आठवणी, केलेले कष्ट, भोगलेला त्रास असे कांही उरलेच नाही. ह्यांचा स्वभावही खूप बदलला आहे. आपल्या कामात ते अद्यापही दंग असले तरी घरात आलेल्या सूनबाई व नातीमुळे ह्यांना घराची थोडी ओढ वाटू लागली असावी.

ह्या धावत्या आठवणींचा मागोवा घेता-घेता श्री. विक्रम नारायण सावरकर ह्यांच्या व्यक्तिमत्वाच्या चित्रणाचा ही प्रयत्न करते .

नीटसर टापटीपीच्या पोषाखाची आवड. पांढरा स्वच्छ रंग फार प्रिय. कामाची पूर्ण जाणीव. अजागळपणा, विलंब, बावळटपणा, बेपर्वाई, उथळपणा, या गोष्टींची चीड. स्वतःच्या कल्पनांप्रमाणे दुसऱ्याकडून वागणुकीची अपेक्षा.

स्वभाव तापट पण दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची धडपड. त्यावेळी स्वतःकडे दुर्लक्ष करण्याची सवय. स्वाभिमान संरक्षिण्यासाठी कोणत्याही सीमेपर्यंत कष्ट, दुःख सोसण्याची सिद्धता, त्या संबंधात पराकोटीचा जिद्दीपणा, करारी स्वभाव, स्वतःच्या कार्यक्षमते विषयी संपूर्ण आत्मविश्वास, धाडस, महात्वाकांक्षा व भव्य दिव्य स्वप्ने या संबंधी आवड. स्वभाव मुळात रसिक पण खडतर जीवनप्रवाहांमुळे तात्पुरती रूक्षता, उदार, सढळ, हाताने खर्च करण्याची आवड. चांगल्या दर्जेदार वस्तु व अत्तरे, स्त्रे चे विलक्षण प्रेम. जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात क्षुद्रतेला स्थान नाही आणि कधीही निराशा स्पर्शत नाही.

ह्यांच्या धावपळीच्या अशा या वाटचालीत, शक्य तितक्या क्षमतेने त्यांचा पाठपुरावा करावयाचा केलेला माझा प्रयत्न, परमेश्वराच्या कृपेने आमरण चालू रहावा हीच या प्रसंगी प्रार्थना !

* * * *

एक तप

श्री. जगदीशप्रसाद उपाध्याय

पहिली भेट

वैनगंगेच्या काठी असलेल्या पवन राजाची पावनभूमी पवनी या गावात १९५७ ते १९६३ या काळात राहाण्याचे भाग्य मला लाभले. याच काळात श्री. कमलाकर रेखडे यांच्या विशेष प्रयत्नाने पवनी नगर हिंदुसभेची शाखा स्थापन झाली. शाखेच्या उद्घाटनासाठी खास निमंत्रण देवून श्री. विक्रमराव सावरकर यांना बोलावण्यात आले होते. विक्रमराव प्रथमच पवनीला आले तेव्हा घोषणा देत मिरवणुकीने त्यांना श्रीमंत तात्यासाहेब दीक्षित यांच्या भव्य वाडयात आणण्यात आले. पवनी सारख्या लहान गावात 'अखंड भारत अमर रहे,' 'एक धक्का और दो पापस्तान तोड दो', 'स्वातंत्र्यवीर सावरकर की जय,' 'विक्रम सावरकर की जय' या घोषणांमुळे पवनीचे पोलीस हादरले होतेच. मुसलमानांतही खळबळ उडाली होती. अशा या वातावरणात पवनी नगर हिंदुसभेच्या शाखेचे उद्घाटन होऊन श्री. बाबासाहेब तथा हेमकांत फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारीणी निवडण्यात आली, या कार्यकारिणीत मी सदस्य झालो. या निमित्ताने विक्रमरावांची पहिली भेट झाली.

पवनीला हिंदुसभेचा प्रचार सुरू झाल्यापासून श्री. कमलाकर रेखडे यांनी विदर्भाचा दौरा केला आणि त्यांचा उत्साह वाढला म्हणून विदर्भ विभाग हिंदुसभेचे अधिवेशन पवनीला घेण्याचे त्यांनी ठरविले. श्री पु. शि. शेकदार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन संपन्न झाले. श्री. नरसिंह जोशी (आता ते विश्वहिंदू परिषदेत आहेत) हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. नागपूरहून बरेच कार्यकर्ते अधिवेशनाला आलेले होते. विशेष करून श्री. बाबूराव मैराळ व कै. क. मु. तांबेकर हे चिमूर आष्टीहून क्रांतीज्योत घेवून पायी पवनीला आले होते. विदर्भाच्या अन्य भागातूनही कार्यकर्ते आलेले होते. त्यामुळे हे अधिवेशन बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले.

कार्यालयाचे दायित्व

१९६३ सालच्या शेवटी म्हणजे बहुतेक ऑक्टोबर - नोव्हेंबर महिना असावा. पवनीच्या पावन भूमीला राम राम ठोकून मी नागपूरला आलो. त्यावेळी श्री. कमलाकर रेखडे हे गुमगावला मुख्याध्यापक होते. मी सरळ गुमगावला जाऊन रेखडेंची भेट घेतली. काही दिवस गुमगावला राहून श्री रेखडेंसह मी गुमगाव ते नागपूर असा ३० किलोमिटरचा पायी प्रवास करून नागपूरला आलो. हिंदूसभेच्या कार्यालयात श्री. विक्रमरावांची भेट झाली. महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या अधिवेशनाची तयारी चालू असल्याचे मला कळले. विक्रमरावांच्या कुशल मार्गदर्शनाखाली बहुतेक सर्व कार्यकर्ते कामाला लागले होते.

त्यावेळी कार्यालयाचे दायित्व विक्रमरावांनी माझेकडे सोपविले. विक्रमरावांच्या कुशल

संयोजनामुळे, हे अधिवेशन महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे होते तरी महाराष्ट्र बाहेरचेही काही प्रतिनिधी आले होते. हे अधिवेशन बरेच गाजले. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आला होता.

प्रांतिक हिंदुसभेचे अधिवेशन पार पडल्यानंतर मी काय करावे याची मला चिंता लागली. त्यावेळी मी बेकार होतो, विक्रमरावांना पण तेव्हा निश्चित असे उत्पन्नाचे साधन नव्हते तरी पण ते मला म्हणाले की 'तुम्ही आधी नक्की करा की कुठे राहायचे? नागपूरला राहणार असाल तर तुमची तशी व्यवस्था करता येईल.'

सावरकर वाङ्मयाचा प्रचार

मी नागपूरला राहण्याचा निर्णय नक्की केला. त्याच सुमारास महाराष्ट्र प्रांतिक हिंदु सभा व केसरी यांच्या सहकार्याने आणि श्री मामाराव दाते यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशनाचे काम हाती घेण्यात आले होते. मी नागपूरला येण्यापूर्वी सावरकर वाङ्मयाचे काही खंड प्रकाशित झालेले होते. या वाङ्मयाच्या विक्रीसाठी स्वस्त योजना आखण्यात आलेली होती. त्यानुसार विदर्भात विक्री-प्रचारासाठी विक्रमरावांनी ही जबाबदारी स्वीकारली होती. सावरकर वाङ्मयाच्या जोडीला पु. भा. भावे, डॉ. ना. भा. खरे, बाळशास्त्री हरदास व कोल्हापूरचे श्री. ग. रं. भिडे यांचे 'अभिनव मराठी शब्दकोश' ही सर्व पुस्तके विक्रीला होती. शिवाय प्रचार म्हणून तात्यारावांचे छायचित्र होते. या सर्व प्रचार-प्रसारासाठी पूर्ण वेळ देणारा विश्वासू सहकारी विक्रमरावांना हवा होता. वरील कामासाठी मी अगदीच नवखा अनभिज्ञ होतो. विक्रमराव म्हणाले, "तुमची तयारी असेल तर सर्व काम मी शिकवीन आणि तुम्ही करू शकाल याची मला खात्री आहे." थोड्याच दिवसात माझेकडे तात्यारावांचे छायाचित्र व काही पुस्तके देण्यात आली. ती घेऊन मी शंकरनगर, बजाजनगर, गांधीनगर अशा सधन वस्तीत मराठी माणसाची दारावरची पाटी पाहून घरोघरी फिरू लागलो. त्याच सुमारास 'सावरकर तत्वज्ञान प्रसार केंद्रा' च्या वतीने घरपोच वाचनालय पण चालू केले होते. शिवाय काही हितचिंतक हिंदूसभेला एक रूपया महिना वर्गणी देत होते. ही वर्गणी गोळा करण्यासाठी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रत्येकाचे घरी जात होतो. काही दिवसानंतर 'सावरकरसाहित्याची ' हिंदी प्रांतातून हिंदी आवृत्तीची मागणी यायला सुरूवात झाली. म्हणून 'माझी जन्मठेप' चा हिंदी अनुवाद छापण्याचे विक्रमरावांनी नक्की केले. परंतु आर्थिक परिस्थिती फारच नाजूक होती. तरी पण विक्रमरावांचा धडाडी आणि हुकूमी स्वभाव यामुळे 'आजन्म कारावास' हे हिंदी रुपांतर प्रकाशित झाले. या पुस्तका बरोबरच आणखी ३-४ पुस्तके प्रकाशित झाली. हिंदी पुस्तकांचा संच घेवून मी दिल्ली, कानपूर, लखनऊ, बनारस असा दौरा काढला होता. या दौऱ्यात पुस्तक विक्रेत्यापेक्षा ठिकठिकाणचे कार्यकर्ते आणि मुख्य म्हणजे रा.स्व.सं. कार्यकर्त्याकडून भरपूर सहकार्य मिळत होते. यात विक्रमरांवाच्या कुशल मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. जनसंपर्क, पुस्तकविक्री, प्रकाशन-मुद्रितशोधन व व्यापारी पद्धतीने हिशेब लिहिण्याचे तंत्र हे सर्व प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण

विक्रमरावांनी मला दिले होता. त्यांचे एक खास वैशिष्ट्य होते की, आपले साहित्य कुणाला दखविल्यानंतर त्याने जर नाही म्हटले तर राग न मानता पुन्हा कधी तरी संपर्क साधावा.

डॉ. भाऊसाहेब कोलत्यांची भेट

अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात डॉ. भाऊसाहेब कोलते हे त्यावेळी प्राचार्य होते. 'समग्र सावरकर वाङ्मयाचे' सर्व खंड नेऊन मी त्यांना दाखविले. परंतु भाऊसाहेबांनी ते घेण्याचे नाकारले. कारण काय, तर सावरकरांची किरकोळ सर्व पुस्तके वाचनलयात आहेत म्हणून हे संच नको. मी त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी ऐकले नाही. मी शांत चित्ताने खोलीच्या बाहेर आलो आणि मराठीचे प्राध्यापक कोण आहे याची शिपायाजवळ चौकशी केली त्याने समोर बोट दाखवून मला सांगितले "साहेब ते पहा समोर त्या बाई दिसतात ना त्याच नातू बाई मराठीच्या प्राध्यापिका आहेत." मी सरळ जाऊन प्रा. नातूबाईना नमस्कार केला आणि येण्याचे कारण सांगितले. त्या म्हणाल्या "तुम्ही बसा मी आले." थोड्याच वेळात त्या बाहेर येवून त्यानी पोहयांची बशी माझ्या हातात देत म्हणाल्या "हे खा मी चहा आणते." हे स्वागत पाहून मी चकित झालो. चहा पिवून आम्ही बाहेर पडलो तर थेट डॉ. भाऊसाहेब कोलते यांच्या कार्यालयात आलो. नातू बाईं सोबत मला पुन्हा आलेला पाहून भाऊसाहेब माझेकडे जरा तिरप्या नजरेनेच पाहून नातू बाईच्या बोलण्यापूर्वीच म्हणाले की "सावरकरांची सर्व पुस्तके असताना हा संच कशाला?" त्यावर नातूबाई म्हणाल्या की, "सावरकरांचे संपूर्ण साहित्य एकत्र करून समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशित करण्यात आलेले आहे आणि तो संच आपल्याकडे आवश्यक आहे म्हणून मराठीच्या बजेट मधून घेण्यास हरकत नाही." शेवटी नाइलाज होऊन भाऊसाहेबांना नाही म्हणता आले नाही, समग्र सावरकर वाङ्मयाचे सर्वखंड तर घेतलेच शिवाय आमच्या पिशवीत सावरकरांची इतर जी पुस्तके होती ती पण घेतली गेली. विक्रमरांवाच्या शिकवणीचा परिणाम होउन मी विजयी मुद्रेने बाहेर पडलो.

शेख अब्दुल्लाविरोधी निदर्शने

१९६४ ते १९७२ हा काळ विक्रमरावांच्या एकूण राजकीय जीवनाचा महत्वाचा काळ मानायला हरकत नाही. याच काळात त्यांच्या नेतृत्वाखाली नागपूरात हिंदूसभेने अनेक आंदोलने करून जनजागृती केली. त्याप्रमाणे विधानसभा व पदवीधर मतदार संघाची निवडणूक पण विक्रमरांवानी लढवली होती. निवडणुकीत जरी त्यांना यश आले नाही तरी समविचारी पक्षांना त्यांच्या उमेदवारीने हादरा दिला. त्याकाळात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेला देशद्रोही शेख अब्दुल्ला हा तुरुंगातून सुटल्यावर काश्मीरचे एक हिंदुत्ववादी नेते प्रेमनाथ डोंगरा यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केल्याची बातमी वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाली. त्याच सुमारास विनोबा भावेंना भेटण्यासाठी शेख अब्दूल्ला पवनारला येणार ही पण बातमी वर्तमान पत्रात येताच विक्रमरावांच्या नेतृत्वाखाली काळे झेंडे दाखविण्याचे

कार्यक्रम ठरले. नागपुरातील हिंदुमहासभेचे बहुतेक कार्यकर्ते पदयात्रा करत विमानतळावर हजर होते. आम्ही विमान तळावर पोचताच आमच्या भोवती पोलिसांचा कडक पहारा तैनात झाला. 'देशद्रोही शेख अब्दुल्ला मुर्दाबाद', 'अखंड भारत अमर रहे.' 'एक धक्का और दो पाकिस्तान तोड दो.' ही आमची घोषणा सूरू होती, त्यामूळे शेख अब्दुल्ला ला घेवून येणारे विमान, विमानतळावर उतरण्यापूर्वीच विमानतळावरील सर्व दिवे बंद करण्यात आले होते. हे आंदोलनही गाजले.

कम्युनिस्टांबरोबर सहभागी

याच काळात नागपुरातील भाववाढविरोधी आंदोलन पण खूप गाजले होते. या आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्षा बरोबर नागपूर नगर हिंदूसभा पण विक्रमरावांमुळे सहभागी झाली. रोज दुपारी ठिकठिकाणाहून मोर्चे निघून जिल्हा कचेरीवर जात होते. सायंकाळी जाहीरसभा होत होत्या. त्या काळात एका मागून एक आंदोलने आखून व ती यशस्वी करण्यात विक्रमराव आघाडीवर होते. मोजकेचे कार्यकर्ते होते पण विक्रमरावांच्या हुकुमी हाकेला धावून येत होते. कै. पुरूषोत्तमराव तांबे यांच्यावर विशेष कामगिरी सोपविण्यात आली होती. जाहीरसभा असो अथवा चौक सभा असो या साठी पोलीसांची परवानगी आणण्यात तांबे आघाडीवर होते. तसेच सभेच्या प्रचारासाठी लाऊडस्पीकर पण तेच फिरवत होते. गोवधबंदी आंदोलन पण खूपच गाजले. हिंदूच्या या अतिशय महत्वाच्या आंदोलनात फक्त विक्रमरावांमुळे हिंदूमहासभेनीच पुढाकार घेतला होता. विनोबाजी भावे हे पण गोवधबंदी आंदोलनाच्या विरूद्ध बोलत असत. याच विषयावर त्यांचा एक खास कार्यक्रम नागपुरात आयोजण्यात आला होता त्यासाठी ते पवनारहून नागपूरला येणार होते. या निमित्ताने त्यांना काळे झेंडे दाखवावे असा कार्यक्रम ठरला. आम्ही बहुतेक कार्यकर्ते अजनी चौकात जमलो होतो. विक्रमरावांसह काही कार्यकर्ते थोडे पुढे उभे होते. पण ही बातमी पोलिसांना समजताच त्यांनी आम्हा सर्वांना अटक करून पोलिसलाईन टाकळी येथे नेले. 'अंग्रेजी हटाव' हे महत्वाचे आंदोलनही विक्रमरावांच्या नेतृत्वा खाली करण्यात आले. सरदार अटलबहादूर सिंह, प्रा. पुरूषोत्तम मेहता, गुणवंत नागपुरे, प्रा. कुकडे, ॲड. कुकडे इत्यादी भिन्न विचाराचे लोक या आंदोलनात सहभागी झाले होते. रात्री बारा-एक पर्यंत आम्ही रंगाचा डबा-ब्रश घेवून चौका-चौकात फिरत होतो. इंग्रजी पाटी दिसली की 'मिटाव.' या आंदोलनामूळे नागपूरच्या पेंटर लोकांना खूप काम मिळत होते. अशाप्रकारे विक्रमरावांनी अनेक आंदोलने केली.

विक्रमरावांना लेखनकला, प्रभावी वक्तृत्व, संघटन कौशल्य, मुद्रण-संपादन इत्यादी गुण असताना त्यांनी आपले सारे आयुष्य शक्तीहीन झालेल्या हिंदूसभेसाठी खर्ची घातले. त्यांच्या कला गुणांवर त्यांना मोठ्या हुद्दयाची नोकरी सहज मिळवता आली असती. विचारांची थोडी तडजोड करून पक्षांतर केले असते तर आमदारकी, खासदारकी, आणि प्रसंगी मंत्री पदही मिळाले असते. परंतु या पैकी कुठल्याही पदाचे मागे ते लागले नाही. विक्रमरांवाच्या ऐन

उमेदीच्या काळात त्यांच्याच सारखा पूर्ण वेळ देणारा प्रभावी साथीदार त्याना भेटला असता तर आज महाराष्ट्र हिंदूसभेचे कार्य वाढविण्यात त्यांना यश आले असते. कमलाकर रेखडे व विक्रमराव एकमेकांचे गुण-दोष पचवून एकत्र आले असते तर दोघांच्या प्रभावी संगठन कौशल्याने हिंदूसभेचे कार्य नक्कीच वाढले असते.

आजारातील सेवा

पाटणा येथे अखिल भारत हिंदुमहासभेच्या अधिवेशनासाठी आम्ही नागपूर विदर्भातील कार्यकर्त्यांसह गेलो होतो. त्यावेळची आठवण. त्यावेळी हिंदी प्रांतातील हिंदूसभेच्या तरूण कार्यकर्त्यांमध्ये विक्रमरावांना विशेष आदराचे स्थान होते. हिंदी प्रांतातून त्यांना सतत निमंत्रणे येत होती. त्यात प्रमुख्याने आजच्या 'बजरंग दलाचे स्वामी धर्मेंद्र महाराज' (हे त्यावेळी हिंदूसभेत विशेष आकर्षण होते) व पिलखुवाचे शिवकुमार गोयल व इतर अनेक तरूण हिंदुभाई विक्रमरावांना मान देत होते. पाटण्याच्या भाषणामुळे कार्यकर्त्यामध्ये विशेष उत्साह दिसत होता. पाटण्याहून परत येताना जबलपूरला अचानक मी आजारी पडलो. पाटणा ते जबलपूर असे आमचे रेल्वेचे रिझर्वेशन होते. जबलपूरला उतरून आम्ही बसने नागपूरला येणार होतो. उन्हाळयाचे दिवस होते. जबलपूर स्टेशन येण्याचे आधी पासूनच मला ताप चढला म्हणून वरच्या सीटवर मी झोपून होतो. मला ताप आहे हे मी कुणालाही सांगितले नाही. जबलपूरला गाडी थांबली आणि एकच गडबड शुरू झाली मला कुणी तरी म्हणाले, "जगदीश उठो" मी गडबडीत उतरण्याचा प्रयत्न करत होतो की तेवढयात माझा तोल जाऊन मी खाली पडलो आणि बेशुध्द झालो मग मला गाडीतून केव्हा बाहेर काढले हे मला समजले नाही. बहूतेक एखादा तास स्टेशनवर मी थांबलो असेन नंतर सर्व कार्यकर्ते आपापल्या मार्गाला लागले. श्री. विक्रमराव व अप्पासाहेब शेकदार हे थांबले होते. नंतर टॅक्सी करून आम्ही आदरणीय बाबूरावजी परांजपे (जबलपूर) यांच्या घरी आलो. आम्ही सर्व लोक आलेले पाहून त्यांच्या घरची सर्व मंडळी धावून आली. मी आजारी आहे हे समजून माझी स्वतंत्र खोलीत व्यवस्था करण्यात आली. आणि लगेच डॉ. पण आले. औषधोपचार सुरू होऊन चार दिवस मी झोपून होतो. त्याच दरम्यान पाटण्याहूनच विक्रमरावांना काही महत्वाच्या कामासाठी मुंबईला जाणे आवश्यक होते. पण माझ्या आजारपणामूळे ते चार दिवस जबलपूरला थांबले. हा त्यांचा सेवाभाव.

जेथे नेता तेथे कार्यकर्ता

मी नागपुरात आलो त्याकाळात विक्रमरावांना राहण्याची निश्चित अशी काहीच व्यवस्था नव्हती. पत्र व्यवहारासाठी नक्की स्थान म्हणून 'सुभाष कुंज' मधील एकटी खोली होती. ऐन उमेदीच्या काळात सर्व आशा आकांक्षा बाजूला ठेवून सौ. स्वामिनी वहिनी ह्या महाजन चाळीत आपल्या माहेरी राहात होत्या. अशा परिस्थितीतही विक्रमरावांनी माझ्या भोजनाची व्यवस्था कै. पुरूषोत्तमराव तांबे यांच्या खानावळीत केलेली होती. त्यावेळी मी हिंदूसभेच्या कार्यालयात रात्री झोपत होतो. हिंदूसभा कार्यालय हे पूर्वी कै. पु. भा. भावे यांच्या नावावर होते. ते

नागपुर सोडून मुंबईला गेल्यावर मधल्या काळात कार्यालयाचे भाडे भरले गेले नाही म्हणून घरमालकांनी नोटीस पाठविली. नोटीस मिळाल्याबरोबरच ते नागपूरला आले. त्यावेळी कार्यालयाचे भाडे भरण्याची जबाबदारी विक्रमरावांनी स्वतःवर घेतली आणि काही रक्कम उभी करून भरली व पुढे पण नियमित भाडे भरण्याची जबाबदारी त्यांनीच स्वीकारली होती. आज नागपुरात हिंदुसभा कार्यालय केवळ विक्रमरावांच्यामुळे टिकून आहे. नागपूर सोडून विक्रमराव मुंबईला गेले तेव्हा पासून नागपुरात हिंदूसभेचे निश्चित स्वरूपात असे काहीच कार्यक्रम होत नाही. कारण जेथे नेता तेथे कार्यकर्ते आणि नियमित कार्यक्रम ही सत्य स्थिती आहे.

* * * *

हिंदू महासभेचे अष्टपैलू नेते

श्री. विक्रमराव सावरकर

लेखक श्री. रामभाऊ तांबट, डोंबिवली.

नागपूरच्या 'श्री. विक्रम सावरकर अभिनंदन ग्रंथ' समितिच्या वतीने, मला माननीय विक्रमरावांच्या पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय कार्याची माहिती थोडक्यात लिहून पाठविण्याची केलेली सूचना मी तत्काळ स्विकारली.

कारण, गेली सुमारे तीस वर्षे मी विक्रमरांवाबरोबर या विभागातील राजकीय कार्यात निकटचा सहकारी म्हणून कार्य करीत आलो आहे.

परंतु, प्रत्यक्षात लिहिण्यास बसलो तेव्हा असे लक्षात आले की, त्यांच्या नेतृत्वाचा प्रत्येक पैलू आणि या अवधीत त्यांनी पार पाडलेले महत्वाचे राजकीय कार्यक्रम यांची थोडक्यात जरी माहिती द्यावयाची झाली तरी त्याचे छोटेखानी पुस्तकच होईल. गौरव ग्रंथातील जागेच्या मर्यादेची जाणीव ठेवून, परंतु यथार्थ कल्पना वाचकांना यावी म्हणून केवळ ठळक गोष्टींची माहिती पुढे देत आहे.

देशघातकी युकॅरिस्ट कॉंग्रेस विरोधी आंदोलन

सन १९६४ च्या डिसेंबर महिन्यात, मुंबईत 'जागतिक ईसाई युकॅरिस्ट कॉंग्रेस' भारत शासनाच्या संपूर्ण पाठिंब्याने आयोजित करण्यात आली. स्थानिक लोकांचे मोठ्या संख्येत ईसाईकरण पोपच्या उपस्थितीत करणे, हा युकॅरिस्ट कॉंग्रेस मधील एक महत्वाचा भाग असतो. येथील हिंदुचे ईसाईकरण होऊ नये म्हणून महाराष्ट्र हिंदुमहासभेने युकॅरिस्ट कॉंग्रेस विरोधी प्रखर आंदोलन करण्याचे घोषित केले. या वेळी मुंबई हिंदुमहासभेने या आंदोलनात, अर्थातच फार मोठे कार्य केले. पण या आंदोलनाची प्रखरता वाढविण्यासाठी विक्रमरावांनी महाराष्ट्रात झंझावाती प्रचार केला. धर्मवीर वि.रा.पाटील, (कै.) प्रा. वि.घ. देशपांडे, पं. ब्रजनारायण ब्रजेश ईत्यादी ज्येष्ठ नेत्यांसमवेत विक्रमरावांची भाषणे मुंबईतही झाली. चौपाटीवरच्या विशाल सभेत झालेले त्यांचे भाषण अतिशय गाजले. युवक श्रोते मोठ्या प्रमाणात त्यामुळे कार्यप्रवण झाले. आंदोलनाचा एक भाग म्हणून विक्रमरावांनी नागपूर येथील महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनावर दि. १८ नोव्हेंबर १९६४ ला जनमोर्चा नेला. तत्कालीन गृहमंत्री (कै.) बाळासाहेब देसाई याना हिंदुमहासभानेते (कै.) वा. ब. गोगटे यांच्यासमवेत विक्रमराव आणि काही मंडळींचे शिष्टमंडळ भेटले. आंदोलन मागे घेण्याच्या गृहमंत्र्यांच्या धमकीवजा विनंतीला विक्रमरावांनी ठामपणे नकार दिला.

युकॅरिस्ट कॉंग्रेस रद्द केली, तरच आंदोलन थांबविण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट बजावले. त्याच सायंकाळी, मोर्चा विसर्जित झाल्यावर, नागपूर हिंदूमहासभेच्या कार्यालयात विक्रमरावांना डी. आय. आर. (भारत संरक्षण निर्बंदाद्वारे) खाली अटक करण्यात येऊन

प्रथम नागपूर आणि नंतर नासिक कारागृहात डांबण्यात आले. पुढे हिंदूमहासभेचे आंदोलन थांबावे म्हणून ऑर्थर रोड (मुंबई) कारागृहात हिंदुमहासभेच्या कृति समितीची बैठक शासनाने आयोजित केली. बंदीगृहातील नेते धर्मवीर वि. रा. पाटील आणि विक्रमराव यांना त्यासाठी मुंबईत आणण्यास आले. आंदोलन मागे घेतले गेले नाही तर, हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांना वर्षभर तरी कारागृहात डांबवण्यात येईल, अशी गर्भित धमकी देण्यात आली होती. धर्मांतराचा कार्यक्रम रद्द केला असल्याने आंदोलन मागे घेण्यास काही हरकत नाही, असा विचार (कै.) वा. ब. गोगटे यांनी मांडला. तेव्हा, विक्रमरांवानी युकॅरिस्ट काँग्रेस रद्द झाली तरच आंदोलन थांबविले जाईल, अशी भूमिका मांडली. कृति समितीने बहुमताने ती मान्य केली. परिणामतः बैठक संपल्यावर कारागृहाबाहेर पडलेल्या कृती समितीच्या सर्व सदस्यांना अटक करण्यात आली. धर्मवीर पाटीलांना औरंगाबाद, तर विक्रमरावांना नाशिक कारागृहात परत पाठविण्यात आले. हे आंदोलन चांगलेच गाजले. स्वतः स्वातत्र्यंवीर सावरकरांनी या प्रकरणी कृती समितीच्या प्रमुख सदस्यांना सावरकर सदनांत बोलावून त्यांना चहापान करून अभिनंदन केले. युकॅरिस्ट काँग्रेस संपल्यावर महाराष्ट्रात अटकेत असलेल्या हिंदुमहासभेच्या सुमारे पाचशे कार्यकर्त्यांची सुटका झाली. माननीय धर्मवीर वि. रा. पाटील आणि विक्रमराव् यांना दि. १९ फेब्रुवारी १९६५ ला सोडण्यात आले. या आंदोलनाच्या प्रखरतेमुळे विक्रमरावांची महाराष्ट्राचे लढाऊ हिंदूनेते म्हणून ख्याती झाली.

कल्याण- भिवंडी येथील शिवजयंती मिरवणुकिची बंदी उठविली

भिवंडी येथील पहिल्या (सन १९७०) भीषण मुस्लिम दंग्यानंतर, भिवंडी आणि कल्याण या नगरात महाराष्ट्र शासनाने शिवजयंती मिरवणुकीवर बंदी घातली. या बंदी विरूद्ध शिवसेना, जनसंघ- भाजपा या संघटनांनी संपूर्ण निष्क्रीयता पत्करिली. तेव्हा श्री. विक्रमरावांनी त्या बंदी विरूद्ध प्रचंड प्रदीर्घ आंदोलन संघटित केले आणि त्यात रोमहर्षक पद्धतीने संपूर्ण विजय प्राप्त केला. खरे तर या आंदोलनाची साद्यंत माहिती पुस्तक रूपाने प्रकाशित करणे आवश्यक आहे.

कारण प्रारंभी एक हाती सन् १९८१ मधे सुरू केलेल्या या आंदोलनाने सन् एप्रिल १९८४ मधे विशाल जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त करून, जे अभूतपूर्व यश मिळविले, ते विलक्षण जन आंदोलन कौतुकास्पद ठरते. येथे केवळ या आंदोलनातील पहिला सार्वजनिक संघर्ष कसा पार पडला ते उदाहरणा दाखल देत आहे.

कल्याण नगरातील शिवाजी चौक

शनिवार दि. १५ ऑगस्ट १९८१ सकाळी दहा वाजण्याची वेळ. रिमझिम पाऊस पडत होता. जमावबंदीचा आदेश लागू करण्यात आला होता. शिवाजी चौकाला सैनिकी छावणीचे स्वरूप आले होते. पोलिसांचा कडक पहारा असल्यामुळे चौकात कोणाही नागरिकाला थांबू दिले जात नव्हते!

कारण त्या दिवशी, कल्याण-भिवंडी विभागात सुमारे बारा वर्षापासून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या मिरवणुकीला असलेली बंदी मोडण्याचा कार्यक्रम, विक्रमरावांनी आयोजित केला होता. त्यासाठी सर्वदूर प्रचाराचे रान उठविण्यात आले होते. अखिल महाराष्ट्रातून शिवभक्त कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते.

जनाब अंतुले मुख्यमंत्री होते. त्यांनी हे आंदोलन दडपण्याचा निर्धार केला. कर्तव्य दक्षते बद्दल ख्याती असलेले रिबेरो ठाणे जिल्ह्याचे पोलिस आयुक्त होते. (पुढे ते राष्ट्रीय पातळीवर, आंतर राष्ट्रीय पातळीवर ख्यातनाम झाले.) त्यांनी कल्याण नगराची नाकेबंदी आदल्या दिवसा पासूनच केली. परगांवच्या सत्याग्रही शिवभक्तांना जिल्ह्याच्या बाहेरच थोपविण्यात आले. कल्याणमधे येणाऱ्या बसेस, रेल्वे गाडया यातून येणाऱ्या प्रवाशांवर करडी नजर गुप्त पोलिसांनी ठेवली होती. हिंदुमहासभेचा कार्यकर्ता असल्याचा नुसता संशय आला तरी त्यांना अटक करण्याचे आदेश देण्यात आले होते. विक्रमरावांना निश्चितपणे ओळखू शकणाऱ्या सुमारे डझन भर गुप्त पोलिसांचे जाळे पसरविण्यात आले होते. विक्रमरावांना कल्याण मधे प्रवेश करण्यापूर्वीच अटक करण्याची योजना होती. यदा कदाचित ते कल्याण मधे आलेच तर, त्यांना शिवाजी चौकात पोचण्यापूर्वीच अटक करण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकारी जातीने, डोळ्यात तेल घालून चौकात फौजे सह पहारा देत होते.

चौकात सर्वत्र सामसूम होती. केवळ पोलिसांची वर्दळ आणि पावसाची रिपरिप चालू होती. संपूर्ण कल्याण नगरात पोलिस वाहने दौडत होती. बिनतारी संदेश देणारी वाहने फिरत होती. उद्देश हाच की, कल्याण मधील शेकडो कट्टर शिवभक्त युवकांना - नागरिकांना घराबाहेर पडता येऊ नये! पोलिसांचा हा हेतु सफल झाला होता. घडाळ्याचा काटा हळुहळू पुढे सरकत होता. पुढे काय होणार या बद्दल विलक्षण कुतुहूल निर्माण झाले होते. . . . इतक्यात चमत्कार घडावा, तसे विक्रमराव शिवाजी चौकातच अवतरले! एका पडदा बंद ऑटोरिक्षेतून ते गल्ली बोळातून एकदम, पोलिसांचा पहारा कुचकामी ठरवून, चौकातच प्रकटले. क्षणार्धात त्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशी दणदणीत आवाजात घोषणा दिली. आणि छत्रपतींच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण केली. त्याच क्षणी एक हातगाडी (फळे विकणाऱ्याची) घेवून काही कार्यकर्ते तेथे दाखल झाले. पाठोपाठ छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा त्या गाडीवर ठेवण्यात आला आणि मग छत्रपतींचा गगनभेदी घोषणांत जयजयकार सुरू झाला. कोठून कोण जाणे पण तितक्यातच सुमारे पन्नास साठ युवक जमा होऊन छत्रपतींच्या पुतळ्याची छोटी मिरवणुक निर्माण झाली.

. . . . पोलिस प्रचंड गोंधळात पडले. त्यांनी तत्काळ लाठीहल्ला सुरू केला. विक्रमरावांना घेरून काही पोलिस अधिकाऱ्यांनी अटक केल्याचे सांगितले. विक्रमरावांनी अटक मान्य केली. पण पोलिस गाडीत बसण्यापूर्वी त्यांनी चौकात, स्वातंत्र्यदिना निमित्त फडकणाऱ्या राष्ट्रध्वजाला पुष्पमाला घालून मगच पोलिस गाडीत बसण्याचा निर्धार घोषित केला!

वास्तविक त्याला हरकत घेण्याचे पोलिसांना काही कारण नव्हते! कारण राष्ट्रध्वजाला पुष्पमाला घालण्याचा अधिकार संपन्न करून विक्रमराव पोलिसांच्या गाडीतच बसणार होते. पण पोलिस अधिकाऱ्यांच्या झालेल्या फटफजितीमुळे ते इतके पिसाळले की त्यांनी राष्ट्रध्वजाला पुष्पमाला अर्पण करण्यासाठी जात असलेल्या विक्रमरावांना बळाने रोखले. मग मात्र विक्रमराव चवताळले! त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांना बाजूला ढकलून राष्ट्रध्वजाच्या स्तंभाकडे धाव घेतली. - आणि एकाच वेळी अनेक पोलिसांनी विक्रमरावांवर झडप घातली! विक्रमराव चिखलात कोसळले! चौघा पोलिसांनी त्यांना हातपाय धरून फरफटतच पोलिस गाडीत कोंबले!

उपस्थित छायाचित्रकारांनी या विलक्षण रोमांचकारी घटनेची छायाचित्रे घेतली. (पण पोलिस खात्याने तत्परतेने कॅमेऱ्यातील फिल्म धाकाने, प्रलोभनाने, ताब्यात घेतली. म्हणून पुढे ती चित्रे कोठेच प्रकाशित होऊ शकली नाहीत!)

त्याचवेळी मिरवणुक काढणाऱ्या सत्याग्रही युवकांनाही पोलिसांनी बळाचा वापर करून अटक केली. त्या प्रसंगी पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्या मुळे अनेक युवक- युवती कार्यकर्ते यांना मार बसला! प्रत्यक्ष छत्रपति शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या जिरे टोपा मागील तुरा तुटला, फुटला! छत्रपतींचा तो पुतळा, ती हातगाडी पोलिसांनी जप्त केली. कार्यकर्त्यांबरोबरच शिवप्रतिमेलाही अटक करण्यात आली!

या प्रकारानंतर, कल्याण नगरांत बंदी मोडून, दिवसभरांत अनेक कार्यकर्त्यांनी छोट्या-छोट्या मिरवणुकी काढल्या आणि त्यांनाही पोलिसांनी पकडले!

रिबेरो सारख्या कसलेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या देखरेखी खाली प्रचंड पोलिसी फौज फाटा असतानाही विक्रमराव आणि त्यांच्या शिवभक्त कट्टर युवा कार्यकर्त्यांनी शिवप्रतिमेची मिरवणुक काढण्याचा सत्याग्रह यशस्वीपणे पार पाडलाच!

दुसरे दिवशी मुंबईतील सर्व वृत्तपत्रांत ही वार्ता लाठीहल्ल्याच्या छाया चित्रांसह (विक्रम रावांचे वगळून) प्रकाशित झाली!

विक्रमरावांसह सुमारे ६० - ७० कार्यकर्त्यांना कल्याण बाहेरील अनेक पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले. त्या दिवशी रक्षाबंधन होते. अटकेतच कार्यकर्त्या भगिनींनी रक्षाबंधनाचा कार्यक्रम केला! नंतर कल्याणमधील जागरूक नागरिकांनी अटकेतील कार्यकर्त्यांना जेवण पुरविले. त्यांच्या जखमांवर मलमपट्टी लावली. दुसरे दिवशी रविवार, न्यायालय बंद. पण तरीही कल्याणच्या देशभक्त नागरिकांनी विक्रमरावांसह अटकेतील सर्व सत्याग्रहींना रोख रक्कम भरून प्रतिभूवर सोडविले!

पुढे विक्रमरावांनी प्रत्येक राष्ट्रीय दिनी - १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, श्री शिवजयंती इत्यादी प्रसंगी असेच सत्याग्रही कार्यक्रम पूर्वघोषित योजनेप्रमाणे पार पाडले.

प्रत्यक्ष भिवंडीत ही विक्रमरावांनी पोलिसांच्या प्रचंड पहाऱ्याला हास्यास्पद ठरवून दि. १० मे. १९८२ ला सकाळी ११ वाजता भिवंडीच्या बाजार चौकातच प्रकट होऊन तेथील पहिला अभूतपूर्व सत्याग्रह पार पाडला!

या आंदोलनाला वाढते जनसमर्थन मिळून पुढे ते संपूर्णतः यशस्वी झाले! प्रथम कल्याण मधील शिवप्रतिमा मिरवणुक बंदी शासनाला एप्रिल १९८२ मधे उठवावी लागली! पुढे मे १९८४ मधे भिवंडीतील बंदीही उठविण्यांत यश मिळविण्यात आले. यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी (कै.) श्री. वसंतदादा पाटील होते.

आजमीतीपर्यंत पोलिस खात्याला दि. १५.८.८१ ला कल्याणला आणि दि. १० १९८२ ला भिवंडीला पोलिसांना चकवून कसे प्रकट झाले. हे कोडे उलगडता आलेले नाही! विक्रमरावांच्या नेतृत्वाचे अष्टपैलू गुण या आंदोलनात प्रकट झाले. प्रभावशाली वक्ता, उत्तम संघटक, कुशल गनिमी कावा पद्धतीने लढणारा उत्कृष्ट सेनापति, धाडसी आणि कल्पक योजना आखून त्या प्रत्यक्षात उतरविणारा आक्रमक नेता- अशा गुणवत्तेने विभुषित विक्रमरावांचे, हिंदु समाजावरील अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या आंदोलनांचे विविध आविष्कार पुढे सातत्याने चालू राहिले.

विक्रमराव त्यावेळी अखिल भारतीय हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते. परंतु विक्रमरावांनी हिंदुमहासभेतही प्रारंभी साध्या कृतिशील कार्यवाह म्हणून कामास सुरवात करून, प्रथम नागपूर नगर हिंदुसभेचे कार्यवाह, महाराष्ट्र हिंदुमहासभेचे विभाग संघटक, प्रधान कार्यवाह, अध्यक्ष ही पदे, तसेच अखिल भारतीय हिंदुमहासभेचे प्रथम कार्यकारिणी सदस्य, विभागीय संघटक, प्रधान कार्यवाह, संघटन कार्यवाह कार्याध्यक्ष आणि अखेरीस अध्यक्ष अशी पदे यशस्वी पणे सांभाळून हिंदुमहासभेचा नेता म्हणून ख्याति संपादन केली!

संघर्षशील नेतृत्व

विक्रमरावांनी हिंदुमहासभेच्या माध्यमातून देशसेवा करण्याच्या जेव्हा निर्णय घेतला तेव्हाच त्यांना आपल्या दायित्वाची संपूर्ण जाणीव होती. हिंदुमहासभेची एकच, परंतु प्राणभूत - मूलभूत बाजू मजबूत होती. ती म्हणजे, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदुमहासभेला दिलेले सर्वांगीण देशहितकारी राजकीय - सामाजिक - आर्थिक तत्वज्ञान होय. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वतःच तसे प्रतिपादन केले आहे, "मी सांगितलेली राजनीती ही या देशासाठी येत्या शेदीडशे वर्षांसाठी निश्चितपणे उपयोगी आणि आवश्यक ठरेल. मग त्यानंतर जशी परिस्थिती असेल त्या प्रमाणे आपल्या देशाने देशहितकारक धोरण स्वीकारावे! आज मात्र हीच (हिंदुहितकारी) राजनीती आवश्यक आणि अपरिहार्य आहे!"

. . . . . पण हिंदुमहासभेची संपूर्णतः लंगडी बाजू म्हणजे संघटन शक्तीचा अभाव!

हिंदुमहासभेजवळ देशहितकारक ओजस्वी तत्वज्ञानाचा आत्मा आहे. पण त्या तेजस्वी

आत्म्याला साजेसे पक्ष संघटनात्मक शरीर नाही! सुदृढ शक्तिशाली पक्षसंघटनेच्या अभावी, हिंदुमहासभेच्या तत्वज्ञानाचा व्यावहारिक विजय होणार नाही, हे वास्तव सत्य लक्षात घेऊन विक्रमरावांनी 'संघर्षातून उत्कर्ष' या तत्वाच्या आधारे पक्ष संघटना वाढविण्याचे धोरण स्विकारले.

जो देशहिताचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. पण अन्य पक्ष-संघटना हाताळीत नाहीत, तो प्रश्न संघर्षाच्या माध्यमाने सोडविण्याच्या कार्यामुळे हिंदुमहासभेकडे कार्यकर्ते व जनता आकृष्ट होईल, हे त्यांच्या कार्यक्रमाचे प्रमुख सूत्र ठरलेले असे.

अर्थात शासनाशी वा देशशत्रूंशी प्रत्यक्ष संघर्ष करण्याची, त्याचे परिणाम (म्हणजे अटक, कारावास, आर्थिक हानी, इत्यादी) सोसण्याची सिद्धता फारच थोड्या कार्यकर्त्यांची असते. म्हणजे समाजातील बहुसंख्य लोक अशा संघर्षापासून दूर असतात. आणि अशा सुखासीन व सुरक्षा कोषात राहू इच्छिणाऱ्या बहुसंख्य समाजाला संघर्षात न गुंतविणाऱ्या पक्षांची बांधिलकी पसंत असते. अशा 'संघर्षशील' नसलेल्या, कोणत्याही प्रकारे अनुयायांना धोका पत्करावा लागणार नाही, अशा सुरक्षिततेची निश्चिती देणाऱ्या पक्षाला - संघटनेला बहुसंख्यांचे पाठबळ लाभते.

कृतीस प्रवृत्त करणारे वक्तृत्व

उत्तम युक्तिवादाने, घणाघाती आक्रमक वक्तृत्वाने त्यांनी अनेक लहान मोठ्या सभा गाजविलेल्या मी अनुभवल्या. आपल्या महाराष्ट्रात चांगल्या, विद्वान वक्त्यांची वाण नाही. काही वक्ते विनोदी शैलीने सभा जिंकतात तर काही पांडित्याने सभेवर प्रभाव पाडतात. परंतु विक्रमरावांचे वक्तृत्व वेगळेच! त्यांच्या बहुतेक सर्व सभा विशिष्ट हेतूने, विशिष्ट आंदोलनात्मक परिणाम करण्याच्या हेतूने आयोजित केलेल्या असतात. शोभेच्या, समारंभाच्या सभांमधून त्यांना क्वचितच भाषण करण्याची वेळ येई.

भाषणाच्या पहिल्या पाच दहा वाक्यातच विक्रमराव असे एखादे चमकदार वाक्य फेकीत की उपस्थित श्रोत्यांकडून उत्स्फूर्तपणे टाळ्यांचा, घोषणांचा प्रतिसाद मिळालाच पाहिजे. श्रोत्यांकडून मिळणाऱ्या अशा पहिल्या प्रतिसादाच्या आधारावर विक्रमराव आपले पुढील भाषण करीत. बिनतोड युक्तिवाद, उपस्थित श्रोत्यांच्या ग्रहण-आकलन शक्तीचा अंदाज घेऊन त्यानुसार प्रत्ययकारी उदाहरणे - उपमा यांची उधळण करीत. विक्रमराव उत्कृष्ट प्रचारकांच्या शैलीने, श्रोत्यांनी प्रत्यक्षात या भाषणानंतर कोणती, कशाप्रकारे कृती केली पाहिजे, याची ते निश्चितपणे जाणीव करून देत. आणि बहुधा सभेचा हेतु श्रोत्यांनी विसरू नये म्हणून, कृतिपर, घोषणा ते उपस्थितांकडून वदवून घेत. श्रोत्यांवर असा जबरदस्त प्रभाव पडलेला आढळे की, त्यातील तरूण रक्ताचे भावनाप्रधान युवक श्रोते, विक्रमरावांच्या आदेशानुसार तत्काळ कृती करण्याची सिद्धता प्रकटपणे व्यक्त करीत!

शासन, विशेषतः गृहविभाग, पोलिस खाते म्हणूनच विक्रमरावांच्या भाषणांमुळे सदैव धास्तावलेले असे!

विक्रमरावांच्या अनेक भाषणांनंतर श्रोत्यातील तरूण गटाने प्रत्यक्ष कृतीपर पावले उचलल्याची अनेक उदाहरणे औचित्य पूर्ण ठरेल.

मिरज-सांगली येथे विलक्षण जागृती

दि.२२ मार्च १९८० ला मिरज येथे प्रचंड जनसमुदायासमोर विक्रमरावांचे भाषण चालू होते. परकीय अरबांनी मिरजेमध्ये पैशाच्या आणि गुंडगिरीच्या बळावर धुमाकूळ माजविला होता. त्या पार्श्वभुमीवर आपल्या भाषणात विक्रमरावांनी इस्लामी विकृती संबंधी ऐतिहासिक काळा पासून तो वर्तमान काळा पर्यंतच्या अत्याचारा संबंधी पुराव्यासह वस्तुस्थिती सांगितली. दीड तास चाललेल्या घणाघाती भाषणाचा विक्रमराव समारोप करीत असतानाच सभेपलीकडील अंधाऱ्या जागेतून मुस्लिम गुंडानी व्यासपीठाकडे जबरदस्त दगडफेक सुरू केली. त्या बरोबर संतप्त झालेले श्रोते जेथून दगडफेक होत होती, त्या जागेकडे चाल करून जाण्याच्या सिद्धतेत होते. परंतु विक्रमरावांनी त्यांना थांबविले, ते म्हणाले, "आपली सभा गोंधळात उधळली जावी असा गुंडाचा डाव आहे. आपणांस प्रथम आपण वैधानिक अनुज्ञेने घेतलेली ही सभा प्रथम पूर्ण करू या. राष्ट्रगीत, वंदेमातरम् झाल्या नंतरच सभा पूर्ण होईल. दगडफेक करणाऱ्या गुंडाना पोलिसांनी अटक केली नाही तर, उद्या मिरज आणि सांगली ही दोन्ही शहरे बंद राहतील. आता जे मुस्लिम गुंडांनी आक्रमण केले आहे त्याचा समाचार आपले लढाऊ तरूण सभा संपल्यानंतर योग्य प्रकारे घेतीलच."

विक्रमरावांच्या आवाहनानुसार खवळून उभा राहिलेला श्रोतासमुदाय जागेवर बसला. मुस्लिमांची दगडफेक चालूच होती. तरी विचलीत न होता, विक्रमरावांनी भाषणाचा समारोप केला. त्यानंतर संपूर्ण वंदेमातरम् म्हटले गेले. आणि सभा संपल्याचे घोषित झाले. तत्क्षणी संतप्त श्रोत्यांनी दगडफेक करणाऱ्या गुंडाच्या दिशेने चाल केली. पोलिस अधिकाऱ्यांनी सुरक्षिततेच्या नावाखाली श्री विक्रम सावरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पोलीस गाडीतून सांगलीतील वास्तव्याच्या ठिकाणी पोचविले. मध्यरात्री मिरजेत दंगा झाला. जाळ-पोळ, लुटमार आदी नेहमीचे प्रकार घडले. मिरज सांगली नगरात १४४ धारा लागू करण्यात आली. दुसरे दिवशीच्या बहुतेक सर्व हिंदुत्व विरोधी दैनिकात, विक्रमरावांच्या भाषणातील संदर्भहीन विकृत वृत्तांत प्रकाशित झाला. त्यात विक्रमरावांच्या भाषणामुळेच दंगल उसळली, असे प्रतिपादन करण्यात आले! विक्रमरावांच्या आदेशा प्रमाणे हिंदु युवकांनी मिरज-सांगली नगरात बंद संपूर्ण यशस्वी केला. दुसरे दिवशी दुपारी श्री विक्रमरावांना अटक होऊन पुढे त्यांना जामिनावर सोडण्यात आले. मिरज न्यायालयात अभियोग दाखल करण्यात आला. दंगल सुरू करणाऱ्या आक्रमक मुसलमानांना हिंदु समाजाने सवाई प्रत्याक्रमणाने चोख उत्तर दिले! विक्रमरावांवरील हा अभियोग सुमारे साडेनऊ वर्षे चालला. सुमारे तीस ते पस्तीस

साक्षीदारांची निवेदने झाली. विक्रमरावांच्या वतीने अधिवक्ता मकरंद कुलकर्णी याने कौशल्याने बाजू मांडली. आभियोगाचा निर्णय दि. २८ सप्टेंबर १९८९ ला लागून न्यायमूर्ति डी. एम. ढवळे यांनी श्री. विक्रम सावरकर यांची निर्दोष मुक्तता केली! विशेष गोष्ट म्हणजे या साडे नऊ वर्षाच्या कालावधीत श्री विक्रमराव सावरकर यांची सभा घेण्यास शासनाने कधीही अनुमती दिली नाही!

. . . वंदे मातरम् कहनाही होगा

मुंबईतील महापालिकेच्या उर्दू शाळामधील मुस्लिम विद्यार्थ्यांच्या जात्यंध पालकांनी राष्ट्रगीत वंदेमातरम् आमची मुले राष्ट्रगीत म्हणणार नाहीत. असा आग्रह घोषित केल्यावर, विक्रमरावांनी दि. १ मार्च १९७३ ला मुंबई येथील विधानसभेवर मोर्चा आयोजित केला. या मोर्चात केंद्रीय कार्यकारिणीतील काही नेते उपस्थित होते. विक्रमरावांच्या मातोश्री मोर्चास शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होत्या. आझाद मैदानावरून निघालाल्या हा मोर्चा विधानसभेपासून सुरक्षित अंतरावर अडविण्यात आला. शिष्टमंडळ निवेदन देण्यासाठी विधानसभेकडे गेले. नेमक्या त्याचवेळी हिंदुमहासभेच्या सरोज कोठीवान, सौ. मानिनी श्रीहर्ष सावरकर, कु. वर्षा पंडितराव बखले, कु. अलका लक्ष्मणराव साटेलकर या चार महिला कार्यकर्त्यांनी वेगळ्या नांवाने प्रवेश पत्रिका मिळवून विधान सभागृहातील प्रेक्षकांच्या दालनात प्रवेश मिळविला. पूर्व नियोजित वेळी त्यांनी लपवून बरोबर नेलेली 'अगर भारत मे रहना होगा, तो वंदेमातरम् कहना होगा' या मथळ्याची शेकडो छापील पत्रके विधानसभेत तशा गगनभेदी घोषणा देत फेकली! सभागृह आणि आरक्षी आश्चर्यचकित झाले. महिलांना अटक करण्यात आली. विधानसभेतील मूळ विषयाचे कामकाज थांबवून विधानसभेला या प्रकाराविषयी चर्चा करावी लागली. आणि शेवटी सभापतींनी सर्व संमतीने या महिलांना दोन दिवसाची कारावासाची शिक्षा दिली! मुंबईतील सर्व दैनिकात दुसरे दिवशी या विषयीचे सर्ववृत्त प्रामुख्याने प्रकाशित झाले. आणि विधान सभेच्या पुढील अधिवेशनाचा प्रारंभ तर वंदेमातरम् गायनानेच झाला!

मुंबई महापालिकेतील मुस्लीम लिगी नगरसेवकांनी वंदेमातरमचा विरोध कायम ठेवला होता. तो मोडून काढण्यासाठी श्री विक्रमराव सावरकरांच्या नेतृत्वाखाली आणि बंडू शिंगरे, दत्ता प्रधान इत्यादींच्या सहकार्याने हिंदुमहासभेच्या लढाऊ निर्दशकांनी २ एप्रिल १९७३ला मुंबई महापालिकेच्या बोरीबंदर येथील प्रमुख सभागृहावर उग्र निर्दशने आयोजित केले. त्या दिवशी महापालिकेच्या सभेत, महापौर पदाची चुरशीची निवडणुक होणार होती. निर्दशकांनी सभेच्या प्रारंभापूर्वीच महापालिकेच्या इमारतीला घेराव घातला. आणि इमारतीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वंदेमातरम् म्हटल्यानंतरच आत सोडण्याची व्यवस्था केली. सभेसाठी आलेल्या सर्वपक्षीय नगर सेवकांना इच्छेने वा अनिच्छेने वंदेमातरम् म्हटल्यावरच आत प्रवेश दिला गेला. एका मुस्लीम नगर सेवकाने काही अर्वाच्य शब्द उच्चारून वंदेमातरम् म्हणण्यास

नकार देताच उग्र संघर्ष झाला. मुस्लीम नगर सेवकास धक्का-बुक्की झाल्यावर पोलिसांनी निर्दशकांवर जबरदस्त लाठीहल्ला केला. त्यात विक्रमराव जबर जखमी झाले. आणि बेशुद्धा अवस्थेतच त्यांना रूग्णालयात हलवावे लागले! महापालिकेच्या सभागृहातही याचे प्रतिसाद उमटले, आणि महापौरपदी पालिकेतील सर्वात मोठ्या पक्षाचे शिवसेनेचे महापौर निवडून आले. वरील दोन्ही कार्यक्रमाच्या आयोजनात विक्रमरावांचे नेतृत्व सफल झाले. वंदे मातरम्चे आंदोलन पूर्णतः यशस्वी झाले.

सिमला करारा विरोधी आंदोलन

हिंदुमहासभेचे प्रधान मंत्री या नात्याने १९७३ मधे विक्रमरावांनी देशद्रोही सिमला करारा विरोधी केलेली निर्दशने ऐतिहासिक महत्त्वाची ठरतात. बांगला देश निर्मिती नंतर पाकिस्तानी प्रधानमंत्री भूत्तो आणि भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्यामधे सिमला नगरात प्रदीर्घ चर्चा होऊन सिमला करार सम्मत झाला. हा करार भारताला हानिकारक ठरेल असे घोषित करून, विक्रमरावांनी प्रत्यक्ष सिमला येथे निदर्शने आयोजित केली. आरक्षी विभागाला विक्रमरावांना नागपूर येथे कार्यक्रमापूर्वी अटक करावयाची होती. परंतु त्यांना गुंगारा देवून विक्रमराव दिल्ली मार्गे निदर्शकांच्या एका तुकडीसह सिमल्या कडे निघाले. सिमल्यापासून सुमारे दहा मैलावर असतानाच पोलिसांनी या तुकडीला अटक केली. आणि 'कंडा घाट' या डोंगरावरील कारागृहात पंधरा दिवस डांबून ठेवले. चर्चा आटोपून भारत-पाक मधे करार झाल्यानंतरच त्यांची सुटका झाली. हिंदुमहासभा या पक्षाने या कराराला प्रथम सक्रीय विरोध केल्याची नोंद इतिहासात झाली.

पांचगणी येथील श्री. राजमोहन गांधी यांच्या पंचमस्तंभीय एम.आर.ए. संस्थेविरूद्ध आंदोलन, गुजराथ मधील सिद्धपूर येथील रूद्र महालय मंदिरावरील इस्लामी आक्रमणाचा प्रतिकार करून तेथे चारशे वर्षापासून चालू असलेला नमाज बंद पाडण्याचे आंदोलन, 'लहरी महम्मद अंतुले हटाव' हे मैदानात लढविलेले आंदोलन अशी कितीतरी आंदोलने विक्रमरावांनी प्रखरपणे चालविली. भिवंडी येथे जागतिक इस्लामी परिषद भरण्याची घोषणा झाली. ही परिषद जातीजातीत देशभाव निर्माण करणारी ठरेल, म्हणून ती रद्द करावी अशी मागणी करणारी प्रखर निर्दशने विक्रमरावांनी ठाणे जिल्हा पोलिसांच्या कचेरी समोर केली. (सप्टेंबर १९८४) परिणामतः भिवंडीतील ती परिषद रद्द करण्यात आली. तसेच भिवंडी जवळ अद्ययावत यंत्र सामुग्रीसह एक प्रचंड कत्तलखाना निर्माण करण्यात आला. अन्य पशु बरोबरच गोवंशाची कत्तल होण्याची शक्यता लक्षात घेवून श्री विक्रमरावांच्या प्रेरणेने एक सर्व पक्षीय अतिशय उग्र आंदोलन संघटित करण्यात आले. प्रचंड मोर्चावर झालेला गोळीबार आणि त्यामुळे सर्व साधारण जनतेत निर्माण झालेला प्रलयंकारी प्रक्षोभ लक्षात घेवून नागपूर विधानसभा अधिवेशनात गुंतलेल्या मुख्यमंत्र्यांनी कत्तलखाना योजना रद्द केल्याचे घोषित केले.

हिंदुमहासभेच्या आर्थिक धोरणाचे आचरण

सन १९८० ते ८७ या कालावधीत अखिल भारत हिंदुमहासभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी अक्षरक्षः सर्वांगीण झंझावाती आंदोलने केली. समान सामाजिक संहिता देशातील सर्व नागरिकांना लागू करावी, यासाठी प्रदीर्घ सर्वकं ष आंदोलन संघटित केले. डॉ. सुधीर हेंद्रे यांनी प्रथमतः प्रकाशित केलेले 'हम दो हमारे दो; हम पांच हमारे पच्चीस' हे चित्र अखिल हिंदुस्थानात लक्षावधी पत्रके - पोस्टर्स या द्वारे सर्वतोमुखी केले. त्यासाठी लक्षावधी स्वाक्षऱ्या राष्ट्रपतींकडे पाठविल्या. इतकेच नव्हेतर, २५- २६ जुलै १९८५ ला हिंदुमहासभेच्या वतीने सर्व नागरिकांना समान नागरिक कायदा तात्काळ लागू करावा या मागणीसाठी त्यांनी अधिवक्ता माधवराव पाठक यांच्या द्वारे सर्वोच्च न्यायालयात रिट - पीटिशन दाखल केले. देशातील ईसाई समाजाला खुश करण्यासाठी पोप पॉल यांना दि. १ फेब्रूवारी ८६ ते ९ फेब्रुवारी १९८६ पर्यंत देशव्यापी दौरा करण्याचे आमंत्रण तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी दिले होते. लक्षावधी हिंदुचे इस्लामीकरण करण्याचा डाव या मागे होता. हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून विक्रमरावांनी या दौऱ्याला प्रखर विरोध केला. आणि पोपच्या प्रत्येक कार्यक्रमासमोर निर्दशन करण्याचा आदेश दिला. दि. १ फेब्रुवारी १९८६ ला दिल्ली येथे आणि दि. १० फेब्रुवारी १९८६ ला मुंबई येथे श्री विक्रमरावांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. भारतातील वृत्तपत्रांनी याची अत्यल्प दखल घेतली. तरी विदेशातील दूरदर्शन संस्थांनी या आंदोलनाचे चित्रिकरण आणि विक्रमरावांच्या मुलाखती जगभर प्रस्तुत केल्या.

आपल्या अध्यक्षपदीय कारकीर्दीत त्यांनी हिंदुमहासभेच्या आर्थिक धोरणाचे व्यवहारिक आचरण केले. ते नेहमी म्हणतात, "हिंदुमहासभेच्या धोरणानुसार देशाच्या समाजाशी संबंधित राष्ट्रीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक समस्या सोडविण्याचे कार्य पक्षकार्यकर्ते करू शकतात." परंतु सर्वधर्म समभावी (सेक्युलर) म्हणविणाऱ्या आणि विशेषतः साम्यवादी, समाजवादी इ. सर्व राजकीय पक्षांना हिंदु समाजावरील धार्मिक, सांस्कृतिक अन्यायाविरूद्ध लढणे शक्य होत नाही. विक्रमरावांनी 'हिंदुस्थान श्रमिक सेना' ही संस्था स्थापन करून ट्रेड युनियन रिक्ट खाली पंजियित केली. बेकारी विरोधी, भाववाढ-महागाई विरोधी आंदोलने संघटित केली. परंतु या प्रश्नाकडे देशातील अन्य प्रबळ संस्था संघटना अधिक लक्ष देत असल्याने आणि हिंदु समाजावरील धार्मिक, सांस्कृतिक, अत्याचाराविरूद्ध अन्य कोणी लढत नसल्यामुळे हिंदुमहासभेजवळ असलेली आंदोलन शक्ती मुख्यत्वे हिंदु हितासाठी वापरणे आवश्यक ठरल्याने त्याकडे अधिक लक्ष पुरविण्यात आले.

लौकिक व्यावहारिक अपेक्षित अपयशाच्या जाणीवेमुळे निराशा नाही

हिंदुमहासभेच्या माध्यमातून विक्रमरावांनी केलेल्या आंदोलनाचा परिणाम म्हणून संस्थेला किंवा त्यांना व्यक्तिगत लाभ निवडणुकीत विजयी होण्याच्या स्वरूपात मिळत नाही. या

बद्दल अनेकजण खंत व्यक्त करतात. विक्रमरावांनी पक्षबदल करून आपल्या कर्तृत्वाचा व्यवहारिक लाभ उठवावा असाही सल्ला काहीजण आत्मियतेतूनही देतात. किंवा हिंदुमहासभेने आपले राजनैतिक धोरण बदलेले पाहिजे (म्हणजे मुख्यतः हिंदुत्वाचा आग्रह सोडला पाहिजे) असा अनाहूत सल्लाही काही जण देतात. त्यावर विक्रमरावांचे उत्तर ठामपणे ठरलेले असते. ते म्हणतात "आपल्या नेत्यांनी (स्वातंत्र्यवीर सावरकरांनी) दिलेला देशहिताचा आदर्श आपण पाळला पाहिजे. हिंदुत्व सोडून इंद्रपद जरी मिळत असेल, तरी ते लाथाडून हिंदु हित संरक्षणासाठी अखेरचा हिंदुत्वनिष्ठ म्हणून लढणेच श्रेयस्कर ठरेल," हे तत्त्व आपण व्यवहारात उतरविणे आवश्यक आहे. आपले राजकीय तत्वज्ञान चुकीचे सिद्ध झाले असते तर ते सुधारणे योग्य ठरले असते. परंतु १९३७ पासून आजतागायत हिंदु महासभेने पुरस्कारलेली सर्व धोरणे आणि इशारे खरे ठरलेले आहेत. अगदी, 'वर्गसंघर्ष नव्हे तर राष्ट्रहितार्थ वर्गसमन्वय' हे धोरणही आज जागतिक पातळीवर यशस्वी ठरले आहे. रशियालाही समन्वय करावा लागला. भारतातल्या पोपटपंची समाजवादी धोरणांना पुंजीवादाशी नेहमीच समन्वय करावा लागला आहे. मग अशा स्थितीत हिंदुमहासभेच्या राजनैतिक धोरणात सुधारणा करण्याची आवश्यकता काय?

आपली पक्ष संघटना दुर्बल आहे. त्यासाठी संघटन शास्त्रातील कौशल्याचे अनुकरण केले पाहिजे. संघटनशक्तीच्या अभावी आपल्या तत्त्वज्ञानांच्या झालेल्या विजयाचे श्रेयही हिंदुमहासभेला घेणे शक्य होत नाही. म्हणूनच,

"लोकशाही निवडणुक पद्धतीत हिंदुमहासभेला सध्याच्या परिस्थितीत यश मिळणे कठीण आहे, याची जाणीव ठेवनूच स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतिकारकांच्या पीढीप्रमाणेच आणखी एका पीढीला स्वतःच्या वा पक्षाच्या लाभाच्या नव्हे, तर देशहिताच्या दृष्टीने आवश्यक त्यागाची भूमिका स्विकारणे अपरिहार्य ठरते - आणि ती भूमिका हिंदु महासभेच्या आजच्या कार्यकर्त्यांनी चांगल्या रीतीने पार पाडली पाहिजे," असे विक्रमराव आपल्या अनुयायांना सांगत असतात.

हिंदु महासभेने चालू केलेल्या राष्ट्र हितकारी आंदोलनांचे श्रेय पुढे शक्तीशाली संघटनांनी मिळवले आहे. त्याबद्दल विक्रमरावांना कधीच खंत वाटत आलेली नाही. आंदोलनाचा उद्देश सफल होणे हे आपले ध्येय. त्याचे श्रेय मिळवणे ही शक्तीवर अवलंबिलेली दुय्यम महत्त्वाची गोष्ट ठरते. अगदी अलीकडील उदाहरण देवून हा लेख संपवितो.

पाकिस्तानी क्रिकेट चमूचा भारताचा दौरा घोषित झाला, तेव्हाच विक्रमरावांच्या प्रेरणेने महाराष्ट्र प्रदेश हिंदुमहासभेने दि ४ ऑगस्ट १९९१ ला वार्षिक सभेत हा दौरा रद्द करण्याची मागणी केली. आणि हट्टाग्रहाने सामने घेण्याचे शासनाने ठरविलेच तर, निदान महाराष्ट्रात (मुंबई- नागपूर) तरी हे सामने उधळून लावले जातील असा इशारा देण्यात आला. त्यानुसार भारताच्या प्रधान मंत्र्यांना तारपत्रे, सहस्रावधी हस्ताक्षरांची आवेदने पाठविण्यात

आली. पहिली चौक सभा दादर येथील कबूतरखान्याजवळ स्वतः विक्रमरावांनीच दि. १३ सप्टेंबरला संबोधित केली. त्यांनी स्वतः दि. २५ सप्टेंबर १९९१ ला पाकिस्तानच्या प्रधानमंत्र्यांना भारतात क्रिकेट चमू पाठवू नये अशी तार केली. हिंदु महासभेच्या कार्यकर्त्यांनी 'वाचकांचा पत्रव्यवहार' सदरात या सामन्यांना विरोध करणारी पत्रे प्रकाशित केली. मुंबईच्या सामन्याला विरोध करण्याची योजना चौक सभातून घोषित केली. या संबंधीची त्रोटक वृत्ते लोकसत्ता, सामना, मुंबई सकाळ, मुंबई तरूण भारत, निर्भय- पाथिक इत्यादी दैनिकात काही प्रमाणात प्रकाशित झाली.

आनंदाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रात शक्तीशाली असलेल्या लढाऊ हिंदुत्वनिष्ठ शिवसेनेचे प्रमुख. मा. बाळासाहेब ठाकरे यांनी दि. १७ ऑक्टोबर १९९१ ला दसऱ्याच्या भव्य मेळाव्यात पाकिस्तानी संघाला मैदानावर पाय ठेवू देणार नाही अशी घोषणा केली. काही वीर शिवसैनिकांनी नंतर वानखेडे मैदानातील क्रिकेटची खेळपट्टी उध्वस्त केली. जगभर या वार्ता प्रकाशित झाल्या. आणि पाकिस्तानी शासनानेच प्रथम मुंबईतील सामना आणि पाठोपाठ भारतातील सर्व दौराच रद्द करण्याची घोषणाच केली. शिवसेनेच्या प्रचंड शक्तीमुळे हा विजय मिळू शकला हे सत्य सर्व दैनिकांनी प्रकाशित केले. परंतु कोणत्याही दैनिकाने या आंदोलनाचा प्रारंभ हिंदुमहासभेने केला असा उल्लेख केला नाही.

अर्थात विक्रमराव आणि त्यांचे हिंदुसभा निष्ठावंत अनुयायी यांना आनंद झाला तो पाकिस्तानी चमूचा दौरा रद्द झाला याचा. हिंदुमहासभेच्या आंदोलनाचा मूळ हेतू सफल झाला, याचा. दैनिक वृत्तपत्रांनी उपेक्षा केली याची खंत नाही. कारण जेव्हा हिंदुमहासभेची संघटन शक्ती वाढेल तेव्हा असे श्रेय मिळणे सहज शक्य होईल.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सूरू केलेल्या आणि त्यांच्या नंतरच्या हिंदु महासभा नेत्यांनी चालविलेले देशहिताचे कार्य माननीय श्री. विक्रमराव सावरकर यांनी आपल्या चैतन्यदायी नेतृत्वाने प्रज्वलित केले. याची नोंद उद्याच्या इतिहासकारांना घ्यावीच लागेल.

* * * *



▼ तीन तडफदार संपादक सा. ग्रामसेवकचे सरदार अटलबहादुर सिंह. सा. बलिदानाचे विदर्भवीर जांबुवंतराव धोटे, सा. प्रज्वलंतचे श्री. विक्रम सावरकर. — कलारसिक संपादक



सुप्रसिद्ध गायक संगीत दिग्दर्शक निर्माता श्री. सुधीर फडके यांच्या समवेत ▼ विक्रम सावरकर



सावरकर मंगेशकर घराण्याचा संबंध दुसऱ्या पिढीपर्यंतही जिव्हाळ्याचा राहिला.

श्री. हृदयनाथ मंगेशकर आणि विक्रम सावरकर.



हिं दु त्व मी मां सा प्र ज्व लं त प र्व

सुप्रसिद्ध विनोदी अभिनेते निळूभाऊ फुले यांच्या सोबत विक्रम सावरकर.



प्रज्वलंत पर्व

डॉ. श्री. प्र. कुळकर्णी

श्री. विक्रम नारायण सावरकर, संपादक सा. प्रज्वंलत, अखिल भारतीय हिंदु महासभेचे भूतपूर्व अध्यक्ष. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेकानेक आंदोलनांचे धडाडीचे नेते, त्यांच्या वयाला दि.२ डिसेंबर १९९१ रोजी साठ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने प्रस्तुत गौरव ग्रंथ प्रकाशित होत आहे.

या विभागात स्वतः श्री विक्रम सावरकर संपादित सा. प्रज्वलंत मधील त्यांचे लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. लेखांची निवड करून त्यावर संपादकीय लिहिण्याचे दायित्व प्रस्तुत लेखकाने स्विकारले. त्याचे फालित वाचकांच्या रसिक आस्वादासाठी येथे सादर आहे.

एकूण १६ लेखांची निवड येथे करण्यात आली आहे. सन १९६८ ते सन ८७ या १९ वर्षातील सा. प्रज्वलंत मध्ये उमटलेल्या श्री. विक्रम सावरकरांच्या शेकडो लेखातून ही निवड केली आहे. त्यात त्यांच्या राजकीय, साहित्यिक, सामाजिक आणि स्फूट लेखनाचा वा भाषणांचा समावेश आहे. त्या लेखातून श्री. विक्रम सावरकरांचे व्यक्तिमत्व, त्यांची विचारधारा आणि साहित्यिक व पत्रकारितेचे गुणविशेष स्पष्ट व्हावेत हा उद्देश आहे. तो किती अंशानी सफल झाला हे वाचक ठरवतील. निवडकर्त्याच्या बौद्धिक मर्यादा, त्याची अभिरूची आणि प्रसंगी वाटणारे लेखांचे महत्व निश्चितच निवडीवर मर्यादा घालतात. त्यामुळे ही निवड सर्वोत्तम आहे असा दावा नाही. वगळले ते सर्व टाकाऊ असेही नाही. खरे म्हणजे सर्वच लेखांचा एक संग्रह निघावा. प्रस्तुत ग्रंथ त्याची नांदी ठरावी. हीच मनोकामना.

प्रस्तुत संकल्पामागची भूमिका स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांशी बांधिलकी स्वीकारून देशकार्यासाठी तन, मन, धन झिजविणाऱ्या एका समर्पित जीवनाचा गौरव करणे एवढीच मर्यादीत नाही; तर त्या निमित्ताने एका विचारधारेचे मूल्यमापन व्हावे ही आहे. वैचारिक मंथनाला चालना मिळावी ही आहे.

श्री. विक्रम सावरकर हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या एका विचारधारेचे प्रतिनिधित्व करतात. हिंदुत्ववादाच्या काल आज आणि उद्या यांना जोडणारा तो एक दुवा आहे. आज हिंदुत्व चलनी प्रयोग आहे. राजकारणात 'हिंदु व्होट बँक' हा दबाव गट अस्तित्वात आला आहे. हे बहुस्व वर्चस्वी नसले तरी दखलपात्र ठरले आहे. तुष्टीकरणाच्या खेळीला एक प्रतिशह निर्माण झालेला आहे. पण ही स्थिती एकाएकी आलेली नाही. त्यामागे प्रत्यहत चालू असलेल्या जाणत्या अजाणत्या संघर्षाचा इतिहास आहे. या संघर्षात योगदान देणारे अनेक आहेत त्यापैकी एक विक्रम सावरकर आहेत. त्यांच्या योगदानाचे मूल्यमापन आवश्यक आहे. आज हिंदुत्वाच्या अनेक विचारधारा आंदोलनांच्या निमित्ताने पुढे येत आहेत. अनेक संघटना निर्माण होत आहेत, अनेक पक्षांतरे होत आहेत, अनेक निवडणुका हिंदुत्वाच्या नावाने

लढविल्या जात आहेत. आज हिंदुत्व लोकमानसात जागृती घडवून आणित आहे. पण काल, आजचा चलनी प्रयोग लांछनी प्रयोग होवू पहात होता. इंग्रजाळलेल्या हिंदुनी, विचारवंतानी, हिंदुत्व नाकारण्यांची स्पर्धाच जणू लावली होती. हिंदुधर्मातील रूढी, अस्पृश्यता, लोकभ्रम, वेडाचार आणि दुराचार यांना धर्म मानून कवटाळत राहणाऱ्या धर्ममार्तडांनी, धर्मसुधारणेचा वेळीच पुरस्कार न केल्याने जगाच्या पाठीवरील एक अत्यंत सहिष्णु, अत्यंत लोकशाहीवादी, व्यक्ति स्वातंत्र्यवादी धर्मसंहिता अन्य कट्टर पंथियांच्या तुलनेत परंपरावादी ठरली आणि अन्य पंथ उदारमतवादी ठरले. राजाश्रयाचे पाठबळ, ब्रिटीशांची भेदनीती, आणि हिंदुधर्मीयांची उदासीनता, धर्मपीठांची असमर्थता या सर्व कारणांनी एक दीर्घकालीन संस्कृती, विचारधन आणि इतिहास धोक्यात आला. धर्मसंघर्षाने अंधधर्म वेडाची जागा घेतली. अल्पसंख्याकांसाठी धर्म सुरक्षित अस्तित्वाची हमी ठरला. दुसऱ्या बाजुने, धर्मपरिवर्तनाची प्रक्रिया मंदगतीने वाटचाल करीत राहिली. आणि हिंदुमधील एका मोठ्या संख्येला धर्मपरिवर्तनाची वाट पाहण्यापेक्षा धर्मांतराची वाट जवळची वाटली, तर हा त्या समाजाचा दोष नव्हता. परिणामी या देशाची शकले पाडण्याची प्रक्रिया अधिक मजबूत झाली. राज्यकर्त्यांना तुष्टीकरण आणि भेदनीती वापरण्यासाठी आणखी एक दबाव गट अस्तित्वात आला. या सर्व गदारोळात समाजाला बुद्धीनिष्ठ आकार देण्याची प्रक्रियाच निर्माण झाली नाही. या राष्ट्रातील बहुसंख्याच्या धर्माचे अस्तित्व गौण ठरले. अल्पसंख्याकांचे धर्म किल्ले मजबूत झाले. निधर्मित्व बुद्धिवाद हरवून बसले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यकर्त्यांसाठी दोन पर्याय उपलब्ध होते. एक, सर्व धर्मांना समान नकार. दोन, सर्वधर्मांचा समान स्वीकार. पहिला पर्याय अंमलात आणण्यासाठी आवश्यक पार्श्वभूमी तयार नसल्याने दुसरा पर्याय व्यवहारी आणि न्याय्य ठरला असता. सर्व धर्मांना समान संरक्षण, समान वागणूक ठेवून धर्म ही वैयक्तिक बाब बनविली असती, धर्माचा आणि राष्ट्रहिताचा संघर्ष असेल तेथे राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचे धोरण अंगिकारले असते तर अनेक प्रश्न उपस्थित झाले नसते. धर्माच्या आधारावर झालेली पाकिस्तानची निर्मिती आणि त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांना समर्थपणे उत्तरे शोधण्याची गरज होती. सामाजिक एकात्मता शक्तीशाली राज्यव्यवस्थेतून त्याचप्रमाणे बुद्धिगम्य सुधारणातून येत असते. दुसऱ्यांना समावून घेणे म्हणजे परास्तुती आणि आत्मनिर्भर्त्सना नव्हे तर नीरक्षीर विवेकाची मागणी होय. हा विवेक राज्यकर्त्यांनी, बुद्धिवाद्यांनी आणि समाजसुधारकांनी बाळगला नाही. एकात्मतेचे प्रयोग दसरा, दिवाळी, इदेच्या स्नेहभेटी पलिकडे सरकले नाहीत. धर्माचे विचारमंथन धर्मांतर्गतच राहिले. सर्व धर्मातले समान विचारी एकत्र येवून सर्वच धर्मात परिवर्तनाची गरज असते हे पटवून देण्यात असमर्थ ठरले. धार्मिकता बळावली. विवेकवाद निर्बळ होत गेला. ही उणीव अल्पसंख्याक धर्मात विशेषतः मुस्लीम धर्मात जास्त दिसते. काही सुधारक तेथे झालेत पण ते सर्व बाजूंनी एकाकी पडले. त्यांचे साहचर्य घडले ते हिंदुधर्म नाकारणाऱ्या विवेकवादी गटांशी. त्यांचे साहचर्य धर्मसुधारणावादी

(हिंदुधर्मावर विश्वास असणाऱ्या) गटाशी घडले असते तर कदाचित वेगळे चित्र तयार झाले असते. तेव्हा एकात्मतेसाठी गरज होती ती विवेकी, वस्तुनिष्ठ हिंदुसंघटनाची.

ही गरज ओळखली होती सावरकरांनी. इंग्लडमध्ये अकबर जंयती पासून शिवजयंतीपर्यंत एकात्मतेचे सर्व प्रयोग करणाऱ्या सावरकरांनी. हिंदुधर्म उपासना आणि आचार यातून वेगळा करून त्याला राष्ट्रधर्म बनवून हिंदुत्वाची व्याख्या करून आसेतु हिमाचल या भूमीला पूण्यभू, मातृभू मानणाऱ्या सर्वांना त्यात प्रवेश मिळाला. मुस्लीमांना वगळले गेले. शीयांना सह प्रवासी दर्जा मिळाला. ईश्वर न मानण्याऱ्या, रूढी परंपरावर टोकाचा आघात करणाऱ्या, विज्ञानवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी सावरकरांनी सत्यनारायण आणि पतितपावनाची स्थापना नव समाजाच्या निर्मितीसाठी प्रतिके म्हणून स्वीकारली. प्रथम एकसंघ हिंदु समाज आणि मग हिंदी राज्य ही मनिषा बाळगली. समाजसुधारणेचे आणि संघर्षाचे मार्ग एकाचवेळी अंगिकारले. वारंवार सिद्ध झाल्याप्रमाणे त्यांचे ध्येय अंतिमतः एकात्म भारताचेच होते. पण रूढींनी पोखरलेला, अस्पृश्यतेचे ग्रहण लागलेला हिंदुसमाज प्रथम एकात्म झाला पाहिजे तरच अन्य शक्तिशाली समाजाबरोबर एक होवू शकेल. सबळांचेच ऐक होते आणि टिकते. ही धारणा त्यामागे होती. हिंदुसंघटन हा भावात्मक विचार होता. मुस्लिमलीगच्या स्थापनेनंतर त्याला एकांगीपण आले. सावरकरांना त्यांच्या आयुष्यात दोन धक्के बसले आणि ते थोडे कडवट झाले. पाकिस्तान हा पहिला धक्का हतबलपणे पाहत बसण्याशिवाय काही करता आले नाही ही खंत गांधीवादाच्या प्रखर विरोधात प्रगट झाली. दुसरा धक्का धर्मांतराचा धर्मसुधारणेसाठी मध्यंतरी वेचलेली सर्व वर्षे जणू पुसुन गेली. हा धक्का त्यांनी पचवला. ही तर हिंदूधर्मातील उडी अशी स्वसमजूत त्यांनी काढली. खरे तर हा धक्का पचविला गेला कारण मनाने ते आणि डॉ. आंबेडकर समानधर्मा होते. विवेकवाद, विज्ञाननिष्ठा, बुद्धीप्रमाण्यवाद, दोघांच्याही मर्मबंधातली ठेव होती. आणि डॉ. आंबेडकरांनी स्विकारलेला मार्ग एक अटळ घटना होती याची आंतरिक जाणीव त्यांना होती. १९३५ ते १९५४ वाट पाहूनही, उपेक्षितांना कोणताच आशेचा किरण न दिसल्याने हे घडले. हे जाणवून त्यांनी हा धक्का पचविला असावा.

हे सर्व विस्ताराने मांडण्याचे कारण म्हणजे पक्ष म्हणून क्षीण-प्रभावी हिंदुमहासभेचे वास्तवतः सर्वेसर्वा असणाऱ्या विक्रम सावरकरांना लाभलेला हा वृत्तीचा आणि तत्वज्ञानाचा वारसा आहे. या विचारांशी एकनिष्ठतेचा वारसा सांगून त्यांनी बुद्धयाची हिंदुत्वाचे व्रत घेतले आहे. आणि हे व्रत पक्षीय आणि पत्रकारितेच्या स्तरावर चालविण्यासाठी आचार्य अत्रे यांचे कडून (दै. मराठा मध्ये) धडे घेवून प्रज्वलंत हिंदुत्व चळवळीचे मुखपत्र बनविले गेले. तेव्हा त्यातील लेखांचा मागोवा घेतांना पहिला शोध ह्याच अनुषंगाने घेतला जाईल. याच विचारधारेच्या पार्श्वभूमीवर विक्रम सावरकरांनी पुढे चालविलेल्या संघर्षाची खोली, त्याची प्रभाविता, परिणामकारकता लक्षात घेतली जाईल.

त्याचवेळी अन्य विचारधारांशी तुलनाही अपरिहार्य ठरेल. सावरकरांच्या विचारातून प्रेरणा घेवून ज्या प्रमाणे हिंदुमहासभा कार्यरत झाली त्याच प्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही दुसरी विचारधारा कृतीने सरस ठरलेली आहे. हिंदुत्वातील या दोन भांवडांचे व्दंव्दही या निमीत्ताने तपासले जाईल.

हिंदुत्वाबरोबरच अन्य सामाजिक कार्यांची विक्रम सावरकरांनी घेतलेली दखल, राजकारणाची जाण, व्यक्त झालेली भविष्यवाणी या सर्वांचे समालोचन येथे प्रस्तुत लेखकाच्या मर्यादित सादर आहे. व्यक्तिगत दृष्टिकोण बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न आहे. असे प्रयत्न जेवढे निरपेक्ष असू शकतात. तेवढेच श्रेय येथे अपेक्षित आहे.

हिंदुत्व, हिंदुसमाज, हिंदुधर्म यातील भेदांचे तात्विक मुद्दे बाजूला ठेवून हिंदु आणि मुस्लीम समाज यातील संघर्षाचे वास्तव स्वरूप, त्याचे जातीय दंग्यात होणारे रूपांतर आणि स्वंतत्र भारतातील राज्यकर्त्या शासनाचे धोरण यावर लक्ष केंद्रित केल्यास बहुसंख्य आणि अल्पसंख्याक हे वर्गीकरण आणि त्या वर्गीकरणातून निर्माण झालेल्या समस्या स्पष्ट व्हाव्यात. अल्पसंख्याक केवळ अल्पसंख्याक आहेत म्हणून त्यांना संरक्षण मिळावे का? हे संरक्षण कोणत्या मर्यादेपर्यंत असावे? त्यांची धर्मस्थाने आणि धर्मपीठे कायद्याच्या कक्षेबाहेर असावीत का? बहुसंख्यांकांना काहीच प्रश्न नसतात का? त्यांचे संरक्षण? त्यांच्या दैवतांचे संरक्षण नी त्यांच्य व्यक्तिगत कायद्यांचे संरक्षण? हे प्रश्न शासनाने केवळ ते बहुसंख्य आहेत म्हणून दुर्लक्षीत करायचे का? स्वातंत्र्यानंतर सातत्याने निर्माण झालेले हे प्रश्न आहेत. विकमरावानी तेच ऊचलले आहेत.

क्रिकेट मॅचमध्ये पाकीस्तानचा पराभव झाला, इराण ने सलमान रशदीच्या ग्रंथावर बंदी आणली, सद्दाम हुसेनने जिहाद पुकारला, इत्यादी भारतीय मुस्लीम वा हिंदु समाजाशी संबंधित नसणारी कारणे घडली. तरी भारत पेटवला जातो. त्यासाठी शस्त्रास्त्रे इस्लामी राष्ट्र पुरवितात, भारताची शकले पाडतात हे वास्तव. याला तोंड देण्याची जबाबदारी शासनाची आणि शासन पार पाडत नसेल तर प्रत्येक नागरिकाची ही भूमिका हिंदूना स्वसंरक्षणाच्या मागणीचा अधिकारच नाही काय? "पापस्तानी सापांच्या पिल्लांना ठेचावे", "सिंधू मुक्तीचा काळ जवळ आला" आणि बहुंताशी सर्वच लेखातून भाषणातून स्पष्ट होते.

मुस्लीम समाज भारताशी अजुन एकरूप झाला नाही. राज्यकर्त्याचे अवाजवी तुष्टीकरण त्याला जबाबदार आहे हे निर्विवाद सत्य. त्यात भर म्हणजे जागतिक स्तरावर "पान इस्लामिझम् " चे प्रयत्न. अरब राष्ट्रात अमेरिका लोकप्रिय नाही. रशियाचे विघटन झालेले. आर्थिक हेतूने रशिया अमेरिका युती अपरिहार्य झालेली. तेव्हा आता अरब राष्ट्रे चीनशी मैत्री जोडून जागतिक वर्चस्व निर्माण करण्यचा प्रयत्न करणार. त्यात पहिला बळी भारताचा जाईल ही अपेक्षा. पाकिस्तान, बंगलादेश, लंका ही धर्माधिष्ठीत राष्ट्रे आणि भारतावर अनेक कारणाने टपलेला चीन यात भारत होरपळला तर नवल नव्हे. अशावेळी आंतरिक विघटन

अत्यंत घातक ठरेल. तेव्हा भारताची एकात्मता जी काय साधायची असेल तर ती आताच वेळ आहे आणि पक्षपाती शासन ते करू शकणार नाही, तोपर्यंत हिंदूनो सावधान ह्या प्रतिक्रीया उमटणारच.

हिंदुसभेच्या या प्रयत्नाला एकमुखी पाठिंबा डाव्यांसह सर्वांकडून अपेक्षित आहे. याचा अर्थ त्यांनी हिंदुसभेच्या तत्वांचा स्वीकार करावा. भडक आणि कडवट प्रतिक्रिया व्यक्त कराव्यात किंवा हिंदूसभेबरोबर खांद्याला खांदा लावून लढावे असा नाही. त्यांनी केवळ बुद्धिवादी भूमिका स्विकारून सरकारला न्याय आणि अपक्षपाती धोरणासाठी बाध्य करायचे आहे. बौद्धिक दृष्टया सावरकरवादाला म्हणजे विज्ञानवादाला, बुद्धिप्रामाण्यवादाला आणि इतिहासवादाला जवळ असणाऱ्या डाव्यांनी या बाबतीत पुढाकार घेणे आवश्यक होते. त्यांची चूक मुसलमानांचे पक्षपाती होण्यात झाली तर हिंदूसभेची चूक त्यांचा अर्थवाद धोपटून काढण्यात आणि त्यांना हिंदूस्थानची नाडी समजली नाही असे अस्थानी निष्कर्ष काढण्यात झाली. आज गरज आहे, ती डाव्यांनी धर्माचे अवडंबर नाकारीत असतांना वास्तव नजरे आड होवू न देण्याची. तर हिंदुसभेने सावरकरांप्रमाणे राष्ट्रहिताला धर्म मानून सम्यक दृष्टीने मुसलमानांकडे पाहण्याची.

अन्यथा विवेक संपुष्टात येतो. विवेकाचा अधिक्षेप कसा होतो ते '१५ नोव्हेंबरच्या हुतात्म्यांना वंदन' या विक्रमरावांच्याच अन्यथा सुरेख लेखात कळते. २४ क्रान्तिकारकांना एकाच दिवशी फाशी सुनावणारा हा दिवस. त्याचे वस्तुनिष्ठ, बिनचुक आणि क्रान्तीकारकांच्या बलिदानाचे महत्व पटवून देणारे हे वर्णन मनोज्ञ आहे. पण त्यात खुबीने एक शीर्षक येते "मुसलमान शिपायाने विश्वासघात केला" यातून निर्माण होणारा बुद्धिभेद, आभास १८५७ पासून तर आजपर्यंतच्या अनेक मुस्लिम बलीदानाना अन्याय कारक ठरतो. अर्थात, अपवादाने नियम होत नाही वगैरे युक्तीवाद करता येईल तरीपण पण सत्य उरते. विवेक हाच रचनेचा पाया होवू शकतो. अर्थात विवेकाचा अधिक्षेप केवळ हिंदुसभा करते असे नाही. एका ब्राम्हणाने गांधी हत्या केली म्हणून अनेक ब्राम्हणांना कंठस्नान घडले. हिंदुसमाजाला आणि त्यांच्या नेत्यांना प्रबोधन करायचे आहे ते या क्षेत्रात. नथुराम गोडसे की जय म्हणून गांधी हत्येचे समर्थन करणे चूक आणि गोडसे म्हणजे संघ, जनसंघ किंवा भाजपा किंवा सर्व ब्राम्हण्य हेही चूक. तो इतिहास तेथेच संपावा. म. गांधी त्यावेळच नेते होते. फाळणीचे ते निमित्त ठरले पण अन्यही तेवढेच जबाबदार आहेत हे आता सिद्ध होते आहे. आणि खरे जबाबदार आहेत ते तर 'राष्ट्र' बनून चुकले आहेत. आता उरला आहे तो केवळ सावधतेचा इशारा. तो देण्याचा अधिकार हिंदुसभेला कुणी नाकारू नये. आणि हिंदु सभेने बुद्धिप्रामाण्याची कास सोडू नये, म्हणजे आपोआप चित्र स्पष्ट होईल.

'एकला चलो रे' हे सशस्त्र क्रान्ती तत्व म्हणून, निधडेपण म्हणून आत्मविश्वास म्हणून योग्यच असेल पण ज्यावेळी समाज व्यवहाराचा प्रश्न येतो त्यावेळी अंतिम ध्येयासाठी काही

'समझोते' अपरिहार्य ठरतात. लहान मोठे 'समझोते' हिंदुसभेने केलेही आहेत. तरीपण सदैव "देशाच्या दुर्दशेस सर्व निधर्मी पक्षच कारणीभूत" या आग्रही भूमिकेतून पहात राहणे कितपत व्यवहार्य आहे? हे भाषण, पक्षीय व्यासपीठावरील भाषण आहे हे लक्षात घेतले तरी त्यातील विसंगती नजरे आड करता येणार नाही. केवळ राष्ट्राच्या संरक्षणावर खर्च वाढवून 'अर्थवाद' दुर्लक्षीत ठेवून ईसाई इस्लामी शक्तींना थोपविण्याचा त्यातील उपदेश अनर्थकारक ठरेल. प्रचंड ताकदीच्या (आजही) संहारक शस्त्रांसह रशियाला धर्मयुद्धे, वंश युद्धे आणि ईसाई-ईस्लामी आक्रमण रोखता आले नाही म्हणूनच रशिया विघटीत झाला ही वस्तुस्थिती. वास्तव तर हे आहे की, ईसाई आक्रमण अमेरिकन भांडवलाव्दारे आणि इस्लामी आक्रमण पेट्रोल साठयाव्दारे होत आहे, होणार आहे. मजबूत संरक्षण, त्यागी लोक आणि मजबूत अर्थव्यवस्था हे त्याचे उत्तर आहे. कौरव संपवतांना पांडवही संपणार आहेत ही तयारी होणे आवश्यक आहे.

संघर्षाचे राजकारण आज एका बांजूने, जन्जागृतीतून दुसऱ्या बाजूने मतपेटीतून आणि प्रसंगी बंदुका हातात घेऊन करावे लागणार आहे. भाजपाने रामजन्मभूमीच्या बाबतीत जन जागृती पथ स्विकारला. माकपा ने पंजाबात शस्त्र पंथ घेतला कॉंग्रेसने मतपेटी घेतली. हिंदुसभेला ठरवायचं आहे तिने काय करायचे. हिंदुसभा आन्दोलनात उणी नाही हे भिवंडी प्रकरणात सिद्ध झाले. शिवछत्रपतीच्या भूमीत शिवजंयती होत नव्हती ती घडून आली. अशीच समाजभावनांची नाडी सर्वत्र पकडून हिंदुसभेने कार्य केल्यास न्याय्य कामासाठी लोक येतील. त्यासाठी हवी आहे थोडी 'सबूर'. सद्हेतु आहे. त्याग रोमारोमात आहे. स्वार्थ शून्य आहे, मार्ग कठीण आहे पण तो नव्याने प्रत्यही शोधला जावा. व्यक्ति म्हणून खूप केले असेल संघटन म्हणून काय घडले हीच हिंदुसभेची वास्तव शोकांतिका आहे. तिचा भार एकटया विक्रम सावरकरांच्या खांद्यावर नाही. तर सर्व समधर्मा हिंदुत्ववादी संघटनावर आहे.

त्यातही, हिंदुमहासभा व राष्ट्रीय स्वंयसेवक संघ दोघांचीही प्रेरणास्थाने समान आहेत - छत्रपती शिवाजी ते स्वा. वीर सावरकर. दोन्ही संघटनामध्ये समान दुवा आहे तो हिंदुत्व संवर्धनाचा. रा. स्व. संघाने देशव्यापी संघटना बांधली. अनेक पक्षोपक्ष, उपसंघटना, समांतर संघटना निर्माण झाल्या. अनेक व्यासपीठे निर्माण झाली. अगदी लेनिनच्या पद्धतीने, स्वशिस्तित संघाने हे घडवून आणले. लेनिनने समाजवादाच्या प्रसारार्थ काय करणे आवश्यक आहे हे सांगताना म्हटले होते की, प्रत्येक उद्योगात प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक स्तरात आपला एक सेल (कार्यरत यंत्रणा) असावा. त्यांचा प्रत्यक्ष क्रान्तिकारी गटाशी संबंध असू नये. त्यांना अशा क्रान्तिकारी गुप्त गटांची माहितीही असू नये. 'लोकापर्यंत पोहचणे' ते हेच. संघ त्यात यशस्वी झाला. हिंदुसभा अनेक कारणांनी (सर्व समर्थनीय कारणासंह) हे करु शकली नाही. परिणामी हिंदुसभेच्या ठिकाणी एक भावना छेद देवून गेली. संघ ही यंत्रणा हिंदुत्वासाठी निर्माण झाली पण ती लढाऊ नाही. आम्ही तीला लढाऊ बनवू. तीने आमचे

नेतृत्व घ्यावे किंवा तिच्याच नेतृत्वाने संख्याबळाच्या योगावर धडक द्यावी.

हीच मिश्र भावना 'संघात मुसलमान प्रवेश', 'खबरदार संघावर बंदी घालाल तर' आणि अन्य अंतर्भूत उताऱ्यात दिसून येईल. आरोप प्रत्यारोपाच्या पलिकडे जावून पाहता दोन गोष्टी जाणवतात. एक, दोघेही एकमेकांना चाहतात. दोन, दोघांनाही एकच ध्येय गाठायचे आहे. मतभेद आहे तो कधी मार्गाबद्दल, कधी असहकार्याबद्दल तर क्वचित तात्विक. मग या दोन्ही संघटनांनी कमीत कमी एक 'समझोता' करावा की हिंदु हितासाठी आम्ही आमचे मतभेद केवळ उच्च पदस्थ भेटीतच बोलू. एकमेकांचा सन्मान राखू आणि अशक्य झालेच तर समांतर जावू. आपआपल्या कृतीने कोण योग्य ते आपोआप सिद्ध होईल. आज संघप्रणीत अनेक संस्था याच परीक्षेच्या सीमारेषेवर उभ्या आहेत. रामजन्मभूमीवर वि.हि.प., भाजपा, साधूसमाज, वगैरे अनेकांची परीक्षा हिंदुसमाज घेणार आहे. आजच आपसात कलहही सुरू आहेत. सावरकरवादी प्रेरणेला हे अनुसरून नाही. तेव्हा एक 'समझोता' आवश्यक आहे. आणि त्यासाठी आवश्यक आहे लहान मोठ्या सर्व संघटानाना समान सन्मान. हिंदुसभा क्षीण आहे म्हणून संघाने तिला दुर्लक्षिणे चूक ठरेल तर हिंदुसभेने संघविरोधात श्रम वाया घालवणे चूक ठरेल. हिंदू समाजाचा इतिहास दोघांनाही क्षमा करणार नाही.

संघाने मुसलमानांना प्रवेश देवू नये. मुसलमान संघ संपवतील. मुसलमान वन्देमातरम् म्हणणार नाहीत. गणवेष घालणार नाहीत, वगैरे तर्क म्हणुन रास्त आहेत. पण त्याच न्यायाने असेही म्हणता येईल की मुसलमान संघात येणारच नाहीत व उपरोक्त लेखात तसे सुचितही झाले आहे. मग प्रश्न उरतो तो संघाने मुसलमान अनुनय करून त्यांना प्रवेश द्यावा का? सावरकरांनीही शियांना मर्यादीत प्रवेश देवू केला होता. आत आलेले मुसलमान खरे राष्ट्रभक्त असतील तर संघाला भिती नाही; आणि संघ संपलाच तर, ज्याचा पाया एवढा कच्चा असेल ते आज ना उद्या संपतेच, संपावे. खरी भिती संघ संपण्याची नसावी. खरी भीती परिपूर्ण एकात्मता होईल किंवा नाही याची असावी. संघाने केलेल्या सर्व कार्याची महती लक्षात घेवूनही अजूनही संघाचे एकात्मतेचे कार्य अपूर्ण आहे. हे सत्य आहे. दलितांचा प्रश्न मुसलमांनापेक्षाही मोठा आहे. जवळचा आहे. बहुसंख्य दलित कॉंग्रेस विरोधी आहेत हे सत्य. संघ भाजपा यांना त्यातील बुहसंख्याना स्वताःत सामावता आले असते. या दृष्टिने सावरकरांच्या सामाजिक सुधारणा महत्वाच्या ठरतात. संघाने, भाजपाने राजकारणाच्या मंचावर कुणालाही जवळ करावे पण त्याचवेळी हिंदुसमाजाची एक आकारपूर्ण रचना करण्यात आणाखी काही वर्ष धावीत. शंकराचार्यांकडून वाटल्यास हे करवून घ्यावे. सर्वांना एक धर्मसंहिता, सर्वांना समान संस्कार, सर्वाना समान पाणवठा, सर्वांना समान धर्माधिकार. संघ क्षेत्रात हे होत असेल पण संघबाह्य समाजात हे घडवून आणावे. स्वयंसेवक वाढोत न वाढोत हे कार्य घडावे. धर्म जाणार नसेल तर तो किमान सुलभ व्हावा, ऊपासना आवश्यक असेल तर ती सर्वांना करता यावी. अर्थात धर्म अमान्य करणारे थोडे असतील त्यांना मुक्त ठेवावे त्यांनी धर्मात आलेच पाहिजे असा आग्रह

असू नये.

संघ, भाजपा, हिंदुसभा या संर्वाचे संघटीत प्रयत्न जो पर्यंत या अंगाने होत नाहीत तो पर्यंत 'रामजन्मभूमी' जिंकली तरी पुन्हा समाज तेथेच राहील. देशाच्या फाळणीचे कॉंग्रेसजन गुन्हेगार असतील तर हिंदुसमाजाच्या फाळणीचे गुन्हेगार आम्ही सर्वच आहोत. आम्ही, धर्म मानणाऱ्या सर्वांना एक बांधू शकलो नाही, तर परधर्मी आणि धर्माला न मानणारे यांना समावून घेणार कसे? धर्मातरापूर्वी हिंदूधर्म क्रांती झाली असती तर चित्र वेगळे असते.

जर..... तर ने वास्तव बदलत नसते. वास्तव हे आहे की, हिंदुसमाज असंघटीत आहे, वास्तव हे आहे की हिंदुसमाज उदासीन आहे, वास्तव हे आहे की एकूण जगच विघटनाच्या मार्गावर आहे. केवळ हिंदुसमाजाच्या संघटनाने प्रश्न सुटणार नाहीत. भारतात मुसलमान समाज ही एक समस्या असेल. तुलनेने तो समाज अधिक संघटीत असेल, त्याला आंतरराष्ट्रीय पाठबळ असेल. पण छोटी छोटी राज्ये केवळ हिंदु-मुसलमान याच आधारावर जगभर झालेली नाहीत. हिंदूमुस्लीम संघर्षापलीकडचे अनेक संघर्ष भारतात आणि भारताबाहेर चालू आहेत. त्यांचा राष्ट्रापुरता विचार केला तरी सर्व प्रश्नांची उत्तरे सर्व पक्षांजवळ आहेत का? मानवता आणि तिचे अधिष्ठान याचा विचार केव्हा होणार? हिंदू राज्याची स्वप्ने पाहणारे आणि मुस्लीम राज्याचे स्वप्न पाहणारे अंतिमतः संकुचित ठरणार नाहीत का? अशा वेळी एक दायित्व निर्माण होते. ते अत्यंत स्थितप्रज्ञतेने या इतिहासाकडे पाहून पुढचा मार्ग दाखविण्याचे. ही जबाबदारी, बुद्धिनिष्ठ विश्लेषणकर्त्यांची आहे. निरीश्वरवाद्यांची आहे, बुद्धिप्रामाण्यवाद्यांची आहे. हे काम ते करीत नाहीत ही खेदाची बाब आहे. कुणाचेही पक्षपाती न होता न्याय अन्यायाच्या कसोटीवर जोपर्यंत हे प्रश्न तपासले जात नाहीत तोपर्यंत सुरक्षा प्रदान करणारे लहान समुह हेच प्रत्येकाचे जग होणार आहे आजचा संघर्ष Identification चा आहे. कुठल्यातरी बिरूदाशी मी बांधलो नाही तर असुरक्षित आहे, ही आजची वास्तव भावना. अंतिम मानवतावादाच्या काही मर्यादा राहतील पण आज कुंपणाच्या अंतर्गत कुंपणे वाढीस लागली आहेत. तेव्हा विशाल हिंदुत्वाच्या कल्पनेत विशाल मानवतेचाही एक विचार असावा. या संग्रहातले 'राजकारणाचा परिपाक' आणि 'धोकादायक नेत्यापासून सावधान' हे लेख श्री. विक्रम सावरकरांच्या राजकीय अवलोकनाचे दर्शन घडवितात. १९४७ ते श्रीमती इंदीरा गांधी या काळात कॉंग्रेस बहुतांशी वेळा गादीवर होती आणि विघटनाचे भस्मासूर तिनेच निर्माण केले. भिंद्रानवाले कॉंग्रेसचीच निर्मिती. बुद्धिवंताना पटावे सर्व कॉंग्रेस विरोधकांना मान्य व्हावेत असेच विश्लेषण या लेखात आहे. पण बुद्धिवंत म्हणजे समाज नाही. समाज अजुनही कॉंग्रेसमागे आहे हे वास्तव. विरोधक अजून विभक्त आहेत हे वास्तव. तेव्हा देशाच्या विघटनाला कोण जबाबदार विभक्त- विरोधक की अल्पमताने बहुमतात येणारी कॉंग्रेस? हा प्रश्न प्रत्येक पक्षाने विचारार्थ घ्यावा. एकतर स्वतःचे बळ वाढवावे किंवा बळ एकच करावे. बळ वाढविण्यासाठी आवश्यक आहे पक्ष बांधणी. जनमानसापर्यंत पोहचणे आणि समाजाच्या सर्वांगाना स्पर्श करणारा कार्यक्रम.

"हिंदू विचारसरणीचे राज्य निर्माण करावे" ह्या विक्रमरावांच्या उधृत भाषणामध्ये असा दिलासा मिळाला असता तर बरे झाले असते. हिंदुत्वाला हिंदूसभेच्या जाहीरनाम्यात अवश्य स्थान असावे पण राज्यव्यवस्थेचे जाहीरनामे प्रचाराच्या भडकतेपासून दूर असावेत. शिवछत्रपतींचे राज्यही हिंदूराज्य होते पण कार्यक्रम हिंदु किंवा मुस्लीम नव्हते. ते जनकार्य होते. राज्य जनबळाशिवाय मिळणार नाही. आणि आजतरी जनबळ हिंदूसभेच्या पाठीशी नाही.

मग ही स्वप्नरंजने कशासाठी? हा निवडणुकांचा अट्टहास कशासाठी? याची उत्तरे "विधानसभा निवडणुकानंतर" या लेखात सापडावीत. ध्येयनिष्ठेची सुसंगत वाटचाल म्हणून त्याकडे पहाता येईल. स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास हेच सांगतो. स्वातंत्र्यासाठी १९४२ ची चळवळ जेवढी जबाबदार आहे तेवढेच १८५७ चे समर आणि तेवढेच अनेक सत्याग्रह. तेव्हा कधीकाळी हिंदुराज्य अस्तित्वात आले, त्याचा आकार वेगळा असला, नाव वेगळे असले तरी श्रेयनामावलीत निश्चितपणे एक नाव श्री. विक्रम नारायण सावरकर हे असेल. तेव्हा खरे मुल्यमापन इतीहासच करील. कारण•इतिहास कृती तपासतो शब्द नव्हे.

या व्यतिरिक्त काही प्रासंगिक लेख संग्रहात घेतले आहेत. "लाख मोलाचा संदेश" असाच आगिबाणीतला लेख. वावटळीलाही कधी कधी 'नव वारे' समजले जाते संजय गांधी अशीच एक वावटळ. तेवढेच त्याचे महत्व.

"आली आली वसंतसेना आली" हा प्रज्वलंतच्या पहिल्या अंकातील पहिला लेख. भावे - कोल्हटकर- अत्रे या सर्वांना साजेसा विनोदी आणि खुमासदार. तरी नागपूरच्या हंगामी राजधानीपदावरचे बोलके भाष्य. भावे - अत्रे पठडीतला एक पत्रकार उदयाला येतो आहे अशी आशा पल्लवीत व्हावी येवढा चटकदार लेख. पण दुर्दैवाने तसे लेखन श्री. सावरकराकडून पुढे झाले नाही. प्रवाह बदलला.

श्री. पु. भा. भावे यांच्या श्रद्धांजलीवर लेख. ईश्वरवादी भावे व वि.घ. देशपांडे आणि निरीश्वरवादी सावरकर यांच्यातील अनुबंधाचे वर्णन करणारा भावुक लेख आहे.

श्री. विक्रम सावरकरांच्या विपुल लेखनातून निवड करून त्यावर भाष्य करतांना त्यातील साहित्यिक गुण, भाषेचा घणाघाती ओघ, परखडपणा आदी गुणविशेषा वर लिहीले नाही. रसिक वाचकांनी स्वतःच त्याची अनुभुती घेणे योग्य असे वाटले. सावरकर विचारांशी व व्यक्तिशः विक्रम सावरकांप्रती आदर ठेवूनच सर्व केले आहे.

शेवटी, वयाने, कृत्तीने, मानाने ज्येष्ठ, बंधुतुल्य विक्रम सावरकरांना व त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. स्वामिनीवहिनींना माझे अभिवादन.

टीप: लेख उधृत करतांना मुळाबरहुकुम कायम ठेवले आहेत. क्वचित काही वगळले ते नमुद केले आहे. शुद्धलेखन मुळाप्रमाणेच ठेवले आहे फक्त मुद्रणदोष दुरूस्त केले. गोल कंस मुळातील आहेत.

लेख क्र. १ : राजकारणाचा फिरता रंगमंच

लेख क्र. २ : १५ नोव्हेंबरच्या हुतात्म्यांना वंदन

लेख क्र. ३ : देशाच्या दुर्दशेस सर्व निधर्मी पक्षच कारणीभूत.

लेख क्र. ४ : भारतात हिंदुंना स्वसंरक्षणाच्या मागणीचा अधिकारच नाही काय?

लेख क्र. ५ : लाखमोलाचा संदेश

लेख क्र. ६ : संघात मुसलमानांना प्रवेश

लेख क्र. ७ : हिंदुत्वनिष्ठांनो सावधान

लेख क्र. ८ : खबरदार संघावर बंदी घालाल तर खबरदार!

लेख क्र. ९ : पुरूषोत्तम भास्कर भावे यांची उणीव.

लेख क्र. १०: सिंधूमुक्तीचा काळ जवळ आला.

लेख क्र. ११ : हिंदूसभा विचारसरणीचे राज्य निर्माण करावे (भाषण)

लेख क्र. १२ : पापस्थानी सापांच्या पिल्लाना ठेचावे

लेख क्र. १३ : धोकादायक नेत्यापासून सावधान

लेख क्र. १४ : विधान सभा निवडणुकानंतर

लेख क्र. १५ : राजकारणाचा परिपाक

लेख क्र. १६ : विषाची परीक्षा कशाला घ्यायची.

लेखांचा क्रम कालक्रमानुसार.

१. राजकारणाचा फिरता रंग मंच

आली! आली!! नागपुरांत वसंत सेना आली !!!

निसर्ग नियमानुसार संध्या नागपूरात हिवाळा सुरू होण्याच्या बेलात आहे. परंतु निसर्गानंतर ज्या राज्यसत्तेची आपल्यावर सत्ता चालते तिच्या लहरीनुसार संध्या येथील सार्वजनिक जीवनात 'वसंतऋतु' अवतरल्या चे घोषित झाले आहे आणि घोषणे पाठोपाठ नागपूर नगरीचा कायापालट होत असलेला दिसत आहे. आणि घोषणे पाठेपाठ नागपूर नगरीचा कायापालटहोत असलेला दिसत आहे. नगरातील रस्त्यांची रंगरंगोटी चालू झाली. रहदारी नियंत्रणाच्या यंत्रणेला नवी पालवी फुटू लागली. वळणा वळणावर, चौका चौकात मार्गदर्शक पाट्या, दिवे, उगवू लागले. काल पर्यत अनेकदा गाऱ्हाणी करूनही उपलब्ध न झालेल्या सोयी, आज एकाएकी अत्यावश्यक त्वर्य ठरून, निर्माण होऊ लागल्या आहेत. कारण ऋतुराज वसंत दि. १८ नोव्हेंबरला नागपुरात पदार्पण करणार आहे.

आनंदी आनंद गडे! संतोषाचा वर्षाव घडे!!

विधान सभेचे अधिवेशन म्हणजे राजकारणातला वसंत ऋतुच! आणि वसंत म्हटला की विकास आलाच. विकास दाखवायचा म्हणजे फिरत्या रंगमचावरील देखावाही बदललाच पाहिजे. मुंबापुरीच्या रंगमंचावरून नागपुरीच्या रंगमंचावर आपला नायक लवकरच अवतरणार! मग नेहमी भकास असणारे नागपुरचे थोबाड झकास रंगवावयास नको काय? आता बाजारभाव उतरतील, अन्नधान्याचा शिधा भरपूर मिळेल, वेगवेगळे नाच- रंग- तमाशे- जलसे- नाटके- बोलपट याच मोसमांत जनतेला दिसणार! कारण, जनता कशी खुश दिसली पाहिजे ना! जनतेचे रूसवे फुगवे काढण्यासाठी नायक आता आश्वासनांची खैरात करणार! काय पाहिजे ते मागा आणि व्हा रंगीबेरंगी फेसाळ आश्वासनावर खुष! आपले मायाजाल फेकून मृगजळ दाखविण्यासाठी ऋतुराज वसंताची सेना नागपुरात दाखल झाली आहे. सावधान!

३७ (१)कलम काढून घेतले.....पण. पुन्हा लावण्यासाठीच!!

वऱ्हाडी माणसा, सावधान! या मायावी 'वसंतसेने' पासून सावधान. वसंतसेना कधी कोणत्या स्वरूपात अवतरेल त्याचा नेम नाही. अगदी 'गोवर्धना' पासून तो 'वर्धना' पर्यंत सर्वांची रूपे तिला अवगत आहेत. पोलिस कमिश्नरांनी दि. २० फेब्रुवारी १९६८ पासून नागपूरात लावलेले पोलिस कायद्याचे कलम दि. २ नोव्हेंबर १९६८ ला म्हणजे ८ महिने१८ दिवसानंतर काढून घेतले आहे! विभिन्न पक्षातील शांतीदूताच्या खास बैठकी चालू आहेत. प्रथम साम, नंतर दाम मग दंड आणि आता भेद नीतीच्या अवलंब चालू झाला आहे. सर्व कसे शांत राहिलेच पाहिजे. वेळ पडली तर स्मशान शांतताहि चालेल! त्यासाठी हजारो राखीव शिपाईही वसंतसेनेत आहेतच. झुंझार युवका,लक्षात ठेव! ३७ कलम काढले ते पुन्हा लावण्यासाठीच !!

५-११-६८

संपादकीय

२. १५ नोव्हेंबरच्या हुतात्म्यांना वंदन!!

५३ वर्षापूर्वीची गोष्ट. शके १८३७ कार्तिक शुद्ध ९ म्हणजे दि. १५ नोव्हेंबर १९१५. सकाळची प्रसन्न वेळ. गोरापान, सुदृढ बांध्याचा, हसतमुख तरूण धीमी पाऊल टाकीत डौलदार गतीने चालत येत आहे. नुकतेच स्नान झालेले असल्याने टवटवीत दिसत असलेला चेहरा कसल्यातरी दिव्य उत्कंठेने, तेजाने, तळपतो आहे. असे वाटावे की कोणी तरणाबांड राजपुत्र राज्यारोहण प्रसंगी सिंहासनारूढ होण्यासाठी दरबारातून चालत येत आहे. किंवा मंगललवाद्यांच्या सूरांनी आनंदमय झालेल्या लग्न मंडपात नवरदेव लग्नवेदीकडे चालला आहे! पण छेः प्रत्यक्षात तो राजदरबार नव्हता की लग्न मंडप नव्हता. तो होता एक भयाण तुरुंग; लाहोर कारागृहातील फाशी विभाग! आणि तो तरूण राज्यारोहणासाठी नव्हे, लग्नमंडपातील विवाहवेदीकडे नव्हे; तर फाशीविभागातील वधस्तंभाकडे डौलदार गतीने, प्रसन्न वदनाने चालला होता! हातातील बेड्यांचा तालबद्ध आवाज करीतच तो वधस्तंभाजवळ पोहचला. त्याच्यामागे, परकीय ब्रिटिश शासनाचे सशस्त्र शिपाई होते. समोर फाशी देण्याचे काम करणारे मांग होते, तुरुंगाधिकारी,डॉक्टर, इत्यादी सर्व सरंजाम तेथे होता. तुरुंगातील नियमानुसार त्या तरूणाला विचारण्यात आले, "तुमची [?] शेवटची इच्छा काय?"

"या हातकड्यामुळे माझे हात मला जोडता येत नाहीत. माझे हात मोकळे करा मला सर्वशक्तिमान परमेश्वरांची हात जोडून शेवटची प्रार्थना करावयाची आहे", त्या तेजस्वी तरूणाने उत्तर दिले. बेड्या काढण्यात आल्या त्या तरूणाने खणखणीत आवाजात परमेश्वराला उद्देशून म्हटले, "परमपवित्र हिंदुस्थान गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आम्ही हे बलिदान करीत आहोत. आमची ती पवित्र इच्छा हे परमेश्वराला, तू पूर्ण कर". झाले, फाशी ची फळी ओढण्यात आली आणि भारतमातेच्या जयजयकारात त्या मंगल जीवनाचा अंत झाला.

१८५७ प्रमाणे सैनिक क्रान्ती करण्याचा महान प्रयत्न

अखंड हिंदुस्थानचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रान्तिचा सेतु उभारण्याच्या प्रयत्नात जे शेकडो क्रांतिवीर हुतात्मा झाले त्यापैकी वरील प्रमाणे धीरोदात्त पद्धतीने फासावर चढणाऱ्या क्रान्तिवीरांचे नांव हुतात्मा विष्णु गणेश पिंगळे होय. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील तळेगाव-ढमढेरे या ठिकाणी झाला. शालेय शिक्षण आटोपल्यावर त्यांनी इंजिनियरिंगचे शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला प्रयाण केले. त्यापूर्वीच अमेरिकेत थोर क्रान्तिकारक लाला हरदयाल हे क्रान्तिसंघटन करीत होते. १९०७ मध्ये स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकरांनीच श्री लाल हरदयालांना अभिनव भारत या क्रान्ति संघटनेत प्रतिज्ञेची दीक्षा देऊन अंतर्भूत केले होते . . . .

हु. पिंगळे यांचे भारतात सैनिक क्रान्तीचे प्रयत्न

लाला हरदयाल यांच्या संघटनेत [गदर] देशभक्त पिंगळे यांचा लवकरच प्रवेश झाला. विद्यापीठातील पदवी घेण्याएवजी श्री. पिंगळे हे "बॉम्ब विद्येचे विशारद" झाले. १९१४

मधे अमेरिकेतून सुमारे चार सहस्र हिंदी क्रांतिकारक भारतात शस्त्रास्त्रे घेवून आले. नोव्हेंबर १९१४ मधे हु.पिंगळे एस.एस सलामीस या बोटीने भारतात आले. येथे आल्यावर त्यांनी लाला हरदयालांच्या आदेशानुसार भारतीय क्रांतिकारकांचे मुख्य सेनानी रासबिहारी बसू(यांनीच पुढे जपानमधे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आजाद हिंद सेना स्थापण्यास बहुमोल सहाय्य केले) संचिद्रनाथ सन्याल इत्यादी नेत्यांशी संधान बांधले. हिंदुस्थानी सैन्यात बिटिशां विरूद्ध उठावणी करण्याचे कार्य श्री. पिंगळे यांनी जोरदारपणे सुरू केले. मेरठच्या सैनिकी छावणीपासून पंजाबातील सेना निवेशा पर्यंत त्यांचे क्रांतिसंघटन चालू होते. सेनापती रासबिहारी बसूंनी सार्वत्रिक उठावाची सिद्धता सुद्धा केली. युद्ध घोषणेचा मसुदा तयार केला आणि योग्य क्षणाची ते वाट पहात होते.

मुसलमान सैनिक सहकाऱ्याने धोका दिला!!

याच सुमारास ब्रिटिश शासनाला क्रांतिवीर पिंगळयां च्या चळवळीचा सुगावा लागला. श्री. पिंगळे यांना पकडून देण्यासाठी शासनाने मोठे बक्षिसही जाहिर केले होते. तरीहि त्यांनी मोठ्या चतुराईने एका मुसलमान सैनिक अधिकाऱ्यासह क्रांतिचे संघटन चालू ठेवले. श्री. पिंगळयाबरोबर तो मुसलमान अधिकारी दिसताच त्यांनी पिंगळयांना धोक्याचा इशारा दिला. त्या बेईमान मुसलमानाला ठार मारण्याची सूचना दिली! परंतु दुर्दैवाने श्री. पिगळयांनी अति विश्वासामुळे या सूचनेकडे दुर्लक्ष केले. अखेरीस ह्या देशद्रोही मुसलमानानेच श्री पिंगळे आणि क्रान्ति कार्याचा घात केला. श्री. पिंगळे १८ अति स्फोटक बॉम्ब घेऊन मेरठ छावणीत पोहचले. त्या रात्रीच त्या मुसलमान सैनिकी अधिकाऱ्याने त्यांना मुद्देमालासकट ब्रिटिश शासनाच्या सुपुर्त केले! कटाचा सुगावा लागला सर्वत्र धरपकड झाली. ६१ क्रान्तिकारकांवर लाहोर येथे विशेष न्यायालयासमोर क्रांति कटाचा खटला [अभियोग] चालू झाला.

१३ सप्टेंबर १९१५ ला निर्णय लागला २४ क्रांतिवीरांना श्री. पिंगळे यांचे बरोबरच फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. अपिलात त्यापैकी १७ जणांची शिक्षा जन्मठेपेची झाली. मात्र सर्वश्री विष्णु गणेश पिंगळे, बागी कर्तारसिंग, हरनामसिंग, जगतसिंग इत्यादी सातजणांची फाशी कायम होऊन दि.१५ नोव्हेंबर १९१५ ला त्या क्रान्तिकारक सप्तर्षींना फासावार लटकविण्यात आले! स्वतंत्र भारताच्या नव्या झुंझार पिढीचे त्या १५ नोव्हेंबरच्या हुतात्म्यांना शतशः प्रणाम !!

१२-११-६८
हुतात्मा पिंगळे पुण्यतिथि विशेषांक
विशेष - लेख.
* [ ] चौकोनी कंस संपादकाचे.

३. देशाच्या दुर्दशेस सर्व निधर्मी पक्षच कारणीभूत

खंडित भारताचे स्वातंत्र्य मिळवून वीस वर्षे उलटली तरी आजहि जनता उपाशी, तरूण बेकार, देशभक्त कारागृहात, देशद्रोही मोकाट आणि देश संकटात, अशी भीषण परिस्थिती भारतात आहे. आपल्या मागून स्वातंत्र्य मिळवलेल्या चीनने याच अवधीत रशिया नि अमेरिका या बलाढ्य राष्ट्रांशी टक्कर देण्याची सिद्धता केली असून जगातील तिसरी सैनिकी शक्ती म्हणून स्थान मिळवले आहे. असे का? याचा विचार विशेषतः तरूण पिढीने बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून केला पाहिजे. गेली वीस वर्षे भारतावर निरंकुश सत्ता चालवित असलेले काँग्रेस शासन हे संपूर्णतः अपयशी ठरले असून अमेरिका, रशिया, ग्रेटब्रिटन इत्यादी राष्ट्रांच्या आर्थिक गुलामगिरीत भारत आज अडकला गेल्याने आपले राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्वातंत्र्यही त्यामुळे धोक्यात आले आहे. देश जर स्वतंत्र ठेवावयाचा असेल तर आजच्या तरूण पीढीने जमेल त्या मार्गाने शक्य तितक्या लवकर काँग्रेसला सत्ताभ्रष्ट केले पाहिजे.

काँग्रेस शासनाने देशाला कर्जबाजारी केले आहे. भारतात जन्मणाऱ्या प्रत्येक बालकाच्या डोक्यावर किमान दोनशे रुपयांचा बोजा असतो. अशा परिस्थितीत उद्याचा भारत ज्या तरूण पीढीला सांभाळावयाचा आहे त्या तरूण पीढीने विशेषतः सुशिक्षित तरूणांनी प्रचलित राजकारणावर अधिकाधिक लक्ष ठेवून राज्यकारभार देशहिताच्या मार्गावर चालण्यासाठी सुयोग्य परिणामकारी आंदोलने केली पाहिजेत.

काँग्रेसने भारतीय राजकारभारात जे तथाकथित निधर्मी धोरण स्वीकारले तेच निधर्मी धोरण कांग्रेसचे विरोधी म्हणविणारे साम्यवादी (कम्युनिस्ट) पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, स्वतंत्र आणि जनसंघ या राजकीय पक्षांनी मूलतः स्वीकारले आहे. फरक इतकाच की रशिया आणि चीनचा अर्थवाद साम्यवादी पक्षांनी स्वीकारला आहे तर अमेरिकेचा अर्थवाद स्वतंत्र, जनसंघ या पक्षांनी शिरोधार्य मानला आहे! परंतु समाजवादाचे, साम्यवादाचे आणि अर्थशास्त्राचे हे पुस्तकी पंडित हिंदुस्तानी राजकारणाचे मूलभूत रहस्य न समजल्याने किंवा समजूनहि स्वार्थामुळे, भीतीमुळे ते रहस्य यथार्थाने लक्षात घेण्यास तयार नसल्याने गेल्या वीस वर्षात देशाची स्थिति अधिकाधिक खालावत गेली. साम्यवादी किंवा पूंजीवादी अर्थव्यवस्था देशात आणण्यापूर्वी सर्वाधिक महत्वाची स्वातंत्र्य-संरक्षण प्रधान अर्थयोजनाची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक होते. केवळ हिंदुमहासभेच्याच खासदारांनी स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभेत तशी मागणी केली होती. काँग्रेसने ती मागणी फेटाळून लावली. संरक्षण व्यवस्थेवर आवश्यक व्यय न करता अन्य तथाकथित विकासाच्या अर्थयोजना स्वीकारण्यात आल्या. आणि श्री. कृपलानींसह सर्व पुस्तकी अर्थपंडितांनी त्याची वारवाणणी केली. परंतु चीन आणि पाकीस्तानी आक्रमणांच्या पहिल्या धक्क्यातच भारतीय अर्थव्यवस्था पार कोलमडून गेली. आणि घाईने संरक्षण योजना बळकट करण्यासाठी अमेरिका आणि

रशियावर अवलंबून रहावे लागले. एखादा शाहाणा बागाइतदार किंवा मळेवाला कुपंण बांधण्यासाठी प्रथम खर्च करतो आणि बळकट कुंपण बांधल्यावरच बगिचा किंवा फळझाडे लावतो. मळ्याची संरक्षण योजना पूर्ण झाल्यामुळेच त्याला पुढे येणाऱ्या भरघोस उत्पादनाचा लाभ मिळतो! शत्रुच्या आक्रमणामुळे आपल्या असंरक्षित विकास योजना फसल्या नि पुस्तकी अर्थपंडित अपयशी झाले!

इस्लामी - ईसाई आक्रमण थोपविण्यास साम्यवादी शासन कुचकामी

निधर्मीपणाच्या भोंगळ राजकारणामुळे कॉंग्रेस, साम्यवादी, स्वतंत्र, समाजवादी, जनसंघ या पक्षांनी देशाचा सर्वनाश आरंभिला आहे. वास्तवतेपासून दूर गेल्याने हे सर्व पक्ष या देशातील नव्वद टक्के लोकसंख्या असलेल्या हिंदुसमाजाला विनाशाच्या खाईत लोटत आहेत. प्रत्येक देशात काही विशिष्ट प्रश्न असतात. आणि त्या विशिष्ट प्रश्नांचा प्रभाव तेथील राजनीतीवर पडत असतो. तेथे कोणाच्या आवडी निवडीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अमेरिकेत गोरा नी काळा हा वर्णभेदाचा असाच प्रश्न आहे. आफ्रिकेतील राजकारणातही वर्ण महात्म्याचा विशेष प्रश्न आहे. तेथील राजनीती ते प्रश्न लक्षात घेवूनच चालविली पाहिजे. आपल्या हिंदुस्थानात गेल्या दोन सहस्र वर्षापासून राजनीतीवर धार्मिक समस्यांचा विशेष प्रभाव आहे, हे नाकारताच येणार नाही. या देशावर मुसलमान- ख्रिश्चन आक्रमकांनी राज्य केले. येथील हिंदु जनतेचे धर्मांतर केले. जगातील इतर राष्ट्रात असो की नसो आपल्या भारतात हिंदूधर्मावर इस्लामी आणि ख्रिस्ती आक्रमणे झाली; आणि या धर्मांतरामुळे देशाची फाळणी झाली ती हिंदु मुसलमान या जातीय प्रश्नावरच. सिंध, पंजाब, बंगाल येथील हिंदूचे प्रथम धर्मांतरण झाले त्यापाठोपाठ पाकिस्तान निर्माण झाले. आसामातील नागा विभागातील हिंदूचे प्रथम ख्रिस्तिकरण झाले आणि त्या पाठोपाठ नागास्थान निर्माण झाले. साम्यवादी मोठ्या (परंतु खोट्या) अभिमानाने म्हणत असतात की आमचे राज्य आले की जातीय प्रश्नच राहणार नाहीत आज केरळात साम्यवादी वर्चस्वाचे मंत्रीमंडळ आहे. परंतु मुसलमानांनी तेथे मोपलास्तानची मागणी शक्तीच्या जोरावर केली आहे. आणि उठसूठ हिंदुधर्मावर दुगाण्या झाडणाऱ्या साम्यवादी पक्षाने त्या धर्मांध मुस्लीमलीगी मोपल्यांसमोर शरणागती पत्करली आहे. देशाचे आणखी तुकडे होवू द्यायचे नसतील तर सर्व निधर्मी पक्षांची कास सोडून पंचेचाळीस कोटी हिंदूचे हित पाहणाऱ्या हिदुंचे धर्मांतर थांबविण्यासाठी आणि बळजबरीने, फसवणुकीने, लोभाने परधर्मात गेलेल्या पूर्वाश्रमींच्या हिंदूचे शुद्‌धीकरण करण्यासाठी चळवळ करणारी हिंदुमहासभाच प्रबळ केली पाहिजे. अर्थवादाचा व्यर्थ बडेजाव माजविणाऱ्या स्वतंत्र, कॉंग्रेस, जनसंघ, साम्यवादी, समाजवादी पक्षाच्या हातून या देशातील धार्मिक समस्या सुटणे केवळ अशक्य आहे. हे पक्ष आपल्या देशावर धार्मिक आक्रमणा पाठोपाठ राजकीय आक्रमण करणाऱ्या इस्लामी आणि ख्रिस्ती शत्रुंपासून कधीच संरक्षण करू शकणार नाहीत. त्यासाठी यथार्थवादी राष्ट्रहिताचा दृष्टिकोन असणाऱ्या हिंदुमहासभेलाच नव्या पीढीने बलाढ्य केले पाहिजे.

*** १४ सप्टेंबर १९६८ ला हिंदुमहासभेच्या प्रगट सभेत अ.भा. हिंदुमहासभा कार्यवाह या नात्याने झालेल्या भाषणाच्या वृतांत दि.१७/१२/६८ च्या प्रज्वलंत मधे प्रसिद्ध झाला त्यातून उधृत.**

४. भारतात हिंदूना स्वसंरक्षणाच्या मागणीचा अधिकारच नाही काय?

भारतात लोकशाही आहे म्हणे आणि या लोकशाही भारतात ९०% जनसंख्या हिंदूंची आहे. या नव्वद टक्के हिंदूच्या मतावर निवडून आलेले कॉंग्रेस शासन देशावर राज्य करीत आहे. परंतु ह्या बहुसंख्य हिंदूंनाच स्वसंरक्षणाची, लोकशाही शांततामय पद्धतीनेही, मागणी करण्याचा घटनसिद्ध अधिकार नाकारण्यात आल्याची आणि उलट तशी मागणी करण्याचा प्रयत्न केल्यावरून हिंदूंना कारागृहात डांबल्याची अत्यंत चीड आणणारी घटना मध्यप्रदेशातील रायपूर नगरात नुकतीच घडली आहे!! कोणतेही निमित्त करून भारतात जातीय दंगली घडवून आणण्याचे कारस्थान पाकीस्थानधार्जिणे मुसलमनी गुंड सतत करीत असतात. ख्रिश्चनांनी जेरूसलेम मधे एक मशीद जाळली आणि इस्लामी जगताने जेहाद पुकारले. या घटनेत हिंदूंचा काहीही दोष नाही, संबंध नाही. परंतु धर्मवेड्या पापस्तान धार्जिण्या मुसलमान गुंडांना तेच निमित्त पुरले. त्यांनी भारतातील हिंदूविरूद्ध जेहाद करून काश्मीर, जबलपूर, महू, कटक इत्यादि ठिकाणी निरपराध हिंदू जनतेवर अत्याचारी आक्रमणे केली. हिंदूच्या सुरक्षेची मागणी करण्यासाठी आणि उपरोक्त ठिकाणी दंगली करणाऱ्या मुसलमान गुंडांचा निषेध करण्यासाठी एक मिरवणूक काढण्याची घोषणा केली. हिंदूच्या हितासाठी सदैव तत्पर आणि जागरूक असलेल्या हिंदुमहासभेने या मिरवणुकीचे नेतृत्व केले. परंतु तेथील कॉंग्रेसी शासनाने ही मिरवणूक निघूच दिली नाही. मिरवणूकीवर बंदी घालण्यात आली. आणि जेव्हा या कॉंग्रेसी नादिरशाहीला विरोध करण्यास हिंदुमहासभेचे कार्यकर्ते पुढे सरसावले तेव्हा रायपूर नगर हिंदुसभेचे कार्यवाह कुंतलसिह चौहान आणि त्यांचे पन्नास सहकारी यांना दि. २४ ऑगस्ट १९६९ ला अटक करून कारागृहात डांबण्यात आले. या पन्नास हिंदूना प्रतिभूवर (जमानतीवर) सोडण्यास ही नकार देण्यात आला। .....आणि पुढील बातमी वाचा.

अमरावतीला २०,००० मुस्लीमांचा अभूतपूर्व निषेध मोर्चा॥

दि. २६/६/६९ ला अमरावतीला वीस सहस्र मुसलमानांनी जेरूसलेम मधील मशिद जाळल्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त केला, अशी बातमी दि. २७/८/६९ च्या दैनिक तरूण भारतात प्रसिद्ध झाली आहे। म्हणजे, भारतात पाकिस्तान धार्जिणे गुंड जातीय दंगे करू शकतात, अमरावतीच्या मुसलमानांना प्रचंड मिरवणूक काढण्याची अनुज्ञा कॉंग्रेस शासन देते. आणि हिंदूना मात्र स्वसंरक्षणाची साधी मागणीही करण्याची अनुज्ञा रायपूरला नाकारून पन्नास हिंदूंना तुरूंगात डांबण्यात येते!! भारतातही हिंदूचा कोणी वालीच उरला नाही काय?

* संपादकीय
दि. २ सप्टेंबर १९६९
सा. प्रज्वलंत

५. लाखमोलाचा संदेश।

युवक कॉंग्रेसचे नेते श्री संजय गांधी यांनी नुकताच महाराष्ट्रातील प्रमुख नगरांचा धावता दौरा केला. दि. २९,३०,३१ आक्टोबर १९७६ या तीन दिवसात त्यांनी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नांदेड, नागपूर या नगरात अति विशाल जनसमुदायाला प्रगटरीत्या मार्गदर्शन केले. "बाते कम काम ज्याद।" या त्यांच्या घोषणाक्याचे त्यांनी स्वतः अत्यंत काटेकोरपणे पालन केले. सरासरी १२ मिनिटे ते प्रत्येक विशाल मेळाव्यासमोर बोलले. प्रत्येक नगरातील मेळावा अभूतपूर्ण होता. मातोश्री इंदिरा गांधीच्या सभेप्रमाणेच हे मेळावे भव्य प्रमाणावर आयोजित केले गेले होते विशेष म्हणजे लाखो युवकांनी भाग घेतल्याने 'युवक मेळावा ' हे नाव यथार्थ ठरले. आजूबाजूच्या जिल्हयातून सहस्रावधि युवक या मेळाव्यासाठी उपरोक्त नगरात आले होते. अर्थात अशा अतिविशाल कार्यक्रमासाठी लक्षावधि रूपये खर्च होणे अपरिहार्य होते. परंतु श्री संजय गांधी यांनी या मेळाव्यातून लाखमोलाचा संदेश दिल्याने हा व्यय सार्थकी लागला असे आमचे प्रांजळ मत आहे.

नेहमीप्रमाणे त्यांनी वीस कलमी कार्यक्रमाला जोडून आपल्या पंचसूत्रींचा पुरस्कार केलाच परंतु त्याच बरोबर बुझुर्ग (मेन) कॉंग्रेसमधील दोषस्थानवर नेमके बोट ठेवून उपस्थित ज्येष्ठांनाही त्यांनी वठणीवर आणण्याचे कार्य केले. मेन कॉंग्रेसमधील हेवे दावे, गटबाजी, जातीयता इत्यादि दोषांचा त्यांनी आवेशपूर्ण भाषेत परामर्श घेतला आणि जाती प्रथेला उत्तेजन देणाऱ्यांना इतपर कॉंग्रेसमध्ये स्थान राहणार नाही. असा खणखणीत इशारा दिला. त्यांनी नेहमीप्रमाणे याही भाषणातून विरोधी पक्षांवर - जनसंघ - स्वतंत्र इत्यादी पक्षांच्या आघाडीवर टीकास्त्र सोडले. विशेषतः - नागपूर हे संघाचे जन्मस्थान आहे, हे लक्षात घेवून त्यांनी बंदी घातलेल्या रा.स्व. संघ व जनसंघ यांच्या कारवायावर जोरदार हल्ला चढविला. देशात फूट पाडून, दंगली माजवून अराजक माजविणे हाच जनसंघाचा एकसूत्री कार्यक्रम असल्याची टीकाही त्यांनी केली. अर्थात ही टीका श्रोत्यांच्या कानवळणी पडली आहे. संजयच्या मातोश्री इंदिराबाई असेच बोलत आल्या आहेत इंदिराबाईंचे पिताजी कै. जवाहरलाल जन्मभर तेच सागंत होते. ती परंपरा संजयनीही पाळली. परंतु त्यांनी या दौऱ्यात प्रत्यक्ष मांजराच्या गळ्यातच घंटा बांधण्याचे धाडस दाखविले ते कौतुकास्पद होय.....

धर्माच्या सबबी खाली कुटुंब नियोजनाला विरोध करणाऱ्यांना देशाबाहेर हाकलू

असा वज्रनिश्चय संजय गांधी यांनी नागपुरातील दोन्ही मेळाव्यात व्यक्त केला. अर्थात हा इशारा त्यांनी महाराष्ट्राच्या राजधानीत दि. २९ आक्टोबर ला शिवाजी उद्यानावरील भव्य मेळाव्यात प्रथम उद्घोषिला. सर्व देशात धडक मेहिमेद्वारा कुटुंब नियोजन अंमलात आणले जात असताना इस्लाम आणि इस्लामी धर्मपंडितांनी कुटुंब नियोजनाला आपल्या धर्मग्रंथाचा विरोध असल्याची बकवास सातत्याने चालू ठेविली. अंधश्रद्ध आणि अडाणी अनुयायांनी या जात्यांध धर्मपंडितांच्या चिथावणीमुळेच कुटुंब नियोजनला आडमुठा विरोध चालू ठेवला हे

संजय महाराजांनी सर्वत्र अनुभविले होते. इतकेच नव्हे तर मुस्लीम लीग या जात्यांध पक्षाचे आमदार बनातवाला यांनी महाराष्ट्र विधान सभेत आकांड ताडंवपूर्वक कुटुंब नियोजन संबंधी विधेयकाला विरोध केला, हेहि संजय गांधीच्या पक्के ध्यानात होते. .....आपल्या भाषणात ते म्हणाले

"वास्तविक जगातील कोणत्याहि धर्मशास्त्रात कुटुंबनियोजनाला विरोध नाही आमच्या धर्माचा कुटुंब नियोजनाला, नसबंदीला विरोध आहे, असे म्हणणाऱ्यांना माझे आव्हान आहे, त्यांनी तो धर्मग्रंथ आणि त्यातील विरोधाचा उल्लेख कोठे आहे ते दाखवून द्यावे. ते दाखवूच शकणार नाहीत. कारण हे धर्मग्रंथ निर्माण झाले त्यावेळी कुटुंब नियोजन होतेच कोठे? आणि नसबंदी देखिल या धर्मग्रंथाच्या निर्मितीसमयी नव्हती. तेव्हा कुटुंब नियोजनाला धर्माचा आधार घेऊन विरोध करणाऱ्यांचा हेतु केवळ स्वतःचे पुढारीपण टिकविण्याचा आहे. स्वतःच्या राजकीय फायद्यासाठीच हे धर्माचा गैर- वापर करीत आहेत

अशा पुढाऱ्यांना कॉंग्रेसमध्ये स्थान असणार नाहीच पण या देशातही राहता येणार नाही. कुटुंब नियोजनाला धार्मिक विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांनी आपल्या कारवाया अशाच चालू ठेवल्या तर त्यांना हिंदूस्थानातून बाहेर काढले पाहिजे।

अर्थात संजय महाराजांच्या या वाक्यावर टाळयांचा प्रचंड कडकडाट करून लक्षावधी श्रोत्यांनी आपल्या ह्दयस्थ संमतीची तत्काळ पावती दिली हे निराळे सांगणे नकोच.....

महाराष्ट्रातील संजय दौऱ्याचा परिणाम लक्षात घेवून मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण म्हणाले की, "संजय गांधी हे आता जननेते झाले आहेत."

आणि म्हणून आम्हालाहि वाटते की लाखो रूपये खर्चून आयोजिलेल्या संजय दौऱ्याचे श्री संजय गांधी यांनी देशाला लाख मोलाचा संदेश देऊन चीज केले.

* १२ नोव्हेंबर १९७६
आणिबाणि काळातील संपादकीय
काही विषयांतरे गाळून उधृत केले आहे.

६. संघात मुसलमानांना प्रवेश

. . . .या मुलाखतीत सरसंघचालकांनी संघातील मुस्लीम प्रवेशासंबंधी आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत. या मुलाखतीत एक महत्वाची गोष्ट स्पष्ट झाली. असे ती म्हणजे संघात मुस्लीम प्रवेशाची जितकी तळमळ व्यक्त झाली आहे ती सर्व हिंदूनीच व्यक्त केली आहे.

"मुसलमानांना अशी तळमळ लागली आहे की नाही हे आधी तपासून घेतले पाहिजे. संघात येणारा प्रत्येक स्वयंसेवक स्वेच्छेनेच येतो. ज्या मुसलमानांना संघात यावे असे मनापासून वाटत असेल त्यांना संघप्रवेशानंतर संघात चालू असलेल्या गोष्टी चालू देण्यासाठी संघाच्या बाह्य स्वरूपात म्हणजे त्याचा गणवेष, शाखा, व कार्यक्रम वगैरेत बदल व्हायचे काहीच कारण नाही. मुसलमानांची उपासना पद्धती वेगळी आहे. घरात किंवा खाजगीत स्वयंसेवक कोणतीही उपासना पद्धती स्वीकारू शकतो परंतु संघस्थानावर संघ पद्धतीच चालू राहील." अशा अर्थाचे विचार श्री. देवरसांनी अधिकृतपणे व्यक्त केले आहेत

आणिबाणिमुळे कारावासात असलेल्या संघ, समाजवादी, सर्वोदयवादी, कॉंग्रेसी मार्क्सवादी आणि जमाते इस्लामी इत्यादी संघटनें च्या नेत्यांना एकत्र सहवास घडला त्यात चर्चा झाल्या. निधर्मी विचारसरणीच्या नेत्यांनी प्रामुख्याने संघासंबधी जे आक्षेप प्रकट केले त्यात संघात अहिदूंनाही प्रवेश द्यावा ही तळमळ व्यक्त केली. संघ हा मुस्लीम विरोधी आहे ही त्या नेत्यांची समजूत! वस्तुतः हिंदुसमाजावरील संर्वंगीण संरक्षण - संवर्धन ही संघाची भूमिका आहे. तेव्हा हिंदूसमाजावरील कोणत्याही प्रकारच्या आक्रमणाविरूद्ध संघाने प्रतिकार करणे योग्यच ठरते. परंतु त्याचा विपर्यास संघ हा मुस्लीम विरोधी आहे. किंवा मुस्लीम विरोध हेच संघाचे प्रमुख धोरण आहे असा करणे अनुचित ठरेल. या विचारातून सरसंघचालकांनी मुक्ततेनंतर आपली भूमिका विशद करताना संघात मुस्लमांनानाही प्रवेश देण्याचा विचार चालू असल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर संघाच्या मूळ ध्येयधोरणात किंवा संघशाखेच्या स्वरूपात व्यक्त होणाऱ्या बाह्य स्वरूपात दैनंदिन कार्यक्रमात बदल न होताही जे मुसलमान स्वेच्छेने स्वयंसेवक म्हणून दाखल होतील ते संघशक्तीत स्वेच्छेनेच मिसळले जातील. अन्य हिंदु स्वयंसेवकाप्रमाणेच संपूर्णतः राष्ट्रीय होतील. उदाहरणार्थ,

(१) मुसलमान स्वंयसेवक अखंड हिंदूराष्ट्र, हिंदू संस्कृती या कल्पनांचा सामाजिक जीवनात मनोभावे 'प्रतिज्ञेने ' स्वीकार करील.

(२) प्रतिदिनी संघस्थानी भगव्या झेंड्याला प्रमाण करील. शाखाधिकाऱ्यांना प्रणाम करील.

(३) प्रतिदिनी संस्कृत प्रार्थना म्हणून मातृभूमीला वंदन करील.

(४) विजयादशमी, मकर संक्रमण उत्सव, छत्रपती शिवराज्याभिषेक दिन, गुरूदक्षिणा उत्सव इत्यादी प्रसंगी हिदुं संस्कृतीच्या गुण गौरवपर संघगीते संस्कृतनिष्ठ हिंदी भाषेत म्हणेल

(५) गोहत्या तर मुसलमान स्वयंसेवक करणार नाहीच परंतु गाईला 'गोमाता की जय' म्हणून घोषणा देईल.

(६) प्रतिदिन भारत माता की जय म्हणणारा मुसलमान स्वंयसेवक वंदेमातरम् हे राष्ट्रगीत संपूर्ण म्हणेल. वन्देमातरमचा सन्मान करील.

(७) संघाच्या विचाररसणीने प्रभावित झालेले मुसलमान स्वयंसेवक अनेक बायका करणार नाहीत. एक पत्नीव्रत स्वीकारतील.

(८) थोडक्यात म्हणजे संघात प्रवेश घेणाऱ्यां मुसलमानाचे संपूर्ण भारतीयीकरण होईल. भले मग ते खाजगीत आपल्या घरी इस्लामी उपासना पद्धती पाळोत किंवा मशिदित नमाज पढोत. सावर्जनिक जीवनात ते संघटोपी घालून समाज सेवेत मग्न राहतील.

अर्थातच,संघाची दारे मुसलमांनाना वरील प्रमाणे खुली करणे राष्ट्रीय एकात्मता साधण्याचा सर्वोत्तम मार्ग ठरेल त्यात राष्ट्राचे कल्याणच साधेल.

परंतु

उत्तरभारताच्या दौऱ्यावर मुसलमान समाजातील काही नेत्यांशीही त्यांनी संपर्क साधला. या संपर्क दौऱ्यातून त्यांनी एक गोष्ट जनमानसावर बिंबविण्यात यश मिळवले. ती गोष्ट म्हणजे हिंदुसंघटन याचा अर्थ इस्लाम वा अन्य धार्मियांच्या द्वेष नव्हे. संघ मुस्लीम विरोधी नाही. उलट तो मुस्लीमांनाही आपल्या संघटनेत समावून घेण्यास उत्सुक आहे. या यशामुळे पूर्वी कॉंग्रेस आणि अन्य निधर्मी पक्षांनी संघावर जातीय व संकुचित असल्याचा जो शिक्का मारला होता तो पुसल्या जाण्यास चांगली मदत झाली.

परंतु या विषयावर विचारांची देवाण घेवाण चालू असताना सरसंघचालकांनी दिल्ली येथील मुलाखतीत व्यक्त केलेल्या काही विचारांना मुरड घालण्याचे धोरण स्वीकारलेले दिसते. उदा. दि. २८ एप्रिल ला कानपूर येथे प्रकट केलेल्या विचारात त्यांनी म्हटले आहे, "संघाचे दरवाजे मुस्लीमांसाठी खुले होण्याच्या दृष्टीने परिपक्व परिस्थिती आता निर्माण झाली आहे." (दै. महाराष्ट्र टाईम्स, डाक आवृत्ती दि. २०/४/७७) म्हणजे दि. १२ ते १८ एप्रिल या काळातील दौऱ्यात, त्यांना काही मुसलमानानाही संघात प्रवेश घेण्याची तळमळ असल्याचे ध्यानात आले असावे. दि. १८ एप्रिललाच कानपूर येथील पत्रकार परिषदेत सरसंघचालक म्हणाले, "हिंदुत्वाची कल्पना आता आमुलाग्र बदलली आहे. हिंदुत्वाच्या सिद्धान्तामध्ये महत्वपूर्ण बदल झाला आहे. सध्याच्या संदर्भात हिंदुत्वची नव्याने व्याख्या करण्याची गरज आहे. हिदुंत्वाच्या सिद्धांताची परिभाषा बदलावी लागेल" (दै. लोकसत्ता, डाक आवृत्ती दि. २०.४.७७ आणि दै. तरूण भारत, नागपूर शहर आवृत्ती दि. २०-४-७७) दि. २१ एप्रिलला गया येथे पत्रकार परिषदेत सरसंघचालक म्हणाले, "देशातील मुसलमान समाजाच्या प्रतिनिधींबरोबर विचार विनिमय करून संघाच्या धोरणात व कार्यक्रमात आम्ही आवश्यक तो बदल करू व एकत्रितपणे कार्य करू."

अर्थात दिल्ली येथील मुलाखतीत, "ज्या मुसलमानांना संघात यावेसे वाटत असेल, त्यांना संघप्रवेशानंतर संघात चालू असलेल्या गोष्टी चालवून घ्याव्या लागतील..... मुस्लिमांना प्रवेश देण्यासाठी संघाचा गणवेष कार्यक्रम इत्यादी स्वरूपात बदल व्हायचे काहीच कारण नाही." असे व्यक्त झालेले सरसघंचालकांचे धोरण कानपूर आणि गया येथील केवळ एका सप्ताहाच्या कालावधितच घेतलेल्या पत्रकार परिषदेत बदललेले दिसते. सरसंघचालकांचा राष्ट्रव्यापी (आसेतु हिमाचल) दौरा पूर्ण झाल्यानंतर मुस्लिम प्रवेशासंबंधीचे धोरण अंतिम रीत्या निश्चित केले जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे. अंतिम धोरण मूळ भूमिकेपासून किती बदलणे शक्य आहे याची साधारण कल्पना कानपूर व गया येथील वक्तव्यावरून येते. संघ तत्वज्ञानाचा प्राणच असलेल्या 'हिंदुत्व ' या मूळ कल्पनेची नवी परिभाषा आणि नवी व्याख्या करण्याचा विचार व्यक्त झाला आहे. मुसलमान नेत्यांशी विचार विनिमय करून संघात चालू असलेल्या कार्यक्रमातही बदल करण्याची घोषणा झाली आहे.

हिंदू - मुस्लिम ऐक्य नाटकांचा नवा प्रयोग

थोडक्यात, भारतात यापूर्वी अनेकांनी केलेल्या हिंदू मुस्लिम ऐक्याच्या नाटकाचा संघ नव्याने प्रयोग करू इच्छित आहे. अगदी अलिकडच्या इतिहासात कै. गांधीजींनी कॉंग्रेसला हाताशी धरून हा प्रयोग केला. त्यात मुस्लीमांची मनधरणी करण्याच्या नादात, अखेरीस परमपवित्र भारत मातेचे दुर्दैवी विभाजन स्वीकारण्यात आले. खंडित भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कै. पं. नेहरूंनी हाच प्रयोग सत्तेला हाताशी धरून अमलात आणताना राष्ट्रगीत वन्देमातरमचा त्याग केला. राष्ट्रभाषेतील उर्दुच्या वर्चस्वाला वाव दिला. कित्येक सामाजिक निर्बंध चालू ठेवले. स्वतंत्र भारतातील हिंदू नागरिक एकपत्नित्वाच्या कल्पनेने जखडला गेला तर मुसलमान नागरिक मात्र अनेक बायका करण्यास मोकळा. असे विषम राष्ट्रघातकी धोरण नेहरू शासनाने हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी केलेल्या, मुस्लिम खुषामतीतूनच अस्तित्वात आले. भारत मातेचे राष्ट्रपतीपद अधून मधून कटाक्षाने मुस्लिम व्यक्तीला देण्याची प्रथा त्यातूनच निर्माण झाली.

जनसंघाने अहिंदूना प्रवेश दिला आणि गोवधबंदीची मागणी करणारा ठराव जनसंघाच्या अधिवेशनात संमत करता आला नाही. भारतात ईसाईकरणाच्या मोहिमेला तीव्र गती देण्याच्या हेतुने १९६४ साली मुंबई येथे भरलेल्या ख्रिश्चन युकॅरिस्ट कॉंग्रेसला, जनसंघातील नगण्य ख्रिश्चन सदस्यांच्या आस्तित्वामुळे, जनसंघाला विरोध करता आला नाही. नुकत्याच स्थापन झालेल्या जनता पक्षाच्या ध्वजाचा रंग ठरविताना हिरवा रंग मान्य करावा लागला.

हिंदूमुस्लिम ऐक्यासाठी कराव्या लागलेल्या वर उल्लेखित बदलांच्या अनुभवावरून, संघाच्या धोरणात आणि कार्यक्रमातही पुढीलप्रमाणे बदल करावेत अशी मागणी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

(१) हिंदुत्वाची नवी व्याख्या करताना, हिंदु संस्कृतीबरोबरच मुस्लिम संस्कृति

संवधर्नाचे दायित्व संघाच्या धोरणात समाविष्ट करावे.

(२) संघाच्या भगव्या ध्वजाच्या पताकापैकी एकीचा रंग हिरवा करण्याचा विचार करावा किमान ध्वजाचे गोंडे तरी हिरवे असावे असा आग्रह धरला जाईल.

(३) सध्याच्या संस्कृत प्रार्थनेऐवजी, उर्दु किंवा उर्दुमिश्रीत हिंदी भाषेतील प्रार्थना अस्तित्वात आणावी.

हिदूंसणाबरोबर ईद मोहरम हे उत्सव आणि शिवराज्याभिषेकाबरोबर औरंगजेब राज्यभिषेक दिनही साजरा करण्याची मागणी केली जाईल.

अर्थात सरसघंचालक आणि जागृत स्वयंसेवक वरील प्रकारची आत्मघातकी तडजोड स्वीकारणार नाहीत. अशी अपेक्षा चूक ठरू नये कारण जनसंघाची दारे मुसलमानांना खुली केल्यावरही अत्यल्पच संख्येने मुसलमान जनसंघात आले आणि जनसंघावर जातीयतेचा आरोप करणे विपक्षीयांनी चालूच ठेवले.

सरसंघचालकांनी ध्येय धोरणासंबंधी खुली चर्चा करण्याची नव्यानेच प्रथा पाडली आणि संघाच्या हितचिंतकाचे आपले मतभेद व्यक्त करण्याचे वैचारिक स्वातंत्र्य मान्य केल्यानेच हा लेख लिहिण्याचे सुचले. संबधित व्यक्ती यावर योग्य तो विचार करतीलच.

*अंक क्र. १९-२०
वैशाख शके १८९९
अंकावरचा इंग्रजी दि. तथा
हिंदू तिथि उमटली नाहीत
संपादकीय पृष्ठावर निरीक्षक
या उपनावाने हा लेख आहे.

* संदर्भ
श्री. मो.ग. तपस्वी यांनी घेतलेल्या
माननीय सरसंघचालकांच्या मुलाखतीचा आहे.
पहा दै. तरूणभारत नागपूर
दि. २४ एप्रिल १९७७ किंवा मनोहर (सा)
२४ ते ३० एप्रिल १९७७ चा अंक
मुलाखत दिल्लीला झाली. ९ ते १२ एप्रिल
च्या वास्तव्यात झाली.

हिन्दुत्वनिष्ठांनो सावधान

शेवटी एकदा भारतीय जनता पक्षाचे पितळ उघडे पडले. अर्थात ज्याचा जन्मच मुळी विकृतीतून झाला त्याची ही अपरिहार्य परिणती होती. भा.ज.प. चे आधीचे स्वरूप भारतीय जनसंघ १९५२ साली निर्माण झाला तोच मुळी हिंदुत्वाची धार कमी करण्यासाठी. वास्तविक संघात फूट नको म्हणून सावरकरवाद्यांनी ज्या स्वयंसेवक संघटना निर्माण केल्या होत्या त्या कै. बाबाराव यांच्या आज्ञेने रा. स्व. संघात विलीन केल्या. कै. बाबाराव सावरकर यांनी डॉ. हेडगेवार यांच्या बरोबरीने भारतात फिरून रा. स्व. संघाची उभारणी केली. कारण तो वेळेपर्यंत शुद्ध हिंदुराष्ट्रवाद हेच ध्येय होते. हिंदुराष्ट्रवाद्यांची राजकीय आघाडी म्हणून हिंदूमहासभा राहिली व या योग्य सहकार्याने भारतात हिंदूत्वाचे व चैतन्याचे स्वरूप सळसळत राहिले. पण हिंदुत्वाचे हे तेजस्वी रूप प्रतिकूल परिस्थितीत टिकवणे अनेकांना असह्य झाले. मग निर्माण झाला भारतीय जनसंघ. हिंदु राष्ट्रवादाच्या जागी भारतीय राष्ट्रवाद घेऊन, हिंदुत्ववादाच्या जागी एकात्म मानवतावाद घेऊन. दुर्दैवाने रा. स्व. संघाने आपले वजन भारतीय जनसंघाच्या पारड्यात टाकले.

सुरूवातीस संघाचा युक्तिवाद असाच होता की, "अहो हे सगळे फसवे स्वरूप आहे. केवळ नाटक! शासनाच्या दडपशाहीतून वाचण्यासाठी स्वीकारलेले. आतून आम्ही शंभर नंबरी हिंदुराष्ट्रवादीच आहोत." पण ही शुद्ध फसवणुक होती. हळूहळू ते मुस्लीम तुष्टीकरण व गांधीवादाकडे नकळत जात होते हे त्यांच्या लक्षात येत होते. निवडणुकीचे राजकारण स्वीकारल्यानंतर तर हे स्वरूप अगदीच स्पष्ट होऊ लागले. मूलभूत तत्वांशी तडजोड करून इतर अराष्ट्रीय पक्षांशी सहकार्य करून सत्तेत वाटाही मिळावला. पण या सत्तेचा उपयोग काय झाला? काय भारतात समान संहिता आली? काय काशी विश्वेश्वराचे मंदीर मुक्त झाले? उत्तर प्रदेशातील संभळला २५० हिंदूंना जाळणाऱ्या मुसलमानांना काय शासन दिले गेले? भारताची संरक्षण व्यवस्था मजबूत झाली का? आपल्या शस्त्रात अण्वस्त्रांची भर पडली काय? हिंदु नेपाळशी संबंध सुधारले गेले का? या अडीच वर्षाच्या सत्तेच्या कालावधीत हिंदुत्वाकडे कोणत्या नजरेने पाऊल टाकले गेले?

उलट त्या अडीच वर्षांच्या सत्तेने भा. जनसंघवाल्यांचे डोके फिरले. सत्तेची चटक लागली. निस्वार्थपणे जीवाची बाजी करून हिंदुराष्ट्रवादाची भूमिका सतत लोकांसमोर जागवू ही जिद्द संपली. पुन्हा संघात मुसलमानांना स्थान का नको ही चर्चा चालू झाली व संघाचे स्वरूपही बिघडवून टाकले. मुस्लीम तुष्टीकरणाची स्पर्धा चालू झाली. हिंदूंची मते मिळवण्याची कटकट नको व मुसलमानांची एकगठ्ठा मते मिळावीत म्हणून मग काँग्रेसशी मात्रागमनी वृत्तीची स्पर्धा चालू झाली. जनता पक्षाच्या राजवटीत दिल्ली शहरात एकशे आठ मशिदी राष्ट्रवादी मुसलमान नेता सिकंदर बख्त याने बांधून दिल्या. मुसलमानी आक्रमकांकडे डोळेझाक होऊ लागली. मोरादाबादच्या दंगलीत मुसलमान गुंडानी पोलिसांवर हल्ले केले तर भा. ज.प. वाले म्हणतात की, "मोरादाबादच्या दंगलीस जातीय रंग देऊ नका. तर तो पोलिसांचा अत्याचार

होता." मुस्लिम दंग्याचे स्वरूप वास्तविक उघड होते परंतु तरी सुद्धा काही भाबड्या लोकांना वाटत होते की, हे सर्व वरवरचे आहे.

पण परवा मुंबई येथे जे भा.ज.प.चे राष्ट्रीय अधिवेशन झाले तेथे जो लोकशाही प्रेमाचा तमाशा झाला व जे तारे तोडले गेलेत त्यामुळे या भाबड्या लोकांचा आशावाद नष्ट होईल अशी आम्हाला आशा आहे. ज्या गांधीवादाने देश खड्ड्यात, विनाशाकडे गेला त्या गांधीवादाचा जोरदार पुरस्कार अध्यक्ष बाजपेयींनी हुकूमशाही पद्धतीने केला व तो संमत करून घेतला. वास्तविक या धोरणास अनेकांनी विरोध केला पण तो विरोध मोडून टाकण्यात आला. भारताच्या हितासाठी (!) पाकिस्तान बलिष्ठ व्हावा ही मनिषा बाजपेयींनी व्यक्त केली. पाकिस्तान बलिष्ठ होऊन भारताच्या समस्या सुटतील हे बाजपेयींचे तर्कट काही औरच आहे! पाकिस्तान बलिष्ठ होणे म्हणजे भारतास धोका वाढणे - हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट दिसत असताना बाजपेयी पाकिस्तान प्रेमाची ग्वाही देतात! कारण त्यांना येथील मुस्लिम मतांची काळजी आहे. कारण त्यांना अमेरिकेचे तुष्टीकरण करावयाचे आहे. कारण त्यांना केवळ विरोधा करिता प्रधानमंत्र्यांच्या पाकिस्तानविरोधी धोरणाला विरोध करावयाचा आहे!

.. होय, होय! बाजपेयी हे अनेकदा केवळ विरोधाकरिता विरोध करीत असल्याचे आढळून आले आहे. मागे साप्ताहिक सोबत मधे दादूमियाँनी बाजपेयींची घेतलेली मुलाखत प्रकाशित झाली. त्यात प्रथम बाजपेयींना अखंड भारत अभिप्रेत असल्याचे नमूद करण्यात आले. बाजपेयींनी तेव्हा (१९७१) बांगला देशाला इंदिरा शासनाने मान्यता द्यावी असा आग्रह धरला होता. "बांगला देशाला मान्यता दिल्याने आणखी एक वेगळे मुस्लिम राष्ट्र निर्माण होईल. अखंड भारताच्या भूमिकेला ही मागणी पूरक कशी ठरेल?" असा प्रश्न विचारला असता बाजपेयींनी "केवळ इंदिराजींना अडचणीत टाकण्यासाठी ही मागणी," असे उत्तर दिल्याचे व मुलाखतकर्त्याने कपाळाला हात लावल्याचे नमूद करण्यात आले आहे.

आताही केवळ इंदिराजींना विरोध करण्यासाठीच भारताला पाकिस्तान पासून युद्धाचा काहीच धोका नाही, असे विधान बाजपेयींनी ठोकून दिले ना! मग त्याविरूद्ध विधान करणे-हीच बाजपेयींची भूमिका! राष्ट्रहिताचे तत्व त्यात लवमात्र नाही.

भा.ज.पा. च्या अधिवेशनात अनेक जागृत सदस्यांनी बाजपेयींच्या 'गांधीवादा' च्या अंगिकाराला प्रखर प्रकट विरोध केला. त्यामुळे प्रतिनिधीत खळबळजनक चर्चाही झाल्या. तेव्हा पुढील प्रमाणे युक्तिवाद खाजगीत करून गांधीवादाला असलेला विरोध शमविण्यात आला:- "सध्या भारतात सुमारे बारा कोटी मुसलमान आहेत. सुमारे चार कोटी ख्रिश्चन आहेत. म्हणजे एकूण सुमारे सोळा कोटी अहिंदु लोकांचा विरोध केवळ हिंदुराष्ट्र या एका शब्दामुळे ओढवून घेतला जाईल! तेव्हा आपण त्या शब्दा ऐवजी गांधीवाद हा शब्द अंगिकारला तर हे सोळा कोटी अहिंदु आपल्याजवळ (म्हणजे मतांसाठी) येतील." बाजपेयींनी भाषणात स्पष्टच म्हटले की आपण एखाद दुसऱ्या शब्दासाठी भांडत बसणे योग्य नाही! 'बाबा वाक्यं प्रमाणं' म्हणणाऱ्या प्रतिनिधींनी लगेच 'गांधीवाद' स्वीकारला!

. . . परंतु मनात हिंदुत्वनिष्ठा बाळगणाऱ्या हजारो प्रतिनिधींना बाजपेयींचा युक्तिवाद देशहितकारक वाटला नाही. भारताच्या दुर्देवी फाळणीनंतर, विभाजित भारतात केवळ सुमारे तीन कोटीच मुसलमान राहिले. वास्तविक या तीन कोटी मुसलमानांनाही त्यांना 'पाक' वाटणाऱ्या पाकिस्तानात पाठविण्यासाठी आंदोलन करणे आवश्यक होते. तसे [illegible] तर सोडाच परंतु त्या तीन कोटी मुसलमानांना अन्य नागरिकांप्रमाणे समान सामाजिक (विशेषतः विवाह विषयक) संहिता लागू करा, असेही जनसंघ-जनता पक्ष व आता भा.ज.पा. यांनी कधी म्हटले नाही! मुसलमानांना वाटेल तितके विवाह व त्यापासून होईल तितकी संतती निर्माण करण्याचे अधिकार दिल्यानेच ते तीन कोटीचे बारा कोटी झाले! हे असेच पुढेही चालू राहिल्यास (आणि बाजपेयी तरी ते तसेच चालू रहावे म्हणून प्रयत्नशील आहेत) नजिकच्या भविष्यात या बारा कोटींचे बावन्न कोटी मुसलमान होणार हे सांगण्यास कोणा ज्योतिष्याची आवश्यकता नाही. मग या बावन्न कोटी इस्लामी जनतेला संतुष्ट करण्यासाठी भा.ज.पा. गांधीवाद सोडून भारताच्या इस्लामी करणाच्या धोरणालाही पाठिंबा देणारच नाही, असे कसे म्हणता येईल?

आपल्या देशात दुर्देवाने भोळसट, अतिरेकी विचारांचा अंगिकार अनेक हिंदु नेत्यांनी केला आहे. गांधी, नेहरू, मोरारजी देसाई, जयप्रकाश, ... आणि आता मोहात्मा बाजपेयी...! "गांधीवाद-नेहरू वाद-देशको किया बरबाद," ही घोषणा डॉ.ना.भा. खरे यांनी दिली. परंतु त्यातील चेतावणी लक्षात न घेता मेंढरांप्रमाणे ज्यांना बाजपेयींच्या गांधीवादा मागोमाग जावयाचे आहे, त्यांनी खुशाल जावे. जाणूनबुजून आत्मनाश करणाऱ्यांना कोण रोखणार? परंतु जे हजारो हिंदुत्वनिष्ठ मनाचे प्रतिनिधी भाजपामधे आहेत, जे अजूनही स्वातंत्र्यवीर सावरकर, प. पू. डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरूजी यांना वाट चुकलेले हिंदुत्वनिष्ठ म्हणत नाहीत. त्या कट्टर राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी मात्र याच वेळी अराष्ट्रीय 'भाजपा' चा त्याग करून राष्ट्रद्रोहाच्या पातकापासून स्वतःचा बचाव करणे आवश्यक आहे. बारा कोटी मुसलमानांची खुशामत करणे हा उपाय नसून देशातील सर्व नागरिकांना समान सामाजिक नियम लागू करून हिंदूंची बहुसंख्या निरंतर राहू देण्याची व्यवस्था करणे हाच रामबाण उपाय आहे, हे ओळखून भाजपातील कट्टर हिंदुत्वनिष्ठांनी हिंदुराष्ट्रवादाचा उघड पुरस्कार केला पाहिजे.

राजकीय रंगभूमीवर हिंदुराष्ट्रवादाची भूमिका घेऊन हिंदुमहासभा अजूनपर्यंत उभी आहे. हिंदुमहासभेचे दरवाजे हिंदुत्ववाद्यांना सदैव उघडे आहेत. या भीषण व भयानक परिस्थितीत हिंदुमहासभा बलिष्ठ होणे हीच काळाची गरज आहे. त्यातूनच तेजस्वी समर्थ हिंदुराष्ट्र निर्माण होणार आहे.

काळाची ही हाक आम्ही ऐकणार आहोत काय?

* दि. ९ जाने. १९८१

संपादकीय

(एक उपमथळा व एक वाक्य वगळून)

८. खबरदार, संघावर बंदी घालाल तर खबरदार!

काश्मीरच्या देशद्रोही शेख अब्दुल्ला पुत्राने- फारूक अब्दुलाने मुख्यमंत्री पदावर आरूढ झाल्यानंतर सत्ताज्वराने पछाडल्याप्रमाणे राजकीय मर्कटलीला सुरू केल्या आहेत. भारतीय संघराज्याच्या सार्वभौम शक्तीसमोर फारूक अब्दुल्ला केवळ ढेकळाप्रमाणे आहे. केन्द्रीय शासनाने मनात आणले तर एका अध्यादेशाच्या फटक्यासरशी फारूक अब्दुल्लाच काय पण अब्दुल्ला घराण्याला सतत चिथावणी देणाऱ्या परकीय शक्तींनासुद्धा कायमचे नेस्तनाबूत करू शकते. काश्मीरला, अन्य भारतीय प्रादेशिक राज्यांच्यापेक्षा वेगळा दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द केले की काशमीरमधील फुटीरता नेहमीकरता संपुष्टात आणता येईल. शेख अब्दुल्ला काय, त्याचा वारस डॉ. फारूक काय किंवा वेगळे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याची आकांक्षा बाळगणारी त्यांची तथाकथित नॅशनल फ्रंट ही संघटना काय, केन्द्रशासनाच्या पोलादी शक्तीपुढे केवळ कागदी वाघ आणि पत्त्याचा बंगला इतकी क्षुद्र आहे. सत्तारूढ काँग्रेस शासनाचा मानसिक कमकुवतपणा हीच त्या कागदी वाघांची शक्ती. निधर्मी सत्तारूढ पक्षांची मतांसाठी लाचारी, सत्ताप्राप्तीसाठी त्यांनी केलेले फुटीर देशद्रोही गटांचे लांगूलचालन हेच त्या गरूडाचा आव आणणाऱ्या काश्मिरी कावळयांचे सामर्थ्य! भारतीय शासनाचा मानसिक दुबळेपणा हा दोष खरे तर आपल्या स्वातंत्र्या लढयातच तत्कालीन काँग्रेसी नेतृत्वात निर्माण झाला. तत्कालीन काँग्रेसचे नेतृत्व जर कणखर असते, त्या नेतृत्वाने विभाजनवादी प्रवृत्तीपुढे त्यावेळी लोटांगणे न घालता प्रखर संघर्ष केला असता तर पाकिस्तानचा जन्मच झाला नसता. त्या दुबळ्या काँग्रेसी नेतृत्वाने देशातील स्वातंत्र्यवादी हिंदू समाजाच्या प्रचंड शक्तीचा विश्वासघात केला नसता तर त्या लढाऊ हिंदू शक्तीने मूठभर पाकिस्तानी गुंडांचा केव्हाच नायनाट केला असता. परंतु तेव्हाच सत्तालालसेने काँग्रेसी नेतृत्वाने स्वीकारलेल्या लाचारी लांगूलचालनवादी धोरणामुळे निधर्मी नेतृत्वात दुर्बल मनोवृत्तीचा न्यूनगंडाचा रोग निर्माण झाला. याच न्यूनगंडाच्या रोगाने पछाडल्यामुळे प्रथम देशाचे विभाजन झाले आणि नंतर एकदा नव्हे तीनदा, पाकिस्तानने लादलेल्या युद्धात पाकिस्तानचा आपल्या पराक्रमी सैन्याने कमरतोड पराभव केल्यानंतरही त्या शत्रूराष्ट्राला जीवदान देण्यात आले. फुटिरतावाद्यांचे लांगुलचालन करण्याच्या न्यूनगंडाच्या रोगामुळेच काशमीरमधे पुन्हा देशद्रोही अब्दुल्ला आणि कंपनी सत्तेवर येऊ शकली. इतकेच नव्हे तर उर्वरित भारतातही फुटीरवादी जंतु आता नागाची शक्ती प्राप्त करून फणा काढून डंख मारण्यास सिद्ध झाले आहेत. महम्मद पैगंबराने पलायन केले हे ऐतिहासिक सत्य शालेय अभ्यासक्रमातील पुस्तकात नमूद करण्यात आले. तर जातीयवादाच्या जहरी विषाने परिपूर्ण असलेल्या मुस्लिम नेतृत्वाने महाराष्ट्रात दंगे घडवून आणले. या मुस्लिम दंगली ठेचून काढण्याऐवजी छत्रपती शिवाजी महाराजांचे कुल बदनाम करणाऱ्या महाराष्ट्र मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी अभ्यासक्रमातील तो धडाच गाळून टाकला आणि फुटीरतावाद्यांपुढे सपशेल लोटांगण घातले. भारतीय शासनाचा हा दुबळेपणा लक्षात घेऊनच

वेगळया खलिस्तानची मागणी स्वायत्ततेच्या नावाखाली मुठभर अकाल्यांनी पुढे रेटली आहे. भारतीय शासनाचा न्यूनगन्ड लक्षात घेऊनच फारूक अब्दुल्लाने उद्दामपणे ३५ वर्षापूर्वी काश्मीरातून स्वेच्छेने पाकिस्तानात गेलेल्या लक्षावधी मुस्लिमांना काश्मीरात परत बोलवून नागरिकत्वाचे अधिकार देणारे विधेयक संमत करून घेतले. सुदैवाने यावेळी मात्र केंद्रीय शासनाने आणि भारतातील सर्व राजकीय पक्षांनी फारूकच्या देशद्रोही कृत्याला विरोध केला. इतकेच नव्हे तर काश्मीरातील सर्व हिंदू जनतेने फारूकच्या देशद्रोही विधेयकाविरूद्ध प्रखर जनआंदोलन उभारले. या जनआंदोलनात सर्व काश्मीरी हिंदु पक्षभेद विसरून सामील झाल्यामुळे फारूक अब्दुल्ला चिंतेत पडला आणि त्या भयातूनच काशमीरातील हिंदू समाजाला नेस्तनाबूत करण्यासाठी अखिल भारतातील हिंदूसंस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेवर काश्मीरात बंदी घालण्याचा निर्धार वारंवार व्यक्त केला आहे. ज्या हट्टाने फारूकने पाकिस्तानी लोकांना काश्मीरी नागरिकत्व बहाल करण्याचे विधेयक संमत करून घेतले त्या हटवादी प्रवृत्तीनेच काश्मीरात संघावर बंदी घालण्यात येईल हे स्पष्ट आहे. आणि म्हणूनच काश्मीरमधील संघावरील बंदी ही केवळ संघावरीलच आपत्ती न राहता अखिल हिंदू समाजावर कोसळू पहाणारी आपत्ती ठरते. या आपत्तीचा समूळ नायनाट करण्यासाठी आता अखिल हिंदू समाजानेच फारूक अब्दुल्लाला बजाविले पाहिजे की, "खबरदार! संघावर बंदी घालाल तर तुमची राजसत्ताच संपुष्टात आणली जाईल!"

फारूक अब्दुल्लाचा कावा

काश्मीरच्या कागदी मुख्यमंत्र्याने पाकिस्तानी नागरिकांचे पुनर्वसन विधेयक हट्टाने संमत करून घेतले. तेव्हाच इंदिराजींचा राग ओढवून घेतला. पुढे इंदिराजींना नामोहरम करण्यासाठी डॉ. फारूकने फुटीरतावादी खलिस्तान चळवळीशी सूत जमविले आणि त्या वादंगात आगंतुकपणे मध्यस्थी करण्याचे नाटक केले. स्वतंत्र काश्मीरच्या कटामधे खलिस्तानवादी अकाल्यांना ओढण्याचा तो दुष्ट कावा होता. परंतु सतर्क असलेल्या इंदिराजींनी डॉ. फारूकची मध्यस्थी फेटाळली तेव्हा त्याचे अवसान गळाले. इंदिराजींनी फारूकची बोळवण कोणत्या शब्दात केली ते प्रकाशित झाले नाही. परंतु इतके मात्र खरे की, इंदिराजींनी फारूकला दिलेल्या चेतावणीमुळे तो इतका गर्भगळित झाला की त्याने, "पुन्हा म्हणून या वादात मध्यस्थी करण्याची उठाठेव करणार नाही," अशी पत्रकारांपुढे जाहीर कबुली दिली. या एकाच गोष्टीवरून आम्ही जे सुरवातीला म्हटले आहे की, केंद्रीय शासनाच्या सार्वभौम शक्तीपुढे डॉ. फारूक ढेकणाप्रमाणे आहे, हे सत्य स्पष्ट होते. सारवासारव करण्यासाठी आणि इंदिराजींची जमेल तितकी मर्जी संपादन करण्यासाठी मग फारूकने संघावर बंदी घालण्याचा आपला निर्धार व्यक्त केला. अखिल हिंदू समाजाचे सांस्कृतिक प्रतिनिधित्व करणाऱ्या संघशक्तीची भीती नेहरू घराण्यात परंपरेने चालत आलेली आहे, ही गोष्ट कावेबाज फारूकने ओळखली. गांधीवधाचे निमित्त करून तत्कालीन पंतप्रधान प. नेहरूंनी संघावर बंदी घातली होती. संघ स्वयंसेवकांनी

केलेल्या अभूतपूर्व सत्याग्रहानंतर संघावर कांही अटी लावून ती बंदी उठवण्यात आली. या बंदीमुळे संघाची संघटना विस्कळीत झाली नाही, उलट ती नव्या जोमाने वाढू लागली. त्यानंतर अलीकडे कै. जयप्रकाशजींच्या आंदोलनाचे निमित्त करून नेहरूकन्या प्रधानमंत्री इंदिराजींनी आणिबाणी घोषित करून संघावर बंदी घातली. या बंदीकालातही ती संघटना नामशेष न होता आणिबाणी व बंदी उठताच अधिक वेगाने फोफावली. इतकेच नव्हे तर बंदी घालणाऱ्या इंदिरा कांग्रेसच्या निवडणुकीतील पराभवानंतर आलेल्या जनता पक्षाच्या राजवटीत काही स्वयंसेवक मंत्रीही झाले! तेव्हा बंदी घालून संघ नेस्तनाबूत होत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. असे असले तरी संघाकडे आकर्षित होणाऱ्या लोकमताचा प्रवाह रोखण्यासाठी बंदीचा काही प्रमाणात उपयोग होतो हेही कांग्रेस शासनाने ओळखले. म्हणूनच आज मितीलाही मध्यप्रदेशातील इंका शासन या ना त्या स्वरूपात संघकार्यात प्रतिबंध करणाऱ्या शासकीय कारवाया करत असते. इंदिराजी संघाला प्रतिस्पर्धा समजतात आणि काश्मीरातही हिंदू जनता संघटित होऊन डॉ. फारूकला विरोध करते याची सांगड घालून जातीयता आणि फुटीरता वाढवीत असल्याच्या आरोपावरून संघावर बंदी घालण्याची घोषणा डॉ. फारूक यांनी केली. निधर्मीपणाचे नाटक व निःपक्षता दाखविण्यासाठी जोडीला मुस्लिम लीगवरही बंदी घालत असल्याचे त्यांनी घोषित केले. एकाच दगडात दोन पक्षी मारण्याचे डॉ. फारूकच्या मनात आहे. संघावरील बंदीच्या द्वारे काश्मीरमधील हिंदू जनतेचे आंदोलन दडपून टाकायचे आणि त्याचवेळी संघविरोधी असलेल्या इंदिराजींची मर्जी संपादन करायची! परंतु फारूकमियांना वाटते तितके यश या प्रकरणी मिळणार नाही, अशी परिस्थिती आज देशात निर्माण झाली आहे.

डॉ. करणसिंहांचे प्रति आव्हान

कारण राष्ट्राचा कणाच असलेला हिंदू समाज हळू हळू का होईना पण निश्चितपणे जागृत होऊ लागला आहे. मीनाक्षीपुरम येथे पेट्रो डॉलर्सने घडवून आणलेले इस्लामीकरण अखिल हिंदू समाजाला निद्रितावस्थेतून जागे करण्यास कारणीभूत झाले. हिंदूचे धर्मांतर होऊ नये म्हणून राजकीय पक्षभेद विसरून हिंदू जनजागरणाचे विराट कार्य चालू झाले. देशाच्या राजधानी दिल्लीत राष्ट्रीय स्तरावर विराट हिंदू संमेलन भरले. हिंदूंच्या धर्मांतराविरूद्ध देशव्यापी लढा देण्याची सिद्धता व्यक्त करण्यात आली. काश्मीरचे भूतपूर्व नरेश आणि केंद्रीय कांग्रेस मंत्रीमंडळातील माजी मंत्री डॉ. करणसिंह यांनी कांग्रेस पक्ष सोडलेला नाही. परंतु पक्षीयपातळीच्या वर जाऊन देशाचा कणाच असलेला हिंदू समाज सुरक्षित संघटित आणि सदृढ असण्याची आवश्यकता मात्र त्यांना पूर्णपणे पटली आहे. म्हणूनच हिंदू समाजाला संघटित करून हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि विशुद्ध देशभक्ती यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करीत असलेल्या संघावर बंदी घालण्याची धमकी देणाऱ्या डॉ. फारूकला त्यांनी तत्काळ रोहटक येथील वार्तापरिषदेत प्रकट आव्हान दिले

आहे. "संघावरील बंदी कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही इतकेच नव्हे तर बंदीची कारवाई तीव्र विरोधाद्वारे हाणून पाडू," असे त्यांनी रोखठोक सांगितले. संघबंदी हा केवळ संघ या संस्थेवरील अन्याय नसून तो अखिल हिंदूसमाजावर होणारा अन्याय आहे. हे सत्य डॉ. करणसिहांनी सर्वप्रथम प्रकटपणे सांगितले, याबद्दल, ते धन्यवादास पात्र आहेत.

अखिल हिंदु समाजानेच प्रतिकार केला पाहिजे

परंतु एकट्या डॉ. करणसिंहानीच प्रतिकाराची सिद्धता दाखवली म्हणजेच कार्यभाग सिद्ध होईल असे नाही. स्वतंत्र भारतात हिंदु समाजाला स्वसंरक्षणाचे स्वातंत्र्य अबाधितपणे उपलब्ध राहावे म्हणून अखिल हिंदू समाजानेच आपल्यावर होऊ घातलेल्या अन्यायाच्या प्रतिकारार्थ उग्र लढ्यास सिद्ध झाले पाहिजे. परकीय मोगलाईत आणि ब्रिटीश राजवटीत हिंदू समाज जितका मुक्त होता तितका या स्वतंत्र भारतातील निधर्मी राजवटीत तो मुक्त राहू शकत नसेल तर ती लांछनास्पद गोष्ट आहे. अल्पसंख्यांकाची मतासाठी खुशामत करणाऱ्या विविध सत्तातुर पक्षातील स्पर्धेमुळे हिंदू समाजाच्या घटनादत्त स्वातंत्र्याला आणि परंपरागत बहुसंख्यत्वालाच धोका निर्माण झाला आहे. समान सामाजिक संहिता आणि समान विवाह व नियोजन विषयक निर्बधाच्या अभावी हिंदुस्थानातच हिंदू अल्पसंख्य होण्याचा धोका निर्माण झाला आहे. हिंदुस्थानात हिंदू समाजालाच संघटनेचे स्वातंत्र्य नाही. हिंदू समाजाच्या हितसंरक्षणाचे स्वातंत्र्य नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रत्येक हिंदुमात्राने संघटितपणे लढा देण्यास सिद्ध राहिले पाहिजे. संघावरील बंदी म्हणजे देशभक्तीवरील बंदी होय. संघावरील बंदी म्हणजे हिंदू संस्कृती जोपासण्यावरील बंदी होय. संघावरील बंदी म्हणजे निःस्वार्थपणे समाजसेवा करण्यावरील बंदी होय. देशभक्ती संस्कृति संवर्धन आणि समाजसेवा करणाऱ्या प्रत्येक संस्थेवरच संघापाठोपाठ बंदी येण्याची शक्यता लक्षात घेऊन वेळीच सावधगिरीची उपाययोजना म्हणून काश्मिरातील संघबंदीला अखिल राष्ट्रीय पातळीवरून उग्र विरोध करणे आपले कर्तव्य ठरते. म्हणूनच फारूक अब्दुल्लाचे आव्हान स्वीकारून हिंदू समाजाने परखडपणे बजाविले पाहिजे की, खबरदार, "संघावर बंदी घालाल तर खबरदार!"

निर्भय व्हा!

संघावरील बंदीच्या धमकीला विरोध करणे म्हणजे संघाचे नेतृत्व मानणे, असे ठरत नाही. संघामधेही काही उणीवा असतील. संघाच्या कार्यप्रणालीबद्दल मतभेद असू शकतात. परंतु संघाच्या देशभक्तीच्या भावनेबद्दल मात्र कोणालाही शंका घेता येणार नाही. पुराणकालापासून हिंदुस्थानात हिंदुसमाज हाच मुख्य जीवनप्रवाह राहिलेला आहे. हिंदुसमाज स्वभावतःच सहिष्णु आहे. अत्याचारी भावनासुद्धा सद्गुण विकृतीमुळे हिंदुसमाजात उरलेली नाही. हिंदु समाजाच्या या औदार्याचा लाभ शत्रू पक्षाने सतत उचललेला आहे. ही आपली चूक सुधारण्याची अखेरची संधी आज आपणास मिळत आहे. यावेळी आपण संपूर्णतः निर्भय

झाले पाहिजे. भारत आणि हिंदुसमाज या गोष्टी संपूर्णतः एकच आहेत हे ध्यानात घेऊन, उघडपणे हिंदुसमाजाचा स्वाभिमान, हिंदुसमाजाची संस्कृती आणि धर्म, हिंदुसमाजाची सर्वांगीण प्रगती या गोष्टींच्या संरक्षणार्थ प्रत्येक हिंदुने निर्भयतेने पुढे आले पाहिजे. हिंदुसमाजाच्या भावनांचा आदर या देशात सर्वप्रथम राखला गेला पाहिजे, हे सत्य ठणकावून सांगितले पाहिजे. हिंदु समाजाच्या पाठिंब्याशिवाय भारतात कोणताही पक्ष सत्तारूढ होऊ शकणार नाही, हे सत्य बजावून काँग्रेससह तथाकथित सर्व निधर्मी राजकीय पक्षांनाही सर्वप्रथम हिंदुसमाजाचे हित जपण्यास भाग पाडले पाहिजे. कारण हिंदूसमाज दुर्बल झाला, अल्पसंख्य झाला तर काँग्रेससह सर्व निधर्मी पक्ष नष्ट होऊन, त्याऐवजी जागतिक मुस्लिम किंवा ईसाई वर्चस्वाच्या राजवटी येतील. हा सर्वनाश टाळण्यासाठी यावेळी हिंदूसमाजाचे संघटन स्वातंत्र्य अबाधित रहावे म्हणून अखिल हिंदू समाजाने संघबंदीच्या कारवाया हाणून पाडल्या पाहिजेत!

दि. ३ डिसें. १९८२

९. पुरूषोत्तम भास्कर भावे

प्रभु श्रीरामचंद्र आज आपल्यात नाहीत परंतु त्यांचे तेजस्वी जीवन, आदर्श वर्तन आजही जनहृदयात जिवंत आहे. भगवान श्रीकृष्ण आज हयात नाहीत पण त्यांचे सद्‌गुणविकृति रहित चरित्र तसेच मानवी तत्वज्ञानाचे सर्वोच्च शिखर ठरलेले गीतेतील तत्वज्ञान आजही नुसते प्रेरणादायकच नव्हे तर अखिल मानवजातीतील बुद्धिमंतात भिनलेले आहे. छत्रपति शिवाजी महाराज, हिंदुकुलभूषण राणाप्रताप, संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास, लोकमान्य टिळक, हिंदुहृदय सम्राट - हिंदु संघटक स्वांत्र्यवीर सावरकर या मालिकेतील थोर विभूती आज आपल्यात नाहीतही आणि तरीही त्यांचे स्फूर्तिदायक चरित्र आणि प्रचलित समस्यांवर रामबाण उपाय सांगणारे व्यवहारी मार्गदर्शन आपल्यास उपलब्ध आहेही.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मशताब्दी सर्वत्र गाजते आहे नि ते आपल्या ऐहिक जीवनात नसतानाही आपणास राष्ट्रीय प्राणवायू पुरवितच आहेत. त्याप्रमाणेच पुरूषोत्तम भास्कर भावे हे वीर विनायकाचे सर्वोत्तम भाष्यकार शिष्योत्तम आज आपल्यात नाहीत आणि तरीही 'हिंदुत्व गीते' चे तत्वज्ञ सावरकर यांचे विचार जनमानसाला सातत्याने शिकविणारे ज्ञानेश्वर पुरूषोत्तम भास्कर भावे आमच्या दैनंदिन जीवनांत मानवतेच्या रक्षणार्थ, राष्ट्र अखंड करण्यासाठी, स्वार्थासाठी देश-धर्म विकण्याचे अधम कृत्य करणाऱ्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी आम्हाला सातत्याने प्रेरणा देत आहेत. जशी ऊर्जा-अणुशक्ति प्रचंड चैतन्य निर्माण करते तशी या मरगळलेल्या निस्तेज होऊ घातलेल्या हिंदु समाजांतील मोजक्या क्रांतिकारी, त्यागी, देशभक्त, लढाऊ हिंदु युवकांत निश्चयाने विजयाप्रत नेणारी युयुत्सु दुर्दम्य, तीव्र इच्छाशक्ति साहित्यभास्कर भावे आजही निर्माण करीत आहेत. भाव्यांचे बलदंड व्यक्तिमत्व पंचत्वात विलीन झाले परंतु तेजस्वी लेखन आणि ओजस्वी भाषण आजही लक्षावधी हिंदु युवकांचे हृदयस्पंदन प्रस्फुरित करीत आहे. आणि . . . .

. . . . आणि तरीही या वीर सावरकर जन्मशताब्दी सोहळ्याच्या काळात आम्हास पु. भा. भाव्यांची तीव्रतेने उणीव भासत आहे. सावरकरांचा गुणगौरव करणारी अनेक नवीन पुस्तके प्रकाशित होत आहेत. सावरकरांवर डॉक्टरेट मिळविणारे प्रबंध लिहिले गेले आणि लिहले जात आहेत. विविध भाषेत शेकडयांनी लेख लिहिले जात आहेत. परंतु त्यांत, आता नव्याने, अगदी नवीनतम विचाराने, ओजाने, आत्मविश्वासाने; सावरकरांच्या नतद्रष्ट टीकाकारांवर, सावरकर नावाच्या यज्ञाची दाहकता विझल्यावर उतरलेल्या राखेत स्वतःच्या भ्याड-स्वार्थी-षंढ वृत्तीने बरबटलेली भांडी घासून त्यावर सावरकर भक्तीची व्यापारी-केवळ ग्राहकांना भुरळ घालणारी - कल्हई करणाऱ्या - नकली 'सावरकर प्रेमी' भाटांवर आसूड ओढणारे-भाव्यांनी वाघनखांनी लिहलेले लेखन आढळणार नाही! भाषाप्रभु सावरकरांवर शैलीप्रभु भाव्यांचे नवीनतम लेखन आढळणार नाही.

ते घणाघाती निर्भय वक्तृत्व आता ऐकू येणार नाही.

पु. भा. भावे हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे निस्सिम भक्त होते. कृतिशील अनुयायी होते. वीर सावरकर म्हणजे भाव्यांचे दैवतच. पण तरीही भावे हे काही अंधभक्त नव्हते. नेत्यापाशी बुद्धि गहाण ठेवलेले अंधानुयायी नव्हते. सावरकरांचा एखादा विचार त्यांना पटला नाही तर त्यांनी नम्रतेने, आदराने तरीही आग्रहाने आपले वेगळे मत मांडलेच. ते स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सीमेचे निष्ठावंत अनुयायी होते, परंतु स्वातंत्र्यवीरांनीच आपल्या अनुयायांना शिकविलेल्या बुद्धिस्वातंत्र्याचे प्रयोगशील अनुयायी होते. वीर सावकरांना असे आणखीन काही विख्यात स्वतंत्र बुद्धिचे अनुयायी लाभले. वि.घ. देशपांडे, सावधानकर्ते मावकर, हुतात्मा नथुराम विनायक गोडसे, नारायण दत्तात्रेय आपटे . . . . . कितीतरी नावांची सूची सांगता येईल. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत हिंदुमहासभेने भाग घ्यावा असे वि. घ. देशपांडयांना प्रकर्षाने वाटले. आणि त्याच्यांपुरता त्यांनी त्या चळवळीत भाग घेतलाही. अर्थातच एका प्रसंगी भावेही मित्रवर्य देशपांडयाबरोबर होतेच! मावकर गटाने, हिंदुमहासभेने तत्कालीन काँग्रेसी सत्याग्रही चळवळीसारखी जनतेला आकर्षित करणारी आंदोलने हिंदु महासभेनेही चालवावी असा आग्रह हिंदुमहासभाध्यक्ष सावरकरांकडे धरला होता. स्वातंत्र्यवीर सावरकर निरिश्वरवादी होते तर पु. भा. भावे आणि वि. घ. देशपांडे परमेश्वराचे अस्तित्व मानणारे होते. भाव्यांनी आपल्या लेखनात आणि भाषणात अनेकदा परमेश्वरी अस्तित्वाचा निर्भयपणे पुरस्कार केलेला आहे. वि. घ. देशपांडे यांनी वीर सावरकरांच्या प्रत्यक्ष भेटीतील याविषयीच्या एक संवाद आम्हांस सांगितला. तो सदैव लक्षात राहण्यासारखा आहे. वि.घ. देशपांडे हे गणपतीचे भक्त होते, पूजा करीत. अथर्वशीर्ष म्हणत. त्या भेटीत तात्याराव विघंना म्हणाले, "अरे या विश्वाचे प्रतीक म्हणूनच तू गणपतीची पूजा करतोस ना?" त्यावर स्वतःच्या दैवतासमान असलेल्या सर्वोच्च नेत्याला नम्रतेने परंतु निर्भयतेने विघंनी तत्काळ प्रत्युतर दिले, "नाही तात्या, विश्वाचे प्रतिक मी गणपतीला मानीत नसून गणपतीचे प्रतीक विश्व आहे, असे मी मानतो. म्हणजे आधी गणपती मग विश्व." कथा सम्राट भाव्यांनी तर देव राहूद्याच परंतु देव्हाऱ्याविषयीही आपली स्पष्ट मते 'देव्हारा' या विख्यात कथेत उत्कृष्ट शैलीत अक्षरबद्ध केली आहेत. परंतु अशी अपवादात्मक मतभिन्नता बाळगूनही भाव्यांनी आपल्या सहस्रावधी भाषणांतून सातत्याने, बुद्धिनिष्ठ विश्लेषणाने पुरस्कार केला तो हिंदुराष्ट्राला, हिंदु धर्माला, हिंदुसमाजाला चैतन्य देणाऱ्या वीरसावरकर तत्वज्ञानाचा होय. सावरकर जन्मशताब्दीच्या वर्षात अनेक विख्यात आणि थोर आणि विद्वान वक्त्यांची 'सावरकर' या विषयांवर झालेली अनेक भाषणे आम्ही एकली. परंतु तेथेही आम्हांस प्रकर्षाने उणीव भासली ती पु. भा भाव्यांच्या निर्भेळ सावरकरवादी घणाघाती वक्तृत्वाची. शासनाच्या रागालोभाची चिंता न करता, सभासंयोजक, आणि श्रोतृसमुदाय यांच्या राजकारणी रंग अंतरंगाची क्षिती न बाळगता हिंदूहृदय सम्राट स्वातंत्र्यवीर सावरकरांचे, विलक्षण व्यवहार्य तर्क शुद्ध इतिहाससिद्ध हिंदूराष्ट्र कल्याणकारी

तत्वज्ञान अत्यंत परिणामकारक शैलीने जनमानसावर ठसविणारा भाव्यांसारखा दुसरा वक्ता आम्ही ऐकला नाही. माझ्या काही साम्यवादी आणि समाजवादी मित्रांनी मनमोकळेपणाने मजजवळ मान्य केले आहे की भाव्यांचे भाषण पूर्ण होई पर्यंत आम्हीही 'भावेविचाराचे ' झालेले असतो. (अर्थात त्या परिणामातून सावरल्यावर हे पोथीनिष्ठ मित्र सत्याला सामोरे न जाता सोयीच्या पंथालाच धरून राहिले, हे वेगळे!)

बुद्धिनिष्ठ आत्मविश्वास

. भावे अतिशय बुद्धिवान होते. त्यांचा इतिहासाचा आणि एकूण सर्वच वाड़मय प्रकाराचा गाढा अभ्यास होता . जागतिक ख्यातीच्या लेखक-कवींची प्रतिभा त्यांना यथार्थतेने समजली होती. ते स्वतः असामान्य प्रतिभेचे पहिल्या श्रेणीतील पट्टीचे साहित्यिक होते. सावरकरांचे जीवन, साहित्य आणि तत्वज्ञान याची त्यांना यथार्थ जाण होती. त्यामुळेच सावरकरांच्या मोठेपणाचे मूल्यमापन करताना ते निःसंकोचपणे आणि संपूर्ण आत्मविश्वासाने रामशास्त्री न्याय देत असत. इतर आधुनिक कवीच्या काव्यप्रतिभेचे कौतुक मान्य करूनही तुलनेने सावरकरांची आभाळासारखी असणारी प्रतिभा व्यक्त करताना ते म्हणत, "फुलामुलांचे कौतुक, निसर्गसौंदर्य प्रेम आणि विरह यांच्या कथा-व्यथा व्यक्त करणाऱ्या काव्यामुळेही आपणांस आनंद वाटतो. चिमणीचेच उदाहरण घ्याना. तीची चिवचिव, किलबिलाट, तीचे बागडणे, आणि भुर्रकन उडून जाणे, निःसंशय आपले मनोरंजन करते. परंतु म्हणून काही चिमणीच्या बागडण्याला उंच आकाशात भरारी मारणाऱ्या वैनतेयाची - गरूडाची बरोबर करता येणार नाही. हेच अंतर अन्य आधुनिक कवी आणि महाकवी सावरकर यांच्यात आहे."

भाव्यांचे भाषण ऐकणे म्हणजे एक ललितरम्य लेख वाचणेच वाटे. किंवा भाव्यांचे नितांत सुंदर लेख वाचतानाही जणू काही भाव्यांचे घणघाती भाषणच आपण ऐकतो असे वाटे. सावरकर या विषयावर लिहितांना आणि बोलतांना त्यांनी काहीही हातचे राखून ठेवले नाही. सावरकरांची निंदानालस्ती होत होती त्या सावरकरांच्या पडत्या काळातही भाव्यांनी प्रकटपणे सावरकरांचा पाठपुरावा केला. सक्रीय राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर जेव्हा सावरकर जीवनांतील अखेरचा काळ आपल्या सदनात जवळजवळ एकांतवासात कंठीत होते - ज्यावेळी वृत्तपत्रातून आणि साऱ्या प्रसिद्धीच्या माध्यमातून गांधी-नेहरू वादाची तसेच पुरोगामित्वाचे नवे विचार म्हणून साम्यवाद समाज़वादाचे डंके वाजत होते, त्याही विपरीत काळात भाव्यांनी मात्र सावरकर विचाराची, प्रतिगामी असा शिक्का बसलेल्या हिंदुत्वाची अमृतवाणी आपल्या लेखना भाषणाद्वारे जनतेसमोर मांडली. सावरकरांप्रमाणेच भाव्यांचीही भरपूर उपेक्षा झाली. ती उपेक्षा लीलया सहन करून हसत ते म्हणत, जिथे स्वातंत्र्यवीरांची उपेक्षा झाली तिथे माझी उपेक्षा झाल्यास नवल ते काय! ज्याप्रमाणे सावरकरांचे फार मोठे सन्मानही झाले त्याप्रमाणेच भांव्याचेही सन्मान झाले. परंतु भाव्यांना मात्र झालेल्या सर्व सन्मानांपेक्षा त्यांचे

दैवत असलेल्या वीर सावरकरांनी केलेल्या गौरवाचे मूल्य सर्वाधिक वाटे. आदेशमधील त्यांच्या लेखांविषयी चौकटीत घालून ठेवावी अशी प्रशंसा करणारी एक - दोन पत्रे सावरकरांनी त्यांना पाठविली होती. त्या पत्रांचे मोल भाव्यांना कोणत्याही सन्मानापेक्षा मोठे वाटे. (दुर्दैवाने गांधीवधानंतर भाव्यांच्या आदेश कार्यालयाची जाळपोळ झाली तेव्हा त्या प्रशस्तिपत्राचीही राखरांगोळी झाली!) बिलासपूरला एकदा श्री. गोवर्धनांच्या बंगल्यात तात्याराव आणि भावे एकत्र उतरण्याचा योग आला. तात्यांचे छायाचित्र घेण्यासाठी तेथे एक छायाचित्रकार आला तेव्हा तात्यांनी भाव्यांना आपणहून बोलावून घेतले आणि एकत्र चित्र काढविले. भावे नागूपर विश्वविद्यालय विद्यार्थी संघटनेचे कार्यवाह असताना त्यांनी तात्यारावांचे एक व्याख्यान आयोजित केले. तेव्हाही त्या दोघांचे एक छायाचित्र एकत्र काढले गेले. ही दोन्ही चित्रे भाव्यांनी अखेरपर्यंत आपल्याजवळ अनमोल ठेव्याप्रमाणे जपून ठेवली. दैवताने भक्ताला दिलेल्या प्रशस्ति - प्रसादाची सर अन्य कोणत्या सन्मानाला येऊ शकेल?

वीर सावरकरांचे अष्टपैलूत्व आत्मविश्वासाने आणि यथार्थतेने वर्णन करताना पु.भा. भावे म्हणतात, "..... अनेक क्रांतिकारक हिंदुस्थानच्या राजकीय वितानावर चमकून गेले. पण वीर सावरकरांइतक्या अष्टपैलु तेजाचा दुसरा कोणी तारा त्यात झाला नाही. .....जगप्रसिद्ध डी. व्हॅलेरा सावरकरांप्रमाणेच क्रांतिचा मुकुटमणी होता, पण तो सावरकरांसारखा महाकवी नव्हता! मॅझिनी सावरकरांप्रमाणेच स्वातंत्र्याचा उद्घोषक होता. त्याने काही ग्रंथलेखनही केले. पण नाटक - कांदबरी सारख्या ललितसाहित्यात त्याची लेखणी चालली नाही. जार्ज वॉशिंग्टन मोठा लढवय्या खरा, पण आपल्या पांडित्याविषयी काही तो सावरकरांप्रमाणे प्रसिद्ध नाही. जगात मोठी माणसे अनेक होऊन गेली. त्यापैकी क्वचीत काही एखाद्या विषयात सावरकरांपेक्षा अधिक कर्तृत्व करून गेली असतील. पण एकापेक्षा एक दुर्मिळ गुणांचा एवढा मोठा समुच्च्य कुठल्याही एका माणसाच्या ठायी सापडत नाही. असे यथार्थ वर्णन भाव्यांवाचून निर्भिडपणे दुसरे कोण करू शकणार ?

म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात आम्हांला प्रकर्षाने आमचे आवडते मार्गदर्शक, लेखक, वक्ते कट्टर सावरकरवादी, हिंतचिंतक (कै.) श्री. पु.भा. भावे यांचे तीव्र स्मरण होत आहे. त्यांची अतोनात उणीव भासत आहे. दि. १३ ऑगस्ट ही त्यांची पुण्यतिथी. त्यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीला सुयोग्य आदरांजली कशी वाहता येईल हा प्रश्न, आमचे मन व्यथित करतो. परंतु वीर सावरकरांच्या कृतिशील अनुयायाला व्यथा आणि दुःख कुरवाळायला उसंत मिळणे शक्य नाही. भाव्यांना जी शक्ति प्रेरक ठरली तीच शक्ति आम्हांलाही निश्चितपणे चैतन्य देईल. ही प्रेरणा म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर प्रणित हिंदुत्व होय. हिंदुत्वाच्या विस्मरणामुळे आज आधीच द्विखंडीत झालेला भारत आणि अधिकच दुबळा झालेला हिंदुसमाज नव्या विभाजनाच्या आणि अंतिम विनाशाच्या मार्गावर आहे. हिंदुत्वाच्या विस्मरणामुळे आज आम्ही पराभूत झालो. वीर सावरकरांच्या राजकारणाचा

तत्वज्ञान अत्यंत परिणामकारक शैलीने जनमानसावर ठसविणारा भाव्यांसारखा दुसरा वक्ता आम्ही ऐकला नाही. माझ्या काही साम्यवादी आणि समाजवादी मित्रांनी मनमोकळेपणाने मजजवळ मान्य केले आहे की भाव्यांचे भाषण पूर्ण होई पर्यंत आम्हीही 'भावेविचाराचे ' झालेले असतो. (अर्थात त्या परिणामातून सावरल्यावर हे पोथीनिष्ठ मित्र सत्याला सामोरे न जाता सोयीच्या पंथालाच धरून राहिले, हे वेगळे!)

बुद्धिनिष्ठ आत्मविश्वास

भावे अतिशय बुद्धिवान होते. त्यांचा इतिहासाचा आणि एकूण सर्वच वाड़मय प्रकाराचा गाढा अभ्यास होता . जागतिक ख्यातीच्या लेखक-कवींची प्रतिभा त्यांना यथार्थतेने समजली होती. ते स्वतः असामान्य प्रतिभेचे पहिल्या श्रेणीतील पट्टीचे साहित्यिक होते. सावरकरांचे जीवन, साहित्य आणि तत्वज्ञान याची त्यांना यथार्थ जाण होती. त्यामुळेच सावरकरांच्या मोठेपणाचे मूल्यमापन करताना ते निःसंकोचपणे आणि संपूर्ण आत्मविश्वासाने रामशास्त्री न्याय देत असत. इतर आधुनिक कवीच्या काव्यप्रतिभेचे कौतुक मान्य करूनही तुलनेने सावरकरांची आभाळासारखी असणारी प्रतिभा व्यक्त करताना ते म्हणत, "फुलामुलांचे कौतुक, निसर्गसौंदर्य प्रेम आणि विरह यांच्या कथा-व्यथा व्यक्त करणाऱ्या काव्यामुळेही आपणांस आनंद वाटतो. चिमणीचेच उदाहरण घ्याना. तीची चिवचिव, किलबिलाट, तीचे बागडणे, आणि भुर्रकन उडून जाणे, निःसंशय आपले मनोरंजन करते. परंतु म्हणून काही चिमणीच्या बागडण्याला उंच आकाशात भरारी मारणाऱ्या वैनतेयाची - गरूडाची बरोबर करता येणार नाही. हेच अंतर अन्य आधुनिक कवी आणि महाकवी सावरकर यांच्यात आहे."

भाव्यांचे भाषण ऐकणे म्हणजे एक ललितरम्य लेख वाचणेच वाटे. किंवा भाव्यांचे नितांत सुंदर लेख वाचतानाही जणू काही भाव्यांचे घणघाती भाषणच आपण ऐकतो असे वाटे. सावरकर या विषयावर लिहितांना आणि बोलतांना त्यांनी काहीही हातचे राखून ठेवले नाही. सावरकरांची निंदानालस्ती होत होती त्या सावरकरांच्या पडत्या काळातही भाव्यांनी प्रकटपणे सावरकरांचा पाठपुरावा केला. सक्रीय राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर जेव्हा सावरकर जीवनांतील अखेरचा काळ आपल्या सदनात जवळजवळ एकांतवासात कंठीत होते - ज्यावेळी वृत्तपत्रातून आणि साऱ्या प्रसिद्धीच्या माध्यमातून गांधी-नेहरू वादाची तसेच पुरोगामित्वाचे नवे विचार म्हणून साम्यवाद समाज़वादाचे डंके वाजत होते, त्याही विपरीत काळात भाव्यांनी मात्र सावरकर विचाराची, प्रतिगामी असा शिक्का बसलेल्या हिंदुत्वाची अमृतवाणी आपल्या लेखना भाषणाद्वारे जनतेसमोर मांडली. सावरकरांप्रमाणेच भाव्यांचीही भरपूर उपेक्षा झाली. ती उपेक्षा लीलया सहन करून हसत ते म्हणत, जिथे स्वातंत्र्यवीरांची उपेक्षा झाली तिथे माझी उपेक्षा झाल्यास नवल ते काय! ज्याप्रमाणे सावरकरांचे फार मोठे सन्मानही झाले त्याप्रमाणेच भांव्याचेही सन्मान झाले. परंतु भाव्यांना मात्र झालेल्या सर्व सन्मानांपेक्षा त्यांचे

दैवत असलेल्या वीर सावरकरांनी केलेल्या गौरवाचे मूल्य सर्वाधिक वाटे. आदेशमधील त्यांच्या लेखांविषयी चौकटीत घालून ठेवावी अशी प्रशंसा करणारी एक - दोन पत्रे सावरकरांनी त्यांना पाठविली होती. त्या पत्रांचे मोल भाव्यांना कोणत्याही सन्मानापेक्षा मोठे वाटे. (दुर्दैवाने गांधीवधानंतर भाव्यांच्या आदेश कार्यालयाची जाळपोळ झाली तेव्हा त्या प्रशस्तिपत्राचीही राखरांगोळी झाली!) बिलासपूरला एकदा श्री. गोवर्धनांच्या बंगल्यात तात्याराव आणि भावे एकत्र उतरण्याचा योग आला. तात्यांचे छायाचित्र घेण्यासाठी तेथे एक छायाचित्रकार आला तेव्हा तात्यांनी भाव्यांना आपणहून बोलावून घेतले आणि एकत्र चित्र काढविले. भावे नागूपर विश्वविद्यालय विद्यार्थी संघटनेचे कार्यवाह असताना त्यांनी तात्यारावांचे एक व्याख्यान आयोजित केले. तेव्हाही त्या दोघांचे एक छायाचित्र एकत्र काढले गेले. ही दोन्ही चित्रे भाव्यांनी अखेरपर्यंत आपल्याजवळ अनमोल ठेव्याप्रमाणे जपून ठेवली. दैवताने भक्ताला दिलेल्या प्रशस्ति - प्रसादाची सर अन्य कोणत्या सन्मानाला येऊ शकेल?

वीर सावरकरांचे अष्टपैलूत्व आत्मविश्वासाने आणि यथार्थतेने वर्णन करताना पु.भा. भावे म्हणतात, "..... अनेक क्रांतिकारक हिंदुस्थानच्या राजकीय वितानावर चमकून गेले. पण वीर सावरकरांइतक्या अष्टपैलु तेजाचा दुसरा कोणी तारा त्यात झाला नाही. .....जगप्रसिद्ध डी. व्हॅलेरा सावरकरांप्रमाणेच क्रांतिचा मुकुटमणी होता, पण तो सावरकरांसारखा महाकवी नव्हता! मॅझिनी सावरकरांप्रमाणेच स्वातंत्र्याचा उद्घोषक होता. त्याने काही ग्रंथलेखनही केले. पण नाटक - कांदबरी सारख्या ललितसाहित्यात त्याची लेखणी चालली नाही. जार्ज वॉशिग्टन मोठा लढवय्या खरा, पण आपल्या पांडित्याविषयी काही तो सावरकरांप्रमाणे प्रसिद्ध नाही. जगात मोठी माणसे अनेक होऊन गेली. त्यापैकी क्वचीत काही एखाद्या विषयात सावरकरांपेक्षा अधिक कर्तृत्व करून गेली असतील. पण एकापेक्षा एक दुर्मिळ गुणांचा एवढा मोठा समुच्च्य कुठल्याही एका माणसाच्या ठायी सापडत नाही. असे यथार्थ वर्णन भाव्यांवाचून निर्भिडपणे दुसरे कोण करू शकणार ?

म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात आम्हांला प्रकर्षाने आमचे आवडते मार्गदर्शक, लेखक, वक्ते कट्टर सावरकरवादी, हिंतचिंतक (कै.) श्री. पु.भा. भावे यांचे तीव्र स्मरण होत आहे. त्यांची अतोनात उणीव भासत आहे. दि. १३ ऑगस्ट ही त्यांची पुण्यतिथी. त्यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीला सुयोग्य आदरांजली कशी वाहता येईल हा प्रश्न, आमचे मन व्यथित करतो. परंतु वीर सावरकरांच्या कृतिशील अनुयायाला व्यथा आणि दुःख कुरवाळायला उसंत मिळणे शक्य नाही. भाव्यांना जी शक्ति प्रेरक ठरली तीच शक्ति आम्हांलाही निश्चितपणे चैतन्य देईल. ही प्रेरणा म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर प्रणित हिंदुत्व होय. हिंदुत्वाच्या विस्मरणामुळे आज आधीच द्विखंडीत झालेला भारत आणि अधिकच दुबळा झालेला हिंदुसमाज नव्या विभाजनाच्या आणि अंतिम विनाशाच्या मार्गावर आहे. हिंदुत्वाच्या विस्मरणामुळे आज आम्ही पराभूत झालो. वीर सावरकरांच्या राजकारणाचा

अंगिकार केला नाही म्हणून आमची दुर्दशा झाली. पु. भा. भाव्यांनी सातत्याने प्रचारिलेल्या सावरकर विचारसरणीचा अंगिकार केला नाही म्हणून सर्वनाशाच्या कड्यावर आम्ही पोचलो आहोत. या पराभवातून हिंदुत्वाच्या स्मरणाने, वीर सावरकरांच्या राजनीतीच्या अंगिकाराने आम्ही निश्चितपणे उद्याचा विजय मिळवू शकू. म्हणूनच श्री. पु.भा भावे यांच्या उणिवेची खंत हृदयाच्या एका कप्प्यात बाळगूनही आम्हांस तत्काल सावधान झाले पाहिजे. वीर सावरकरांच्या आदेशाचे तत्परतेने पालन केले पाहिजे. त्यामुळेच पु.भा. भाव्यांची स्मृती प्रज्वलित होणार आहे.

*दि. १५ आ. १९८३
भावे यांच्या तृतिय पुण्यतिथी निमित्त लिहिलेला लेख

सिंधुमुक्तीचा काळ जवळ आला.

गेल्या महिन्यात सिंध, बलुचिस्तान आणि पुश्तुस्तान या पाकिस्तान व्याप्त विभागात झियांच्या सैनिकी हुकुमशाही विरूद्ध प्रचंड जन आंदोलने सुरू झाल्याच्या वार्ता जागतिक वृत्तपत्रात ठळकपणे प्रकाशीत झाल्या आहेत. या बातम्या बरोबरच झिया सरकारच्या अधिकृत वृत्तसंस्थानी ही जनआंदोलने विदेशी शक्ती घडवून आणीत आहेत आणि या आंदोलनाचा कणखरपणे झिया शासन बिमोड करीत आहे, अशाही वार्ता प्रकाशित झाल्या आहेत. जगातील लोकशाहीवादी शक्ती पाकिस्तानातील हुकुमशाही विरुद्ध आणि लोकशाही संस्थापनार्थ चालू असलेल्या जनआंदोलनात प्रकटपणे नैतिक समर्थन देत आहे. तर जागतिक राजकारणातील अमेरिकन गटाने पाकिस्तानच्या या "अंतर्गत भानगडीबद्दल विदेशांनी प्रदर्शन करणे म्हणजे पाकिस्तानातील राजकरणात हस्तक्षेपच ठरतो" असा प्रचार चालविला आहे. एरव्ही तटस्थ असलेल्या प्रधानमंत्री इंदिरा गांधीनी यावेळी मात्र सिंधमधील लोकशाही प्रस्थापिण्यासाठी चालू असलेल्या आंदोलनाला उघड पाठिंबा दिला. "झिया शासनाने सूरू केलेल्या पाशवी दडपशाहीला बळी पडत असलेली लोकशाहीवादी जनता या संदर्भात दुर्लक्ष करू शकणार नाही," असेही त्यांनी घोषित केले. भारतातील सिधुमुक्ती या विषयांशी संबंधित असलेल्या काही संस्थानी झियाविरोधी प्रगट निदर्शन केली - आणि अर्थातच भारतातील अमेरिकेच्या शागीर्दानी भारत शासन, प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि सिंधुमुक्ती संबंधी संस्था यांच्या विरोधी वक्तव्ये केली आहेत . . . .

सिंधु मुक्तीचे कर्तव्य

साधारण जाण असलेला राजकीय कार्यकर्ता हे आज निश्चितपणे जाणून आहे की आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दबावाखाली भारतात अनेक घडामोडी होत असतात. देशातील अंतर्गत परिस्थिती आणि जागतिक राजकारणातील दबाव यांच्या संयुक्त परिणामातून अनेक राजकीय उलाढाल्या घडत असतात. १९७१ मध्ये लोकशाहीवादी निधर्मी मुजीब शासन स्थापन केले त्याच प्रमाणे सिंधुमुक्तीचे कर्तव्य पार पाडावे लागल्यास कोणास आश्चर्य वाटू नये. मात्र सिंधुमुक्तीच्या कार्यात भारताला बांगला देशाचा कटू अनुभव लक्षात घेऊन अधिक सुधारलेली आणि कणखर उपाययोजना कार्यवाहीत आणावी लागेल.

निर्वासितांची समस्या सोडविण्यासाठी

पाकिस्तानी अत्याचारी हुकुमशाही राजवटीमुळे जेव्हा आंदोलनकारी जनता असहाय्य स्थितीत निर्वासित होऊन जवळच्या गुजरात आदी भारतीय राज्यात लाखोंच्या संख्येत प्रवेश करेल तेव्हा मानवता रक्षणाच्या कर्तव्याने त्यांना भारताला आसरा देणे भाग पडेल. परंतु भारतीय जनतेचा प्रतिपाळही जे शासन व्यवस्थितपणे करू शकत नाही ते शासन अशा लक्षावधी पाकिस्तानी निर्वासितांना किती दिवस पोसू शकणार? सन १९७१ साली, पूर्व

पाकिस्तानातून आलेल्या एक कोटी निर्वासितांना वर्षभर सांभाळल्यानंतरच त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी भारताला पाकिस्तानचे दोन तुकडे करण्याचे आणि बांगला देश निर्मितीचे कर्तव्य पार पाडावे लागेल. साधारणतः त्याच कारणांमुळे भारताला पश्चिम पाकिस्तानाही, तेथून येऊ घातलेल्या लक्षावधि निर्वासितांचे पुर्नवसन करण्यासाठी पोलिसी सदृश सैनिक कार्यवाही करणे आवश्यक कर्तव्यच ठरेल. जागतिक राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास, नजिकच्या भविष्यात अपेक्षित असलेला भारत - पाक संघर्ष हा केवळ स्थानिक युद्धाइतकाच मर्यादित राहणार नाही, हे स्पष्ट होते. या संघर्षामध्ये चीन आणि अमेरिका पाकिस्तानी माध्यमातून देशद्रोही फारूक अब्दुलाच्या साहाय्याने काश्मिरात आक्रमक आघाडी उघडेल. पाकिस्तानबरोबर झालेल्या पूर्वीच्या दोन युद्धात भारतातील पाकिस्तानी पंचमस्तंभीय गटांना भारतांतर्गत बंड आणि घातापाती कारवाया करता आल्या नाहीत. परंतु अलिकडच्या काळात लक्षावधी अरब पेट्रो डॉलर्स आणि अमेरिकन सी.आय.ए. च्या कारवाया यामुळे देशातील विभाजनवादी आणि पंचमस्तंभीय शक्ती अधिक बलशाली झाल्या आहेत. या पंचमस्तंभीय शस्त्रसंपन्न शक्ती आगामी युद्धात प्रचंड प्रमाणावर घातपात करण्याची शक्यता मुळीच नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत बाह्य शत्रूबरोबर लढत असतानाच अंतर्गत शत्रूंशी कट्टर राष्ट्रवादी संघटनांनी शासकीय साहाय्याने सामना दिला पाहिजे.

जागतिक परिस्थिती अनुकूल

ब्रिटीशांच्या जोखडातून भारताला स्वतंत्र करण्यासाठी चालेल्या शतकव्यापी स्वातंत्र्यसंग्रामाला, दुसऱ्या महायुद्धाने निर्माण झालेल्या जागतिक परिस्थितीचा लाभ मिळून अखेरीस खंडित भारताचे स्वातंत्र्य मिळाले.

तसेच आगामी भारत-पाक सर्वकष संघर्षास रशिया अमेरिका यातील वितुष्टाचा लाभ मिळून, भारताला या सर्वकंष युद्धात संपूर्ण विजय मिळवणे शक्य होईल. मात्र यावेळी बांगलादेश प्रकरणी दाखविलेला गलथानपणा टाळून, संपूर्ण वास्तववादी भूमिका स्वीकारून, पाकिस्तानी सैनिकी सत्तेपासून मुक्त केलेला सर्व प्रदेश लोकशाही भारतात समाविष्ट करावा आणि सिंधुमुक्ती बरोबरच लोकशाहीवादी अखंड भारताचे ध्येय साकार करणे इष्ट ठरेल. पाकिस्तान आणि बांगलादेश व्याप्त प्रदेशातील मुसलमानांच्या मनावर हे ठसविले पाहिजे की, लोकशाही अखंड भारतातच त्यांना खरेखुरे नागरिक स्वातंत्र्य उपभोगावयास मिळते. ज्याप्रमाणे रशिया आणि चीनमध्येही मुसलमान नागरिक स्वातंत्र्य उपभोगित आहेत, त्याप्रमाणेच अखंड भारतातही, देशाची एकता आणि अखंडता याला धक्का न लावणाऱ्या सर्व मुसलमानांना भारतातील अन्य देशभक्त नागरिकाप्रमाणेच स्वातंत्र्य उपभोगता येईल. या प्रकारचा विश्वास भारत शासनाने, अल्पसंख्यांकांच्या खुशामतवादाचे धोरणसोडून, सर्व नागरिकांना धर्मनिरपेक्षतेने समान निर्बंध लागू करून, जनतेमध्ये निर्माण केला पाहिजे. त्याचबरोबर येऊ घातलेल्या देशव्यापी युद्धाचा धोका लक्षात घेऊन भारतातील देशभक्त जनतेने,

केवळ खूर्चीच्या राजकारणासाठी देशहितावर निखारे ठेवणाऱ्या विविध सत्तालोलुप राजकीय नेत्यांना खडयासारखे वगळूनं अखंड भारत निर्मितीच्या कार्यात भारत शासनाला सर्वांगीण सहकार्य देणे हेच देशभक्तीचे लक्षण ठरेल.

* दि. १६ सप्टे. १९८३



११. हिंदुसभा विचार सरणीचे

राज्य निर्माण करणे आवश्यक

भिवंडी: भिवंडीत छत्रपती शिवाजी जयंती निमित्त मिरवणुक काढण्याची अनुज्ञा-अनुमती म्हणजे परवानगी चौदा वर्षानी मिळाली, असा जो उल्लेख अनेक वृत्तपत्रात तसेच अनेक नेते आणि कार्यकर्ते यांच्या बोलण्यात येत आहे त्यात अनुमती मिळाली या ऐवजी शिवभक्त नागरिकांनी सतत आंदोलन करून, स्वतंत्र भारतातील छत्रपतींच्या महाराष्ट्रातील भिवंडी नगरात राष्ट्रपुरूष शिवाजी महाराजांच्या जंयतीनिमित्त मिरवूणक काढण्याचा घटनादत्त **'अधिकार मिळविला,'** असे म्हणणेच योग्य आणि वास्तववादी आहे. (प्रचंड टाळ्या) दोन वर्षापूर्वी म्हणजे दि. १० मे १९८२ ला, १८५७ च्या स्वातंत्र्य समराच्या एकशे पंचविसाव्या स्मृतिदिनी, भिवंडीतील अन्याय्य शिवमिरवणुक बंदी आगाऊ घोषित करून मोडण्यासाठी मी स्वतः आणि आजच्या कल्याणमधील मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका वठविणारे या व्यासपीठावर उपस्थित असलेले माझे सहकारी श्री. उमेश निरगुडे पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्ताला हास्यापद ठरवून शिवाजी चौकात प्रकट झाले त्यावेळी बंदी मोडून मिरवणुक काढण्याच्या पवित्र्यात आम्ही, 'छत्रपति शिवाजी महाराज की'..... अशी गर्जना केली. पण ती घोषणा पूर्ण करण्यासाठी सभोवताली उपस्थित असलेल्या हजारो नागरिकांपैकी एकानेही जय हा शद्व उच्चारला नाही. मग आम्हीच छत्रपती शिवाजी महाराज की जय, अशा घोषणा दिल्या. आणि पोलिसांनी आम्हांस अटक केली. त्यानंतर पून्हा आगाऊ घोषित करून दि. १५ ऑगस्ट १९८२ ला मिरवणूक बंदी मोडण्यासाठी हिंदू सेनेने सत्याग्रह संघटित केला. त्यात आमच्याशिवाय आणखी वीस सत्याग्रहींना अटक झाली. तेव्हा मात्र उपस्थित जनतेने छत्रपतींच्या जयजयकाराला चांगली साथ दिली. त्यानंतर म्हणजे दि. १४मे१९८३ ला येणाऱ्या शिवजयंती पूर्वीच दि. ११ मे. १९८३ ला भिवंडीत बंदी मोडण्याचा कार्यक्रम होऊ नये म्हणून मला रा.सु.का खाली अटक करून नाशिक कारागृहात पाठविले. तरीही सुमारे दोन हजार शिवभक्तांनी १४ मे १९८३ च्या शिवजयंतीला अन्याय्य मिरवणूक बंदी मोडून दिवसभर छोट्या छोट्या मिरवणूक काढल्या आणि अटक करून घेतली. यावर्षी तर या आंदोलनात अखिल महाराष्ट्रातून सुमारे पन्नास हजार सत्याग्रही येण्याची योजना झाली होती. तसा इशारा दि. २१ एप्रिल १९८४ ला मुंबईच्या गिरगांव चौपाटीवरील हिन्दुमहासंघाच्या मेळाव्यात देण्यात आला होता. संघटीत हिन्दूच्या या उग्र आंदोलनाच्या दडपणामुळेच शासनाला बंदी उठविण्याशिवाय मार्ग उरला नाही आणि संघटित हिन्दू शिवभक्तांनी हा प्रचंड विजय मिळविला. (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट व छत्रपतींचा जयजयकार)

हिन्दूमहासंघाच्या यशाचा श्रीगणेशा

हिन्दू समाजात राजकीय जागृती निर्माण करून, लढाऊ शक्ति संघटित करण्याच्या हेतूने शिवसेना, हिन्दूमहासभा, मुसराश्रम शुद्धी संघटन इत्यादी हिंदुत्वनिष्ठ संस्थांनी

एकत्रित येऊन हिन्दूमहासंघाची २३ जानेवारी १९८४ ला स्थापना केली. हिन्दुमहासंघाने म्हणजेच संघटीत हिन्दूंच्या लढाऊ शक्तीने भिवंडीतील बंदी उठविण्यात यश मिळवून पुढील विजयाचा श्रीगणेशा केला आहे. केवळ शिवजंयतीचा उत्सव साजरा करणे इतकाच आमचा हेतू नाही. छत्रपतींच्या राजकारणाचा आदर्श आजच्या आपल्या देशाच्या समस्या सोडविण्यासाठीही मार्गदर्शक आणि अनुकरणीय ठरणार असल्याने शिवछत्रपतींची राजनीती अवलंबून आपल्या हिन्दू राष्ट्राला सर्वार्थाने महान बनवावयाचे आहे. (टाळया) अल्पसंख्याकांच्या लाचार खुशामती राजकारणामुळे काश्मीर, आसाम पंजाब (खालिस्थान) आदि समस्या देशनाशक ठरत आहेत. (१) हिन्दूराष्ट्र (२) समान सामाजिक संहिता (३) संपूर्ण गोवंशहत्याबंदी या गोष्टी प्रत्यक्षात लागू करण्याचे प्रकट वचन देणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्यावे, असे शिक्षण हिन्दू समाजाला देऊन हिन्दू महासंघाच्या विचाराचे राज्य म्हणजे शासन निर्माण केल्यानेच राष्ट्र संकटमुक्त होणार आहे. म्हणूनच हा प्रयोग सर्वप्रथम महाराष्ट्रात करून हिंदूमहासंघाच्या विचाराचे राज्य इथे निर्माण करावयाचे आहे. (प्रचंड टाळया) असा महाराष्ट्रच देशाचे संरक्षण करू शकेल. (टाळया)

महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा

महाराष्ट्राची परंपराच राष्ट्रीय हित संरक्षणाची आहे. भारताच्या इतिहासात असा दुसरा कोणता प्रांत आहे की जो स्वतःच्या प्रातांच्या सीमा ओलांडून आक्रमक शत्रूशी लढण्यासाठी राष्ट्राचा सीमेवर गेला? छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या इतिहासानंतर महाराष्ट्राने हे कर्तव्य परंपरेने पाळले. महाराज स्वतः आगऱ्याला गेले ते मोगली सत्ता उखडण्याच्या हेतूनेच. ती योजना यशस्वी झाली नाही हा भाग वेगळा. नंतरच्या काळात मराठयांनीच अटकेपार भगवे झेंडे रोवून शत्रुशी लढत दिली. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आदी मराठी नेत्यांनी परिणामकारक लढे दिले आणि आजही ज्या शिवसेना आणि हिन्दू महासभेला संकुचित, जातीय अशी दूषणे लावली जातात त्या संस्थांच्या मराठी नेतृत्वानेच हिंदू महासंघाची राष्ट्रीय ऐक्यवादी संघटना उभारली आहे. अखिल भारतीय पक्ष म्हणून मिरविण्याऱ्या अन्य कोणत्याही राजकीय पक्षाने ही भूमिका घेतली नाही हे लक्षात ठेवावे ! मराठा हा सतत राष्ट्राला महान करण्याकरीता संघर्ष करीत आला आहे . राष्ट्राला महान करणारा प्रांत म्हणजे महाराष्ट्र ! (टाळया) म्हणून सर्व हिंदू समाजाला राजकीय दृष्टया संघटित करून या देशाला सामर्थ्यशाली हिंदूराष्ट्र बनविण्यासाठी हिंदूमहासंघाला बलशाली केले पाहिजे. काही ध्येयसिद्धी करण्यासाठी शिवजयंतीच्या भिवंडीतील विजयाने प्रारंभ झाला ही अत्यंत शुभशंकुनाची गोष्ट आहे. आजचा विजय मिळविण्यासाठी ज्या सर्व शिवभक्तांनी परीश्रम घेतले त्यांचें अभिनंदन.

* सा. प्रज्वलंत दि. १९ मे १९८४; भिवंडी येथे झालेल्या भाषणातील उतारे जसेच्या तसे दिले आहेत.

१२. पापस्तानी सापांच्या पिल्लाना ठेचावे.

कल्याण येथे कोणतीही पूर्वसूचना न देता मुस्लीमलीगचे सर चिटणीस खासदार बनातवाला अचानक आले. त्यांच्या आगमनानंतर दूधनाका येथून सुमारे शंभर सव्वाशे मुसलमानांनी मिरवणुक काढली. शौकतअली चौकात सभा झाली. या वेळी बनातवाला अणि मुस्लिमलीग जिंदाबाद बरोबरच पाकिस्तान जिंदाबाद अशा घोषणा देण्यात आल्या ! जनाब बनातवाला आपल्या भाषणात म्हणाले, "हिंदुस्थान कुणा एकाच्या मालकीचा नाही त्यावर हिंदूइतकाच मुस्लिमांचाही हक्क आहे. मुस्लिमांनी दंगलीच्या घटनांनी घाबरू नये. मन खचू न देता येणाऱ्या प्रसंगाना तोंड द्यावे. हमारा हिंदुस्थान म्हणजे 'यह' आहे. हिंदुस्थानवर आमचाही (मुसलमानांचा) हक्क आहे."

वरील आशयाची वार्ता मुंबईच्या दै. महाराष्ट्र टाईम्सच्या दि. १९ जुलै १९८४ च्या अंकात प्रकाशित झाली आहे. सध्या महाराष्ट्र विधान सभा अधिवेशन मुंबईत चालू आहे. निदान मराठी आमदार तरी दै. महाराष्ट्र टाईम्स वाचतात असे गृहीत धरूया. मुंबईपासून तीस मैलावर असलेल्या कल्याण शहरात मुस्लीम लीगचे खासदार बनातवाला अचानक येऊन गोंधळ घालतात पोलीसांची पुर्वानूमती न घेता प्रकट सभा घेतात, त्या सभेत 'पाकिस्तान जिंदाबादच्या' घोषणा दिल्या जातात... आणि तरीही मराठी जनतेचे प्रतिनिधी असलेले आमदार त्या संबंधी विधान सभेत किंवा विधान परिषदेत कोणत्याही प्रकारचा निषेध नोंदवत नाहीत व त्यासंबंधी कोणतीही चिंता व्यक्त करीत नाहीत यांचे सखेद आश्चर्य वाटते. सत्तारूढ कॉंग्रेसच्या खासदाराकडून तशी अपेक्षा करणेही चुकीचे ठरेल. याच बनातवाल्यानी सुमारे दोन वर्षापूर्वी "भिवंडीत शिवजंयती मिरवणुकीला शासनाने परवानगी दिली तर रक्ताचे पाट वाहतील." अशी प्रकट धमकी दिली होती. त्या धमकीला आव्हान देवून शिवभक्त मंडळीनी कल्याण भिवंडी विभागात असलेली बंदी उठविण्यासाठी श्री विक्रम सावरकर यांचे नेतृत्वाखाली लोकशाही पद्धतीने सातत्याने संघर्ष केला. शिवजंयती, स्वातंत्र्यदिन आणि महत्वाच्या राष्ट्रदिनी बंदी मोडण्यासाठी सत्याग्रह केले. त्या संबंधात झालेल्या लाठी हल्ल्यात अनेकांना मार लागला..... अखेरीस यंदा १९८४ च्या शिवजंयतीला भिवंडितील बंदी उठविण्यासाठी यश मिळवून, हिंदूमहासंघाच्या (दि. २२ जानेवारी १९८४ ला मुंबईत स्थापन झालेल्या) नेतृत्वाखाली भिवंडी येथे शिवजंयती निमित्त प्रचंड मिरवणूक अत्यंत उत्साहाने पण शांततामय वातावरणात काढली. लोकांना वाटले की बनातवाल्याची रक्ताचे पाट वाहण्याची धमकी पोकळ ठरली ! कल्याण भिवंडीत पूर्ववत राष्ट्रीय विचारसरणीचे वातावरण निर्माण झाले !!! परंतु हा आभास होता हे, दि. १७ - १८ मे १९८४ ला भिवंडी येथेच मुस्लिमांनी पूर्व योजनेनुसार सूरू केलेल्या भीषण दंगलीने सिद्ध झाले.

ही दंगल केवळ भिवंडीपुरतीच मर्यादित न राहता कल्याण, ठाणे या बरोबरच मुंबईतही

पसरली. त्यावेळी या मुस्लिम दंगलीचे खापर हिंदुमहासंघाचे एक नेते श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी दि.२१ एप्रिल१९८४ ला गिरगाव चौपाटी येथे हिंदुमहासंघाच्या पहिल्याच मेळाव्यात केलेल्या भाषणावर केवळ मुस्लिम नेत्यांनीच नव्हे तर अन्य काही निधर्मी पक्षाच्या लोकांनीही फोडले. परंतु गिरगाव चौपाटी वरील भाषणानंतर सुमारे पंचवीस-सव्वीस दिवसांनी भिवंडी येथे मुस्लिमांनी योजनापूर्वक दंगल घडवून आणली, ती जनाब बनातवाल्यानी..... 'तर भिवंडीत रक्ताचे पाट वाहतील,' या दिलेल्या धमकीला साकार कारण्यासाठीच! हे सत्य प्रथम श्री. विक्रम सावरकर आणि बाळासाहेब ठाकरे या हिंदूमहासंघाच्या दोन नेत्यांनी जनतेसमोर प्रकट केले. त्यानंतर श्री. बाळासाहेब ठाकरे यांना नव्हे, तर देशद्रोही दंगलखोर बनातवाल्यास अटक करावी, अशी मागणी कट्टर राष्ट्रवादी हिंदू कार्यकर्त्यांनी केली. मुस्लिम समाजाला खूष करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने श्री. बाळासाहेब ठाकरे आणि सोबतचे संपादक श्री. ग. वा. बेहेरे यांच्यावर खटले भरण्याचे घोषित केले. त्यासंबंधी प्राथमिक कार्यवाही सूरू झाल्याचेही कळते . परंतु, भिवंडीत रक्ताचे पाट वाहवण्याची धमकी प्रत्यक्षात उतरविणाऱ्या बनातवाल्याला मात्र शासनाने मोकाट सोडले आहे. (नशीब हिंदू समाजाचे की दंग्याला चिथावणी देणाऱ्या 'भिवंडी न्यूज' च्या मुस्लिम संपादकावर कारवाई केली.)

श्री. विक्रम सावरकरांना बंदी

या कांग्रेस शासनाने, भिवंडी येथील दंगलग्रस्तांना साहाय्य करण्यासाठी तेथील परिस्थिती पाहून आवश्यकतेनुसार मदत करण्याच्या हेतूने दि. २२ मे १९८४ ला हिंदुमहासंघाचे नेते श्री. विक्रम सावरकर आणि ब्रम्ह्चारी विश्वनाथजी भिवंडीस जाण्यासाठी ठाणे पोलिस आयुक्तांकडे अनुज्ञा मागण्यासाठी गेले असता, नकार दिला. (मात्र दि. २४ मे १९८४ ला आदरणीय ब्रम्हचारी विश्वनाथजींना भिवंडी प्रवेशाची अनुज्ञा देऊन दंगलग्रस्तांसाठी पाहणी करून मदत करण्याची सुविधा दिली, हे हिंदू समाजाचे भाग्यच समजायचे) लोकांना वाटले, हिंदूची स्पष्टपणे बाजू घेणारे म्हणून हिंदुमहासभाध्यक्ष श्री. विक्रम सावरकरांना भिवंडी प्रवेश बंदी करण्यात आली. या घोरणानुसार मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनाही भिवंडी प्रवेश बंदी करण्यात येईल. परंतु घडले ते उलटेच. काही दिवसा नंतर भिवंडी दंगलीस प्रेरणा देणारे जनाब बनातवाला भिवंडीस भेट देऊन आल्याचे प्रकाशित झाले! असा पक्षपात करणाऱ्या सत्तारूढ कॉंग्रेसचे आमदार, कल्याण मधील बनातवाल्याच्या सभेत, "पाकिस्तान झिंदाबाद" च्या झालेल्या देशद्रोही घोषणांविरोधी आवाज विधानमंडळात कसा उठविणार? या देशद्रोही घोषणेकडे लक्ष वेधण्याचे कार्य अन्य विरोधी पक्षाचे आमदार करतील अशी जनतेची अपेक्षा होती. परंतु सत्तारूढ कॉंग्रेस प्रमाणेच मुस्लिमांना न दुखावण्याची खबरदारी निधर्मी विरोधी पक्षीय आमदारांनीही घेतलेली पाहून सर्वसामान्य देशभक्त जनतेला या मुस्लिम धार्जिणेपणाची चीड येते.

जातीय दंगलीपेक्षाही देशद्रोही कारवाया अधिक घातक

भारतात पाकिस्तानच्या प्रेरणेने मुस्लिम दंगली घडवून आणल्या जातात. या दंग्यामुळे हिन्दू मुसलमान जमातीत वैरभाव तर वाढतोच, पण जनतेची प्राणहानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर होते. राष्ट्राच्या प्रगतीस खीळ बसते. त्यामुळे अशा जातीय दंगली राष्ट्रीय हितास हानीकारक ठरतात. परंतु तुलना केली तर जातीय दंगलीमुळे होणाऱ्या राष्ट्रीय हानीपेक्षा, 'पाकिस्तान झिंदाबाद' अशा देशद्रोही घोषणा प्रकट सभेत देऊन उघड उघड पाकिस्तानी पंचमस्तंभीयाची शक्ती वाढविणे आणि भारताच्या सार्वभौम राजवटीला आव्हान देणे हे राष्ट्रीय हिताची अधिक हानी करणारे ठरते. दंग्यामध्ये हिंदु-मुस्लिम भांडले तरी त्यात भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान नसते. पण हिंदु समाजाच्या म्हणजेच भारताच्या शत्रूस्थानी असलेल्या पाकिस्तानाचा जयघोष करणे म्हणजे उघड बंडच होय. परवा कल्याण येथे झालेल्या 'पाकिस्तान झिंदाबाद ' च्या घोषणा ही काही पहिलीच देशद्रोही कृती नाही. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर उर्वरीत भारतात या घोषणा अनेक वेळा अनेक नगरात झालेल्या आहेत. यात राजधानी दिल्लीपासून भिवंडी, मालेगावातील गल्ली पर्यत सर्व ठिकाणांचा समावेश आहे. दिल्लीत, एकदा तर दि. १५ ऑगस्ट च्यां स्वातंत्र्यदिनाच्या सभारंभाच्या वेळीच या घोषणा करण्यात आल्या. क्रिकेट मॅचचे निमित्त साधून मुंबईतही या घोषणा वारंवार देण्यात येतात. परंतु सत्तारूढ पक्ष त्याकडे देशघातकी दुर्लक्ष करीत आला आहे. पाकिस्तान आणि भारतातील पाकिस्तान धार्जिणा मुस्लिम समाज, "हसकें लिया पाकिस्तान, लड के लेंगे हिंदूस्थान" ही पैगंबरवासी जीनांची घोषणा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कटिबद्ध आहे. भारताचे संपूर्ण पाकिस्तान करण्याच्या प्रक्रियेत 'पाकीस्तान जिंदाबाद' च्या घोषणा फार मोठा उत्साह निर्माण करतात. या घोषणा देणारे लोक उघड देशद्रोही आहेत आणि त्यांचे बनातवाल्यासारखे धर्मांध नेते नेतृत्व करतात. प्रधानमंत्री इंदिरा गांधी पाकीस्तान कडून भारतावर युद्ध लादले जाण्याची शक्यता वारंवार बोलून दाखवितात. त्या संभाव्य युद्धात बनातवाल्यासारख्यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान धार्जिणा मुस्लिम समाज भारतांतर्गत घातपात, दंगेधोपे घडवून पाकीस्तानी आक्रमणाला साहाय्य करतील हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. हा धोका लक्षात घेऊन शासनाने भारतातील पाकिस्तानी सापाच्या पिल्लांना वेळीच ठेचून काढणे योग्य ठरेल. देशभक्त जनतेची तशी मागणी आहे. कल्याणमध्ये पूर्वअनुमती मिळविल्याशिवाय मिरवणूक काढणाऱ्या, सभा घेणाऱ्या आणि 'पाकिस्तान झिंदाबाद' च्या घोषणा देणाऱ्या पाकिस्तानी पंचमस्तंभीय लोकांना त्वरित अटक करून कठोर शिक्षा करणे, म्हणूनच आवश्यक आहे.

* २७ जुलै १९८४

उपनावाने सादर वृत्त व भाष्य. लहान वृत्तपत्रांच्या संपादकांना अनेकदा हे करावे लागते.
आवश्यक तेवढे १/४ बदल. अन्यथा लेख मुळाबर हुकूम

१३. धोकादायक नेत्यांपासून सावधान

दिल्लीला दि. १५ ऑगस्ट १९८४ ला एका हिंदुत्वनिष्ठ पक्षाची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा खासदार सुब्रहमण्यम स्वामी यांनी केली आहे. श्री स्वामी हे मूळचे संघ स्वयंसेवक. ते संघाने स्थापन केलेल्या हिंदुत्व रहित जनसंघ या राजकीय पक्षात ते एक बुद्धिवंत अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता पावले. त्यानंतर झालेल्या जनता पक्षात जनसंघावरोबर ते विलीन झाले. व्यक्तिगत स्वार्थी महत्वांकाक्षेपायी त्यांनी जनता पक्षात भरपूर गोंधळ घातला. जनता पक्ष सत्तारूढ झाला. संघाचे लोक भाजपा या नव्या पक्षात एकत्रित झाले. पण संघीय स्वामी मात्र जनता पक्षातच राहिले. मुंबईतून खासदार म्हणून निवडून आले आणि त्यांनी नव्या जोमाने जुना गोंधळ घालणे चालुच ठेवले. अति झाल्यावर, अर्थातच जनता पक्षाने त्यांना काढून टाकले. सरते शेवटी स्वतःचा अहंगड आणि कंड शमविण्यासाठी त्यांनी वरीलप्रमाणे नव्या पक्षाची घोषणा केली.

अशीच कथा दुसऱ्या एका स्वार्थी अहंमन्य स्वकेंद्रित संघ. स्वयंसेवकाची आहे. त्याचे नांव प्रा. बलराज मधोक. श्री मधोक, हे मूळचे संघस्वयंसेवक. अर्थात जनसंघात त्यांना आपल्या राजकीय महत्वकांक्षा पूर्ण करण्याची विपुल संधी मिळाली. संघशक्तीच्या पाठिंब्यावर ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दित जनसंघाने निवडणुकीत बऱ्यापैकी यश मिळविले. राजधानी दिल्लीत जनसंघाची शक्ती वाढली! मधोकांना स्वर्ग केवळ दोन बोटे उरला! ज्याप्रमाणे गुरूजी गोळवलकर जन्मभर सरसंघचालक म्हणून राहिले, त्याप्रमाणे जनसंघाचे अध्यक्ष म्हणून हयातभर मिरविण्याची महत्वाकांक्षा मधोकांनी बाळगली. ते स्वतःला द्वितीय राजकीय नेता समजू लागले. परंतु त्यांनी मिळविलेले यश मूलतः संघशक्तिवर अवलंबून आहे, हे ते विसरले. संघाने जनसंघाध्यक्षपद त्यांच्या खांदयावर ठेविले म्हणून ते मोठे झाले, या सत्याचा त्यांना विसर पडला. ग च्या बाधेने त्यांनी संघालाच (म्हणजे सरसंघचालकांच्या प्रतिकाराला) आव्हान दिले आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. जसा येशू ख्रिस्ताला पाठीवर वाहून नेणाऱ्या गाढवाला ची बाधा झाल्यानंतर जो परिणाम भोगावा लागला तसा.

येशू आणि गाढव

येशू ख्रिस्ताच्या यशस्वी जीवनाच्या प्रारंभीची गोष्ट. ईसाई विचारांचा प्रसार करण्यासाठी येशू गाढवावर बसून गावोगावी फिरत होता. येशूच्या प्रभावाने हजारो लोक ईसाई धर्माची दीक्षा घेऊ लागले. त्यांचे गावोगावी स्वागत होऊ लागले. त्यांच्या मिरवणुका निघू लागल्या. अशाच एका गावाच्या वेशीवर येशू गाढवावर बसून पोचला. हजारो लोक स्वागत करायला जमले होते. त्यांनी येशूचा जयजयकार केला. त्याची मिरवणूक काढली. ते स्वागत बघून गाढवाला ग ची बाधा झाली. गाढवच ते! त्याला वाटले. हे स्वागत, हा सत्कार नि मिरवणुक

त्याचीच आहे. झाले त्या बेहोषित गाढव चौखूर उधळले. त्याच्या पाठीवरील येशू खाली पडला. त्याची पर्वा न करता गाढव पुढे चालू लागले! परंतु जमाव अतिशय चिडला. येशूला पाठीवरून खाली पाडून चौखूर उधळणाऱ्या गाढवाला त्यांनी मरेतो बेदम झोडपले. येशूला पाठीवरून वाहिले म्हणून गाढव काही मोठे ठरत नाही!

मधोकजींचे तसेच झाले. संघाने जनसंघाध्यक्षांची धुरा मधोकजींच्या खांदयावर ठेविली. मधोक ती धुरा वाहत होते. व जनशक्तिचा विजय होत होता. देशात आणि विदेशात विशेषतः अमेरिका इस्रायल मध्ये; (इस्रायल शब्द वाचल्यावर संघस्वयंसेवक डोळे मिचकावू लागतील. त्यातले गुपित मधोक आणि स्वयंसेवकांनाच ठाऊक!) संघ, जनसंघाची वाहवा होऊ लागली. ही शक्ति डोक्यावर घेऊनच मधोक देशात आणि विदेशात वावरले. तेथे स्वागत झाले ते संघजनसंघशक्तिचे, मधोक केवळ वाहक होते. पण त्यांना ग ची बाधा झाली आणि ते चौखूर उधळले. सरसंघचालकांना डावलून जनसंघाध्यक्षपद आजीवन स्वतःकडे ठेवण्याचा हट्ट धरला! .....आणि याचवेळी त्यांना संघाने धडा शिकविला. त्यांचे अध्यक्षपद काढून घेण्यात आले. संघशक्तिच्या आशीर्वादाविना, येशू विना गाढवाची जी गत झाली, तीच मधोकांची झाली. मधोकांना पक्षातून काढण्यात आले. (तोवर जनसंघाचे जनता पक्षात विलीनीकरण झाले होते.) मधोकांनी जुन्या जनसंघाचे नेतृत्व घोषित केले. जनसंघाध्यक्ष असताना जमविलेली पुंजी वापरून त्यांनी काही काळ आसेतु हिमाचल दौरे केले. पण त्यांच्या मागे स्वयंसेवक आले नाहीत, ते भाजपात सामील झाले. मधोकांना कोणी अनुयायी उरले नाहीत. चार दोन व्यक्तिगत मित्रांशिवाय त्यांना कोणी मानेनासे झाले! आणि मग ते प्रत्येक निवडणुकीत जबरदस्त मार खाऊ लागले. लाखो मते मिळविण्याची दर्पोक्ती करूनही अखेरीस त्यांच्या पदरी दोन सव्वा दोन हजार मतेच पडली! दुर्दैव असे की, तरीही त्यांचा भ्रमनिरास झाला नाही.

स्वयंघोषित नेते

श्री. मधोकांनी, मग स्वतःला हिंदुत्वनिष्ठ नेता म्हणून घोषित केले. हिंदुत्व, हिंदुराज्य आदी विषयांवर ते प्रवचने देऊ लागले. जणू काही, आपणच हिंदुत्वाचा शोध लावला अशा थाटात वावरू लागले. स्वतःला स्वातंत्र्यवीर सावरकरांपेक्षाही हिंदुत्वाचे मोठे पंडित समजू लागले. "स्वातंत्र्यवीर सावरकरांपेक्षाही मी पुढले पाऊल टाकले....." असे बरळू लागले. मीनाक्षीपुरम् धर्मांतरानंतर हिंदुसमाज जागृत होऊ लागला. स्वातंत्र्यवीर सावरकरप्रणित हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करणारा हिंदुमहासभा पक्ष राजकारणात शक्ती संपादन करू लागला. हिंदुराष्ट्रवाद्यांची आघाडी हिंदुमहासभेने उभारली, श्री. मधोकही त्यात सामील झाले. पण स्वयंघोषित नेतृत्वाची त्यांची हाव मुळीच कमी झाली नव्हती. तेथेही ते, स्वतःच्या मागे सर्वांनी यावे, त्यांना एकमेव नेता मानावे, अशी महत्वाकांक्षा बाळगू लागले. परंतु हिंदुत्वनिष्ठांतही त्यांच्या अहंगंडाला मुळीच वाव मिळाला नाही. कारण गांधीवधानंतरही, भयंकर छळ सोसून,

वीर सावरकरांच्या ज्या अनुयायांनी हिंदुत्वनिष्ठा न सोडता राष्ट्रवादी राजनीती चालविली ते सरडयाप्रमाणे रंग बदलणाऱ्या मधोकांना कसे मानणार? हिंदुमहासभेने राजनीतीचे हिंदुकरण करण्यासाठी, हिंदु समाजात राजकीय जागृती करण्याच्या हेतूने समविचारी नेत्यांच्या सहकार्याने 'हिंदु जागरण मंच,' सप्टेंबर १९८३ मध्ये मुंबईत निर्माण केला. ऑक्टोबर १९८३ मध्ये अखिल भारतीय पातळीवर हिंदुत्वातील संस्था, संघटना आणि व्यक्ति यांचा अंतर्भाव करून 'हिंदू राज्य मोर्चा' घोषित केला. हिंदु जागरण मंचाची तत्वे स्वीकारून मुंबईत शक्तीशाली असलेल्या शिवसेनेसह महाराष्ट्रपुरता हिंदुमहासंघ जानेवारी ८४ मध्ये निर्माण झाला. कोठेही नेतृत्वाची स्पर्धा नाही; तत्वाला महत्व. श्री. मधोक हे जर प्रामाणिक हिंदुत्वनिष्ठ असते तर उपरोक्त आघीडीत सामील झाले असते. पण स्वतःचे नेतृत्व हेच ध्येय, असल्यामुळे मधोकांनी दि. २२ जुलै ८४ ला मुंबईमध्येच आणखी एका नव्या हिंदुपक्षाची स्थापना दि. १५ ऑगस्टला करणार असल्याचे घोषित केले! स्वामी आणि मधोक, दोघेही अनुयायी शून्य. अहंमन्य नेते! त्यांच्याकडून हिंदु संघटन सूतराम घडणार नाही, हे लक्षात घेऊन हिंदुसमाजाने सावध राहावे. आधीच कार्यरत असलेल्या हिंदुमहासंघ आणि हिंदु राज्य मोर्चा संघटनांना बलशाली करावे. कारण हिंदु समाजात एकता निर्माण करण्याएवजी हे महाभाग (?) नवे पक्ष काढून हिंदू मतांचे विभाजन करीत आहेत.

* दि. ३ ऑगस्ट १९८४
बहिर्जी नाईक उपनावाने लिहलेला लेख.

१४. विधानसभा निवडणुकानंतर

प्रज्वलंतच्या गेल्या अंकाचा मथळा होता, "हिंदुमहासभा विजयासाठी सज्ज." विधानसभा निवडणुका पार पडल्या. निवडणुकांचे निर्णय लागल्यानंतर सर्वच पक्षात निवडणुकांतील यशाविषयीचे अंदाज प्रत्यक्षात खरे ठरले नाहीत. अर्थात लढण्यापूर्वी यशाबद्दल दृढ आशा जनमानसात ठसविण्याचे काम करणे हे प्रत्येक पक्षाचेच नव्हे तर प्रत्येक उमेदवाराचे प्राथमिक कर्तव्य ठरते. यशाची ज्याला 'उमेदच' नाही त्याला उमेदवार म्हणायचे कशासाठी? त्या अर्थाने निवडणुकीतील यशाची आशा अधिक वाढवून सांगितली जाते. ही गोष्ट सर्वसाधारणपणे गृहित धरली जाते. या पार्श्वभूमीवर 'प्रज्वंलत' मधील मथळा वास्तवतेच्या पासून फार दूर नव्हता असेच म्हणावे लागेल.

प्रज्वलंतमधील मथळ्याचा आधार घेऊन निवडणुक निर्णयानंतर आम्हास काही चोखंदळ वाचकांनी प्रत्यक्ष भेटून विचारले की, "हिंदुमहासभा विजयासाठी सज्ज असताना हिंदुमहासभेला असा दारूण पराभव का स्वीकारावा लागला? आपल्याला वास्तवतेची जाणीव नव्हती की जाणूनबुजून आपण वाचकांची दिशाभूल केलीत?" ही वाचक मंडळी प्रमाणिकपणे आणि शुद्ध हेतूने विचारणा करीत असल्यामुळे यांना तितक्याच प्रमाणिकपणे आणि वास्तवतेला धरून प्रगट उत्तर देणे योग्यच नव्हे तर आवश्यक ठरते.

हिंदुमहासभेने विधानसभा निवडणुकीत जे उमेदवार उभे केले ते अर्थातच काही उमेद बाळगून! लढण्यासाठी आवश्यक ती मानसिक सिद्धता करण्याच्या हेतूने. अर्थातच यशासंबधी आशा वाढवूनंच प्रचाराला प्रांरभ करण्यात आला. त्यात काहीच वावगे नव्हते. कुस्ती जिंकण्याच्या हेतूनेच, दोन्ही पैलवान आखाड्यात उतरतात. त्यातला एक हरतो. परंतु त्या हरणाऱ्या पैलवानाने जिंकण्याची उमेद का बाळगली, असा, प्रश्न, कुस्तीच्या निर्णयानंतर विचारणे अर्थहीन ठरते. प्रज्वलंतच्या गेल्या अंकात ज्या पाच जागी हिंदुमहासभेला विजय मिळण्याचा विश्वास व्यक्त केला होता तो अवाजवी नव्हता. बार्शी येथील हिंदुमहासभेचे उमदेवार श्री. रामभाऊ पवार हे त्या मतदारसंघात जुने जाणते, अनुभवी आणि शक्तीशाली नेते म्हणून ओळखले जात. त्यांच्याजवळ कार्यकर्त्यांचा संचही चांगला आहे. भगवंत समाचार नावाचे एक दैनिकही ते प्रकाशित करीत असतात. त्यांची प्रमुख उणीव म्हणजे द्रव्यांची! अन्य उमेदवारांच्या तुलनेत श्री रामभाऊ पवार यांचे द्रव्यबळ अगदीच नगण्य होते. तरीही त्यांनी अत्यंत जिद्दीने अधिकाधिक साधनसामुग्री निवडणुक प्रचारासाठी उभी केली आणि मतदात्यांपर्यंत आपल्या ध्येयधोरणाबरोबरच आपल्या उमेदवारीचे वैशिष्ट्यही पोचविण्यात यश मिळवले. ते जर निवडून आल्याची घोषणा झाली असती तर ते अनेकांना मुळीच अनपेक्षित वाटले नसते. अशीच परिस्थती थोड्याफार फरकाने अन्य मतदार संघातही होती. उदाहरणार्थ लातूर येथील उमेदवार अधिवक्ता विठ्ठलराव केळगांवकर. जुने जाणते आणि अत्यंत यशस्वी असे अधिवक्ता

म्हणून लातूर क्षेत्रात त्यांची प्रसिद्धी आहे. रा.स्व. संघाचे ते लातूरचे कित्येक वर्षे संघचालक राहिले. आजही अनेक स्वयंसेवक त्यांच्याविषयी आदर बाळगून आहेत. विधानसभा निवडणूक लढविण्याचा अनुभवही त्यांना आहे. मागे एकदा विधानसभा निवडणुकीत क्रमांक दोनची मते मिळविली होती. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतही त्यांनी हिंदुमहासभेचे उमेदवार श्री. रामभाऊ पवार यांच्यासाठी प्रभावशाली प्रचारकार्य केले. या अनुभव आणि गुणवत्तेच्या आधारावर तेथेही हिंदुमहासभेच्या विजयाची आशा बाळगण्यात वावगे नव्हते. परंतु धनशक्तीत मात्तबर असलेल्या काँग्रेस पुलोदच्या कुटील कारवायांमुळे श्री. केळगावकर यांच्या प्रचारकार्यात धोके आणि अडथळे निर्माण होऊन विश्वासघाताचे निंदनीय दुष्कृत्य केवळ विरोधकांनीच नव्हे तर काही स्वकीयांकडून घडल्यामुळे हिंदूमहासभेच्या श्री. केळगांवकरांना पराभव पत्कारावा लागला. (३) भिवंडी येथील हिंदुमहासभेचे उमेदवार श्री. रमेश संभुस यांनी १९७० च्या भिवंडी दंगलीपूर्वीच त्या परिसरात ओजस्वी शिवचरित्र कथनकार म्हणून लौकिक मिळविला होता. प्रत्यक्ष भिवंडी नगरात हिंदु अल्पसंख्य असले तरी भोवतालच्या ग्रामीण विभागात हिंदु बहूसंख्य असल्याने आणि त्या मतदार क्षेत्रात भाजपाचा उमेदवार नसल्याने संघस्वयंसेवकांची मते श्री. रमेश संभुस यांच्या हिंदूत्वनिष्ठेमुळे तसेच व्यक्तिगत लोकप्रियतेमुळे मिळण्याची शक्यता होती. भिवंडीत शिवजयंती मिरवणूक बंदी उठविण्यासाठी हिंदुमहासभा नेत्यांनी घेतलेला यशस्वी पुढाकार ही गोष्ट सुद्धा आशादायकच होती. परंतु संघीय हिंदुत्वनिष्ठांनी आपल्या प्रचारयंत्रणेसह इमानेइतबारे पुलोद जनता उमेदवार श्री. टाबरे यांना विजयी करण्यासाठी विक्रमी मतदान केले. परिणामतः तेथेही हिंदुमहासभेला पराभव स्विकारावा लागला. (४) कंधार मतदार क्षेत्रात हिंदुसमाजाची एक गरज म्हणून हिंदुमहासभेच्या प्रचार कार्याला चांगला प्रतिसाद मिळत होता. मात्र मुस्लिम आक्रमणापासून संरक्षणासाठी हिंदुमहासभेची मदत घेणाऱ्या हिंदुमहासमाजाने मतदान मात्र हिंदुमहासभेचे उमेदवार श्री. शिवाजी नळगे यांना केले नाही. तसाच प्रकार कल्याण येथेही घडला. हिंदुसमाजाने मतदान मात्र संघर्षाच्यावेळी आरामात राहणाऱ्या पुलोद भाजपा उमेदवाराला केले! वरील परिस्थिती विस्ताराने एवढयाच कारणासाठी दिली आहे की उपरोक्त विधानसभा क्षेत्रात हिंदुमहासभेला विजयाचा दावा करण्याकरिता भरीव आधार होता.

अन्य ठिकाणच्या हिंदुमहासभेच्या उमेदवारांना हिंदुमहासभेची हिंदूहितकारक विचारसरणी निवडणुकीच्या निमित्ताने लोकांसमोर मांडून अन्य राजकीय पक्षांच्या भाऊगर्दीत हिंदुमहासभेलाच मानणाऱ्या मतदारांची संख्या किती आहे याचे वास्तवापूर्ण ज्ञान प्राप्त करावयाचे होते. या दृष्टीने त्यांनीही शक्तिच्या मानाने फार मोठे प्रचारकार्य केले. हिंदुमहासभेच्या सर्वच उमेदवारांनी हिंदुमहासभेची प्रमुख धोरणे (१) समान सामाजिक संहिता २) संपूर्ण गोवंशहत्याबंदी ३) अखंड हिंदुराष्ट्र ४) हिंदुच्या धर्मातरांवर बंदी आणि

५) परधर्मियांच्या ताब्यात असलेल्या हिंदुमंदिरांची मुक्ती तसेच राष्ट्रहिताचे वर्गसमन्वयाचे आर्थिक धोरण, इत्यादी. जनसामान्यापर्यंत पोचविण्यासाठी लक्षावधि हस्तपत्रके आणि हजारो भित्तीपत्रके या माध्यमांचा सदुपयोग केला. चौकसभा व काही ठिकाणी मोठ्या प्रकटसभा घेण्यात आल्या. म्हणजे जनतेला हिंदुमहासभेचे उमेदवार देशहितकारक विचारसरणी घेऊन उभे असल्याची जाणीव करून देण्याचे कर्तव्य चांगल्या रीतीने बजाविले आणि याच अर्थाने हिंदुमहासभा विजयासाठी सज्ज होती असे म्हणणे यथार्थ ठरते.

हिंदुमहासभेचे अध्यक्ष आणि प्रज्वलंतचे संपादक श्री. विक्रम सावरकर यांनी अशाच आधारावर काही हितचिंतकांजवळ 'विजयासाठी सज्जचे' स्पष्टीकरण केल्याचे मी स्वतः ऐकले. श्री सावरकर म्हणाले, "सर्व प्रकारच्या आक्रमणापासून हिंदुसमाजाचे रक्षण होणे आवश्यक आहे. असा विचार आणि जागृती हिंदुसमाजात वाढत्या प्रमाणात होत असल्याचे स्पष्ट दिसत होते."

बहुसंख्य मुस्लिम मतदारांनी लोकसभा निवडणुकीत राजीव काँग्रेसला प्रखर विरोध केला तर बहुसंख्य हिंदु मतदारांनी मुस्लिम विरोधाची जाणीव ठेवून मतदान करून विजयी केले या पार्श्वभूमीवर हिंदुसमाजावरील सर्वांगीण आक्रमणाविरूद्ध संघर्षशील धोरण अमंलात आणणाऱ्या व्यापक हिंदुसमाजाच्या अस्मिता रक्षणासाठी आणि सर्वांगीण प्रगतीसाठी अचूक विचारसरणीचा अंगीकार करणाऱ्या हिंदुमहासभेला हिंदुसमाज कर्तव्य म्हणून चांगले मतदान करील, अशी अपेक्षा आम्ही बाळगली. त्या दिशेने मतदारांपर्यत पोचण्यासाठी आम्ही आवश्यक तो प्रचारही केला. आमच्या अपेक्षेप्रमाणे जर हिंदु मतदात्यांनी आम्हांस मतदान केले असते तर आम्ही विजयासाठी आणि त्यानंतर अंगावर येणारे दायित्व पार पाडण्यासाठी सज्ज होतो. परंतु हिंदु समाजातील स्वसंरक्षणाची जागृती हिंदुहिताच्या पक्षाला प्रत्यक्ष मतदान करण्यात परिणित झाली नाही. आमच्याबद्दल सद्भावना बाळगूनही बहुसंख्य हिंदु मतदात्यांनी मतदान मात्र वेगवेगळ्या कारणासाठी निरनिराळ्या पक्षांना केले. या परिस्थितीचाही आम्ही वास्तववादी दृष्टिकोनातून अभ्यास करून आमच्या कार्यप्रणालीत योग्य सुधारणा करणार आहेत.

अंदाज कोणाचे चुकले नाहीत?

निवडणुकीतील यशासंबंधी प्रत्येक पक्षाने दिलेली हमी विधानसभा निवडणूक निर्णय पाहिला असता खोटीच ठरली आहे, असे लक्षात येते. महाराष्ट्रात सत्तारूढ श्री. वसंतदादा पाटील यांनी किमान दोनशे जागा आपण सहज जिंकू असे घोषित केले होते. (त्यांच्या काही अतिउत्साही सहकाऱ्यांनी दोनशे वीस इतका आकडा सांगितला होता.) परंतु प्रत्यक्षात श्री. वसंतदादांना एकशे एकसष्ठ जागाच जिंकता आल्या. पुलोदचे नेते (आणि घोषित मुख्यमंत्री) यानी ही आपण किमान एकशे साठ जागी जिंकून निश्चितपणे बहुमतात येऊ,

अशी वारंवार घोषणा केली होती. (आणि अर्थातच त्यांच्या अतिउत्साही सहप्रवासी पक्षांनी मंत्रीमंडळातील आपल्या जागांसाठी दावे सांगण्यास प्रांरभ केला होता). परंतु प्रत्यक्षात पुलोदला केवळ एकशेतीनच जागा मिळवून अल्पमतात राहावे लागले. (आणि श्री. शरद पवारांना मुख्यमंत्री पदाऐवजी विधानसभेतील विरोधी पक्षांच्या नेतेपदावरच संतुष्ट राहावे लागले) श्री. वसंतदादा पाटील यांचा अंदाज चाळीस जागांनी हुकला तर श्री. शरद पवारांचा दावा सुमारे सत्तावन्न जागांनी चुकला. अशा परिस्थितीत हिंदुमहासभेचा काही जागी यश मिळविण्याचा दावा पूर्णतः चुकला यात कोणास वैषम्य वाटावयास नको.

आत्मनिरीक्षण

अर्थाने हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांनी केवळ तर्कशुद्ध स्पष्टीकरणावर समाधान मानून चालणार नाही. बहुसंख्य हिंदु समाज हिंदुहिताच्या एकमेव हिंदुमहासभा पक्षाला बहुसंख्येने मतदान का करीत नाही, यांचा वस्तुनिष्ठ विचार हिंदुमहासभेचे नेते आणि कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. केवळ साधनहीनतेचे (म्हणजे प्रामुख्याने द्रव्यबळ नसल्याचे) सातत्याने रडगाणे गाऊन भागणार नाही. विरोधी पक्षांनी कुटील कारवाया केल्या, वचनभंग केला, विश्वासघात केला, हिंदूमहासभेच्या हितचिंतकांची दिशाभूल केली, हिंदुमहासभेच्या संघटनेत फितुरी, इत्यादी कारणे सागूंनही दीनदुबळेपणाचे तसेच मुत्सद्देगिरीच्या अभावाचे आणि कुटील राजनीतीच्या अज्ञानाचे केविलवाणे प्रदर्शन करणे लाभदायक ठरणार नाही. राजकारण हा खेळच कुटीलतेनी काठोकाठ भरला आहे. प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य ठरते हे जागतिक महत्वाचे सूत्र ध्यानात घेतले पाहिजे. लोकशाहीतील निवडणुक हे ही एक राजकीय युद्ध असते. तेव्हा त्यात आपले प्रतिस्पर्धी सर्व भल्याबुऱ्या तंत्राचा अवलंब करतील हे लक्षात घेऊनच हिंदूमहासभेने व्यूहनीती योजिली पाहिजे. आपले उद्दिष्ट ठरविले पाहिजे. या दृष्टीने विधानसभा निवडणुकीत हिंदुमहासभेने ते उद्दिष्ट सफल केले, असेच म्हणावे लागेल. मात्र ही निवडणूक लढविताना आपल्या प्रचार कार्यातील उणीवा व आपल्या कार्यकर्त्यांच्या क्षमतेचा वास्तविक अनुभव जो आला त्याचा आत्मनिरिक्षणार्थ योग्य अभ्यास केला पाहिजे. पुढील निवडणुकीत आपल्या उणीवा कमी कशा होतील आणि कार्यक्षमता कशी वाढेल, यासाठी नवीन सिद्धता पाहिजे. असे कठोर आत्मपरीक्षण आणि त्यानुसार कार्ययोजनेत सुधारणा केल्यानेच यशाची वाटचाल वेगाने वाढू शकेल.

निवडणूक लढविण्याचा हिंदुमहासभेचा हेतू

हिंदुमहासभा हा राजकीय पक्ष असल्यामुळे आपले ध्येय पूर्णार्थाने साकार करण्यासाठी सत्ताप्राप्ती आवश्यकच. अर्थात सत्ताप्राप्तीसाठी शक्य त्या सर्व मार्गाने प्रयत्न करणे हे ही कर्तव्यच ठरते. आपल्या देशात लोकशाही आहे व लोकशाहीत होणाऱ्या निवडणूका लढविणे हे प्रत्येक पक्षाचे प्रथम आणि पवित्र कर्तव्य ठरते. लोकशाहीत विविध राजकीय पक्षानांच

नव्हे तर मतदार असलेल्या उमेदवारीच्या वयाची अट पूर्ण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला निवडणुक लढविण्याचा अधिकार आपल्या घटनेने आहे. म्हणूनच देशात विपुल संख्येत असलेल्या पक्षाबरोबर स्वतंत्र किंवा अपक्ष म्हणून हजारो उमेदवार निवडणूक लढवित असतात.अशा परिस्थितीत, स्वतःला फार शहाणे समजणाऱ्या व्यक्ती भोळेपणाचा आव आणून किंवा पक्षस्वार्थाचा डाव साधून विचारतात की, "महासभा निवडणूक का लढते?" तेव्हा 'हिंदुमहासभा राजकीय असल्यामुळे निवडणूक लढविणे हे हिंदुमहासभेचे प्राथमिक कर्तव्य आहे," असे उत्तर योग्य ठरते. दुसरा प्रश्न असा विचारण्यात येतो की "विजयाची शक्यता नसताना निवडणुका लढविल्या जातात?" त्याला वास्तववादी उत्तर म्हणजे हे, "विजयाची शक्यता निर्माण करण्यासाठी निवडणुक लढविली पाहिजे. आपल्या विचारसरणीला किती मतदांराचा कौल आहे हे कळण्यासाठी निवडणुक लढविणे हाच उपाय! निवडणुक एकदा वा अनेकदा हरली तरी विजय मिळेपर्यंत लढवित राहिलेच पाहिजे." याबाबतीत आणि आम्ही वारंवार उल्लेखीत असलेले घोरण आदर्श ठरते. ते म्हणजे, कुस्ती खेळता खेळताच, हरतानाही डावपेच शिकता शिकताच, अखेरीस माणूस हा पैलवान होतो.

हिंदुमहासभेने निवडणूक लढवू नये तर केवळ अन्य सांस्कृतिक, धार्मिक कार्य करून हिंदुसमाजाची सेवा करावी असे म्हणणारे मतलबी महाभाग जेव्हा भेटतात तेव्हा त्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. हिंदुहितासाठी या देशात जे निर्बंध राबविणे आवश्यक आहे ते निर्बंध (कायदे) प्रकट सभेत नव्हेत, रामजन्म उत्सवात नव्हेत, गंगाजल रथयात्रेत नव्हेत, तर अगदी ग्रामपंचायतीपासून तो विधानसभा, लोकसभा इत्यादी निर्बंध करणाऱ्या सभागृहातच संमत होतात. अशा ग्रामपंचायतीपासून तो लोकसभेच्या सभागृहात हिंदुहिताचे विशुद्ध तत्वज्ञान अंमलात आणण्यासाठी प्रकटपणे प्रतिज्ञाबद्ध असलेल्या प्रतिनिधीनींच निवडून जाणे अपरिहार्य ठरते.

ज्या संस्था- संघटनानी आम्हास राजकारणात भाग घ्यायचा नाही अशी प्रतिज्ञा घेऊनच कार्यारंभ केला, त्या संस्था संघटनांना सुद्धा त्यांचे ध्येय साकार करण्यासाठी अखेरीस नाही नाही म्हणता म्हणता, राजकारणात आणि तेही निवडणुकीच्या राजकारणात भाग घ्यावाच लागत आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. एखादया युवतीने, मी आजन्म अविवाहित राहीन अशी प्रतिज्ञा करून, पुढे अर्ध्या वयात एका पाठोपाठ एक अनेक विवाह करण्याच्या कार्यक्रम हाती घ्यावा, तशी स्थिती रा. स्व. संघाची झाली. संघाने राजकारणात भाग घेणार नाही, राजकारण करणार नाही, राजकारणाशी आमचा काही संबंध नाही अशा प्रतिज्ञा घेऊन अखेरीस प्रथम जनसंघ, जनता पक्ष, भाजपा आणि त्यापुढे पुलोदवगैरे सारख्या अनेक आघाडया यात राजकीय सहभाग देऊन, राजकारण अपरिहार्यच ठरते हा सिद्धांत मान्य केला आहे. "कामगार संघटनांचा राजकारण आणि निवडणूका यांच्याशी काही कर्तव्य नाही," असे

प्रतिज्ञापूर्वक प्रतिपादन करताना अखेरीस डॉ. दत्ता सामंताच्या नेतृत्वाखाली राजकीय कामगार आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविणे अपरिहार्य ठरले. श्री. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेनेही प्रथम नाही नाही म्हणता म्हणता अखेरीस प्रत्येक निवडणुकीत कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षांना मतदान करण्याचे आदेश दिले. या पार्श्वभूमीवर ज्या हिंदुमहासभेजवळ स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दिलेले, आपल्या देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असलेले तत्वज्ञान आहे, ज्या हिंदुमहासभेने भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी तसेच भारताचे विभाजन टाळण्यासाठी उपलब्ध शक्तीनुसार शक्य ते सर्व प्रयत्न केले, जी हिंदुमहासभा हिंदु समाजाच्या हितासाठी प्रथमापासूनच राजकीय कार्य करीत आली आहे आणि ज्या हिंदूमहासभेने वीर सावरकरांचे राजकारणाचे हिंदुकरण म्हणजेच हिंदुहिताची राजनीती हे सूत्र स्विकारले आहे त्या हिंदुमहासभेला राजकीय क्षेत्रात देशहितासाठी कार्य केलेच पाहिजे. देशहितासाठिच आपल्या विचारसरणीचा प्रचार करण्याच्या हेतूनेच निवडणुका अवश्यमेव लढविल्याच पाहिजेत.

हिंदुमहासभेने राजकारण करू नये किंवा निवडणूका लढवू नयेत असे म्हणणारे एक कारण असे सांगतात की, हिंदुमहासभेजवळ शक्ती नाही. शक्ती म्हणजे अर्थात जन आणि धनाचा पुरेसा अभाव. देशाच्या फाळणीनंतर झालेल्या गांधीवधामुळे हिंदुमहासभेला चिरडून टाकण्याचे सत्तारूढ पक्षाने सर्वांगीण प्रयत्न केले. हिंदुमहासभेची संघटना नष्ट व्हावी म्हणून सर्व प्रकारची दडपशाही केली. (आजही गुप्त पोलिसांचा जितका ससेमिरा हिंदुमहासभेच्या पाठीमागे आहे, तितका ससेमिरा अन्य कोणत्याही पक्षाच्या व संघटनेच्या पाठीमागे नाही.) परिणामतः हिंदुमहासभेची जनशक्ती व त्यामुळेच धनशक्ती खच्ची झाली. दुसरा एखादा पक्ष किंवा संघटना असती तर अशा परिस्थितीत संस्थेचे विसर्जन करून केव्हाच मोकळी झाली असती. परंतु स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या निष्ठावंत अनुयायानी तो भ्याडपणा अंगिकारला नाही. प्रसंगी फटके खाऊन आणि देऊनही संस्था टिकवली. हिंदुमहासभेच्याच तत्वज्ञानामूळे हिंदु समाजाचा उद्धार होणार असल्याचा ठाम विश्वास असल्यामुळे कारावास आणि उपहास सहन करूनही या कार्यकर्त्यांनी आपल्या पक्षाची पाटी, पक्षाचा ध्वज आणि पक्षाचे तत्वज्ञान जिद्दीने टिकविले. हिंदुमहासभेचे तत्वज्ञान आज ना उद्या स्विकारावेच लागेल ही वस्तुस्थिती असल्यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हिंदुमहासभेचा ध्वज मूठभर का होईना पण निष्ठावंत कार्यकर्त्यांनी फडकत ठेवला आहे. आणि आता तर परिस्थितीच्या लाथा खाऊन खाऊन समाजाला हिंदुत्वाच्या तत्वज्ञानाचा अंगिकार केल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी अचूक आणि आवश्यक तत्वज्ञान असलेल्या हिंदुमहासभेला लोकपाठिंबा मिळविणे हे कार्यकर्त्यांचे अपरिहार्य कर्त्तव्य ठरते. त्यासाठी हिन्दु समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्यक्ष कार्य करणे आणि निवडणुकीच्या

माध्यमाने हिंदुमहासभेचे तत्वज्ञान लोकांपर्यंत पोहचविणे, ते पटवून देणे आणि त्याचा अंगिकार करावयास लावणे, या गोष्टी आवश्यक ठरतात. हिंदुमहासभेतील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या निष्ठावंत आणि कृतीशील अनुयायांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका शक्तीच्या मयदित लढविल्या. महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण तेवीस जागा लढविण्यात आल्या. त्यापैकी मुंबईत सात आणि ठाणे जिल्ह्यात सात लढविल्या गेल्या, त्यानिमित्ताने अत्यल्प अवधीत आणि अत्यल्प साधनांद्वारे का होईना. हिंदुमहासभेच्या अन्य सर्व पक्षापेक्षा वेगळ्या परंतु देशहिताच्या विचारसरणीची प्राथमिक ओळख जनतेला करून देण्यात यश मिळविले आहे. लोकसभा, पाठोपाठ विधानसभा आणि आता लगेचच पालिका निवडणुकांना तोंड देण्याची वेळ आली आहे. निवडणुक प्रचार यंत्रणेचा अभाव असलेल्या हिंदुमहासभेला तर ते महान संकट वाटणे साहजिकच आहे. परंतु या संकटातूनच काही देशहित साधल्याचा लाभ होणार आहे. डिसेंबर १९८४, मार्च १९८५ आणि एप्रिल १९८५ या अल्पावधित लोकांसमोर हिंदुमहासभेची विचारसरणी पुन्हा पुन्हा मांडण्याची संधी मिळाली आहे. वीर सावरकरांनी जिद्दीने हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांनी हे आव्हान स्विकारले पाहिजे आणि येत्या पालिकेच्या निवडणुकांतही अधिकाधिक जागा, लढविल्या पाहिजेत असा आमचा स्पष्ट आग्रह आहे.

* सा. प्रज्वलंत २२ मार्च ते २८ मार्च १९८५ टोपणनावाने लिहिलेला लेख.

१५. राजकारणाचा परिपाक

अकाली नेते संत लोंगोवाल यांच्या हत्येनंतर पंजाबात सार्वत्रिक निवडणुकाही आता पार पडलेल्या असल्याने आता त्यासंबंधात सुचणारे विचार प्रकट करण्यास काहीच प्रत्यवाय नाही.

भारतीय स्वातंत्र्याला आता तीन तपावर काळ उलटून गेलेला असला तरी आपल्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश साम्राज्यासारख्या सत्तेशी शतकव्यापी स्वातंत्र्याचा सातत्याचा नि सर्वप्रकारे यशस्वी संग्राम देणाऱ्या, प्राचीनतम अशा सर्वश्रेष्ठ संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या या देशाच्या राजकारणात महत्प्रयासाने मिळविलेल्या स्वातंत्र्याचे संवर्धन तर राहोच पण साधे संरक्षण करण्याच्या दृष्टीनेही कोणताच स्वागतार्ह असा पालट झालेला नाही, किंबहुना ब्रिटिश या देशातून निघून गेलेले असले तरी आपली फोडा, झोडा नि राज्य करा ही नीती मागे ठेवूनच असे म्हणण्यासारख्याच घटना अद्यापही या देशात घडत आहेत. राखीव जागा समर्थन किंवा पंजाब प्रकरणासारख्या घटना हा त्याचाच ताजापुरावा म्हणता येईल.

तुमचे खेळ होतात पण.....

या देशावरील आपली पकड पक्की नि घट्ट बसावी यासाठी ब्रिटिशांनी १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर त्याच्या हातातील शस्त्र काढून घेऊन त्याची अवस्था एखाद्या नखे काढलेल्या सिंहासारखी करून टाकली. आणि त्यावर पहारा ठेवला तो मात्र अद्ययावत शस्त्रास्त्रांचा. त्याच्या धाकात या देशात त्यांनी जे काही अनन्वित अत्याचार केले ते इतिहासाने नोंदून ठेवलेले आहेत. त्यांचा वीरोचित असा प्रतिशोध घेण्यासाठी आणि मातृभूमीच्या पायांतील दास्यशृंखला तोडून टाकण्यासाठी क्रांतिकारकांनी शस्त्रास्त्रे सरसावून ब्रिटिशांचा तो डाव त्यांच्यावरच उलटविण्याचा चंग बांधला तेव्हा त्यांची संभावना नव्हे नव्हे अगदी स्पष्ट शब्दातच म्हणावयाचे तर अन्याय्य अशी निर्भर्त्सनाच 'अत्याचारी' अशा शब्दात करण्यात आपल्या त्या अहिंसावादाची धन्यता मानली. त्याच त्या काँग्रेसच्याच राजवटीत निवडणुक प्रधान राजकारणात जे काही अत्याचार नी हत्या या देशात घडत आहेत त्या पाहिल्या की, "हेच का तुमच्या त्या अहिंसावादाचे प्रतिक?" असा प्रश्न कोणाला विचारावासा वाटला तर तो अवास्तव म्हणता यावयाचा नाही. परकी पाशवी सत्तेविरूद्ध शस्त्रे उचलणाऱ्या क्रांतिकारकांसमोर राष्ट्रस्वातंत्र्याचे ध्येय होते, स्वबांधवावरील अन्याय अत्याचारांची चीड होती. आणि उरात भावना होती ती देशभक्तीची. पण आजच्या अन्याय-अत्याचारात निवडणुक स्वार्थापलीकडे कोणते असे महान ध्येय आहे? निव्वळ सत्तास्वार्थ डोळ्यासमोर ठेवूनच केलेले राजकारण हे प्रसंगी राष्ट्र घातालाही कारणीभूत ठरले. पाकिस्तानची निर्मिती हा त्याचाच ताजा नि ऐतिहासिक असा ज्वलंत पुरावी असून या देशाने त्यापासून काहीही बोध घेतल्याचे दिसत नाही. पंजाब, आसाम काश्मीर, मिझोरम, झारखंडासारखी प्रकरणे त्यानंतर का निर्माण झाली

असती? आणि या देशाच्या राजकारणात कोणताही स्वागताई असा पालट न झाल्यास अशीच आणखी किती तुकडे पाडतील ते तरी कोणी सांगावे? या पंजाब प्रकरणांतील संत हरचंदसिंग लोंगोवाल ही दुसरी महत्वाची हत्या. पहिली पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीची . त्यावांचून सामान्य हत्या किती झाल्या असतील त्यांना तर गणतीच नाही. हे सारे दृश्य पाहिले की बा राजकारण्यांनो, तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो असे म्हणण्याची पाळी आज सामान्य जनतेवर आलेली आहे.

सत्तास्पर्धेचे राजकारण

हे विचार आज येथे सुचण्याचे कारण अकाली दलाचे अध्यक्ष संत हरचंदसिग लोंगोवाल यांची गेल्या दिनांक वीस ऑगस्टला शेरपूर येथील गुरूद्वारात भाषण करीत असता झालेली निर्घृण हत्या. त्यासंबंधात कोणी दोष देतात तो त्यांच्या संरक्षण व्यवस्थेला तर कोणी अतिरेक्यांना. त्यात परकी हात असल्याचा संशयही व्यक्त केला जातो. तथापि या देशात निदानपक्षी गेली काही दशके तरी खदखदत असलेल्या राजकारणाचाच तो एक अपरिहार्य असा परिपाक आहे, हे सत्यही विसरता येणारे नाही. आणि सत्ताधाऱ्यांपासूनच कोणताही निवडणूक प्रधान राजकीय पक्ष त्याला अपवाद नाही हेही तितकेच खरे आहे. प्रत्यक्ष शिवाजीमहाराज समोर अवतरले तरी तो त्या म्हणून त्यांचा शक्यतो त्वरित नाश करण्याचाच प्रत्येकजण प्रयत्न करील, अशी आहे आजच्या राजकारणाची परिस्थिती. प्रत्येक राजकीय पक्ष नि त्याच्या नेत्याची महत्वाकांक्षा आहे ती या देशाचे नेतृत्व आपल्याकडेच असावे ही आणि ती पूर्ण करण्यासाठी जे डावपेंच खेळले जातात त्यात प्रतिस्पर्ध्याचा कांटा काढणे महत्वाचे असते. त्यांत मग आपपर भाव काहीही नसतो. इतिहासात त्याची अनेक उदाहरणे आहेत. पृथ्वीराज चौहानचा काटा काढण्यासाठी महंमद घोरीला पाचारण करणारी जयचंद राठोडी वृत्ती ही त्यातील ठळक म्हणता येईल. जनता पक्षाची राजवट अवघ्या अडीच वर्षातच कोसळली, हे तरी लक्षण कशाचे? या देशाची फाळणी नि पाकिस्तानची निर्मिती तरी काय सांगते?

आणि त्यांची परंपरा

कॉंग्रेस आणि तिच्याद्वारे या देशाच्या नेतृत्वावर केवळ आपली नि आपलीच काय ती पक्कड घट्ट बसावी, अन्य कोणतेही नेतृत्व वर येता कामा नये यासाठी गांधीजींनी बॅ. चित्तरंजनदास, नेताजी सुभाषचंद्र बोस, वीर नरीमन, डॉ. ना.भा. खरे प्रभृतींवर जसे निरनिराळे प्रयोग केले तसाच एक प्रयोग त्यानी बॅ. महंमद अल्ली जीना यांच्यावरही करून पाहिला. पण तो या देशाला महाग पडला. कारण त्यानेच जीनांत पाकिस्तानी भस्मासूर निर्माण केला, असे इतिहासच सांगतो. तो भस्मासूर स्वतः गांधीजींनीच निर्माण केलेला असला तरी त्यांना तो आवरावयाचा नव्हता. अन्यथा पाकिस्तानला पंचावन्न कोटी रूपयांचा मलिदा चारण्यासाठी राष्ट्राला पुन्हा एकदा संकटाच्या खाईत लोटणारे प्राणांतिक उपोषणाचे जे निर्वाणीचे हत्यार त्यांनी उपसले त्याचा प्रयोग राष्ट्रावरील फाळणीचे संकट टाळण्यासाठी त्यांनी जीनांवर करून

पहिला असता. पण तसे काही घडल्याचे इतिहास सांगत नाही.

गांधी आणि गांधी

खलिस्तानवादी भिंदरानवाल्यांचा भस्मासूर पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनीच निर्माण केला असा विपक्षीयांचा आरोप आहे. तथापि त्यांत आपलाही काही वाटा आहेच हे त्यांनाही विसरता येणार नाही. तसेच गांधीजींनी जेव्हा पाकिस्तानी भस्मासूर निर्माण करून पोसला तेव्हा त्या कृत्याचा साधा निषेध करण्याचे तरी धैर्य या पैकी कितीजणांनी दाखविले होते असा प्रश्नही साहजिकच निर्माण होतो. आणि इतिहास त्याचे उत्तर नाही असेच देतो. लोकतंत्राच्या काळात कोणत्याही घटनेला एखादी व्यक्ति उत्तरदायी नसते, तर ते दायित्व असते सामुदायिक. ही वस्तुस्थिती ध्यानात घेता खलिस्तानच्या मागणीसाठी पाकिस्तानच्या मागणीच्या धर्तीवरच या राष्ट्राला प्रत्यक्ष युद्धाचेच आव्हान देणाऱ्या नि त्यासाठी शस्त्रास्त्रांच्या साठ्यापासून तो अनैतिक घटनांचा आधुनिक नरकासुराचाच अड्डा बनलेल्या त्या सुवर्णमंदिराला पावित्र्याचे प्रशस्तीपत्र देणारे त्यातून कसे सुटणार? तथापि, तो भस्मासूर या राष्ट्राला घातक ठरू पाहताच त्याला नष्ट करण्याचे धैर्य पंतप्रधान श्रीमती गांधींनी दाखविले. आणि त्यासाठी स्वतःचे बलिदानही दिले, तथापि, त्या बलिदानाचे काही सोयरसूतक या देशांतील त्या विपक्षी म्हणविणाऱ्या राजकारण्यांना दिसत नाही. अशाच प्रकारे सतत अस्थिर वातावरण देशात वावरत असावे नि त्याचा लाभ आपल्याला सत्ता संपादनासाठी मिळावा एवढीच अपेक्षा बाळगणारांवर त्याचा अन्य कोणता परिणाम होणार? खालिस्तानच्या राष्ट्रघातकी मागणीची आग पूर्णपणे विझली आहे असे म्हणतां येत नाही. ती आज ना उद्या आणखी कोणाचा तरी बळी घेणार हे निश्चित होते. आपले नवे तरूण पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जिवाला धोका असल्याचे बोलले जात होते. कारण ती आग शमविण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न होता. त्यासंबंधात अकाली दले नि केंद्रशासन यांच्यात त्यांच्यामुळेच वातावरण निवळले. पण नावडतीचे मीठच अळणी अशी भूमिका असलेल्या निव्वळ सत्तापिपासू राजकारणाला तो तितकासा मानवलेला दिसत नव्हता. कारण त्यामुळे त्यांचा धंदाच बसला होता! पाकिस्तान निर्मितीला यापैकी किता जणांनी विरोध केलेला होता?

फाळणी टाळण्याचे प्रयत्न

पाकिस्तानचा स्वतःच निर्माण करून पोसलेला मुस्लीम लीगचा भस्मासूर आवरण्याचे गांधीजींचे काही चिन्ह दिसेना तेव्हा अन्य क्षेत्रांतून देशभक्तीच्या भावनेने नि राष्ट्रहित बुद्धीने त्यातील राष्ट्रघातकी विष काढून टाकण्याचा जो काही प्रयत्न झाला, त्यालाही स्वतः गांधीजी किंवा त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने कोणत्याही प्रकारे सहकार्य न देता प्रत्यक्षात विरोधच केला असे स्वतः इतिहास सांगतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नेतृत्वाखाली निदान पक्षी दहावर्षे आधीपासून तरी हिंदुमहासभेने त्या धोक्याची सूचना देवून जनजागृतीचा प्रयत्न केला. पण या देशाच्या दुर्देवाने तो अपेक्षा ठरला. तेव्हा फाळणी विरोधी आंदोलन थाटून

तिने आत्मयज्ञही केला. त्याचा परिणाम म्हणून कोणत्याही प्रकारचा प्राथमिक स्वरूपाचा पुरावा, हाती असलेल्या सत्तेचा सर्वतोपरी उपयोग करूनही, उपलब्ध होत नसतानाही गांधी वधाच्या कटात स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या देशभक्ताला गोवून त्यांची कीर्ती कलंकित करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. माधवदास वधवानी

शेवटचा वैयक्तिक प्रयत्न करणारे निघाले ते डॉ. माधवदास वधवानी. ते १९३७ ते ४२ या कालखंडातील पंजाब मंत्री मंडळाचे एक सदस्य होते. वीर सवारकर आणि बॅ. जीना यांच्याशी त्यांचे पूर्वापार संबंध होते.... [जीना व] त्यांच्याच बोलण्यावरून डॉ. माधवदास वधवानी कराचीहून १९४३ च्या ऑगस्ट मध्ये मुंबईला आले. आणि जीना सावरकर भेटीचे प्रयत्न सुरू झाले. .....सावरकरांनी निरोप दिला की, जीना जर हिंदुस्थानच्या फाळणीचा तसेच केंद्र शासनातील समान प्रतिनिधित्वाचा आग्रह सोडून देण्यास सिद्ध असतील तर मी त्यांची भेट घेण्यास सिद्ध आहे! ..... जीनांनी सावरकरांच्या अटी मान्य असल्याचे कळविले....ती वार्ता बाहेर झिरपली आणि कुणातरी खाकसार तरूणाने बॅ. जीनांवर त्यांच्या निवासस्थानी हल्ला केला. वाचलेल्या जिनांनी भेट पुढे ढकलल्याचे घोषित केले. पण ती भेट पुन्हा कधी झालीच नाही.

बॅ. जीनांचा पिंड

बॅ. महमदी अली जीना हे मूळ कट्टर राष्ट्रवादी. ते स्वतःला लो. टिळकांचे शिष्य म्हणवित. १९१९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंट ने नेमलेल्या समितिसमोर साक्ष देताना त्यांनी, "लखनौ संधीपेक्षा बंगाली मुसलमानास अधिक काही मिळण्यास आपला विरोध आहे. या देशात राष्ट्रवादी म्हणवून घेण्यास आपणास अभिमान वाटतो. मुसलमानांचे स्वतंत्र प्रतिनिधित्व नष्ट होईल. तो सुदिन, तसेच हिंदु मुसलमानातील द्वंद्व संपून ते एकात्म असल्याचे दर्शन घडविणारा सुदिन शक्यतो लौकर उगवावा असे मनापासून वाटत असल्याचे" सांगितल्याची नोंद मिळते. टिळकांच्या पश्चात देशाच्या राजकारणाने जो वळसा घेतला त्यात खिलाफत चळवळीची भर पडली आणि तिला विरोध करणाऱ्या जीनांसारख्यांवर बहिष्कार टाकला गेला, त्यांच्यात पाकिस्तानी भस्मासूर निर्माण झाला.

आता हा शोधही आवश्यक

गांधीवादी कॉंग्रेसने स्वातंत्र्यवीर सावरकर आणि हिंदुमहासभा यांच्याशी मांडलेला उभा दावा ध्यानात घेता सावरकर-जिना भेटीच्या संदर्भातील बॅ. जीनावरील हल्ल्यावरच थांबले याचे आश्चर्य वाटते. लोंगोवाल हत्या प्रकरणी परकी हात असल्याचे बोलले जाते तसेच ते पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी हत्येच्या संबंधातही. पण ज्या देशाला जगातील प्राचीनतम अशा श्रेष्ठ संस्कृतीचा वारसा, विशाल भूप्रदेश, सहाय्यकारी निसर्ग नि प्रचंड जनशक्ती तसेच

वैभवसंपन्न असा इतिहास लाभलेला असतानाही परकी सहाय्यावरच जगण्यात नि त्यांत आंतरराष्ट्रीय महती मानण्यात धन्यता वाटते त्या देशाच्या राजकारणात परकी हस्तक्षेप प्रभावी नसेल तर ते एक महदाश्चर्य ठरेल नाही काय? हा सारा इतिहास पाहता फाळणी टाळण्याच्या प्रयत्नातील प्रकरण बॅ. जीनांवरील हल्यावरच थांबले याचे आश्चर्य वाटले. त्या हल्ल्यातील तो तरूण खाकसारच होता की, अन्य कोणी होता नि त्याच्या पाठीशी या देशातील काही राजकारण होते की काय, याचाही आता नव्याने शोध घेणे आवश्यक वाटते.

* दि. १८ ऑक्टो. १९८५
श्री संत लोंगोवाल यांच्या हत्येनंतर लिहिलेला लेख



१६. विषाची परीक्षा कशाला घ्यायची?

"अल्पसंख्यांकांच्या कल्याणाकरीता (म्हणजे खुशामती साठी!) पंतप्रधानांनी केलेल्या पंधरा कलमी सूचनेनुसार पोलीस भरतीच्या वेळी, अल्पसंख्यांकांचा विशेष विचार करण्याचे धोरण राज्यात अवलंबिले जात आहे. यंदा एप्रिल ते जून (१९८७) या तीन महिन्यात त्या धोरणानुसार राज्यपोलीस दलात चौतीस मुस्लीम व एक ख्रिस्ती अशा अल्पसंख्यांक उमेदवारांना बढती देण्यात आली. तसेच छत्तीस मुस्लिम व आठ ख्रिस्ती उमेदवारांची दलात थेट भरती करण्यात आली." अशी माहिती एका सरकारी प्रत्रकात देण्यात आल्याचे दैनिक महाराष्ट्र टाईम्सच्या दि. २२ नोव्हेंबर १९८७ च्या शहर आवृत्ती अंकात पृष्ठ क्रमांक सहा वर प्रकाशित झाले आहे.

'मुखमे सर्वधर्म समभाव'
पण प्रत्यक्षात अल्पसंख्यांकांची खुशामत!

वास्तविक आपल्या घटनेनुसार शासनाने सर्वधर्म समभाव धोरण सतत घोषित केले आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र सत्तेसाठी आवश्यक असलेल्या एकगठ्ठा मतांच्या लालसेने भारतातील अल्पसंख्यांक जाती जमातीचे लांगूलचालन केले जाते! त्यातूनही देशातील मुस्लिमांबद्दल काँग्रेसने स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पासून देश घातकी खुशामतीचे विशेष धोरण प्रकर्षाने अवलंबिलेले आढळते.

स्वातंत्र्य लढयामध्यें ज्या 'वंदे मातरम्' राष्ट्रगीतातील 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय घोषणेसाठी देशभक्तांनी ब्रिटीश शासनाकडून चाबकाचे फटके खाल्ले, कारावास भोगला, आणि अनेक मृत्यु दंडाची शिक्षा झालेल्या क्रांतीकारकांनी फाशी जाताना 'वंदे मातरम्' अशी अखेरची घोषणा केली त्या स्वयंभू राष्ट्रगीताची काही कडवी केवळ मुस्लिमांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून काँग्रेस पक्षाने गाळली! तेव्हा पासून वंदेमातरम् ची केवळ पहिली दोनच कडवी राष्ट्रगीत म्हणून काँग्रेस पक्षीय अधिवेशनात आणि सभामधून म्हटली जाऊ लागली.

अत्याचारी आक्रमक मुस्लिम दंगली पुढे नमून काँग्रेस ने केवळ मुस्लिमांना प्रसन्न करण्यासाठी समस्त हिंदु जनतेला अखंड भारताचे स्वातंत्र्य मिळविण्याचे दिलेले लेखी आणि जाहीर वचन, १९४५ - ४६ साली ब्रिटीशाकीत भारतातील "मध्यंतर निवडणूका" जिंकल्या नंतर, पाकिस्तानच्या निर्मितीला मान्यता देवून मोडले! जगाच्या इतिहासात कोटयावधी जनतेचा असा घोर विश्वासघात अन्यत्र कधीही केला गेला नाही!

खंडीत भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तारूढ झालेल्या काँग्रेसने सतत मुस्लिम आणि ईसाई अल्पसंख्यांकांना विशेष सवलती, विशेष अधिकार, हिंदु हितावर म्हणजेच राष्ट्र हितावर निखारे ठेवून बहाल केले! वास्तविक शासन यंत्रणेत केवळ गुणवत्तेला स्थान हवे, आणि गुणवत्ता यादीतील क्रमांक एक चा गुण म्हणजे देशभक्ती होय. राष्ट्रनिष्ठा ही गुणवत्ता

यादीतील आधारभूत शाला असली पाहीजे. आजतागायत जगातील सर्व देशांमध्ये हा नियम कसोशीने पाळला जातो. रशिया आणि चिन ही दोन्ही कम्युनिस्ट राष्ट्रें असली तरी एखाद्या चिनी माणसाला रशियाचे पंतप्रधान होण्याची संधी कधीच दिली जाणे शक्य नाही, तसेच एखाद्या रशियन व्यक्तीला चीन मधील सामान्य नगराच्या पालिकेचे अध्यक्षत्वही बहाल केले जाणे असंभव! परंतु भारत हा असा एकमेव दुर्दैवी देश आहे की, जेथे हिंदु जनतेच्या माथी मुस्लीम राष्ट्रपती, एकदा नव्हे तर दोनदा लादला जातो. १९७१ च्या भारत - पाक युद्धाच्या वेळी तत्कालीन मुस्लीम राष्ट्रपतीभवनातून भारतीय रणनीतीचा आराखडा, मुस्लिम राष्ट्रपतीच्या स्वकीयांकडून पाकिस्तानाला पुरविण्यात आल्याच्या वार्ता वृत्तपत्रात प्रकाशित झाल्या!

मुस्लिम समाजाच्या खुशामती साठीच देशातील सर्व नागरिकांना सर्वधर्म समभाव न्यायाने समान - नागरी कायदा लागू करण्या ऐवजी विवाह- संतती नियमन, (परिवार नियोजन) घटस्फोट, इत्यादी बाबतीत कुराणप्रणीत वेगळे कायदे लागू करण्यात आले! महिला मुक्ती आंदोलनातून केवळ मुस्लिम खुशामर्तीसाठी मुस्लिम महिलाना वगळण्यात आले. मुस्लिम महिला विधेयक लागू करून कॉंग्रेस शासनाने सर्वधर्म समभावाचे आपले धोरण किती मुस्लीम पक्षपाती आहे, हे सिद्ध केले. आणि सैन्यात व आरक्षी दलात (पोलीस विभागात) मुस्लिमांना व ईसाईना अधिक जागा केवळ त्यांच्या खुशामतीसाठी देणे सुरू करून हिंदु समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला आहे.

गुणवत्तेच्या आधारावर सैन्य व पोलीस भरती हवी

देशाचे स्वातंत्र्यच रक्षण करणाऱ्या सेना दलात केवळ गुणवत्तेवर आधारीत भरती करणे आवश्यक ठरते. तसेच तीच गोष्ट देशांतर्गत, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शांततेसाठी निर्माण केलेल्या आरक्षीदलांसही (पोलीस खात्यासही) लागू पडते. आणि गुणवत्ता यादीतील पहिल्या क्रमांकाचा गुण देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठा असावा, हे प्रारंभी म्हटल्याप्रमाणे अपरिहार्य ठरते. सेना पोलीस दलांमध्ये संशयास्पद राष्ट्रनिष्ठेची एकाही व्यक्तीची भरती केली जाऊ नये. विशेषतः देशातील मुस्लिमांनी आपली निष्ठा भारतापेक्षा आणि भारतीय घटनेपेक्षा इस्लाम आणि कुराणावर अधिक असल्याचे वारंवार ठणकावून सांगितले आहे. तशी वृत्ती बहुसंख्य मुसलमानांनी अनेकदा केल्याची प्रचिती आपण अनुभविली आहे. 'हसके लिया पाकिस्तान लडके लेंगें हिंदुस्तान' ही पाकिस्तानातीलच नव्हे तर भारतातील बहुसंख्य मुसलमानांची घोषणा आहे. 'पाकिस्तान तर आपले उघड शत्रु राष्ट्र आहे, परंतु भारतात कॉंग्रेस व जनता शासनाने विवाह व परिवार नियोजनाच्या कार्यक्रमांतून मुस्लिमांना सूट दिल्याने प्रमाणाबाहेर वाढलेल्या कोटयावधी मुस्लिम समाजाची, अपवाद वगळता, पाकिस्तान निष्ठा वारंवार प्रकट होत असते. हिंदुधर्मीयांवर काहीना काही कारण उकरून सशस्त्र हल्ले करण्याच्या योजना मुस्लिम दंगेखोरांनी सतत अमलात आणल्या आहेत. साध्या क्रिकेट सामन्याच्या निमित्याने येथील मुस्लिमांची पाकिस्तान निष्ठा वारंवार उघड झाली आहे.

अलिकडेच मुंबईत पैगंबर जयंतीच्या मिरवणुकीतील प्रचंड संख्येतील पैगंबर पुत्रांनी भारत ऑस्ट्रेलीया या मध्ये चालू असलेल्या सामन्यात भारताचा प्रत्येक खेळाडू बाद झाल्यावर फटाके वाजवून केवळ आनंदच व्यक्त केला नाही तर, त्या निमित्ताने हिंदू जनते बरोबरच हिंदु पोलीस अधिकाऱ्यांवरही प्राणांतिक आक्रमण केले! मुस्लिमांच्या या पाकिस्तान निष्ठेविषयी (भारत द्वेषाविषयी) सर्वसामान्य हिंदु जनतेने एकमुखी विरोधाच्या भावना व्यक्त केल्या. परंतु जनतापक्षाचा नेता आणि महाराष्ट्र विधानसभेतील विरोधी पक्षनेता निर्लज्ज निहाल अहंमदने मात्र "भारत हरल्याबद्दल भारतीय मुस्लीमांना आनंद वाटणे सहाजिकच आहे असे," उन्मत्त उद्‌गार काढले. इतक्यावरच न थांबता त्याने असा प्रतिप्रश्न केला की, जर पाकिस्तान - वेस्टइंडीज सामन्यांत पाकिस्तान पराभूत झाल्यानंतर भारतातील हिंदू फटाके वाजवून आनंद व्यक्त करतात, तर भारत हरल्यावर येथील मुस्लिमांनी आनंद व्यक्त केला तर काय बिघडते?"

निहाल अहंमदाच्या या बेमुर्वतखोर प्रश्नांतच येथील सर्व मुस्लीमांचे अतःकरण उघडे पडते. वस्तुतः सर्व भारतीय नागरिकांनी पाकिस्तानला शत्रुराष्ट्र समजायला हवे. येथील हिंदु समाज आणि अनेक वेळा सोयीने सत्तारूढ काँग्रेस पक्षही पाकिस्तान ला शत्रु राष्ट्र मानतो ही वस्तुस्थिती आहे. परंतु भारतीय भूमीवर जन्मून, भारतीय भूमीतील अन्न खाऊन, बहुसंख्य हिंदु कडून दिल्या गेलेल्या करांच्या रकमेतून मुस्लिमधार्जिण्या शासनाकडून सर्वप्रकारच्या सोयी सवलती व विशेषाधिकार उपभोगीत असलेल्या भारतातील मुस्लीम समाज पाकिस्तानला शत्रु तर मानत नाहीच, पण आपल्या निष्ठा भारतापेक्षा पाकिस्तानवर अधिक असल्याचे आपल्या देशद्रोही वर्तनाने वारंवार प्रकट करतो. भारताच्याच अन्नावर पोसलेल्या परंतु पाकिस्तानवर निष्ठा असलेल्या सर्व मुस्लिमांना खरे तर पाकिस्तानात हाकलून दिले पाहिजे! पण दुर्दैवाने आमचे नपुंसक शासन त्या ऐवजी, देशाचे स्वातंत्र्य व देशांतर्गत शांतता सुव्यवस्था रक्षिण्याचे दायित्व असलेल्या सेना आणि पोलीस दलात देशबाह्य निष्ठा असलेल्या मुस्लिमांची वाढती भरती हेतूतः जाणीव पूर्वक करीत असल्याचे पाहून या शासनाच्या देशहिताच्या प्रामाणिक कळकळीचीच शंका येते. सेना व पोलीस दलात मुस्लिम भरती करून विषाची परीक्षा घेण्यात देशाचे कल्याण मुळीच होणार नाही! शासनाच्या या देशघातकी धोरणाचा सर्व हिंदु समाजाने प्रखर विरोध केला पाहिजे, कारण हिंदु समाजाचे प्रतिनिधी म्हणून निवडून गेलेल्या महाराष्ट्र विधान भवनातील आमदारांनी - श्री. मनोहर जोशी आणि सुधीर जोशी - या दोन हिंदुत्वनिष्ठ आमदारांचा अपवाद वगळता पोलीस दलांतील वाढत्या मुस्लिम भरतीचा अजिबात विरोध केला नाही! तेव्हा देशहितासाठीच सर्वसामान्य जनतेचे शासनाच्या अल्पसंख्यांकांच्या खुशामतीच्या धोरणाला कठोरतम विरोध करणे कर्तव्य ठरते!

* सा. प्रज्वलंत २७ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर १९८७

डॉक्टर आंबेडकर यांच्या संदर्भात बॅरिस्टर सावरकर

प्राचार्या डॉ. सौ. सुहासिनी वंजारी


युगकर्त्या, कर्तृत्ववान महापुरूषांची एक पिढीच्या पिढीच भारताने जगाला दिली आहे. हे स्वातंत्र्यपूर्व भारताचे सर्वात मोठे वैशिष्ठय आहे. 'अज्ञान' आणि 'दास्यत्व' यांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या महापुरूषांचे स्वतंत्र व्यक्तित्व इतिहासामध्ये स्वतंत्रपणे आजही उभे आहे. स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर यांना क्रांतिकारकांचे मुकुटमणी असेच संबोधले जाते.

'वर्तमानकाळाला घडविण्यासाठी इतिहासाची प्रेरक सकारात्मक समीक्षा करणारा राष्ट्रपुरूष' अशा शब्दात बॅ. सावरकरांचे वेगळेपण नेमकेपणाने सांगता येते. त्यांच्या अनेक समकालीन नेत्यांशी त्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वैचारिक व तात्विक विरोध होता. इतिहासातील दोन महान व्यक्तित्वांच्या संघर्षाला इतिहासकार हात लावू पाहत नाही उलटपक्षी सरळ सरळ टोकाची भूमिका घेऊन दोघाना दोन ध्रुवाच्या अंतरावर मांडले जाते. बॅ. सावरकरांच्या संदर्भात डॉ. आंबेडकर हे असेच एक महान व्यक्तित्व दोघेही क्रांतिकारक असले तरी त्यांच्या जीवननिष्ठा व वैचारिक भूमिका भिन्न होत्या. त्यांचा वैयक्तिक आणि वैचारिक संघर्ष भारतीय इतिहासाने ठळकपने टिपला आहे. आज अनेक प्रश्नचिन्ह उभे असलेल्या स्वातंत्र्याच्या काळात त्यांच्या संघर्षाचा कोणता विधायक अन्वय आपण स्वीकारला पाहिजे हे आपल्या समोरचे खरे आव्हान आहे.

बॅ. सावरकर यांच्या व्यक्तित्वाचे डॉ. आंबेडकरांच्या संदर्भातील काही पैलूंचे विश्लेषण करून त्यातून कोणते सार्थ निष्कर्ष काढता येतील हे पाहण्याचा या लेखात मी प्रयत्न केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय दलितांच्या मुक्तिआंदोलनाचे प्रणेते होते. "अलौकिक प्रतिभावंत, सामाजिक न्यायाकरिता झगडणारा सेनानी आणि भारतीय घटनेचा शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकर यांचे स्थान अढळ तर आहेच परंतु त्याबरोबरच हिंदू समाजातील छळ करणाऱ्या सर्व प्रवृत्तीविरूद्धच्या बंडाचे प्रतीक म्हणून ते स्मरणात राहतील" असे पंडित नेहरूंनी त्यांचे सार्थ वर्णन केले आहे. 'सामाजिक न्याय' हा बहुधा त्यांच्या सर्वच क्रांतिकार्याचा व वैचारिक लेखनाचा आत्मा आहे. कारण सामाजिक अन्याय हा त्यांचा अपरिहार्य जीवनानुभव होता.

बॅ. सावरकर आणि डॉ. आंबेडकर या दोघानीही केवळ त्यांच्या अंगिकृत कार्याचा एक आवश्यक भाग म्हणून विपुल साहित्यनिर्मिती केली. सामाजिक समतेच्या आधारावर हिंदुसमाजाची पुनर्रचना करणे व भारताचे आधुनिकीकरण करणे हे या दोन्ही महापुरुषांचे स्वप्न होते. दोघेही विज्ञाननिष्ठ परंतु समग्र समाजाच्या धारणेसाठी धर्माची आवश्यकता मानणारे होते. डॉ. आंबेडकर हे मुळात समाजशास्त्राचा व विधीचा अभ्यास करणारे पंडित



▲ स्वातंत्र्यवीर तात्याराव यांचे डिसें. १९४९ रोजी नागपूर रेल्वे स्थानकावर भाषण त्यावेळेस उजव्या बाजूला उभे श्री. विक्रमराव.

▼ पत्नी सौ. स्वामिनी सावरकर ह्यांच्या सोबत श्री. विक्रमराव.



नागपूर येथे दि. २५ मे १९८३ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्यांचे अनावरण करताना सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांचे समवेत श्री. विक्रमराव. महाराष्ट्राचे तत्कालीन अर्थमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे, भाई भगवंतराव गायकवाड, प्रा. प्रमोद सोवनी, प्रा. वि. र. पुंडलिक, हे ही छायाचित्रात दिसत आहे. विक्रमरावांच्या अगदी पाठीमागे लाखे प्रकाशनचे श्री. चंद्रकांत लाखे आणि शिल्पकार सुधाकर बेलेकर हे ही झळकत आहेत.





मार्क्सवादी साहित्यिकांच्या सहवासात विक्रमरांव उजवीकडून सोवियत लँड नेहरू पारितोषिक विजेते गुजराथी साहित्यिक प्राजजी डोसा मराठी साहित्यिक डॉ. वि. स. जोग, सौ. शैलजा जोग, सौ. मानिनी श्री. हर्ष सावरकर आणि श्री. विक्रमराव. मुंबईतील रशीयन दुतावासात हे छायाचित्र घेतले आहेत.

आणि दलितांचे नेते होते. तर स्वा सावरकर हे मुळात राष्ट्रवादी क्रांतिकारक पण त्यांच्या संपूर्ण राजकीय कर्तृत्वाला समाजसुधारणेची झालर आहे व सामाजिक क्रांती हा तर त्यांच्या साहित्याचा गाभाच आहे. धर्म- नीती समाजकारण आणि राजकारण यांच्या एकात्मतेवर या दोन्ही विचारवंतांचा भर असला तरी त्यांच्या भूमिका वेगवेगळया होत्या. कारण दोघांचीही सामाजिक सांस्कृतिक प्रेरणा व परंपरा यात भेद आहे. सावरकर उच्चवर्णीय तर आंबेडकर दलित. याचाच परिणाम म्हणून सावरकरांचे जीवितध्येय हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य हे होते तर सामाजित परिवर्तन हे आंबेडकरांचे लक्ष्य होते. बॅ. सावरकर व डॉ. आंबेडकर हे दोघेही गांधीवादाच्या विरोधात असले तरी सावरकर हे परिवर्तनकारी हिंदुत्ववादी होते आणि आणि रूढ अर्थाने आंबेडकर हे हिंदुधर्माच्या कालबाह्य व बुरसटलेल्या परंपरांच्या विरोधी होते. खरे म्हणजे डॉ. आंबेडकर हे चातुर्वर्ण्याच्या बैठकीच्या विरोधी होते. आंबेडकरांच्या धर्मातराला केवळ पंथातर असे संबोधणाऱ्या सावरकरांची व आंबेडकरांची धर्माची संकल्पनाही वेगवेगळी होती. म्हणूनच त्यांच्या सामाजिक समस्येविषयीच्या भूमिकांमध्ये विरोध दिसून येतो. हे दोन्ही महापुरूष वैयक्तिकरित्या देशाच्या राजकारणात व समाजकारणात प्रभावी असले तरी त्यांचे एकंदर कार्य त्यांच्या सोबत असलेल्या असंख्य कार्यकर्त्यांचा समूह व अनुयायांचा समाज आपापल्या परीने निष्ठेने मानतो म्हणूनच त्यांच्यानंतर सावरकरवाद व आंबेडकरवाद हे स्वतंत्रपणे रूजले. बॅ. सावरकर आणि डॉ. आंबेडकर यांच्या कार्यातून 'सावरकरवाद' व 'आंबेडकरवाद' यांना छेद देणारा नवा समग्र क्रांतीचा विचार सापडतो का हे शोधण्याची गरज आज आहे.

डॉ. आंबेडकर जेव्हा जातिभेद आणि अस्पृश्यता या विषयी अस्पृश्य प्रबोधन, संघटन व मोर्चेबांधणी करीत होते; त्याचवेळी सावरकर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत अस्पृश्यताविरोधी मोहिम चालवित होते. दोघेही वर्तमानपत्राच्या माध्यमातून एकमेकांच्या चळवळीचे समर्थन करीत होते. सावरकरांच्या दृष्टीने हिंदुराष्ट्राच्या निर्मितीसाठी अस्पृश्यता निर्मूलन हे साधन होते तर आंबेडकरांच्या दृष्टीने अस्पृश्यता जातिभेद निर्मूलन हेच साध्य होते आणि हिंदुधर्मचिकित्सा हे साधन होते.

सन १९२४ च्या जानेवारीत सावरकरसंची अंदमानातून जन्मठेपेच्या शिक्षेतून सुटका झाली आणि १९२४ च्या मार्च मध्ये आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारणी सभा,' या संस्थेची स्थापना केली. सावरकर व आंबेडकर भारताच्या सामाजिक क्षेत्रात एकाच वर्षी कार्यरंभास प्रवृत्त झाले हा योगायोगच मात्र या दोघांनाही एकाच व्यासपीठावरून बोलण्याचा योग कधीच आला नाही. सन १९२९ मध्ये एकदा रत्नागिरी येथे विठोबाच्या देवळात सावरकरांनी डॉ. आंबेडकरांना शेकडो नागरिकांच्या स्वाक्षरीने भाषणाचे निमंत्रण धाडले होते. तसेच रत्नागिरीचे कीर मंदिर जेव्हा अस्पृश्यांसाठी उघडे झाले तेव्हाही निमंत्रण धाडले होते पण दोन्ही वेळा आंबेडकरांना कामाच्या व्यापामुळे हजर राहणे जमले नाही. वर्तमान पत्रांतून या काळात दोघांनीही एकमेकांच्या कार्याची खूपच प्रशंसा केल्याचे दिसून येते.

"दलित वर्गाच्या प्रतिनिधिच्या जागेसाठी डॉ. आंबेडकरांसारखी दुसरी कार्यक्षम व्यक्ती ब्रिटिश सरकारला सापडणे शक्य नाही." असे उद्‌गार काढणाऱ्या सावरकरांना आंबेडकरांची अस्पृश्यता निर्मूलन कार्यामागील भूमिका तितकीशी मान्य नव्हती. सामाजिक सुधारणा की राष्ट्रीय चळवळ, तसेच विवेकनिष्ठा की पुनरूज्जीवनवाद या स्वरूपातील टिळक आणि आगरकर यांच्यातील विरोधाचीच परंपरा सावरकर आणि आंबेडकर यांच्यात दिसून येते. बहुसंख्य दलितांचा आत्मोद्‌धार झाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नव्हता, ही आंबेडकरांची बाजू सावरकर मान्य करीत होते. सावरकरांची सुधारणेची भूमिका हिंदुराष्ट्रवादी वास्तववादी नि क्रांतिकारक होती. जातिविहीन हिंदू समाजाची पुनर्निर्मिती करून सामर्थ्यशाली हिंदुराष्ट्र उभारणी हेच त्यांचे ध्येय होते.

'हिंदुत्व ' चा स्वीकार आणि नकार यातूनच बॅ. सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यामागील भूमिकांमध्ये मतभेद असल्याचे लक्षात येते. जातिभेद, अस्पृश्यता, धर्म, राष्ट्र, स्त्री या संदर्भातील सावरकरांच्या विचारांची मांडणी आंबेडकरांच्या हिंदुधर्मावर जुनाट व परंपरावादी विचारांवरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवरच झालेली आहे.

डॉ. आंबेडकरांना चातुर्वर्ण्य व जातिभेद हेच हिंदू समाजाचे महत्त्वाचे वैशिष्टय वाटते. चातुर्वर्ण्याची कल्पना वेदांइतकीच जुनी आहे, मग आणखी सनातन धर्म तो कोणता? असा त्यांचा प्रश्न आहे. 'भारतातील जाती' या ग्रंथात त्यांनी हिंदू समाजाची घटना व जातिव्यवस्था एकजीव असून याला ब्राह्मणांची कुटिलताच कारणीभूत आहे असे विधान केले आहे. परंतु बॅ. सावरकरांना चातुर्वर्ण्य म्हणजे "निःश्रेयसाच्या मार्गावरील वैभवशाली अभ्युदय साध्य करण्याकरिता स्पर्धाविरहीत कार्यविभागणीच्या व परस्पर सहाय्याच्या तत्त्वावर घातलेला सामाजिक संघटनेचा पाया" असे वाटते. "हिंदुधर्मीयांनी हिंदुराष्ट्राच्या हिताच्याच बुद्‌धीने जन्मजात जाति भेदाची प्रथा निर्माण केली," असे ते म्हणतात. अर्थात हा सर्व विचार करताना सावरकर हिंदुधर्म व हिंदुत्वाची स्वतःची वेगळी व्याख्या गृहीत धरतात. व हिंदुत्व या निष्ठेला सुसंगत अशा प्रकारचा सांस्कृतिक आधार ते घेऊ पाहतात. पण त्यामुळेच सावरकरांचे युक्तिवाद शास्त्रीयदृष्टया वेगळे ठरतात. आंबेडकरांच्या संपर्ण मांडणीत अनुवंशशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास यांचाच तर्कशुद्‌ध आधार दिसतो हे मान्य करावे लागते.

बॅ. सावरकरांचा "हिंदुत्वाचा " स्वीकार हा एका आदर्शाच्या पातळीवर राहिलेला दिसतो, तर डॉ. आंबेडकरांचा हिंदुत्वाचा नकार हा एक कठोर सामाजिक वास्तवाच्या रूपात दिसतो. अस्पृश्य हे हिंदुधर्मीय होते. हिंदूची सामाजिक अस्मिता ही जातीशी निगडीत आहे. वरिष्ठ वर्गाने आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी लोकांच्या जातिनिष्ठेचा पुरेपुरे उपयोग करून घेतला. हिंदू धर्मातील सामाजिक विषमतेचे मूळ जातिसंस्थेत आहे, आणि या विषमतेची घृणास्पद परिसीमा अस्पृश्यतेत झाली आहे. हे आंबेडकरांचे जातिविषयक विचार सावरकरांना पूर्णपणे अमान्य आहेत. परंतु याचा अर्थ त्यांनी चालविलेली अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ विफल होती असे म्हणता येत नाही. उलट ती जास्त व्यवहार्य होती व

यशस्वी झाली. 'हिंदु समाज' म्हणजे 'एक राष्ट्र' या जाणिवेतून त्यांनी सहभोजन, मंदिरप्रवेश व शुद्धी चळवळीतून केलेले कार्य हिंदूंच्या एकीकरणाला पोषकच ठरळ.

"माझा देवावर विश्वास नाही," असे डॉ आंबेडकर स्पष्ट म्हणतात. त्यांनी स्वीकारलेल्या बौद्ध तत्त्वज्ञानातही ईश्वराची जागा नीतीने घेतली आहे. धर्म हा मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांना व्यापून राहिलेला असतो. असे त्यांचे मत होते. खरा धर्म हा समाज व शासन यांचा आधार असतो या एडमंड बर्क्च्या मताशी ते सहमत होते. आंबेडकरांची देव- धर्माची कल्पना मानवतावादाशी जवळची होती तर देव- धर्म आणि धर्मग्रंथ या सर्व गोष्टींना सावरकर बुद्धिनिष्ठेच्या कसोटया लावतात. सावरकरांची देव कल्पना धार्मिक आध्यात्मिक अंगापेक्षा सामाजिक किंवा राष्ट्रीय अंगासच जास्त महत्त्व देते. अज्ञानातून, बुद्धिहीनतेतून निर्माण झालेल्या देव कल्पनांना त्यांचा विरोध आहे. मानवी जीवनाचा आणि विश्व नियंत्रक शक्तीचा कुठलाही संबंध नाही. म्हणूनच देवाच्या भाबडया, मूर्ख-कल्पनेवर आधारीत झाडांच्या पूजा, यज्ञ, व्रते सावरकरांना मान्य नाहीत. पण त्यांची धर्माच्या सनातनत्त्वाची कल्पना वेगळी आहे. खरा धर्म म्हणजे विश्वातील चिरंतन शाश्वत सत्त्य होय. प्रत्येक धर्मात जेजे चिरंतन सत्त्य असेल ते ते स्वीकारण्यातच सर्वांचे हित आहे. विश्वाचा हा सनातन धर्म त्यालाच आम्ही हिंदू लोक सनातन धर्म म्हणतो, असे सावरकरांना वाटते.

सावरकरांच्या देव,धर्म या संदर्भातील कल्पनांना हिंदुत्त्वाचीच प्रेरणा आणि तिच मर्यादा आहे. हिंदूचा धर्म तोच खरा सनातन धर्म हे सावरकरांचे विधान त्यांच्या बुद्धिनिष्ठेविरूद्धचे आहे. त्यांच्या दृष्टीने हिंदू हे स्वतःच राष्ट्र आहेत व मुसलमान हे अहिंदु आहेत. हिंदूधर्मच मनुष्यजातीस कल्याणप्रद आहे यावर त्यांचा ठाम विश्वास दिसतो. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेला त्यांच्या सामाजिक विचारात केवळ साधनाचे स्वरूप येते. याउलट धर्माची सामाजिक व आध्यात्मिक गरज मान्य करूनही आंबेडकरांची धर्मसंकल्पना मानवी संस्कृतीमधील उत्क्रांत मूल्यांवर अधिष्ठित आहे. सावरकरांचा धर्मविचार हा त्यांच्या तत्त्वज्ञान, सामाजिक विचार राष्ट्रवादी विचार व त्यांच्या चळवळींशी सुसंगत ठरतो, पण संस्कृतीशी बद्ध नसल्याने आंबेडकरांच्या विचारात वेगळेपणा आहे.

बॅ. सावरकरांनी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराला खूप विरोध केला. त्यांना अखिल हिंदुराष्ट्राच्या सामर्थ्यासाठी संख्याबळ हवे होते. धर्मांताराविरोधी लेखातून त्यांनी अस्पृश्य इतर धर्मात गेले तरी त्यांची स्थिती बदलणार नाही, इतर धर्मातही अनिष्ट रूढी आणि अंधश्रद्धा आहेत, विषमता आहे, बौद्ध धर्मातही भाकडकथा आहेत असे साधार दाखविले. एका लेखात तर त्यांनी, 'आंबेडकरांचे चिरंजीव परत हिंदूधर्मात येतील' अशी भविष्यवाणीही केली. आंबेडकरांना मात्र धर्मांतराशिवाय पर्याय दिसत नव्हता. पण माझ्या धर्मांतरामुळे देशाहिताला बाधा येणार नाही, भारतीय संस्कृतीची एकात्मता भंग पावणार नाही याची मी काळजी घेईन, असे त्यांनी आश्वासन दिले होते. बौद्ध धर्माच्या स्वीकाराने त्यांनी ते पाळलेही. या पार्श्वभूमीवर केवळ आंबेडकर हिंदू धर्माचा त्याग करीत आहेत म्हणून बौद्ध धर्मावर प्रतिकूल टीका

करण्याची सावरकरांची भूमिका मान्य होण्यासारखी नाही.

डॉ. आंबेडकरांसारख्या नेत्याशी बॅ. सावरकरांचा झालेला संघर्ष हा केवळ एका कारणासाठी होता. ते कारण म्हणजे सावरकरांची राष्ट्रनिष्ठा. अर्थात त्यांच्या मते हिंदू हेच राष्ट्र आहेत श्री. द.न. गोखले म्हणतात, "सावरकर धर्माप्रमाणे, पोथीप्रमाणे किंवा शास्त्राप्रमाणे राष्ट्रहित ठरवीत नाहीत तर राष्ट्रहिता प्रमाणे धर्म ठरवितात. राष्ट्रहित व मनुष्याचे हित यांचा उल्लेख सावरकर जोडीने करतात. आणि हिंदू धर्माच्या माध्यमातून मनुष्यहिताची हिंदुराष्ट्राशी सांगड घालतात. त्यांच्या धर्माचे नि राष्ट्राचे तोंड हिंदू राष्ट्राकडे नि हिंदू राष्ट्राचे तोंड मानवतेकडे आहे. सावरकरांनी हिंदू राष्ट्राच्या हिताची मानव जातीच्या हिताशी सांगड घातली होती पण जीवनकलहात हिंदू जातीने प्रथम टिकावे. याविषयी ते दक्ष होते. म्हणूनच त्यांनी आपल्या हिंदुत्ववादाला राष्ट्रवादाची बैठक दिली" (स्वा. सावरकर: एक रहस्य: मौज प्रकाशन, मुंबई १९८५)

डॉ. आंबेडकरांनी केलेली धर्मचिकित्सा, अस्पृश्यता निवारणाच्या चळवळी व राज्यघटनेची निर्मिती यातून त्यांच्या विवेकनिष्ठेचा प्रत्यय येतो. त्यांच्या विवेकनिष्ठेला बुद्धाच्या विवेकवादी विचारांचा आधार होता. विवेकनिष्ठ आंबेडकरांच्या चळवळीचे विचारांचे केंद्र हिंदूधर्माची सुधारणा वा हिंदू समाजाची पुनर्घटना हेच होते. याच गोष्टीचे नकारात्मक रूप म्हणजे त्यांचे धर्मांतर होय. सावरकरांच्या मते धर्मांतर हे राष्ट्रांतर होय. हिंदू समाजाच्या अपकर्षास कारणीभूत झालेल्या जन्मजात जातिभेदाचा उच्छेद त्यांना आद्य कर्तव्य वाटते. त्यासाठीच ते विज्ञाननिष्ठेचा स्वीकार करतात. परंतु आंबडेकरांची विवेकनिष्ठा व सावरकरांची विज्ञाननिष्ठा यात फरक आहे. सावरकर हे उपयुक्ततावादी आहेत. अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी ते विज्ञाननिष्ठेचा वापर करतात तर आंबेडकर जीवननिष्ठेच्या रूपात विवेकवादाला स्वीकारतात.

बॅ. सावरकरांच्या जीवनकार्याचे व विचारांचे ध्येय, हिंदुत्व होते. हिंदुराष्ट्राच्या निर्मितीसाठी ते बुद्धिनिष्ठा, विज्ञाननिष्ठा व ऐहिकता यासारखी मूल्ये साधन म्हणून स्वीकारतात. पोथीनिष्ठा सोडून यंत्रयुगाचे स्वागत करण्याचे आवाहन करतात. परंतु ही विवेकनिष्ठा इतिहासाकडे बघण्याच्या दृष्टीत दिसून येत नाही. असे कां झाले असावे? याचे एक उत्तर असे की, हिंदुत्वाच्या नकारातून आंबेडकरांनी पर्यायी मूल्यव्यवस्था स्वीकारली. स्वातंत्र्य समता आणि बंधुता, लोकशाही आणि बुद्धाचा विवेकनिष्ठ जीवनमार्ग स्वीकारला. याची सकारात्मक प्रतिक्रिया म्हणून हिंदुत्वाच्या स्वीकारासाठी सावरकरांनी इतिहासाची हिंदुत्वनिष्ठ समीक्षा केली व हिंदुराष्ट्राच्या सामर्थ्यासाठी विज्ञाननिष्ठेचाही स्वीकार केला. मौर्य काळाचा अपवाद वगळता हिंदूंचा इतिहास हा पराजयाचा इतिहास आहे. या आंबेडकरांच्या विधानावर सावरकरांनी आक्षेप घेतला होता. आंबेडकर मनुस्मृतीचे दहन करतात तर सावरकर जुने धर्म ग्रंथ उपयुक्त नसतील तर ते ऐतिहासिक दुवे म्हणून कोपऱ्यात जपून ठेवावे अशी भूमिका घेतात. याचे कारण शोधताना प्रसिद्ध चरित्रकार श्री. धनंजय कीर

म्हणतात, "आंबेडकरांच्या पिढ्यानपिढ्या मनुस्मृतीच्या गुलामगिरीखाली चिरडल्या गेल्या. त्यामुळे ते रूसोच्या घणाघाती त्वेषाने तिच्यावर हल्ला करतात. सावरकर जन्माने ब्राह्मण त्यांच्या पूर्वजांना गुलामगिरीची झळ लगली नव्हती. आंबेडकर ब्राह्मण असते नि सावरकर महार असते तर त्यांनी वेगळे वर्णन केले असते यात संदेह नाही."

बॅ. सावरकर आणि डॉ. आंबेडकर यांच्या वैचारिक संघर्षाचे मूळ कारण वरील पार्श्वभूमीतच दडले आहे. आंबेडकरांचे जीवितकार्य जसे जन्मतःच त्यांच्या वाटयाला आले होते तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा ही त्यांच्यावरील संस्कारातूनच झाली होती. बॅ. सावरकरांनी एका व्याख्यात हे मान्य केले आहे की, "अस्पृश्य समाजात जन्मल्यामुळे आंबेडकरांच्या कार्यात स्वभावतःच ना जो जिव्हाळा, जिद्द आणि कडवेपणा दिसून येतो तो आमच्यासारख्या सवर्णाच्या कार्यपद्धतीत कधीच आढळणार नाही." बॅ. सावरकरांचे भगुर, पुणे व रत्नागिरी येथील वास्तव्यात त्यांच्या सभोवतालचे वातावरण, व्यक्ती व चळवळी राष्ट्र प्रेमाने व हिंदू संस्कृतीने प्रेरीत झाल्या होत्या. त्यांचे सर्व कुटुंबच स्वातंत्र्याच्या ध्यासाने प्रेरीत झाले होते.

सावरकरांवरील राष्ट्र प्रेमाच्या या संस्काराचाच परिणाम त्यांच्या सामाजिक कार्यावर झालेला दिसतो.

बॅ. सावरकर आणि डॉ. आंबेडकर या दोन्ही विचारवंताचे सामाजिक कार्य आधुनिक भारताच्या निर्मितीप्रक्रियेतील महत्त्वाच्या घटनाआहेत. त्यांच्या कार्यामुळे भारतीय राजकारण व समाजकारणाला अनेक नवी वळणे मिळाली आहेत. दोघेही महाराष्ट्रीयन असल्याने महराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय जीवनावर दूरगामी परिणाम झाले. त्यांना मोठ्या संख्येने अनुयायी लाभले.

बॅ. सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्या अनुयायांनी सावरकरवाद व आंबेडकरवाद या संकल्पनांचा आविष्कार केला आहे. हिदुंत्वाचा अभिमान कायम ठेवून भौतिक प्रगतीसाठी नव्या ज्ञान-विज्ञानाला सामोरे जाण्यासाठी महाराष्ट्रात अनेक स्वयंसेवी संस्था उभ्या राहिल्या, त्यामागे सावरकरांची प्रेरणा आहे. अहिंदुच्या सामाजिक सांस्कृतिक व राजकीय वर्चस्वापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी हिंदुत्वनिष्ठ सावरकरांचा हिंदुत्ववाद स्वीकारणाऱ्या सावरकरवाद्यांची सामाजिक परिवर्तनाची भूमिका मात्र प्रत्यक्ष सावरकरांइतकी विवेकनिष्ठ नाही असे खेदाने म्हणावे लगते. आज देशातील समतेसाठी कार्य करणाऱ्या सर्व चळवळींना आंबेडकर ही एक जिवंत प्रेरणा वाटते. महाराष्ट्रातील तळागाळातल्या, दलितांच्या वस्तीतल्या माणसांनी संपूर्ण समाजव्यवस्थेत जे चैतन्य निर्माण केले आहे त्याला कारण आंबेडकरवादच आहे. परंतु आंबेडकरांना प्रेरणा मानणाऱ्या राजकीय पक्षांमध्ये गटागटाचे राजकारण सतत उद्भवत असल्याने सत्तेच्या स्पर्धेत त्यांना यश कधीच आले नाही.

शेवटी या दोन्ही द्रष्टया महापुरूषांच्या विचारांचा व कार्याचा आजच्या वर्तमानकालीन समस्यांच्या निराकरणासाठी काही उपयोग करता येतो का हे बॅ. सावरकरांच्या उपयुक्ततावादाच्या दृष्टीने तपासणेच श्रेयस्कर आहे, असे वाटते.

* * *

हिंदु धर्माची समन्वयनिष्ठ विश्वात्मकता

ले. डॉ. श्री. भा. वर्णेकर - प्रज्ञाभारती

भारताच्या धर्मजीवनात विद्वान शास्त्रज्ञ व अनुभवी संत अशा दोन प्रकारच्या महापुरूषांनी मार्गदर्शन केल्याचे दिसून येते. सामान्यपणे मनू, याज्ञवल्क्य यांच्यासारखे धर्मशास्त्रकारांच्या परंपरेतले महापुरूष हे शास्त्रज्ञ कोटीतले व बुद्ध, महावीर, ज्ञानेश्वर, तुलसीदास, कबीर यांच्यासारखे महापुरूष हे संत कोटीतले होते, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही, जगद्गूरू शंकराचार्य, ज्ञानेश्वर, यांच्यासारखे काही महापुरूष 'शाब्दे परे च निष्णातः' अशा उभयविध कोटीतल्ले होते. या तिन्ही कोटीतल्या महापुरूषांनी भारतीय धर्म व तत्वज्ञान या क्षेत्रात मोठे कर्तृत्व गाजविले आहे. आजचे भारताचे विशुद्ध धर्मजीवन हे त्या सर्व महापुरूषांच्या कर्तृत्वाचा परिपाक आहे असे म्हणता येईल.

विद्वान शास्त्रज्ञांसमोर जेव्हा जेव्हा धर्मविषयक समस्या उभ्या झाल्या, तेव्हा त्यांचे निरसन परंपरागत चालत आलेल्या धर्मग्रंथातील विधिनिषेधात्मक वचनांच्या आधारे त्यांनी केले. या उलट संत कोटीतल्या महापुरूषांजवळ काही विशिष्ट अनुभूती असल्यामुळे त्यांच्या वेळी निर्माण झालेल्या समस्याचे निरासन, त्यांनी नवीन मार्गदर्शन म्हणचेच 'समयोपदेश' करून केले. बहुधा जुन्या परंपरागत धर्मशास्त्राचा धिक्कार न करता, त्यांनी त्या शास्त्राची नवीन पद्धतीने मांडणी केली. सामाजिक रूढीनुसार पतित गणण्यात आलेल्या लोकांनाही त्यांचा योग्य तो आचारधर्म सांगून परमार्थप्राप्तीसाठी त्यांनी मार्गदर्शन केले. शास्त्री-पंडित आपल्या शास्त्रग्रंथाच्या आधारे पतिताला त्याच्या कृतकर्माबद्दल प्रायश्चित्त सांगत होते, पण ते त्यांना त्यांच्या अधिकारानुसार परमार्थप्राप्तीची एखादी नवीन प्रक्रिया शिकवू शकले नाहीत.

द्विविध समन्वय पद्धती-

ग्रंथनिविष्ठ विचार आणि प्रत्यक्षातला आचार यामध्ये विषमता उत्पन्न झाली तेव्हा शास्त्री-पंडितांनी आणि संतानीही समन्वयात्मकच मार्गदर्शन समाजाला केले. असे भारतीय धर्मजीवनाचे सिंहावलोकन करताना दिसून येते. तथापि या समन्वयामध्ये शास्त्रज्ञ आणि संत यांची प्रक्रिया वेगवेगळी दिसून येते. शास्त्री पंडितांना धर्माचा किंवा तत्वज्ञानाचा समन्वय करण्याचा प्रसंग आला, तेव्हा त्यांनी इतर मताचे गौणत्व दाखवून स्वतःच्या धर्म-संप्रदायाचा सिद्धान्तच श्रेष्ठ आहे हे आपल्या बुद्धिकौशल्याने सिद्ध करून दाखविले. या उलट संतानी आध्यात्मिक अनुभूतीला उपजीवक व इतर गोष्टींना उपजीव्य ठरवून समन्वय साधला आहे. हाच पंडितांच्या आणि संताच्या भूमिकेतील महत्वाचा भेद आहे. भिन्न भिन्न संप्रदायांचा अविरोध साधून परस्परांतील द्वेषभावाचा निरास करणारी समन्वयपद्धती धर्म व तत्वज्ञान यांचा अभ्यास करणाऱ्याच्या ठिकाणी असणे फार आवश्यक आहे.

यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः

ही वैशैषिक दर्शनकारांनी सांगितलेली धर्माची व्याख्या आजवर भारतात झालेल्या सर्व संप्रदायांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मान्य आहे. तसेच धर्म, अर्थ, काम व मोक्ष न चारही पुरूषार्थ प्राप्त करणे हे मानवी जीवनाचे ध्येयही सर्व विचारवंतांना मान्य आहे. परंतु विविध धर्मसंप्रदायांत आचार व विचार [किंवा कर्मकाण्ड व ज्ञानकाण्ड] यांमध्ये भिन्नता आहे. ईश्वराच्या स्वरूपासंबंधीदेखील वाद आहेत. तथापि संत दृष्टीच्या विचारवंतानी व्यक्ति-व्यक्तीच्या अधिकारभेदाचा विचार करून व आध्यात्मिकतेवर भर देऊन, समन्वय निर्माण करण्याचा वारंवार महान प्रयत्न केला. म्हणूनच भारताच्या धर्मजीवनात इतरत्र कोठेही दृष्टीस न पडणारी परधर्म सहिष्णुता नव्हे, सर्वधर्म- समादर वृत्ती प्रामुख्याने दिसून येते.

भारतीय व अभारतीय धर्म

भारतीय धर्म आणि अभारतीय धर्म यांमध्ये महत्वाचा भेद कोणता? या प्रश्नाचे उत्तर असे सांगता येईल की, भारतातील सर्व धर्म-संप्रदायांनी लौकिक अभ्युदय व आत्यंतिक निःश्रेयस म्हणजे मोक्ष, कैवल्य, निर्वाण, किंवा अमृतत्व या उभय अंगाचा विचार केला आहे, या उलट अभारतीय धर्मसंप्रदायांनी लौकिक अभ्युदय आणि स्वर्गीय सुखोपभोग यांचाच प्रामुख्याने विचार केला आहे. त्यांच्या तत्वज्ञानामध्ये, सर्व भारतीय तत्वज्ञानामध्ये प्रामुख्याने अभिप्रेत असलेला मोक्षाचा किंवा निर्वाणाचा विचार नाही. काही भारतीय धर्ममतातही शुद्ध आचार आणि सामाजिक सुव्यवस्था यांनाच अधिक महत्व आहे. मोक्षपर तत्वज्ञानाचा सखोल विचार त्यांनी केलेला नाही. याचे कारण त्या धर्ममतांच्या महान प्रवर्तकाभोवती जे धर्मजिज्ञासू जन गोळा झाले, त्यांच्या ठिकाणी उच्च तात्विक विचार ग्रहण करण्याची पात्रता नव्हती असे दिसून येते. आज 'हिंदुधर्म' या शब्दाने ज्या भारतीय धर्माचा निर्देश करण्यात येतो त्यामध्ये शुद्ध आचार, सामजिक सुव्यवस्था व श्रेष्ठ आध्यात्मिक ज्ञान या धर्माच्या विविध अंगाची उत्तम प्रकारे सागंड घालण्यात आली आहे. कर्म, भक्ती, ज्ञान या विविध साधनांची अधिकारानुरूप प्रतिष्ठा राखण्यात आली आहे. आजवर मानवाच्या उद्धारासाठी ज्या असंख्य महापुरूषांनी विविध प्रकारे मार्गदर्शन केले त्यातील शाब्दिक मतभेद वगळून नीरक्षीर न्यायाने सारग्रहण केलेले आहे. तर्कआणि शब्द [आप्तवाक्य] या दोन्ही प्रमाणांची एकवाक्यता प्रमाणभूत मानण्यात आली आहे. आधुनिक प्रगत भौतिक विज्ञान देखील ज्याला धक्का देऊ शकत नाही, असे शाश्वत सत्यसिद्धांत या धर्माने अंगिकारलेले आहेत. वेदकाळापासून शतकानुशतके भारतीय धर्म व तत्वज्ञानात जी आंतर व बाह्य स्थित्यंतरे देशकाल परिस्थितीच्या प्रभावाने होत गेली. त्या सर्वांचा परिपाक म्हणजे आजचा हिंदुधर्म होय. इतिहासाच्या अनुरोधाने जे धर्मविषयाचे विवेचन आढळते त्यामध्ये 'हिंदु' या नावाचा धर्म कोठेही दिसत नाही. वास्तविक ऐतिहासिक काळात जसे विविध धर्ममतांचे संस्थापक, वा त्यांची थोर परंपरा व

त्या परंपरेने निर्माण केलेले वाङ्मय आढळून येते, त्याप्रमाणे 'हिंदु ' नामक धर्माचा संस्थापक त्याची परम्परा व त्या परंपरेचे निश्चित वाङ्मय कोठे आढळत नाही.

हिंदुधर्म -

भारतीय धर्मसंप्रदायाचे वैदिक धर्म व अवैदिक धर्म असे विभाजन करण्याची पद्धती आहे. तदनुसार वैदिक धर्माच्या किंवा श्रुतिस्मृति-पुराणोक्त धर्माच्या कक्षेत येणाऱ्या सर्व सम्प्रदायांच्या समूहाला अनुलक्षून 'हिंदुधर्म ' हा शब्द प्रयोग करण्याची प्रवृत्ती दिसते, पण ती योग्य वाटत नाही. याचे कारण भारताच्या हिंदुधर्माचे आधुनिक प्रणेते म्हणून, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. राधाकृष्णन् इत्यादी महापुरूषांची व्यापक धर्मदृष्टी पाहिली असता, त्यांच्या धर्मविचारात, बौद्ध-जैन इत्यादी अवैदिक धर्ममताबद्दल, वैदिक परंपरेतील धर्ममताइतकीच उत्कट आत्मीयता आहे. किंबहुना ख्रिस्ती व महंमदी यासारख्या अभारतीय मानण्यात येणाऱ्या धर्ममताबद्दलही तितकीच आत्मीयता आहे त्यामुळे 'हिंदुधर्म ' म्हणजे केवळ वैदिक परम्परेतील विविध धर्मपंथांचा समुच्चय ही कल्पना योग्य वाटत नाही.

वास्तविक हिंदू हे भारताच्या पुत्ररूप समाजाचे नाव आहे [ते कोणी दिले व त्याची निरूक्ती-व्युत्पत्ती काय या शुष्क वादात पडण्याची येथे आवश्यकता नाही.] या हिंदु समाजाच्या जीवनात जितके पंथ व संप्रदाय गेल्या कित्येक शतकांपासून निर्माण झाले, वाढले आणि यथाक्रम अस्तास गेले, त्या सर्वांच्या संस्कारातून जो धर्म आकारास आला, त्यांचा निर्देश करण्यासाठी 'हिंदुधर्म ' हा सर्वंकष शब्द गेल्या दोन तीन शतकांपासून विशिष्ट ऐतिहासिक व राजकीय पार्श्वभूमीवर उदयास आला. गेल्या शतकापासून तो विशेष प्रचारात आला आहे. याचे कारण १९ व्या व २० व्या शतकातील भारताच्या धर्मधुरिणांनी 'हिदुंधर्म ' या शब्दाचा अधिक प्रमाणात उपयोग करून विशिष्ट आचारविचाराचे प्रतिपादन केले आहे. धर्मविषयक ग्रंथास ज्या अनेकविध पंथोपपंथाचे पृथक विवेचन आढळते, त्या सर्वांच्या समन्वयातून आजचा हिंदूधर्म आकारास झाला आहे. राजकीय विचारसरणीचा अभिनिवेश विसरून हिंदुधर्माचा विचार करणाऱ्याला विद्यमान भारतीय धर्म व तत्वज्ञान याचे व्यापक व समन्वयात्मक स्वरूप लक्षात येईल.

धर्म, संप्रदाय, पंथ-

धर्मविषयक ग्रंथांत धर्म, संप्रदाय व पंथ या तीन शब्दांचा सर्वत्र वापर होता असतो. धर्म हा शब्द व्यापक अर्थी वापरला जात असून, धर्मान्तर्गत काही परिचित अंशावर अधिष्ठित असलेल्या संघटनेचा निर्देश करण्यासाठी संप्रदाय व एखाद्या अंशावर अधिष्ठित असलेल्या संघटनेचा निर्देश करण्यासाठी पंथ हा शब्द वापरण्यात येतो. उदाहरणार्थ, हिंदु धर्म हा शब्द व्यापक अर्थाचा वाचक आहे. हिंदुधर्मामध्ये कर्ममार्ग- ज्ञानमार्ग, उपासनामार्ग, योगमार्ग इत्यादी

विविध मार्ग किंवा पंथ आहेत. हे पंथ परस्परांपासून भिन्न असले तरी व्यापक हिंदुधर्मान्तर्गत कोणत्या तरी तत्वाला धरून आहे. सरोवरात पिण्याचे पाणी कितीही असले तरी तृषार्त मनुष्य आपल्या तृप्तीपुरतेच घेतो, तो सारे पाणी पिऊच शकत नाही. त्याप्रमाणे स्वतःला हिंदू म्हणविणाऱ्याला सर्व पंथाचे अध्ययन किंवा साधन करण्याची आवश्यकता नाही. आपल्या वंशपरंपरेने किंवा गुरूपरंपरेने प्राप्त झालेला पारमार्थिक आचार आणि स्वतःच्या बौद्धिक पात्रतेनुसार एखादे तत्वज्ञान यांचा स्वीकार केला की माणसाची धर्मजीवनात प्रगती होऊ शकते. धर्मांतराची किंवा संप्रदायांतराची आध्यात्मिक उन्नतीसाठी मुळीच आवश्यकता नसते. भारतीय धर्म व तत्वज्ञानात ही गोष्ट फार महत्वाची मानली आहे, धर्मांतर किंवा सम्प्रदायान्तर करण्यामागे आध्यात्मिकतेपेक्षा राजकारणाचा भाग अधिक असतो. धर्म हा सामान्यरूपाने सर्वच पंथोपपंथांना आधारभूत असतो म्हणून त्याचा कोणत्याही संप्रदायाशी किंवा पंथाशी विरोध नसतो. सांख्य, योग, न्याय, मीमांसा, वेदान्त ही दर्शने किंवा द्वैत अद्वैत ही मते परस्परांपासून कितीही भिन्न भिन्न असली, तरी ती सारी वेदमूलकच असल्याने, हे सारे दार्शनिक वैदिकच असतात. तसेच शैव, गाणपत्य, वैष्णव, इत्यादी आधिदैविक पंथांच्या मुळाशी कोणते तरी वेदवचनच प्रमाणभूत असते. महानुभाव इतर अचार मानीत नाहीत. पण कृष्णोपासना करतात. शीख निराकाराची भक्ती करतात. जैनांनी अहिंसा परमधर्म मानला आहे, बौद्धांनी पंचशीला वर भर दिला आहे. अशाप्रकारे सारे संप्रदाय व्यापक धर्माच्या एकेका अंशावर आधारलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यातील विरोध हा तत्वतः विरोधच नाही, तो विरोधाभास आहे. प्रत्येक व्यक्तीची कमी अधिक पात्रता लक्षात घेता धार्मिक जीवनात एकच आचार आणि एकच तत्वज्ञान असून भागणार नाही, तसे असल्यास सर्वांना परमार्थ साधणारच नाही. म्हणून एकूण समाजाच्या सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीने आचार - भिन्नता आणि तत्वज्ञान - भिन्नता असणे फार आवश्यक आहे. भारतीय धर्म आणि तत्वज्ञान यांच्या क्षेत्रात ती आपणास भरपूर आढळून येते. व्यक्तिमात्राची आत्मोन्नती हेच धर्माचे ध्येय आहे. ते सिद्ध करण्यासाठी भिन्न भिन्न व्यक्तींच्या किंवा समूहांच्या अधिकारानुरूप व्यापक धर्मातील तत्वज्ञानाचा थोडा थोडा संकोच करून निरनिराळे संप्रदाय, प्रवर्तित करण्यात आले आहेत. म्हणून संप्रदायामध्ये विविधता असली तरी विरोध असण्याचे कारण नाही. भारतीय धर्म जीवनात व तत्वज्ञानात हा अविरोध अति प्राचीन काळापासून आढळून येतो. तलवारीच्या जोरावर दुसऱ्या संप्रदायांचा नाश करून, स्वतःचा विशिष्ट संप्रदाय वाढविण्याचा प्रयत्न भारतातील कोणत्याही संप्रदायाने केला नाही, याचे कारण भारताच्या अतिप्राचीन तत्वज्ञांनी येथील समाजात रूजविलेली अविरोधाची किंवा समन्वयाची प्रवृत्ती होय. वैदिक तत्वज्ञानातील मायावादाने ही समन्वय प्रवृत्ती सर्व सामान्य भारतीयांच्या पचनी पाडली आहे. मायावादानुसार सारे जगच मायेचा पसारा असल्याने मिथ्या नामरुपात्मक विषयासाठी भांडण्यात धार्मिक भारतीयाला काही स्वारस्य वाटत नाही. परमेश्वराची निरनिराळी स्वरुपेसुद्धा मायामूलक

असल्याने, त्याच्या भिन्न रूपाचे अधिष्ठान असलेला मुख्य देव एकच आहे. त्यामुळे त्या मुख्य देवाची प्राप्ती करण्यात स्वारस्य आहे. अशी उत्तम समन्वयाची वृत्ती भारतात सर्वत्र पाहावयास मिळते.

समुद्राच्या एका लाटेत स्नान केले की संपूर्ण समुद्राचे स्नान घडते, त्या प्रमाणे कोणत्याही संप्रदायाची साधना केली तरी मुख्य धर्माची साधना घडते. म्हणून एका संप्रदायाने दुसऱ्या संप्रदाचा विरोध करण्योच प्रयोजन नाही, ही धारणा भारतातल्या धर्ममार्गी समाजात दृढमुळ झालेली असल्याने या देशातले भक्तीमार्गी संत भिन्न भिन्न उपास्य देवतांची व संतांची मनापासून स्तुतिस्तोत्रे गातात व सामान्य यात्रेकरू सर्व पंथोपंथांच्या मंदिरातील देव देवतांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या भक्तीने जात असतात.

तत्वज्ञानाच्या क्षेत्रात सुद्धा हीच समन्वयाची उदार वृत्ती आढळते. ज्या थोर आचार्यानी स्वतःच्या विशिष्ट सिद्धान्ताशी विरोधी असणाऱ्या तत्त्वज्ञानाचे खंडन केले, त्यांनी त्या असंमत तत्वज्ञानांच्या आचार्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी अलिप्तता किंवा उपेक्षा बाळगली. सहसा कोणत्याही महान आचार्याने इतर मताचे खंडन करताना त्या मताच्या आचार्याविषयी अनादर व्यक्त केलेला नाही. तात्विक समन्वयासाठी ही असली उपेक्षावृत्ती किंवा अलिप्तता भारतीय तत्वज्ञानाच्या क्षेत्रात समन्वय घडवून आणण्यास कारणीभूत झाली असे म्हणता येईल.

समन्वयाची उत्कृष्ट पद्धती

तत्वज्ञानाच्या क्षेत्रात समन्वय साधण्याची एक पद्धत प्राचीन तत्त्वज्ञांनी प्रवर्तित केली आहे. या पद्धती प्रमाणे चार्वाकापासून शांकर तत्वज्ञानापर्यत सर्व नास्तिक व आस्तिक तत्वाज्ञानांची विशिष्ट क्रमानुसार व्यवस्था लावण्यात येते. या समन्वय-पद्धतीत श्रेष्ठ कनिष्ठता गृहीत धरलेली असली तरी कोणाविषयी उपेक्षाबुद्धी नसते. भारतीय समाजात दृढमूल झालेल्या या समन्वय वृत्तीमुळे कोणताही संप्रदाय किंवा पंथ या समाजात नाश पावला नाही. सर्व प्रमुख धर्माचे लहान मोठे संप्रदाय व पंथोपपंथ येथे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. क्वचित् कोठे कटुता निर्माण झाली असली, तरी ती धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्यांनी निर्माण केली असे भारतीय धर्म जीवनाचा इतिहास दाखवितो.

समन्वयाचे तात्विक विवेचन करणारे आधुनिक विचारवंत श्रीगुलाबराव महाराज [श्री गुलाबराव महाराज हे विदर्भातील गेल्या शतकातले थोर विचारवंत होते. ते जन्मतः अंध होते. त्यांचे लहान मोठे एकशे तीस ग्रंथ, 'मधुराद्वैत प्रकाशन' या संस्थेने नागपुरात प्रसिद्ध केले आहेत] यांनी आपल्या 'संप्रदाय कुसुममधु' नामक पद्य ग्रंथात सारग्रहण करण्याच्या पद्धतीने कसा समन्वय साधता येतो फार सुंदर विवेचन केले आहे. वैदिक धर्मान्तर्गत जे भक्तिमार्गी अनेक संप्रदाय भारतात आजवर झाले त्यातील कोणत्या संप्रदायापासून कोणती भावना ग्रहण करण्यासारखी आहे याविषयी त्यांचे मार्गदर्शन भारतीय धर्म व तत्ज्ञान या विषयाच्या

अभ्यासकाला फार उपयुक्त होईल.

भक्तिमार्गी विविध सम्प्रदाय व त्यांतील ग्राहयांशः

(१) नारदपंचरात्र- वासुदेवाचा विग्रह हाच परब्रह्म असून अनेक साधनांनी त्याची प्राप्ती करावी ही भावना या संप्रदायातून ग्राहय आहे.

(२) पाशुपत - पशु म्हणजे जीव त्याचा पाश म्हणजे कर्म बंधन. या कर्मबंधनापासून विमुक्त असलेला, नित्य व मंत्रमय भगवान शिव हा उपास्य आहे, ही भावना या संप्रदायापासून ग्राहय आहे.

(३) शैव - सच्चिदानन्द विग्रह आणि उमेसहित असणाऱ्या पंचवदन शिवाची नित्य उपासना करावी ही शैवांची भावना ग्राहय आहे.

(४) शाक्त - सर्व स्त्रिया उमास्वरूप असून त्यांच्या ठिकाणी मातृभावना करावी ही भावना दक्षिणपंथी शाक्तांपासून ग्राहय आहे.

(५) पूर्णप्रज्ञा - भगवान विष्णु स्वतंत्र असून, इतर सर्व त्याच्या तंत्राने चालणारे आहेत ही भावना ग्राहय.

(६) रामानुज - विभवस्म, व्यूहस्म, सूक्ष्मरूप व अन्तर्यामी अशा श्रीहरीचे श्रौत व स्मार्त कर्मानुष्ठानासहित पंचविध अर्चन करून जीवाला परमेश्वरत्व प्राप्त होते ही भावना ग्राहय.

(७) निंबार्क- भगवंताला नैवेद्य दाखविणे, भगवंताप्रीत्यर्थ दान करणे, किंवा ज्या ज्या योगे भक्त तृप्त होतील असे करणे, हे दोन्ही प्रकार एकरूपच आहेत, ही भावना ग्राहय.

(८) राधिकावल्लभ - श्रीकृष्णाच्या चरणांची प्राप्ती करण्यासाठी गोपीश्रेष्ठ राधिकेची सेवा करावी ही भावना ग्राहय.

(९) चैतन्य - रासेश्वर भगवान कृष्ण वृंदावनात नित्य असतो आणि तो माधुर्य भक्तिनेच प्राप्त होऊ शकतो ही भावना ग्राहय.

(१०) .वल्लभ - बालस्वरूप श्रीकृष्णाची वात्सल्य प्रेमाने पण मर्यादा राखून सेवा करावी ही शिकवण ग्राहय.

(११) गाणपत्य - गणेश हा विघ्नहर्ता असल्यामुळे, नेहमी चिंता सोडून भगवद्भक्तीत मग्न राहावे ही शिकवण ग्राहय.

(१२) सौरागम - आदित्यामध्ये असलेला पुरूष तो मीच आहे ही धारणा ग्राहय.

(१३) प्रत्यभिज्ञा - शिव अव्दैतस्वरूप आहे, सर्वाच्या हृदयात स्फूर्तिरूपाने तोच आहे म्हणून सुलभही आहे व सर्वकर्ता आहे हे विवेचन ग्राहय.

(१४) रामानंद - अव्दैत व निर्गुण अशा ब्रह्माचे ध्यान करावे आणि प्रमादरहित अशा सद्गुरूची सेवा करावी हा विचार ग्राहय.

(१५) विठ्ठल - भगवान श्रीकृष्ण निजधामाला गेले नाहीत. ते पंढरपुरात आपल्या भक्तासाठी

येऊन राहिले, ही निष्ठा ग्राहय.

(१६) शांकर - ब्रह्म एकच आहे, पण भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी ते अनेक रूपे धारण करते. त्यापैकी कोणत्याही एका रूपाचे भजन करावे. त्या रूपाशी ऐक्य झाले की मुक्ती मिळते ही भावना ग्राहय.

(१७) मधुराद्वैत - ज्ञानाने अविद्येचा नाश झाल्यावर, अनध्यस्त विवर्त असलेल्या साकार श्रीहरीचे भजन करावे ही भावना ग्राहय.

याप्रमाणे मधुराद्वैताचार्य श्री गुलाबराव महाराजांनी सर्व भक्तिपंथाचा समन्वय साधण्याची जी पद्धती सांगितली आहे. त्या पद्धतीने विचार व आचार करून भारतातील सर्व धर्म आणि त्यांची तत्वज्ञाने यांचा समन्वय साधून अखिल मानवजातीला धर्मविषयक मार्गदर्शनाचे कार्य ही धर्मभूमी यापुढे करीत राहील असा विश्वास आहे.

अशा प्रकारे अनादी कालापासून या भरतखंडामध्ये मानवाच्या शाश्वत कल्याणाची चिंता करणाऱ्या ब्रह्मर्षि- राजर्षींनी, शास्त्री- आचार्यांनी, साधु- संतांनी, यति- मुनींनी जे जे याग-योग, मंत्र- तंत्र विधि- निषेध, पूजा- पाठ येथील आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी किंवा ज्ञानी अशा चतुर्विध मानवाला शिकविले, त्या सर्वाच्या संपिडित संस्कारातून आजचा तथाकथित हिंदू धर्म आकारात आला आहे.

तथाकथित म्हणण्याचे कारण 'हिन्दू' हे एखाद्या विशिष्ट धर्माचे नाव असल्याचे प्राचीन धर्म वाङ्मयात आढळत नाही. 'हिंदू' हे एका विशिष्ट समाजाचे नाव आहे. तो समाज म्हणजे या भरतभूमीचा पुत्ररूप समाज.भरतभूमी हीच ज्यांची अनादिसिद्ध मातृभूमी, पितृभूमी, पुण्यभूमी आहे, या भूमीच्या नैसर्गिक मयदिबाहेर [राजकीय मर्यादाबाहेर नव्हे. राजकीय मर्यादांचा युद्धादिक उत्पातांनी संकोच- विकास होत असल्याने त्या अनित्य, अशाश्वत असतात.] साम्प्रदायिक अनुशासनामुळे ज्यांना कोणतेही श्रद्धाकेन्द्र नाही, तो समाज म्हणजे हिंदू समाज. काही भ्रान्त धारणांमुळे स्वतःला हिंदू न मानणारा किंवा मूर्खपणामुळे स्वतःला हिंदू म्हणविण्यात लाज बाळगणारा, असाही भारतीय समाज जगात हिंदू म्हणूनच ओळखण्यात येतो.

अशा या हिन्दू समाजात ज्या ज्या पुण्य पुरूषांनी जितके कर्ममार्ग, ज्ञानमार्ग उपासनामार्ग आणि विधिनिषेध सांगतिले तितके संप्रदाय या समाजात निर्माण झाले. त्यांतले काही वैदिक तर काही अवैदिक आहेत. काही वर्णाश्रम व्यवस्था मानणारे तर काही त्या व्यवस्थेवर कडाडून टिका करणारे आहेत. काही जाती- पातींची बंधने कसोशीने पाळणारे, तर काही जाति- व्यवस्था हेच सर्व सामाजिक अनर्थाचे मूळ कारण मानणारे आहेत. कोणी बुद्धाला, कोणी महावीरला, कोणी शंकराचार्यादिक आचार्याना आपापल्या श्रद्धेप्रमाणे जगद्गुरु मानणारे आहेत. तसेच स्वतःच्या भारतीय पंथावर दृढश्रद्धा असूनही येशू ख्रिस्त, महमद पैगंबर, झरतुष्ट्र इत्यादी अभारतीय धर्मपुरूषांनाही पूज्य मानणारे आहेत. सर्व प्रकारचे धर्मसंप्रदाय व त्याचे

प्रमाणभूत ग्रंथ यांचा सत्कारपूर्वक अंगिकार करणारी अशी जी विश्वभरी धारणा या हिंदू समाजात निर्माण झाली, तिच्यातून आजचा हिंदुधर्म आकारास आला आहे.

वर्णभेद, पंथभेद, संप्रदायभेद, उपासनाभेद, आचारविचारभेद इत्यादी अगणित भेदभावनांपायी छिन्नविच्छिन्न होणाऱ्या या हिंदू समाजाला अद्वैताच्या सूवर्णसूत्रात गुंफण्याचा प्रयत्न आधुनिक काळात ज्या महापुरूषांनी केला त्यांनी आजचा हा विश्वम्भर हिंदुधर्म सुव्यवस्थित करण्याचा प्रयत्न केला. स्वामी. विवेकानन्द, महात्मा गांधी, योगी अरविंद, परमपूज्य श्री गुरूजी, रविन्द्रनाथ टागोर, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आचार्य विनोबाजी भावे यांचा त्या महापुरूषांच्या प्रभावळीत प्रामुख्याने नामनिर्देश करता येईल. या सर्वांच्या धर्म धारणेचे सार पुढील सूत्ररूप श्लोकात सांगता येईल.

साहाय्यं न तु संघर्षः
स्वीकृतिर्न तिरस्कृतिः ।
समता शांतिरेवा Sस्तु
विग्रहो न कदाचन।

[परस्परांना साहाय्य करा. संघर्ष करू नका. एकमेकांचा आत्मीयतेने स्वीकारच करा, तिरस्कार करू नका. सर्वांभूती समता आणि अन्तःकरणात शान्ती धारण करा। विग्रह - कलह तंटे कदापि करू नका.]

हिंदू समाजात दृढमूल झालेल्या विश्वम्भरी धारणेतून आधुनिक काळात आकारास आलेल्या हिंदू धर्माची 'चतुःसूत्री' वरील श्लोकात समावलेली आहे. शिकागोच्या विश्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे महनीय प्रतिनिधी म्हणून केलेल्या ओजस्वी प्रवचनात स्वामी विवेकानन्दांनी या चतुःसूत्रीचा प्रथमोद्घोष केला [त्याचाच वरील संस्कृत - श्लोकानुवाद मी माझ्या विवेकानन्दविजयम् या महानाटकात केला आहे.]

हिंदू धर्माच्या या सर्वंकष किंवा विश्वंभर धारणेत सम्प्रदायत्यागाला काहीही स्थान नाही. 'धर्मत्याग' हा रूढ शब्दप्रयोग योग्य नाही. कारण धर्माचा प्रतिद्वंद्वी अधर्म असल्याने धर्मत्याग करणे म्हणजे अधर्मयुक्त किंवा धर्महीन होणे," अर्थात "धर्मेण हीना. पशुभि/: समानाः" या रूढ सिद्धांताप्रमाणे धर्मत्याग करणे म्हणजे मनुष्यत्व सोडून पशुत्व स्वीकारणे होय.

आजवर धर्मत्याग करणाऱ्यांनी क्षुद्र संकुचित धर्मकल्पनेमुळे केवळ एका सम्प्रदायाचा त्याग करून दुसऱ्या संप्रदायाचा स्वीकार केला आणि कुठल्यातरी क्षुद्र राजनैतिकतेच्या आहारी जाऊ परम्परा प्राप्त सम्प्रदायाचा द्वैष, विध्वंस केला. या पेक्षा त्यांनी इतर काही केले नाही.

सर्व मार्ग एकाच महान सत्याकडे जातात, हा वेदोपनिषदांचा परम उदार संदेश त्या परंपरेतून उदयास आलेल्या ऋषिमुनींच्या आणि साधुसंतांच्या शिकवणुकीद्वारा आसेतु-

हिमाचल पसरलेल्या हिंदू समाजात अनादी कालापासून रूजलेला असल्यामुळे संप्रदाय - त्यागाला या हिंदू समाजात काही महत्व नव्हते. आपला संप्रदाय सुसंघटित करणे व त्याच्या बाहेरच्या लोकांना कसली तरी थातुर मातुर दीक्षा देऊन आपल्या संघटीत संप्रदायात अन्तर्भूत करणे, ही प्रक्रिया भगवान बुद्धाच्या कार्यात आढळते. बौद्धांच्या या प्रक्रियेमुळे हिंदूंचा केवळ बौद्ध संप्रदाय भारताबाहेर पसरलेला दिसतो. इतरही काही हिंदू संप्रदायांनी हा प्रकार केला, पण तो मर्यादित प्रमाणात केला. प्राचीन काळच्या राष्ट्रीय जीवनावर त्याचा काही परिणाम झाल्याची लक्षणे दिसत नाहीत.

अभारतीय समाजांच्या राजकीय आक्रमणाच्या मागोमाग अभारतीय संप्रदायांच्या प्रसाराचे कार्य शासनाच्या प्रेरणेने या देशात सुरू झाले. तेव्हा संप्रदायत्यागाचे दुष्परिणाम हिंदूचे नेतृत्व करणाऱ्यांना दिसू लागले होते. हिंदवी संप्रदाय सोडून मुसलमानी किंवा ख्रिस्ती संप्रदायाचा स्वीकार करणे, ही गोष्ट हिंदूना अप्रिय वाटली तरी त्याची प्रतिक्रिया इतर अहिंदू साम्प्रदायिकांना आपल्या एखाद्या संप्रदायात ओढून हिंदूंनी कधी केल्याचे दिसत नाही. अहिंदूंना हिंदू समाजात प्रवेश नाकारण्यामागे किती मोठी उदारता आहे याची कल्पना ज्यांना झाली नाही, अशा काला पहाडसारख्या उन्मत्तांनी हिंदूंचा उच्छाद मांडला, तरी हिंदू समाजाने आपली सनातन उदारात्मता सोडली नाही. केरळात ख्रिस्ती संप्रदायाचा प्रवेश इंग्लंडच्या आधी झाला तेव्हापासून १९ व्या शतकापर्यंत हिंदूचे ख्रिस्तीकरण करण्याचे पादरी- धर्मकार्य अव्याहत चालू होते. गोव्यात या पादरी- धर्मकार्यामागे परकीय शासनकर्त्यांची शक्ती उभी असल्याने तेथे हे संप्रदायत्यागाचे कार्य काहीशा मोठ्या प्रमाणावर घडून आले असले तरी हिंदुंनी संप्रदायांतराचे कार्य मुळीच केले नाही. शिवाजी महाराजांनी दोन मोठी शुद्धीकरणे केली असली, तरी शुद्धीकरणाची मोहिम चालवून ख्रिस्ती किंवा मुसलमान संप्रदायाच्या राज्यकर्त्याप्रमाणे सामुहिक संप्रदायांतराचे कार्य केले नाही.

इंग्रजी साम्राज्यशाहीच्या काळात, हिंदूंच्या या उदारात्मतेचा दुरुपयोग करून अज्ञानी, दरिद्री [क्वचित स्वार्थी आणि कामातुर] लोकांना प्रलोभन आणि भय दाखवून अभारतीय संप्रदायाकडे ओढण्याचे काम फार भीषण प्रमाणावर झाले. हिंदूचे अहिंदूकरण अशाच झपाट्याने चालू राहिले तर संपूर्ण हिंदू समाज किती वर्षात नामशेष होईल याचे त्रैराशिक काही लोकांनी मांडून दाखविले होते. वास्ताविक ज्या सम्प्रदायांतराची मानवाच्या आत्मकल्याणासाठी काहीही आवश्यकता नाही, त्यावर एवढा मोठा भर देऊन, हिंदूना अहिंदू करण्याचे अनैतिक कार्य या देशात राजकीय स्वार्थापायी चालू झाले पाहून अहिंदू संप्रदायात ओढण्यात आलेल्या हिंदूना आपल्या समाजात का परत घेऊ नये? हा प्रश्न अनेकांना डाचत होता. स्वामी दयानंद, श्रद्धानंद यांनी त्याबाबत ठाम भूमिका घेऊन आजवर सम्प्रदायान्तर करून अभारतीय सम्प्रदायात शिरलेल्या स्वजनांना परत राजकीय समाजात येण्याला मज्जाव असला तरी आता तो मज्जाव दूर करून सम्प्रदायान्तराचा दुसरा मार्गही सुरू केलाच पाहिजे असे ठरवून तदनुसार अहिंदूच्या

आक्रमणावर पायबंद घालण्याचा मोठा प्रयत्न केला. पण मध्यंतरीच्या काळात आर्य समाजाने तो उद्योग सोडून दिला होता. इतर हिंदू सम्प्रदायांनी याचा कधी विचारच केला नाही. शैव-वैष्णववादी संप्रदायांच्या आचार्यांनी या कामी पूर्वी सारखाच आपला विरोध चालू ठेवला होता. अशा परिस्थितीत, हिंदू समाजाच्या असंख्य लहान पंथाना एका व्यासपीठावर आणून, त्याच्यातले भेदाभेद शक्य तितके कमी करून, 'आम्ही सर्व हिंदू आहोत' ही महान सर्वंकष धारणा त्याच्या अन्तकरणात जागविण्याच्या आकांक्षेने विश्व हिंदू परिषद एका सुमुहुर्तावर उदयास आली. हिंदू समाजाच्या धार्मिक इतिहासात कधीही न घडलेले अद्‌भूत कार्य या परिषदेच्या स्थापनेने घडले. प्रायः सर्व पंथोपंथाच्या धुरीणांनी आपले निरपवाद हिंदूत्व, विश्वहिंदू परिषदेच्या निरनिराळ्या अधिवेशनातून उच्चरवाने घोषित केले. भयाने, प्रलोभनाने किंवा कपट प्रयोगाने कधी काळी पूवर्जांवर, या समाजातील संप्रदायाचा त्याग करून, अहिंदू समाजातल्या संप्रदायाचा स्वीकार करण्याचा घोर प्रसंग ओढविल्यामूळे ज्यांचे हिंदूत्व लोपले होते, अशा अभागी बांधवांना पुनर्ध आपल्या मूळ जीवन प्रवाहाशी एकरस होण्याचा महान संकल्प या परिषदेच्या व्यासपीठावरून सर्व आचार्य-महंतादिकांनी उद्‌घोषित केला ही फार महत्वाची गोष्ट आहे.

वर सांगितल्याप्रमाणे व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी कोणी कोणत्याही सम्प्रदायानुसार योग्य ती साधना केली तरि ती इष्टफल देऊ शकते, त्यासाठी सम्प्रदायान्तराची आवश्यकता नाही. हिंदूने मुसलमान किंवा ख्रिस्ती होण्याची, मुसलमानाने हिंदू किंवा ख्रिस्ती होण्याची किंवा ख्रिस्त्याने हिंदु किंवा मुसलमान होण्याची मुळीच आवश्यकता नाही. पण धर्मजीवनाच्या नन्दनवनात राजकारणाचे डुक्कर शिरल्याने हा प्रश्न केवळ अध्यात्मापुरता सीमित राहिला नाही. तो एक राष्ट्रीय प्रश्न होऊन बसला. म्हणून या प्रश्नाचा राष्ट्रीय दृष्टया परामर्श घेण्याची निकड निर्माण झाली. हिंदू समाजाच्या भाग्याने ती निकड विश्व हिंदू परिषदेच्या संस्थापनेमुळे भागली आहे. आध्यात्मिक प्रेरणेव्यतिरिक्त इतर क्षुद्र निमित्ताने हिंदू समाजाबाहेर गेलेल्या आपल्या बाधवांशी योग्य तो संपर्क वाढवून, त्यांना आपल्या राष्ट्रीय परंपरेचे ज्ञान देऊन, त्यांची अराष्ट्रीयता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील होणे हे आज प्रत्येक जागरूक हिंदूचे परम कर्तव्य आहे. त्यासाठी प्रत्येकाने विश्व हिंदू परिषदेशी आपला संबंध स्थापन करणे नितान्त आवश्यक आहे. विश्व हिंदू परिषदेला या कार्यात आजवर मिळालेले यश नगण्य आसले तरी 'अल्पारंभः क्षेमंकरा' या न्यायाने ते स्पृहणीय आहे।

* * * *

हिंदुत्व मिमांसा

माझे हिंदुत्व

प्राचार्य राम शेवाळकर

आचार्य दादा धर्माधिकारी म्हणायचे, "किराणा मालाच्या दुकानात सर्व संसारोपयोगी वस्तु मिळतात. पण किराणा नावाची वस्तु मिळत नाही." त्याप्रमाणे हिंदु समाजात ब्राम्हण, कुणबी, महार अशा जाती दिसतात. त्यातून हिंदू ओळखता येत नाही. या जातींची लक्षणे सांगता येतात. त्यांचे वेगळेपण ओळखता येते. पण हिंदू म्हणून एखादे व्यवच्छेदक लक्षण सांगता येत नाही. जो मुसलमान, ख्रिश्चन वा पारशी नाही तो हिंदू असे व्यावर्तक विधान करता येईल. पण हिंदू म्हणून स्वतंत्र ओळख करून देता येणे सोपे नाही. प्रगमनशील विचार करणारे लोक आपल्या खाजगी व सार्वजनिक जीवनात धर्माचे बंधन वा स्थानही अनावश्यक ठरवू लागले आहेत. त्यामुळे इतर कुठल्याही धर्माचा असलेला माणूस हिंदूच असेल असे नाही. तो पुरोगामीही असू शकेल.

समाजामध्ये वरचेवर होणाऱ्या जातीय दंगलींच्या मुळाशी धर्मबुद्धी असल्याने समाजाच्या विघटनाला कारणीभूत होणाऱ्या एखादया धर्माचे आपण पाईक आहोत, असे जाहीरपणे कबूल करणे शिक्षितांना कमीपणाचे वाटू लागले आहे. शिवाय आपल्या धर्माची जाण बाळगणे प्रतिगामीपणाचे ठरण्याची भीती असल्यामुळे कित्येकांना ते अडचणीचेही वाटत असण्याची शक्यता आहे. आधीच शिक्षणामुळे, विज्ञानवेगामुळे व नवविचारांमुळे धर्मभावना आपोआपच विरळ व क्षीण होत चालली आहे. त्यात स्वतःचे हिंदूपण नेमके ओळखणे, ते जोपासावेसे वाटणे हे लोकांना निरूपयोगी जाणवणे स्वाभाविक आहे. हिंदू म्हणून आपले वेगळेपण जाणणे, त्याची निरामय जोपासना करणे, ज्यांना स्वाभिमानाचे वाटते त्यांच्यासाठी हिंदुत्वाच्या स्वरूपाची चर्चा अनिवार्य होऊन बसते. चर्चेच्या आरंभीच व्याख्येचा मोठा अडसर येतो. आ.र्य, वैदिक व सिंधू या क्रमाने नामांतर व वाटचाल झालेला हिंदू धर्म हा एका संप्रदायांच्या ज्ञात इतिहासातील आद्य धर्म होय. यातील आचार, विचार व चालीरीती न मानवल्यामुळे काही संप्रदाय यातूनच फुटून बाहेर पडले, व कालांतराने वेगळया वाटा फुटून त्यांचें स्वतंत्र प्रवास गतिमान होऊ लागले. त्यामुळे बहुतेक आर्येतर धर्माचे आरंभ निश्चित सांगता येतात व प्रवर्तकही ओळखता येतात. हिंदू धर्माची परंपरा ही त्यामुळेच अनादि मानली गेली व या धर्माशी मतभेद नोंदवूनच उत्तरकालीन संप्रदायांना आपले वेगळेपण स्पष्ट करता आले. हिंदू धर्माचे बाकी किराणा दुकान झाले.

ही अडचण लक्षात आलेल्यांना हिंदू धर्माची व हिंदुत्वाची व्याख्या व लक्षणे निश्चित करणे निकडीचे वाटले. त्यातून लोकमान्य टिळक व स्वा. सावरकर ह्यांच्या प्रसिद्ध प्रयत्नांचा उदय झाला.

प्रामाण्य बुद्धि वेदेषु साधनानामनेकता।
उपास्यानामनियमः एतद् धर्मस्य लक्षणम्॥

ही लोकमान्यांची व्याख्या बरीचशी निश्चितार्थक आहे. पण त्यात वेदप्रामाण्य हे अग्रक्रमाने अनिवार्य मानल्यामुळे अवैदिक संप्रदायांना हिंदू धर्माचे द्वार आपोआप बंद होते. हिंदू देवता, आचार पद्धती, संस्कृती व परंपरा एरव्ही बव्हंशी मान्य असणाऱ्या या वर्गांना हिंदू धर्माबाहेर ठेवावे लागणे, हे या व्याख्येचे अपयश आहे. साधनांची अनेकता व उपास्याबद्दलचा अनाग्रह हे हिंदुधर्माचे ठळक विशेष बाकी या व्याख्येतून पहिल्यांदा प्रगट झाले. त्यामुळेच परस्पर विरोधी विचारप्रवाहांनाही एकाच धर्माची आधारभूमी वापरता आली. यापेक्षा स्वा. सावरकरांच्या व्याख्येत तुलनेने आधुनिक, व्यावहारिक व धर्मनिरपेक्ष दृष्टी व्यक्त झाली आहे.

आ सिंधुसिंधुपर्यता यस्य भारतभूमिका।
पितृभूः पुण्यभूश्चैव सवैहिंदू रितिस्मृतः ॥

उत्तरेकडे सिंधु नदी व दक्षिणेकडचा हिंदी महासागर हा संपूर्ण भारत एकच असल्याची ज्याची दृढ धारणा आहे, या देशाला जो पितृभूमी प्रमाणेच पुण्यभूमीही मानतो, तो सावरकरांच्या मते हिंदू होय. या व्याख्येत भारताची उत्तर- दक्षिण एकसंघता गृहित धरली आहे. ज्यांच्या इतिहासाची पाळेमुळे येथील मातीत रूजली आहेत, त्याच बरोबर ज्यांचे श्रद्धास्थान या पवित्र देशाव्यतिरिक्त अन्यत्र कुठेही नाही, अशा सुजाण व जागरूक, भिन्न धार्मिकांना सुद्धा सावरकरांच्या व्याख्येने हिंदूत्वाची दीक्षा प्रदान केली आहे. भारताच्या भौगोलिक अभिन्नतेवर विश्वास, भारताच्या इतिहासाचा अभिमान, व भारताच्या पावित्र्यावर एकांतिक निष्ठा हे स्वा. सावरकरांचे हिंदुत्वासाठी प्रमुख निकष या श्लोकातून निष्पन्न होतात. वरवर पाहता या व्याख्येतील हिंदुत्वाला हिंदुधर्मापासून मुक्तता मिळाली आहे. ही व्याख्या व्यापक व सर्व समावेशक झाली असून तिचा व्यावहारिक व राजकीय उद्देश उघड आहे. पण या दोन्ही प्रयत्नांवरून हिंदूचे पृथगात्मक असे सांस्कृतिक वैशिष्टय अस्पष्ट राहिले आहे.

पुनर्जन्म, कर्मविपाक, आत्मस्वातंत्र्य, प्रवृत्ती- निवृत्ती समन्वय, श्रेय- प्रेय विवेक, सर्वागमप्रामाण्य, परमतसहिष्णुता, वृत्तीची उदारता व व्यापकता, परहित विचाराला प्राधान्य, प्रत्येक वस्तुमात्रातील चैतन्याचा शोध, व प्रत्येक प्राणिमात्रातील आत्मतत्वावर श्रद्धा, हृदयाची आत्मौपम्य अवस्थाःही माझ्या अल्पबुद्धीप्रमाणे हिंदुत्वाची स्थूलमानाने लक्षणे सांगता येतील. या लक्षणांना पौर्वात्य चिंतनाचा दीर्घकाळचा मजबूत आधार आहे.

मानवाच्या आदर्शावस्थेकडे या लक्षणांचा संकेत आहे. या लक्षणांनी युक्त असा आदर्श हिंदू आपोआपच आदर्श मानवही ठरेल. याचा व्यत्यासही पत्करण्याची तयारी ठेवल्यास हिंदूधर्म हा मानवधर्माशी समव्याप्त होईल. हिंदुत्वाच्या तेजोमय रूपाबद्दलची माझी संकल्पना ही आहे.

मूलतत्व व त्याचे व्यावहारिक कार्यान्वयन यातील तफावतीमुळे सर्व मतभेद व वाद उत्पन्न होत असतात. हे सर्वच सत्तत्वांबद्दल खरे आहे. विश्वाच्या मूलकंदाबाबतच्या सूक्ष्मचिंतनातून तत्वे अंकुरत असतात. व माणसाच्या जीवनकलहात त्या तत्वांची शक्याशक्यता व ग्राहयग्राहयता निश्चित होत असते. जीवन संघर्ष अधिक उग्र झाला, तर अस्तित्वाच्या रक्षणासाठी तत्वांचा विसरही पडतो. व त्यातून विचार व आचार यांचा दुरावा उत्पन्न होतो. विचार व आचार या दोन ध्रुवांना सांधण्याची धडपड उच्चार करीत असतो. उच्चार म्हणजे विचारांशी अभिव्यक्ति आणि आचाराच्या दिशेने आगेकूच करण्याचे आश्वासन. उच्चार विचारांशी शिवाशिवी खेळतात. आचार या खेळात मागे पडत जातो. आत्मश्रद्धेचा अभाव हे या अपयशाचे कारण. उच्चाराचा आधार घ्यावा न लागता, विचार जेव्हा निःशद्ध आचाराद्वारे अभिव्यक्त होतो, तेव्हा त्याचा प्रभाव व्यापक व चिरंजीवी होतो. म्हणून धर्माची व्याख्या 'आचार प्रभवोधर्मः' अशी करण्यात आली आहे. धर्ममूल्ये ही विद्युतगृहासारखी असतात. त्या विजेचा वापर करणाऱ्याच्या योजकतेवर व क्षमतेवर प्रकाशाचा पुरवठा अवलंबून असतो. विद्युतगृहातील उपलब्ध साठयाचा महत्तम वापर करणारे काही आदर्श इतिहासात वेळोवेळी उत्पन्न होत असतात. अशा मोजक्या आदर्शावरूनच धर्म तत्वांचे मूल्यमापन करावे लागते. धर्मक्षेत्रातील भ्रष्टाचार मात्र अनुयायांच्या दुर्बलतेतून बोकाळत असतात. त्याबाबत धर्माच्या मूलतत्वांना जबाबदार धरणे वैचारिक उठवळपणाचे लक्षण आहे.

माझ्या मते हिंदुतत्व ही राजकीय, भौगोलिक वा सांप्रदायिक संकल्पना आहे. या दृष्टीने ती अतिशय मौलिक, सर्वस्पर्शी, व्यापक व निकोप संकल्पना आहे. त्यामुळेच कोणत्याही पूर्वग्रहमुक्त, निर्मल, सत्याग्रही, निर्भय व स्वाभिमानी भारतीयाला ती स्वीकार्य ठरायला हरकत नसावी.

* * * *

हिंदुत्वाचे राजकीय भवितत्य

प्राचार्य श्री. म. पांडे

आज हिंदुसंघटनेचा दावा करणाऱ्या प्रमुख संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्वहिंदू परिषद, हिंदुमहासभा, बजरंग दल, शिवसेना, भारतीय जनतापक्ष, दक्षिण भारतातील हिंदु मुन्नानी इत्यादी होत. त्यापैकी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सोडल्यास अन्य संघटनाच्या कार्यात चढउतार होते. तसे ते अपेक्षितही आहेत.

बजरंग दल

बजरंग दल ही मुख्यत उत्तर भारतातील लढाऊ हिंदु संघटना आहे. त्याचे कार्य तात्कालिक स्वरूपाचे आहे. अयोध्या, काशी आणि मथुरा येथील मंदिरांचे प्रश्न संपले. की बजरंग दलाचे कार्यही आपोआप संपेल. सध्या बजरंग दलाचे जे स्वरूप आहे ते पाहता ते देशाच्या इतर भागात पसरेल असे वाटत नाही. कारण बजरंग दलापाशी टिकाऊ स्वरूपाचा कोणताही कार्यक्रम नाही. बजरंग दलाला दीर्घायुष्य लाभायचे असेल तर बजरंग दलाच्या स्वंयसेवकाना पद्धतशीर आध्यात्मिक शिक्षण द्यावे लागेल. धर्माची संकल्पना समजावून सांगावी लागेल. दलअंतर्गत चर्चासत्रे आयोजित करावी लागतील. आज तसे काही होत आहे, असे वाटत नाही. बजरंग दलाचे योगदान म्हणजे उत्तरभारतात खेडयापाडयात आणि तरूणवर्गात हिंदुत्वाची धार्मिक जागृती त्याने घडवून आणली. त्याने व्यावहारिक हिंदुत्वाचा प्रसार केला. हिंदुत्वाचे 'टेरर' निर्माण करणे हे बजरंगदलाचे काम आहे. तशी आपद्धर्म म्हणून आवश्यकताही होती.

शिवसेना

महाराष्ट्रात शिवसेनेची निर्मिती मुळात एका वेगळया स्थानिक परिस्थितीतून झाली. मराठी माणसांचे आर्थिक प्रश्न ते हिंदुची अस्मिता हा शिवसेनेचा प्रवास निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. पण तेथे सखोल वैचारिक प्रबोधनावर भर नाही. शिवसेनेला मजबूत तात्विक अधिष्ठान नाही. श्री. बाळासाहेब ठाकरे ठरवतील ते प्रबोधन. शिवसेना हे हिंदुत्वाचे स्थिर स्वरूपाचे संघटन ठरेल की नाही याविषयी शंका आहे. शिवसेनेचे कार्यमान अपेक्षे इतके सेवाभावी किंवा व्रती (मिशनरी) वृत्तीने चालले आहे असा दाखला नाही. चारदोन रुग्णालये चालविणे, काही उपाहारगृहे चालवणे एवढ्यापुरता सध्या तरी शिवसेनेचा सेवाभाव दिसतो. वस्तुतः समग्र हिंदुत्वाचे राजकीय भवितव्य स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सांगितल्याप्रमाणे, हिंदुच्या सैनिकीकरणावर अवलंबून आहे. त्यादृष्टीने शिवसेनेने काही भरीव कार्य केल्याचे अजूनपर्यंत तरी आढळलेले नाही.

मात्र विशिष्ट प्रश्नांवर शिवसेनेने आक्रमक हिंदुत्वाचा तेजाळ आविष्कार घडवला

जसे भारत पाक क्रिकेट सामने नाकारणे. तसा तो विशिष्ट परिस्थितीत आवश्यकही होता. त्यामुळे हिंदुत्व ही एक शक्ती आहे याची जाण आंतराष्ट्रीय राजकारण्यांना होण्यास मदत झाली.

पण शिवसेनेच्या भविष्याविषयी कोणतीही खात्री देता येत नाही. आज या हिंदुत्वाने भाजपाची संगत धरली आहे. उद्या हेच हिंदुत्व कॉंग्रेसशी संगत धरणारच नाही याचा कोणी भरवसा देऊ शकत नाही.

विश्व हिंदुपरिषद

विश्व हिंदुपरिषद ही हिंदूचे संघटन करणारी जागतिक सामाजिक धार्मिक संघटना आहे. आज जगामध्ये जिथे जिथे हिंदु आहेत तिथेतिथे विश्व हिंदुपरिषद पोचली आहे. १९८९ मध्ये त्यावेळच्या इंग्लंडच्या पंतप्रधान श्रीमती मागरिट थॅचर यांच्या उपस्थितीत विश्वहिंदूपरिषदेचे अधिवेशन इंग्लंडमध्येही भरले होते.

हिंदुमहासभेने तिच्या आरंभ काळात हिंदुसंघटनेचे जे कार्य केले तेच कार्य वेगळ्या शैलीत आज विश्व हिंदुपरिषद करीत आहे. तसे अन्य कोणतीही संघटना करीत नाही. हिंदूधर्मातले आजच संत आणि शंकरचार्य केवळ तत्वज्ञान सांगतात. विश्व हिंदूपरिषद त्या तत्वज्ञानाचे संशोधनीकरण करून त्याचा सर्वत्र प्रभावी प्रसार करते. विश्व हिंदूपरिषदेने धार्मिक हिंदूत्वाला विशाल सामाजिकतेचा आयाम दिला.

हिंदुमहासभेने हिंदुत्वाची राजकीय परिभाषा स्पष्ट शब्दात सांगितली. ही परिभाषा लोंकापर्यत पोचविण्यात ती कमी पडली. साधनसामुग्रीच्या अभावामुळे विश्वहिंदूपरिषदेला ती साधनसामुग्री उपलब्ध झाली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही विश्व हिंदुपरिषदेची जन्मदात्री संस्था आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाची मुळातली भूमिका मवाळ हिंदुत्वाचे संघटन करायचे आहे तर तणाव येऊ द्यायचा नाही या त्यांच्या शैलीमूळे त्यांची संघटनात्मक बांधणी टिकाऊ ठरली. हिंदूसंघटन त्यानी देशभर केले. देशाच्या बाहेरही केले. १९२५ मध्ये संघाची स्थापना झाली. आवश्यकतेनुसार त्यात नवनवीन कार्यक्रमांची भर पडत गेली.उदा. वनवासी कल्याण आश्रमाचा प्रकल्प हिंदू मुन्नानीची उभारणी. भारतीय मजदूर संघाची स्थापना. अखिल भारतीय विधार्थी परिषदेची निर्मिती. विद्याभारतीची निर्मिती. पूर्वीचा जनसंघ आणि आजचा भारतीय जनता पक्ष हे देखील संघाचेच योगदान आहे. कै. डॉ हेडगेवारांनी संघ कार्याला विद्युतनिर्मिती केंद्राची उपमा दिली. ते विधायक कार्याचे जनरेटर आहे. विद्युतनिर्मिती केंद्रात निर्माण झालेली वीज सर्वत्र खेळविली जाते. संघस्वंयसेवक जीवनाच्या सर्व क्षेत्रात जीवनदायी चैतन्य निर्माण करतात.

संघाचे सेवाभावी प्रकल्प

समाजात जेथेजेथे हिंदू एकजुटीची आवश्यकता आहे तेथेतेथे ती मुख्यतः संघाने घडवून आणली आहे. सेवाभावी आणि व्रती कार्यांना संघाचे हस्ते परहस्ते मदत केली आहे. म्हैसाळच्या श्री देवलांनी केलेल्या दलितोद्धार कार्यक्रमाला संघाने मदत केली. नागपूर जवळील खापरी येथील विवेकानंद वैद्यकीय सेवाप्रकल्प हा संघाने प्रेरिलेला. पुण्याचा दिनदयाल कर्क रोगसेवा वैद्यकीय प्रकल्पही त्याच धर्तीचा. तर नागपूर येथील दिनदयाल शोध प्रकल्पही त्याच प्रकारचा. अशी अगणित उदाहरणे देता येतील.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघाने जनसंघ- भाजपला घडवले. पण भाजप हा शुद्ध राजकीय पक्ष आहे. निवडणुक आणि सत्ताप्रप्ती हेच त्याचे लक्ष्य आहे. संघ असा सत्ताकेंद्रित नाही. निवडणूकीची परिमाणे आणि परिणामे बदलू शकतात. उद्या भाजप ऐवजी कॉंग्रेसने निवडणुकिसाठी हिंदूत्व स्वीकारले तर तो विजयी होऊ शकतो. उद्या सत्तेसाठी भाजपने हिंदूत्व नाकारले तर त्याचा नि संघाचा संबंध तुटू शकतो. कारण हिंदूत्व हेच संघाचे प्राणतत्व आहे. निवडणुकीच्या समीकरणात बदल होऊ शकतो. निवडणुकीच्या राजकारणात तडजोड होऊ शकते. पण संघाच्या हिंदूकारणात तात्कालिक लाभासाठी कोणतीही क्षुद्र तडजोड होऊ शकत नाही. श्री. लक्ष्मणशास्री जोशी यांच्यासारख्या रॉयिष्टाने देखील संघाचा अग्निबीज म्हणून गौरव केला आहे तो उगाच नव्हे.

संघावरील मुसलमानांचा राग

भारतीय राजकारणाला आज हिंदुत्वाचे वळण लागले आहे हे संघाचे श्रेय आहे.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघावर अनेकांचा अनेक कारणांसाठी राग आहे. दलितांना प्रामाणिकपणे वाटते की मधल्या काळात आपल्या वाट्याला जे पशुसमान जीवन आले त्याचे उत्तरदायित्व हिंदुधर्माचे आहे. त्यामुळे 'हिंदू' हा शब्द जिथेजिथे येतो तिथेतिथे दलित त्यांचा राग करतात. म्हणून राष्ट्रीय स्वंयसेवक संघ हा हिंदूचे संघटन करतो म्हणून त्याचा राग. मुस्लिमांचा संघाविषयी द्वेष असण्याचे मुख्य कारण तत्वज्ञान या दृष्टीने इस्लाम हे हिंदूत्वापेक्षा श्रेष्ठ ठरू शकत नाही. त्यामूळे वैचारिक बाजू संघाची पक्की आहे. दुसरे असे की इतिहासकाळात मुसलमानांनी भारतात जबरीने सत्ता उपभोगली. पुन्हा तसेच करण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. या आसूरी महत्वाकांक्षेच्या आड येणारा प्रमुख विरोधक म्हणून ते संघाचा द्वेष करतात.

मुसलमानांना आणखी एक गोष्ट चांगली ठाऊक आहे. ती म्हणजे आपण केवळ मुसलमान म्हणून हिंदूस्थानात हिंदूशी लढू शकत नाही. म्हणून मग ते हिंदूमधीलच कुणाला तरी पूढे करतात. कधी कॉंग्रेसला, कधी कम्युनिस्टांना, कधी समाजवाद्यांना. अलिकडील याचे उदाहरण म्हणजे राम जन्मभूमी प्रकरणात मुसलमानांच्या ऐवजी हिंदूदेष्टे हिंदूच मंदिर बांधकामाच्या

विरोधात आघाडीवर आहेत.

भारतातील मुसलमानांच्या हिंदूत्वविरोधाला आणखी एक आयाम आहे. तो म्हणजे भारतातल्या मुसलमांनानी भारतातल्या हिंदूइतकी प्रगती केली नाही. याचे मुख्य कारण ते जुन्याच कुराण- आयतादिंना कवटाळून बसले. याउलट हिंदुंनी नव्या संहिता केल्या. भारतीय राज्यघटना ही हिंदूची संहिता. 'हिंदूकोड बिल' ही हिंदूची संहिता आणि अंतर्गत किंवा बाह्य विरोध झाला तरी रा. स्व. संघाने प्रेरलेली मंडळी हिंदूची नवीसंहिता बनविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. खरे तर मुसलमांनानी हिंदूंच्या या प्रबोधन प्रयत्नात स्वतःच्या संदर्भातही सहभागी व्हावे. ते त्यांच्याच हिताचे आहे. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की मुसलमान हे हिंदुस्थानात हिंदूशिवाय जगू शकत नाही. उलटे हिंदू मात्र मुसलमानांशिवाय जगू शकतात.

समाजवाद्यांचा संघविरोध.

समाजवादी आणि कम्युनिष्ट मंडळी हिंदू संघटनांना सैद्धांतिक पातळीवरून विरोध करतात. त्यांना 'हिंदूत्व ' हे राष्ट्रीयत्व ही संकल्पना मुळात मान्य नाही. राष्ट्र शब्दासंबधी त्यांचे आकलन भिन्न आहे. ब्रिटीशांच्या आगमनानंतर हा देश राष्ट्र या संज्ञेला पात्र झाला. तो पर्यंत केवळ हिंदूत्वाच्या आधारावर तो राष्ट्र बनला नव्हता अशी त्यांची प्रामाणिक धारणा आहे. पण अशा प्रामाणिक धारणेतून हिंदूत्वाला किंवा संघाला विरोध करणारी समाजवादी किंवा कम्युनिष्ट पिढी अंर्तगत झाली. आजचा त्यांचा हिंदुत्वाविरोध हा केवळ मत्सर ग्रस्त राहिला आहे. समान आयुष्य मिळूनही संघाने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आणि आपण मागेच राहिलो नव्हे जागतिक पातळीवर पराभूतही झालो या वैफल्यभावनेने ही मंडळी हिंदूसंघटनाकडे अधिकच आकसाने पाहातात. या आकसाचे ताजे उदाहरण म्हणजे लोकप्रभा दिवाळी १९९१ च्या अंकात प्रसिद्ध झालेला मधू लिमये यांचा लेख होय. तर ते असो. हिंदुत्वाच्या भविष्यातील निकोप वाढीसाठी प्रथम हिंदुत्वाची व्यापक सर्वसमावेशक व्याख्या करणे आवश्यक आहे. तसे करिताना हिंदू ज्यांना ज्यांना आपली वैचारिक परंपरा मानतात त्या सर्व व्यक्ती, ग्रंथ, घटना यांचा संदर्भ ध्यानात द्यावा. माझ्या मते स्वातंत्र्यवीर सावरकरांची "आसिंधू सिंधूपर्यंता यस्य भारतभूमिका पितृभू पुण्यभूश्चैवः सवै हिंदू रीतीस्मृतः" ही व्याख्या आजच्याही काळात सर्वाधिक उपयुक्त मानावी. उपयुक्ततेच्याच दृष्टीने विचार केला तर कै. प. पू. गोळवलकर गुरूजी यांनी त्यांच्या 'वुई' या पुस्तिकेत हिंदूत्वाची जी लक्षणे सांगितली तीही ध्यानात घ्यावी. मात्र एका गोष्टीचे पथ्य पाळले पाहिजे की हिंदुत्वाच्या नावावर कोणत्याही कालबाहय कर्मकांडाना पुनःप्रतिष्ठा मिळू नये.

हिंदूसंघटनांचे राजकीय भविष्य देशहितकारक ठरण्यासाठी स्वतः हिंदूसंघटनांनी काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. कोणत्याही हिंदूसंघटंनेने एकमेकावर दोषारोपण न करता हिंदूत्व हे बीजभूत मानून आपापल्या परीने प्रयत्न करावेत. अशा सर्व संघटनाचे प्रवास समांतर असले तरी चालतील. पण एकमेकांना छेद देणारे नसावेत. उदा. विश्व हिंदू परिषदेचे सत्संग वगैरे

कार्यक्रम हे कर्मकांडात्मक आहेत. पण सद्यःपरिस्थितीत त्यावर टीका करून संघटनाला तडाच जाण्याचा संभव अधिक. अशा कर्मकांडात्मक कार्यक्रमामुळे समाजातील निवृत्त स्त्री पुरूष श्रमशक्ती चा उपयोग हिंदू संघटनांसाठी करून घेता येतो हे लक्षात ठेवावे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या शाखामध्ये येणे सर्वांनांच वेगवेगळ्या कारणामूळे शक्य होत नसेल. परंतु म्हणून शाखांचा उपहास किंवा टवाळी करू नये किंवा शाखेत जाणे हीच हिंदूत्वाची अधिकृत पात्रता असाही अंहकार बाळगू नये. क्रिकेट सामने न होऊ देण्यासंबंधी च्या शिवसेनेच्या धमकी वर आणि खेळपट्टी खराब करण्याचा कृतीवर भाजपचे श्री. प्रमोद महाजन यांनी मौन पाळले. माझ्या दृष्टीने हे मौन समर्थनीय आहे. क्रिकेट सामन्याचे निमित्त करून भाजपा शिवसेना युती फोडण्याचा किंवा निदान तत्संबंधी बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न झाला पण श्री महाजन यांच्या संयमित मौनामुळे तो सिद्धिस गेला नाही. दरम्यानच्या काळात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि शिवसेनाप्रणीत विद्यार्थी सेना यांच्यात महाविद्यालयीन निवडणुकांवरून संघर्ष झाला होता. भविष्यात असे संघर्ष उद्भ्वणारच नाहीत आणि तात्कालिक क्षुल्लक प्रश्नांवरून मतभेद निर्माण झाले तरी त्यामुळे व्यापक हिंदुसंघटनाला इजा होणार नाही याची काळजी सगळयानीच घेतली पाहिजे. कारण हिंदुत्वाचे शत्रू अनेक आहेत. ते अशी निमित्तेच पाहात असतात.

हिंदुत्वाचे वैचारिक प्रबोधन सातत्याने चालविले पाहिजे. त्याची उपेक्षा नको. तरच 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या सावरकरोक्तीला अर्थ प्राप्त होईल. हिंदुस्थानात 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' सिद्ध झाले तर बाकीच्या जगाला त्याची दखल घ्यावीच लागेल. मात्र जागतिक राजकारणावर हिंदुत्वाचा प्रभाव पाडायचा असेल तर हिंदुत्व भौतिक दृष्टीने सशक्त झाले पाहिजे. याचा वेगळा अर्थ असा की शस्त्रबळ आणि धनबळ या दोन दृष्टीने हिंदुत्व सशक्त झाले तरच जगात त्याचा प्रभाव पडेल. रशियापाशी केवळ माक्र्सवादी तत्वज्ञान प्रबळ आहे असे नसून रशिया शस्त्रसंपन्न आणि तंत्रविज्ञान प्रभुत्वाने युक्त होता म्हणूनही रशियाचा धाक महाशक्ती म्हणून दीर्घकाळ राहिला.

प्रथम हिंदुत्वाचा भौतिक धाक किंवा प्रभाव आणि त्यामागोमाग हिंदुत्वाच्या वैचारिक, तात्विक अंगाचा प्रसार याच मार्गाने जागतिक राजकारणात हिंदुत्व ही महाशक्ती म्हणून उदयास येईल.

* * * *

हिंदू राष्ट्र म्हणजे काय?

श्री मा. गो. वैद्य

देश, राज्य आणि राष्ट्र या संकल्पना परस्परांशी निगडित आहेत. परंतु त्या वेगवेगळ्या आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे. 'देश' ही भौगोलिक संकल्पना आहे. 'राज्य' ही राजकीय व्यवस्थेची संकल्पना आहे. तर 'राष्ट्र' ही लोक आणि त्यांच्या भावना यांच्याशी संबद्ध असलेली संकल्पना आहे. लोक कोणत्या तरी भूभागात म्हणजे देशात राहणार. स्वाभाविकच त्या भूमीशी त्यांच्या भावना जुळलेल्या आणि जडलेल्या राहणार. तसेच, लोकांना राजकीय व्यवस्थाही आवश्यक असणार. म्हणजे राष्ट्र, राज्य आणि देश यांचे संबंध सदैव परस्परांमध्ये गुंतलेले आणि गुंफलेले असणार. तथापि, एवढ्यावरून त्यांच्यातील फरकाबाबत विवेक सुटू देण्याचे कारण नाही. देशाशिवायही राष्ट्र असू शकते. सुमारे सतराशे वर्षे यहुद्यांना त्यांचा देश नव्हता. परंतु, त्यांचे राष्ट्र होते. कारण, आपण यहुदी आहोत, आणि आपले एक राष्ट्र आहे, अशी भावना, ते यहुदी कोणत्याही देशात राहत असले, कोणताही भाषा बोलत असले राज्याच्या व्यवस्थेने ते नियंत्रित असले, तरी त्यांनी सतराशे अठराशे वर्षे विजनवासात असतानाही जोपासली होती. राष्ट्र आणि राज्य यांचाही संबंध घनिष्ठ असतो. अठराव्या शतकापासून एक राष्ट्र, एक राज्य ही संकल्पना युरोपखंडात स्थिरपद झाल्यापासून तो संबंध अधिकच घनिष्ठ झाला आहे. तथापि, राज्य वेगळे आणि राष्ट्र वेगळे. एका राष्ट्रात अनेक राज्ये राहू शकतात, एका साम्राज्यात अनेक राष्ट्रे असू शकतात, तात्विक दृष्टया हे मान्य करावयास अडचण जाऊ नये. व्यवहारात, देश, राज्य आणि राष्ट्र हे एकरूप झालेलेही दिसतील.

राष्ट्र : एक आध्यात्मिक तत्व

आता दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, राष्ट्र कशाचे बनते? अर्नेस्ट रेनॉं (Ernest Renan) या सुमारे शंभर वर्षापूर्वी झालेल्या फ्रेंच विचारवंताने, राष्ट्र या संकल्पनेचा सखोल विचार केला होता, असे मला वाटते. त्याच्या फ्रेंच भाषेतील प्रबंधाचे इ.स. १८८२ साली, 'व्हाट् इज ए नेशन' या शीर्षकाखाली इंग्रजीत भाषांतर प्रसिद्ध झाले आहे. तो ग्रंथ मुळात वाचण्यासारखा आहे. रेनॉंने आपल्या ग्रंथात वंश, भाषा, उपासना - संप्रदाय (रिलिजन), हितसंबंध, किंवा भूगोल, यांच्या समानतेत 'राष्ट्रत्व' सामावले असते, अशी जी समजूत त्यांच्या काळी प्रचलित होती, आणि वरवर विचारकरणाऱ्या आपल्या भारतातील पंडितांमध्ये जी आजही प्रचलित आहे, ती रद्द ठरविली. त्याचा निष्कर्ष असा आहे की राष्ट्र हे एक आध्यात्मिक (Spiritual) तत्व आहे. हे तत्व दोन बाबींवर आधारलेले असते. पहिली बाब आहे, सम्मन स्मृतींचा समृद्ध वारसा; आणि दुसरी बाब आहे एकत्र राहण्याची इच्छा.

वंशाच्या एकत्वाच्या कल्पनेची रेनाँने खूप थट्ट केली आहे. तो म्हणतो, "वंशशास्त्राचा अभ्यास करणे हा विद्वानांचा उद्योग आहे. प्रत्यक्ष राजनीतीशी त्याचा काहीही संबंध नाही. मानवाचा इतिहास आणि प्राणिशास्त्र दृष्टया मानवाचा विचार यात मूलभूत फरक आहे. प्रत्येकाच्या डोक्याच्या आकाराचे माप घेत, त्याच्या गळयाच्या हाडाची चाचणी करीत आणि त्यावरून "तुझा आमच्याशी संबंध आहे, तू आमचा आहे," असे म्हणण्याचा कुणासच अधिकार नाही."

"वंशाच्या एकत्वाचा जसा राष्ट्रत्वाशी संबंध नाही, तसाच भाषेच्या समानतेचाही नाही. रेनाँ म्हणतो, भाषा एकत्व प्रस्थापित करण्याला मदत करू शकते. परंतु एकत्वाची ती अनिवार्य अट नाही." समान भावना, समान विचार आणि समान श्रद्धा यांची जोपासना, भिन्न भाषांच्या द्वारे करणे अशक्य आहे काय, असा त्याचा मार्मिक प्रश्न आहे. अमेरिका आणि इंग्लंड एकच भाषा बोलतात म्हणून त्यांचे एक राष्ट्र आहे काय, किंवा स्पेन व दक्षिण अमेरिकेतील अनेक देश समान भाषा बोलतात, म्हणून त्या सर्वांचे एक राष्ट्र बनते काय, हा त्याचा दुसरा सवाल आहे. याच्या उलट स्वित्झरलंडमध्ये चार भाषा बोलल्या जातात, आणि तरी ते एक राष्ट्र आहे, असे तो नमूद करतो.

राष्ट्रीयत्वाच्या आधुनिक संकल्पनेसाठी रिलिजन किंवा संप्रदाय हाही समाधानकारक आधार होऊ शकत नाही, असे रेनाँचे प्रतिपादन आहे. "सांप्रदायिक कर्मकांड हे मूलतः कुटुंबाचे कर्मकांड असते. हल्लीच्या युगात 'राज्याचा रिलिजन' ही संकल्पनाच कालबाह्य झाली आहे. माणूस राष्ट्रीय दृष्टया फ्रेंच, इंग्लिश किंवा जर्मन राहील आणि त्याच वेळी तो कॅथोलिक किंवा प्रॉटेस्टंट किंवा ज्यूही असेल. रिलिजन ही व्यक्तीने आपल्या विवेकबुद्धीने किंवा पसंतीने निवडावयाची बाब आहे आता कॅथोलिक राष्ट्रे आणि प्रॉटेस्टंट राष्ट्रे असे विभाजन केले जात नाही," असे रेनाँ म्हणतो.

हितसंबंधांची समानता, माणसामाणसामंधले बळकट बंधन बनू शकते, परंतु केवळ एवढ्या आधारावर त्यांचे एक राष्ट्र बनत नाही, असे सांगून रेनाँ पुढे म्हणतो, "समान हितसंबंधांनी व्यापारी तहनामे घडून येऊ शकतात. राष्ट्र नव्हे. राष्ट्र म्हणजे आत्मा व शरीर यांची एकात्मता असते, आणि त्याला एक भावनेची बाजू असते. कस्टम्स युनियन म्हणजे देश होत नाही."

भूगोलही राष्ट्रत्वासाठी तत्व म्हणून स्वीकाराला जाऊ शकत नाही. नैसर्गिक सीमांनी राष्ट्रांचे विभाजन घडून येते, हे रेनाँला मान्य आहे. परंतु राष्ट्रत्वाच्या सीमा नकाशावरील रेघा ठरवू शकत नाहीत, असे तो म्हणतो. भूमी माणसांच्या संघर्षाला आणि परिश्रमाला आधारभूत असते. परंतु राष्ट्राला आत्मतत्व माणूसच स्वतः देत असतो. ज्याला आपण राष्ट्र म्हणतो, त्याची घडण माणूस करीत असतो, भूभाग नाही. रेनाँची मूळ वाक्ये उद्धृत करण्यांचा मोह मला आवरत नाही. म्हणून मी ती येथे देत आहे.

"The soil provides the substratum, the field for struggle and labour; man

provides the soul. Man is everything in the formation of this sacred thing that we call a people. Nothing that is material suffices here. A nation is a spiritual principle, the result of the intricate workings of history, a spiritual family and not a group determined by the configuration of the earth.

हे हिंदू राष्ट्र

हे आत्मतत्व कसे तयार होते, या संबंधी तो पुढे लिहितो-

"Two things which are really one go to make this soul or spiritual principal. One of these things lies in the past, the other in the present. The one is the possession in common of a rich heritage of memories and the other is actual agreement, the desire to live together and the will to continue to make the most of the joint inheritance. Man cannot be improvised. The nation like the individual is the fruit of a long past spent in toil, sacrifice and devotion. Ancestor worship is of all the forms the most justificable, since our ancestors have made us what we are. A heroir past, great man and glory - I mean real glory- these should be the capital of our company when we come to found a national idea. To share the glories of the past, and a common will in the present, to have done great good deeds together and to desire to do more - these are essential conditions of a people s being. Love is in proportion to the sacrificies one has made and tthe evils one has brone. we love the house that we have built and that we hand down to our successors. The spartan song "we are what we were, and we shall be what we are" is in its simplicity, the abvidged version of every national anthem.

[भावानुवाद - दोन गोष्टींनी, ज्या वस्तुतः एकच आहेत, हे आत्मतत्व किंवा आध्यात्मिक तत्व तयार होते. यातली एक गोष्ट भूतकाळातील असते, दुसरी वर्तमानकाळातील. पहिली भूतकाळातील समृद्ध स्मृतींचा वारसा असतो. दुसरी गोष्ट असते, एकच राहण्याची मनीषा आणि संयुक्त वारशातून जे प्राप्त झाले आहे, त्याचा अधिकाधिक सदुपयोग करण्याची उत्कट इच्छा. परिश्रम, त्याग आणि निष्ठा यांनी जो प्रदीर्घ भूतकाळा संपन्न झालेला असतो. त्या भूतकाळातून जसे व्यक्तीचे व्यक्तित्व संपन्न होत असते, तसेच राष्ट्राचेही. आपण जे काही आज आहोत, ते आपल्या पूर्वांजामुळे, त्यामुळे पूर्वजांचा गौरव बाळगणे, हे अत्यंत उचित आहे. राष्ट्रीयत्वाची संकल्पना सिद्ध करावयाची आहे, व त्यासाठी भांडवल असते, पराक्रमयुक्त भूतकाळ, थोर पुरूष त्यासंबंधीचा गौरव - खरा गौरव. भूतकाळा च्या गौरवाची समान अभूभूती वर्तमानसंबंधी समान मनीषा, सर्वांनी मिळून पूर्वी महान कार्ये केल्याची जाणीव आणि त्यातूनही अधिक करण्याची अभिलाषा - राष्ट्राच्या अस्तित्वाच्या या आवश्यक अटी आहेत. ज्या प्रमाणात आपण त्याग केला असेल आणि संकटे भोगली असतील, त्या प्रमाणात

त्या विषयासंबंधी आपल्यास प्रेम असते. जे घर आपण बांधले असते आणि जे आपाल्या वंशजांच्या स्वाधीन आपण करणार असतो, त्या घरावर आपले प्रेम असते. स्मार्टन लोकांचे एकगीत असे. जे आम्ही होतो, ते आम्ही आज आहोत. "जे आम्ही आज आहोत,ते आम्ही पुढे राहणार आहोत." हा त्या गीताचा आशय आहे. हे गीत, प्रत्येक राष्ट्राच्या राष्ट्रगीताची साधी, संक्षिप्त आवृती आहे.

रेनॉच्या या प्रतिपादनाशी मी शंभर टक्के सहमत आहे. भारत आणि पाकिस्तानच्या दरम्यान झालेल्या क्रिकेटच्या सामन्यात, पाकिस्तानचा विजय झाला तर भारतातील काही लोक विजयोत्सव का साजरा करतात, यांचे कोडे वरील प्रतिपादन वाचले, तर उलगडू शकले. ज्यांनी पाकिस्तानच्या निर्मितीसाठी परिश्रम केले आणि यावद्दल ज्यांना आजपर्यंत कधी खंत वाटली नाही, त्यांना पाकिस्तानच्या विजयाचा आनंद होणार नाही, तर काय होईल? भारताचे नागरिकत्व देऊन आणि इतर सोयी, स्वच्छती आणि खुशामतीची वागणुक देऊन राष्ट्रीयत्व निर्माण होऊ शकत नाही. त्या सोयी सवलती आणि खुशामतीची वागाणूक देणाऱ्याविषयी फार तर स्नेहभाव राहू शकतो. रेनॉ चे हे प्रतिपादन मान्य केले की, मग आपले हे हिंदु राष्ट्र आहे हे मान्य करण्याशिवाय गत्यंतरच राहात नाही.

हिंदु शब्दाचा इतिहास

'हिंदु राष्ट्र' हा सामासिक शब्द आहे. त्याचा विग्रह दोन प्रकारांनी करता येतो. एक विग्रह आहे, हिंदूचे राष्ट्र ते हिंदूराष्ट्र. दुसरा विग्रह आहे. हिंदू असे राष्ट्र, ते हिंदुराष्ट्र. पहिला समास बष्ठी तत्पूरूष समास आहे, दुसरा कर्मधारय समास आहे. कर्मधारय समासात हिंदू हे गुणवाचक विशेषण आहे. हिंदू या विशेषनामाला हे गुणवाचकत्व त्याचा अत्यंत प्राचीन असा इतिहास, सुखदुःखाचे समान प्रसंग बरे-वाईट, श्रेय-देय ठरविण्याचे समान मापंदड श्रेयस्कर आणि आदर्श मापदंडांना आपल्या जीवनात चरितार्थ करणाऱ्या महापुरूषांविषयी आदराची समान भावना, आणि या महापुरूषांना विरोध करणाऱ्याविषयी तिरस्कार व तिटकारा या सर्वांच्या समुच्चयाने, प्राप्त झाले आहे. या सर्वांचा समुच्चय म्हणजेच संस्कृती.

कुणी कुणी असा कीस काढतात की, 'हिंदू ' हा शब्द प्राचीन नाही. एवढेच नव्हेतर तो परक्यांनी दिलेला आहे. या दोन्ही गोष्टी मान्य करावयास हरकत नाही. ऋग्वेदादि प्राचीन ग्रंथामध्ये, रामायणमहाभारतादि तुलनेने अर्वाचीन ग्रंथांमध्ये, एवढेच काय पण श्रीमदाद्य शंकराचार्यांच्या भाष्यांमध्ये सुद्धा हिंदु शब्द नाही तथापि, आज ज्या समाजाला हिंदू म्हणून ओळखले जाते, त्या समाजाने ऋग्वेदी ग्रंथाना, रामायण - महाभारतांना, शंकराचार्यांच्या भाष्याला आपले मानले आहे त्याच्यां वारसा स्वीकारण आहे. ज्या ऋषींच्या, ज्या पूर्वजांना त्यांच्या बऱ्यावाईट कर्तव्यासह या समाजाने स्वीकारले आहे. वडिलंच्या इस्टेटीवर तेवढा हक्क

सांगायचा आणि कर्ज नाकारयाचे असे त्याने केले नाही. हिदू शब्द अर्वाचिन असलेही, पण हिंदू राष्ट्र अत्यंत प्राचीन आहे.

हिंदू हे नाव परक्यांनी दिले आहे, असे सांगितले जाते. पण त्यानेही काही बिघडत नाही. तुमचे नाव, तुमचे आडनाव, हे दुसऱ्यानेच दिलेले असते. पण तुमचे संपूर्ण अस्तित्व, व्यक्तिमत्व आणि अस्मिता त्या नावाशी निगडित त्या नावाभोवती गुंफलेली आणि त्या नावात गुंतलेली असते. तसेच या राष्ट्राचे संपूर्ण अस्तित्व, व्यक्तिमत्व आणि अस्मिता ही सारी हिंदू या नावाशी जडलेली आहे. 'भारतीय' या नावाशी वैर असण्याचे कारण नाही पण एकतर तो प्रादेशिक अर्थाचा द्योतक आहे दुसरे म्हणजे तो 'इंडियन ' या इंग्रजी शब्दाचे भाषांतर म्हणून उपयोगात आणला जात असतो. हिंदू पासूनच 'इंडस्' 'इंडस्' पासून 'इंडियन ' आणि त्या 'इंडियनचे ' भाषांतर आम्ही 'भारतीय' केले आहे. या 'भारतीय' शब्दाला जेव्हा केव्हा आपण गुणात्मक अर्थ प्रदान करतो, तेव्हा त्याचा अर्थ हिंदू असाच होतो. आपल्या विद्यापीठांमध्ये 'इंडियन फिलॉसॉफी' शिकवितात,त्याचे भाषांतर आपण 'भारतीय तत्वज्ञान' असे करतो. पण त्याचा आशय असतो, "हिंदूतत्वज्ञान. " कारण त्यात सांख्य, वेदान्त, न्याय या हिंदू दर्शनशास्त्रांचा अभ्यास केला जातो. भारतीय शिल्प, भारतीय नाटयशास्त्र, या साऱ्या शब्दावली मध्यें 'भारतीय' चा अर्थ 'हिंदु ' हाच आहे.

संस्कृती म्हणजे काय?

श्री रेनॉ यांनी म्हंटल्याप्रमाणे 'राष्ट्र' संस्कृती म्हणजे काय? संकल्पनेची जी भावनिक बाजू असते, ती इतिहासाने आणि संस्कृतीने तयार झालेली असते. इतिहासाचा अर्थ स्पष्ट आहे, आणि संस्कृती म्हणजे काय?- जरा खोलात जाऊन विचार केला, तर संस्कृती म्हणजे लोकांनी मान्य केलेही मूल्यव्यवस्था. विशिष्ट मूल्यव्यवस्था प्रदीर्घ काळात तयार होते. ही मूल्ये आपल्या जीवनात चरितार्थ करणारे महापुरूष असतात. तेच समाजाचे आदर्श बनतात. तेच गौरवाचे व श्रद्धेचे विषय ठरतात. सामान्य माणूस संस्कृतीची व्याख्या आणि चिकित्सा करू शकणार नाही. पण संस्कृतीच्या मूल्यांचे भान त्याला अवश्य असते. आपल्या येथे नवीन मूल जन्माला आले, तर त्याचे नाव कोणी रावण ठेवीत नाही. रावण ना मुसलमान होता ना ख्रिस्ती. तो तर मोठा पंडित होता. सोन्याच्या लंकेचा राजा होता. पण त्याचे नाव कोणी ठेवीत नाही. कारण रावणाचे चरित्र लोकांना भावत नाही. मान्य नाही. 'राम' मान्य आहे. म्हणून पुरूषाचे नाव राम ठेवले जाते. गरीब, अकिंचन तपस्वांची नावे ठेवली जातात. बलिदान करणाऱ्यांची नाव ठेवली जातात. संतांची आणि साध्वींची नावे ठेवली जातात. इतिहासाच्या प्रक्रियेत अशा मान्यता प्रश्नाची एक मलिका तयार होते. ती मालिका विशिष्ट जीवनमूल्येच प्रकट करीत असते. ही मालिकांच मूल्यांची एक संदर्भचौकट (Frame of Reference) बनवीत असते. सामान्य जन, प्रत्येक वेळी, प्रत्येकी कृत्तीचा विश्लेषणात्मक विचार करीत

नसतात. ते ती कृती या संदर्भचौकटीकडे नेत असतात. आणि तिच्या मापदंडाने त्या कृतीची देयता किंवा उपादेयता ठरवीन असतात. अशी जीवनमूल्ये प्रस्थापित करणाऱ्या महापुरूषांचा इतिहास आणि मूल्यांची संदर्भचौकट यांच्या समन्वयाने संस्कृती तयार होत असते. ही संस्कृतीच राष्ट्र - कल्पनेची आधारशिला असते. आमच्या या संस्कतीचे नाव 'हिंदू' संस्कृती आहे. म्हणून हे 'हिंदू' राष्ट्र आहे.

संस्कृतीचे गतिशीलत्व

संस्कृती ही गतिशीलही असते. म्हणजे शाश्वत तत्वे कायम असतात. परंतु बाह्य आकार-प्रकार बदलत असतात म्हणून साचलेल्या रूढींचे डबके म्हणजे संस्कृती नव्हे. गतिमान प्रवाह वाहणारा असतो. तो पूर्वी होता, आजही आहे आणि पुढेही राहणार आहे. या प्रवाहमान जगात संस्कृतीच्या रचनेतही बदल होत असतो. जे बदलत नाहीत, ते संपतात. आमची संस्कृती संपली नाही, कारण ती थांबली नाही. स्वतःत उचित परिवर्तन करीत गेली. परंतु तिचा आत्मा मात्र कायम असतो. या आत्मत्वावरूनच सतत परिवर्तनशील जगात तिची ओळख कायम राहते. ऋग्वेदात इंद्र, वरूण आणि अग्नी या प्रधान देवता आहेत. पण त्यांचे आज एक ही मंदिर नाही. ज्यांची मंदिरे आणि भक्त आहेत, ते शिव, विष्णु, देवी, गणपती, दत्तात्रेय, राम, कृष्ण, विठ्ठल, यांचे नाव देखील ऋग्वेदात नाही. नव्या नव्या देवता आल्या आहेत, येत आहेत. पन्नास वर्षापूर्वी संतोषी मातेचे नावही कोणी ऐकले नव्हते. आता तिच्या भक्तानी तिचे मंदिर बनविले आहे. पण त्यासाठी कोणतेही जुने मंदिर फोडले वा पाडले नाही. साई मंदिरे जागोजागी उभी होत आहेत. गुरूचरित्राच्या आणी गजानन महाराजांच्या पोथ्यांची पारायणे, वेदपठनाइतक्याच निष्ठेने आणि चिकाटीने केली जात आहेत. आणि तरी हे सर्व करणाऱ्यांचा ऋग्वेदाशीही संबंध कायम आहे. संस्कृतीचे सातत्य अर्थात परिवर्तनशीलता याचे हे उदाहरण आहे. उपास्यांच्या बाबतीत स्वातंत्र्य हा जो हिंदू संस्कृतीचा विशेष आहे, त्यांचा हा विलोभनीय अविष्कार आहे. म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् म्हणतात -

Hinduism is a way of life, not a form of thought. It is a movement, not a position, a process not a result, a growing tradition not a fixed revelation.

[अनुवाद- हिंदुत्व किंवा हिंदु संस्कृती हा एक जीवनमार्ग आहे, विचारांची बांधील आकृती नाही. ती गती आहे, स्थिती नाही. ती एक प्रक्रिया आहे, परिणाम नाही. ती विकासमान परंपरा आहे, साचेबंद साक्षात्कार नाही].

यातली 'ग्रोइंग ट्रॅडिशन' ही शब्दावली महत्त्वाची आहे. 'विकासमान परंपरा.' परंपरा आणि तरी विकासमान! प्राचीनाशी संबंध असल्याशिवाय, परंपरा बनू शकत नाही. पण केवळ प्राचीनाशी संबंध ठेवून ती तेथेच थांबली, तर ती विकासमान असू शकणार नाही. हिंदु संस्कृती ही विकासमान असल्यामुळे, ती किंवा तिचे पुरस्कर्ते 'फंडामेंटालिस्ट' बनू शकत

नाही. फंडामेंटालिस्ट असण्यासाठी विचाराची एकच स्थिर स्थिती, किंवा त्याचा एकच अर्थ ग्राह्य आणि बाकीचे त्याज्य, एकच पैगंबर, तोच अंतिम सत्य सांगणारा अंतिम देवदूत असे मानावे लागते. जे असे मानतात, तेच फंडामेंटालिस्ट होतात. हिंदू संस्कृती असे मानीत नाही. हिंदू जनही तसे मानत नाहीत. सत्याकडे जाण्याचे अनेक मार्ग असू शकतात, हे सिद्धान्ततः हिंदू संस्कृती मानते, आणि व्यवहारात अशा भिन्न भिन्न मार्गांनी जाणाऱ्यांना ती आपल्यात सामावून घेते. कारण हे सर्व मार्ग खरे आहेत, असे ती समजते. हिंदुत्वाचा हा विचार अर्नाल्ड टॉयनबीने उत्तम रीतीने प्रकट केला आहे. तो म्हणतो-

"Hinduism takes for granted that there is more than one approach to truth and to salvation, and that these different approaches are not only compatible but are complementary".

[अनुवाद - सत्याकडे आणि मोक्षाकडे जाण्याचे मार्ग एकाहून अधिक असतात, असे हिंदुत्व गृहीत धरते. आणि हे भिन्न भिन्न मार्ग केवळ परस्परांशी अविरोधीच नसतात, तर परस्पर पूरकही असतात.]

हिंदू राष्ट्राची प्रतिष्ठापना म्हणजे काय?

'हिंदू राष्ट्र' याचा अर्थ, ही संस्कृती, ही मूल्ये, आणि हे विचार मानणाऱ्या समाजाचे राष्ट्र. कर्मधारय समास स्वीकारला, तर ही संस्कृती, ही मूल्ये आणि हे विचार मानणारे राष्ट्र. या राष्ट्राचे घटक असणाऱ्या लोकांच्या भाषा विविध आहेत. रिलिजन म्हणजे उपासना - संप्रदाय वेगवेगळे आहेत. कुणी मूर्तिपूजक आहेत, तर कुणी मूर्तिपूजा न मानणारे आहेत. लोकांचे पवित्र ग्रंथही भिन्न आहेत. कुणी वेद मानणारे आहेत, तर कुणी त्यांचे प्रामाण्य न मानणारे आहेत. परंतु असे भेद असले, तरी जीवनविषयक दृष्टिकोण सर्वांचा समान आहे. बंगाली भाषेतला राम आणि मराठी भाषेतला राम सारखाच आहे. रावणही एकच आहे. म्हणून हे एक राष्ट्र आहे, आणि ते हिंदू राष्ट्र आहे, आम्ही जेव्हा हिंदू राष्ट्राच्या प्रतिष्ठापनेची बात करतो, तेव्हा आम्हाला समाज जीवनात ही मूल्ये प्रकर्षाने प्रतिष्ठित करावयाची आहेत, असत्यांचा अर्थ असतो. सुमारे एक हजार वर्षाच्या संघर्षाने , या संघर्षात अनेक वेळा प्राप्त झालेल्या पराभवामुळे आणि गुलामीच्या अनुभवामुळे ही मूल्ये धूमिल झाली आहेत. त्यांच्या वरची राख झाडून ती पुनः तेजस्वी आणि प्रखर करावयाची आहेत. हिंदूंच्या नवजागृतीचे हे उद्दिष्ट आहे. ही त्या जागृतीची दिशा आहे. इतरांच्या उपास्यांचे भंजन केल्याशिवाय, ज्यांच्या उपास्यांची प्रतिष्ठापना होऊ शकत नाही, त्यांचे हे राष्ट्र नाही. ते सारे अराष्ट्रीय आहेत. या बाबतीत संदिग्धता बाळगण्याचे कारण नाही.

धर्म म्हणजे काय?

या लेखाचा समारोप करण्यापूर्वी आणखी एक मुद्दा स्पष्ट करणे आवश्यक आहे. तो मुद्दा

म्हणजे धर्म व संस्कृती यांच्या अर्थाचा आणि परस्पर संबंधांचा. संस्कृतीचा अर्थ तर स्पष्ट करण्यात आला आहे. तेव्हा धर्माचे विवेचन केले पाहिजे. एक गोष्ट अगोदरच स्पष्ट केली पाहिजे. ती ही की, धर्म म्हणजे 'रिलिजन ' नव्हे. धर्म शब्दाचे 'रिलीजन 'हे भाषांतर अत्यंत चूक आहे. आणि वैचारिक विकृतीला आणि गोंधळाला त्याने जन्म दिला आहे. धर्मशाळा ही काय 'रिलिजस स्कूल' असते? आणि धर्मार्थ दवाखाना काय 'हॉस्पिटल फॉर रिलिजन' असतो? आपले धर्मशास्त्र म्हणजे सायन्स ऑफ रिलिजन नव्हे. म. म. डॉ. पां. वा. काणे यांनी 'हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र' हा प्रचंड ग्रंथ इंग्रेजी भाषते लिहिला आहे परंतु त्यांनी धर्मशास्त्र या शब्दाचे इंग्रजी भाषांतर केले नाही. डॉ. काणे यांना, रिलिजन शब्द माहीत नव्हता काय? तेव्हा धर्म आणि रिलिजन एक नव्हते, हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. 'धर्म 'हे धारण करणारे, जोडणारे, बांधणारे सूत्र आणि तत्व आहे. कुणाचे ते धारण करते? कुणाला ते जोडून आणि बांधून ठेवते? अर्थात संपूर्ण विश्वाला. या विश्वात काय काय आहे? स्थूलमानाने चार अस्तित्वे आहेत. (१) मानव व्यक्तिरूपाने (२) मानव, समाजरूपाने (३) मानवेतर सृष्टी आणि (४) या सर्वामध्ये व्याप्त असणारे चैतन्य. या चौघानांही जे जोडून ठेवते, जे बांधून ठेवते, यांचे जे धारण करते, ते सूत्र म्हणजे धर्म. हे धारण अर्थातच सामंजस्याने होणारे. म्हणून धर्म म्हणजे वैश्विक सामंजस्याचे सूत्र. व्यक्ती आणि समाज यांच्यात टकराव असंभव नाही. कारण दोघांच्या हितसंबंधामध्ये बेबनाव येऊ शकतो. एक मत व्यक्तीलाच सर्वश्रेष्ठ मानते. या मताने अनिर्बध भांडवलशाहीला जन्मास घालावे. दुसरे मत व्यक्तीला नगण्य समजून समाजाला सर्वश्रेष्ठ मानते. या मताने समाजवादास जन्म दिला आहे. दोन्ही वाद अपूर्ण आणि अहितकर ठरलेले आहेत. धर्म या दोघांमध्ये सामंजस्य निर्माण करतो. त्यांच्यात अंगांगिभाव आहे, असे तो सांगतो. व्यक्ती स्वतःसाठी घर बांधते, तेव्हा तो धर्म होत नाही. जेव्हा इतरांसाठी निवारा तयार करते, तेव्हा ती धर्मशाळा होते. धर्मशाळा व्यक्तीला समाजाशी बांधून ठेवते. धर्मशाळा समाजाचे धारण करते. व्यक्तीला समाज सापेक्ष बनविते. श्रीभगवतगीतेत, 'भुंजते ते त्वद्यं पापा ये पंचत्यात्म कारणाने' असे म्हटले आहे. त्याचा अर्थ, जे फक्त स्वतःसाठी अन्न शिजवितात, ते अन्न भक्षण करीत नाहीत, पाप भक्षण करतात, असा आहे. यात व्यक्तीने स्वतःसाठी अन्न शिजवू नये, असे सांगितले नाही. पण त्याचे अन्न शिजविणे हे समाज सापेक्ष असले पाहिजे, असे सांगितले आहे. व्यक्ती आणि समाज यांचा संबंध अशा रीतीने जोडणे, याचे नाव धर्म आहे. ज्या ज्या कृती असा संबंध जोडतात, त्या सर्व धर्मकृती होत.

धर्म - भावने आविष्कार

श्रीभगवतगीतेतच, 'देवात् भावयतानेन, ते देवा भावयन्तु नः . परस्पर भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ '- असा श्लोक आहे. येथे 'देव' म्हणजे निसर्गातील शक्ती. सृष्टीतील या शक्तींचे आपण जतन केले पाहिजे, म्हणजे त्या आपले जतन करतात, असा या श्लोकाचा

भावार्थ आहे. नदीचे आपण जतन केले पाहिजे, म्हणजे नदी आपले जतन करील. वृक्षाचे आपण जतन केले पाहिजे, म्हणजे वृक्ष आपले जतन करतील. बाह्यतः निर्जीव दिसणाऱ्या सृष्टीतील वस्तूंचे जतन कोणत्या भावनेने करावयाचे? अर्थात आदराच्या भावनेने, तसेच आत्मीयतेच्या भावनेने. मातृत्वाची भावना ही सर्वोत्तम आदराची आणि जिव्हाळ्याची भावना आहे. म्हणजे नदी लोकमाता आहे. 'गंगामैया' बनली आहे. म्हणून गाय 'गोमाता' आहे. आणि तुळशीचे झाड 'तुलसीमाय' आहे, आणि दगडाधोंडयांची ही जमीन भूमाता किंवा मातृभूमी आहे. हे सारे धर्म भावनेचे आविष्कार आहेत. मानव आणि मानवतेवर सृष्टी यांचे हे मातापुत्राचे नाते धर्म सांगतो. म्हणून आमच्या कडे 'कॉंक्वेस्ट ऑफ नेचर' ची कल्पना नाही. 'कॉंक्वेस्ट' परक्यांवर मिळवायचा असतो. आपल्या आईवर नाही. तिच्यावर प्रेमच करावयाचे असते. सर्व प्रकारची निसर्गपूजा त्यामुळे धर्म आहे.

चैतन्यतत्वाचे पूजन एक नास्तिक सोडले, तर सर्वच करतात. या तत्वाचेच नाव परमात्मा किंवा परमेष्टी आहे. याची अनेक रूपे आहेत. सर्वत्रच ते भरले आहे. ते तत्व दिसत नाही. म्हणून त्याची वेगवेगळी प्रतीके मानवाने तयार केली आहेत. विशिष्ट प्रतीक तेवढे खरे, इतर खोटी, असे मानणे हा अधर्म आहे. प्रतीकांच्या स्थानांना मानवाने पावित्र्य अर्पण केले आहे. आणि अशा रीतीने, चैतन्य तत्वाशी, आपण संबंध जोडला आहे. हा जो एकमात्र संबंध, त्याला 'रिलिजन' असे नाव आहे. म्हणून धर्मात रिलिजनचा अंतर्भाव आहे. रिलिजनमध्ये धर्म समाविष्ट होत नाही.

विश्वात विविधता असल्यामुळे, संघर्षही आहे. धर्म संघर्षाएवंजी समन्वय आणि सामंजस्य निर्माण करतो. म्हणून धर्माला वैश्विक सामंजस्याचे तत्व मानण्यात आले आहे. हा धर्म आमच्या संस्कृतीचेही आधारभूत तत्व आहे. समाजजीवनाच्या सम्यक संचालनासाठी (for the right ordering), या तत्त्वाचा आधार घेतला पाहिजे सर्व संस्था पाहिजे. त्या आधारातून समाजजीवनाच्या सर्व रचना आणि सर्व संस्था निर्माण केल्या पाहिजेत. याचा अर्थ संपूर्ण समाजजीवन धर्माधिष्ठीत असले पाहिजे. राज्यही धर्मराज्य असले पाहिजे. धर्मराज्य हे थिओक्रॅटिक स्टेट नाही. ते पुरोहितशाहीचे राज्य नाही. हिंदुराष्ट्राला असे राज्य मान्य नाही. वैश्विक सामंजस्याचे भान ठेवणारा धर्म, आमच्या संस्कृतीचा आधार आहे. धर्म आणि संस्कृती यांचा असा घनिष्ठ संबंध आहे. आमची संस्कृती धर्माधिष्ठित आहे, असे जेव्हा आम्ही म्हणतो किंवा आमचे ऐहिक जीवन धर्मनियंत्रित असावे, असे जेव्हा आम्ही प्रतिपादितो, तेव्हा त्याचा हा अर्थ असतो. धर्मसापेक्ष जीवन म्हणजे समाजसापेक्ष, सृष्टिसापेक्ष आणि चैतन्य सापेक्ष असे जीवन, या प्रकारच्या जीवनाची कामना आणि साधना हे हिंदुराष्ट्राचे वैशिष्टय आहे. त्याच्या अस्तित्वाचे प्रयोजन आहे.

* * * *

हिंदुत्वाची ॲलर्जी !

लेखक : विद्याधर गोखले

'अलर्जी' म्हणजे तिटकारा, घृणा. अनेक माणसे एरव्ही निकोप असतात. पण त्यांना 'ॲलर्जी' नामक विकार जडलेला असतो. कोणाला कार्ल्याच्या कडू भाजीची असह्य घृणा असते. कोणाला मांसगोळ्याप्रमाणे दिसणाऱ्या टोमॅटोची घृणा असते. सोंवळया माणसाला व्हिस्कीच्या नुसत्या वासाचाहि तिटकारा असतो. !

'ॲलर्जी' चें हे सर्व प्रकार समजू शकतात पण सुगंधित फुलांच्या सुवासाची देखील ॲलर्जी असू शकते, हे ऐकून आपणास आश्चर्य वाटेल. तथापि ही वस्तुस्थिती आहे की परलोकवासी आचार्य 'भगवान रजनीश' ह्यांना सुगंधाची ॲलर्जी होती. म्हणूनच त्यांच्या प्रवचनांना गर्दी करणाऱ्या फॅशनेबल् सुंदर नारींना देखील मस्तकीं गजरे–वेण्या घालण्यास मनाई होती !

परंतु, सर्वांत आश्चर्याचीच नव्हे तर उद्वेगार्चीहि गोष्ट ही की हिंदुस्थानात जन्मलेल्या हिंदु माणसाला देखील, मंदारफुलांहून सुगंधी, अमृताहून गो आणि गंगेहून पावन अशा हिंदुत्वाविषयी ॲलर्जी असावी ! ही विमारी ब्रिटीशांनी धूतपणें जोपासली, तिच्या प्रभावामुळेच भारताची फाळणी झाली, स्वातंत्र्यानंतरच्या काळात ती अधिकच वाढली. इतकी कीं आपले पुरोगामी पंडित जर विदेशात गेले आणि त्यांना जर कोण्या साहेवाने विचारले– 'Are you Hindu ?' तर हे महाभाग अंगावर पडलेले झुरळ झटकल्यागत उद्गारतील–

'Oh, No No. I am Indian !'

अर्थात, हिंदु हा शब्द ज्या 'सिंधु' शब्दावरून घडला, तोच 'Indian' ह्या शब्दाचा जनक आहे; ('सिंधु'–हिंदु–इंडस्–इंडियन्) ह्याची ह्या गावठी पुरोगाम्यांना वहुशः कल्पना नसते. काय गंमत आहे पहा– अमीर खुस्रो पासून तो इक्वालपर्यंत आणि बाबर पासून औरंगज़ेबापर्यंत वडे बडे मुसलमान ह्या देशाला 'हिंदोस्ताँ' हिंदु' म्हणत आले आहेत. पण हे पुरोगामी पंडित 'More Muslim than the Muslim themselves' असल्यामुळे स्वतः 'हिंदु' म्हणून घेण्यास विचकतात !

अशास्त्रीय प्रयोगाचा अतिरेक !

१९४७ साली ह्या देशाचे भयानक नि लज्जास्पद विभाजन उघड उघड धर्मांध मुस्लिम जातीयतेने घडवून आणल्यावरही 'हिंदु हिंदुत्व हिंदुस्थान' ह्या शब्दांवावतची, सत्तांध सेक्युलरवाद्यानी परिपुष्ट केलेली 'ॲलर्जी' कायमच राहिली. गत ५–१० वर्षांत ती काही थोड्या अंशांनी कमी झाली खरी; पण अद्यापी मोठ्या प्रमाणात राष्ट्र-शरीरात विद्यमान आहे. ह्याला कारण आमच्या बड्यावड्या 'इंडियन' पुढाऱ्यांची अंधश्रद्धा– आणि त्यांतून उद्भवलेला भ्रान्त हिंदी राष्ट्रवाद !– शक–यवन–हूण नि मुसलमान ह्यांची

आक्रमणे होण्यापुर्वीच्या **प्राचीन काळापासून हिंदुस्थान हें एकात्म हिंदु राष्ट्रच आहे, ह्याचा विसर ह्या पुढाऱ्यांना पडला.** अंग–वंग कलिंग– विदर्भ– पांडय इत्यादि विविध राज्यांत विभागला गेला असला तरी, **सारा भारत देश एकाच हिंदु (आर्य, वैदिक) संस्कृतीने बद्ध असलेले राष्ट्र होते आणि हिंदुत्व (हिंदुपणा) हेंच त्याचे प्राणतत्त्व होते**–(आजहि आहे) ह्याचे भान त्यांना उरले नाही. पाश्चात्यांचा प्रचलित राष्ट्र–विचार त्यांनी तारतम्य न बाळगता 'साहेबोक्त प्रमाणम्' ह्या आंधळया निष्ठेने जसाच्या तसा उचलला. राष्ट्रवादातील 'भूमि'– समान भूमि ह्या घटकावर प्रमाणाबाहेर भर दिला. आणि येन केन प्रकारे मुस्लीमांची अलगतावादी आक्रमक वृत्ति नष्ट व्हावी व त्यांनी नूतन हिंदी-राष्ट्रवाद स्वीकारावा म्हणून, आमच्या भ्रान्त नेत्यांनी **मुसलमानांच्या विलगता-वन्हींत सौदेबाज तुष्टिकरणाचे तूप ओतून तो विझवण्याचा उद्योग आरंभिला !**– गांधी–नेहरु युगात ह्या सद्हेतुमूलक पण अशास्त्रीय प्रयोगाचा अतिरेक झाला.

बधिरापुढे सुरेल गायन !

किमान पक्षीं, फाळणीनंतर तरी हा खतरनाक प्रयोग थांबावा असा प्रयत्न काही वास्तववादी शहाण्या विचारवंतांनी केला. पण 'हिंदु-हिंदुस्थान– हिंदुत्व' ह्या संकल्पनांची जबरदस्त ॲलर्जी असल्यामुळे हा प्रयत्न वाया गेला. स्वातंत्र्यवीर सावरकर, धर्मवीर डॉ. मुंजे, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी,गुरुजी गोळवलकर हे हिंदुत्ववीर सोडाच. त्यांच्या विधायक सूचना आणि इशारे 'सूडो-सेक्यूलर' राज्यकर्त्यांनी तर मनावर घेतलेच नाहीत. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे डॉ. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या सारख्या 'प्रोग्रेसिव्ह' विचारवंताचे आवाहनहि बधिरापुढील सुरेल गायन ठरले ! डॉ. धनंजयराव गाडगीळ ह्यांनी ६ आक्टोबर १९४७ ला प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले होते–

"नव्या हिंदु संघराज्याचे समर्पक वर्णन करावयाचे असेल, तर 'हिंदुराज्य संघ' या शब्द समुच्चायाने ते होईल. 'हिंदु' हा शब्द काही एखाद्या विशिष्ट पूजा प्रकाराला किंवा पारलौकिक कल्पनांना उद्देशून आहे असे नाही. हिंदु म्हणून घेणाऱ्या निरीश्वर वाद्यांपासून तो थेट व्यक्तिपूजा करणाऱ्यांपर्यंत सर्वांचा समावेश त्यात आहे. आधिभौतिक वादापासून तो तहत्.... अध्यात्मवादाच्या कल्पनापर्यंत, सर्व कल्पनांचा समावेश 'हिंदु' मध्ये होतो. 'हिंदु'– शब्दाचा व्यापक अर्थ लक्षात घेतला तर पूर्वीच्या आणि अलीकडच्या काळात समाजसुधारणेसाठी झालेल्या बौद्ध, शीख, जैन, लिंगायत, ब्राहमो इत्यादि सर्व आंदोलनांचा त्यांत अंतर्भाव होतो.— म्हणूनच, 'हिंदुराज्य' म्हणजण्याने काही एका विशिष्ट सांस्कृतिक आणि ऐतिहासिक समान परंपरा मानणाऱ्यांचे राज्य, इतकाच अर्थ होतो. आणि **हिंदुसंघराज्य म्हणजे अशा समान संस्कृतीच्या पण भिन्न भिन्न धर्मांच्या (रिलिजन्सच्या) लोकराज्यांचा संघ** असा बोध होईल. आज आसामियांपासून तो गुजराती लोकांपर्यंत आणि पंजाब्यांपासून तो तामिली लोकांपर्यंत सर्वांना एकत्र ठेवणारी कोणती एकच प्रवृत्ती असेल तर ती हिंदुपरंपरा नि संस्कृति यांच्या विषयीची आपुलकीची भावना,

हीच होय "...

आजहि असे वास्तवतावादी राष्ट्रविचार सत्ता-राजकारण्यांच्या बाबतीत पालथ्या घड्यावरील पाणी ठरतात, ह्याचे कारण हिंदु नि हिंदुत्व ह्यांच्याविषयी हाडीमासी खिळलेली ॲलर्जी आणि अल्पसंख्यांकांच्या एकगठ्ठा मतांचा सत्तालोलुप सोस, हेंच आहे – ही शोचनीय **दुःस्थिती दूर करण्यासाठी संस्कृतिनिष्ठ, विज्ञान निष्ठ, वैशिष्ट्यपूर्ण भारतीय धारणांच्या भक्कम पायावर हिंदुत्वाचे पुनरूत्थान, हाच एकमेव उपाय आहे.**

हें पुनरूत्थान करू पाहणाऱ्या काही हिंदुत्वनिष्ठांच्या हृदयातहि– 'हिंदुत्व-संकल्पना' सुस्पष्ट नसते. सतत ७५ वर्षें चालू राहिलेल्या उद्वेगजनक मुस्लिम-तुष्टीकरणाची तीव्र प्रतिक्रिया झाल्यामुळे, 'हिंदुत्व' ही निषेधपर (Negative) संकल्पना नसून, विधायक विशाल संकल्पना आहे, ह्याचा विसर त्यांच्या भावनाप्रधान मनास होऊ शकतो. त्यास हा बोध देणें आवश्यक आहे की **'हिंदुत्व' हा अखेरीस उदात्त मानव्याकडे नेणारी शास्त्रपूत सोपान होय,** हीच स्वा. सावरकरांचीहि धारणा होती–

थेट वैदिक काळापासून हीच धारणा येथील ऋषि मुनींनी, साधुसंतांनी आणि विचारवंतांनी जोपासली आहे. पण आमच्या पुरोगामी पंडितांना प्रस्तुत विशाल हिंदुत्वाच्या बुडाशीं असलेल्या भारताच्या परंपरागत ज्ञान-विज्ञानपूत धारणाच नीट उमजलेल्या नाहीत. 'हिंदुत्व' म्हणजे ह्या देशाच्या समता-ममता–बंधुता इत्यादि नैतिक मूल्यांवर आधारलेली, सर्वभूत हिदरत, समंजस सहिष्णु जीवन पद्धती– The Hindu way of life ! आज ह्या जीवन पद्धतीचा सखोल अभ्यास पाश्चिमात्य विचारवंत करू लागले आहेत. आणि इकडे आमचे उथळ पुरोगामी आणि लोभी खुर्चीवादी मात्र 'हिंदुत्व म्हणजे संकुचित जातीयत्व' असा ठणाणा करताहेत, हें केवढे दुर्दैव ! पण हे दुर्दैव नि दैन्य दूर करण्यासाठी आपल्या देशात **सांस्कृतीकरणाच्या तुलनेने राजकारणाला दुय्यम महत्त्व दिले गेले पाहिजे.** राजकारण ही शक्ति आहे खरी; पण ती संस्कृति संपन्न शिवाच्या हातीं राहिली पाहिजे ! हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरच **'विश्वाचिया अखिल मंगल धारणार्थ'** असे हिंदुत्व प्रभावी होऊन, त्याची ॲलर्जी नष्ट होईल. यासाठीच, 'हिंदु' ह्या संकल्पनेच्या व्याख्येचा अर्थ अधिक सुस्पष्ट व्हावा ह्या हेतूने–

आसिंधु सिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव सवै हिंदुरिति स्मृतः ॥

ह्या सावरकरी व्याख्येला त्यांच्याच एका सांगलीकर भक्ताने दिलेली जोड मला कालोचित व महत्त्वाची वाटते. जोड अशी–

मात्स्य-न्याय-विरोधश्च, गतिः, धर्म-सहिष्णुता
निष्ठा समाजे विज्ञाने स वै हिंदुरिति स्मृतः ॥

❊ ❊ ❊

मार्क्सवाद– धर्म–हिंदुत्व

श्री. अर्धेंदु भूषण बर्धन

श्री. बाळासाहेब देवरसांचा पर्याय

रा. स्व. संघाच्या दसरा मेळाव्यात दि. १७ आक्टो. ९१ रोजी श्री. बाळासाहेब देवरसांचे जे भाषण वाचण्यात आले त्यात, सरसंघचालकानी घोषणा केली की, "आता साम्यवादाचा अंत झाला आहे, तेव्हा हिंदुत्वच ती पोकळी भरून काढू शकते."

या ठिकाणी, मी बाळासाहेबांशी, साम्यवादाचा खरोखरी अस्त झाला आहे का ? अथवा तो होण्याचा मार्गावर आहे कां ? या विषयावर प्रतिसाद घालणार नाही पण येवढेच म्हणेन की, त्यांनी उपस्थित केलेला विकल्प चूक आहे. तो गैरलागू आहे. साम्यवाद विरुद्ध हिंदूधर्म किंवहुना कोणताही धर्म असा विकल्प नाही. विकल्प आहे तो, साम्यवाद म्हणजेच वास्तव अर्थाने समाजवाद व भांडवलशाही ह्यांच्यात; निर्धन आणि सधन ह्यांच्यात; तसेच मुठभरांची (देश, लोक, वर्ग इत्यादिंची) सुवत्ता आणि विशाल बहुसंख्य जनसमुदायाचे, पूर्वकालिन वसाहतींचे आणि जगभरच्या वंचितांचे दारिद्र्य, अज्ञान अनारोग्य त्यांची अनावस्था, ह्यामध्ये.

ह्या संघर्षात, धर्मचार्यांनी आणि अग्रणी धर्मोपदेशकांनी ज्या धर्माचे प्रतिपादन केले त्या धर्मांनी, देशाच्या किंवा लोकांच्या भाग्य-निधानाच्या ऐतिहासिक क्षणी कुणाचा पक्ष घेतला किंवा पुढेही कुणाचा पक्ष घेण्याची त्यांची मनिषा आहे ? हा, खरा प्रमुख प्रश्न आहे. धर्माचे ऐतिहासिक स्थान त्यावर निर्भर आहे. त्याचे तत्त्वज्ञान, त्याच्या निष्ठा, त्याचे पंथ आणि श्रद्धा ह्यावर नव्हे.

भारतीय मार्क्सवाद्यांवरील आरोप

भारतिय मार्क्सवाद्यांसह आम्हा सर्व मार्क्सवाद्यांवर केवळ नास्तिकतेचाच आणि निरिश्वर वादाचाच नव्हे तर धर्मविरोधक असल्याचाही आरोप होत असतो. रा.स्व.सं.-विहिंप-भाजपा ह्यांचे बुद्धीवंत प्रचारक, आम्ही, खास करून हिंदुधर्म विरोधक, हिंदुना डिवचणारे म्हणजेच मुसलमानांप्रती मऊ असल्याचा आरोप करीत असतात. आम्ही कबुली देतो, की, रा.स्व.सं. विहिंप, भाजपा अभिप्रेत 'हिंदुत्त्व', 'हिंदू-ऐकता', 'हिंदू जाणीवा' ह्यावर आधारित आणि स्वत:चा राजकीय स्वार्थ पुष्ट करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या, आक्रमक जातीयवादी दृष्टिकोणाला आम्ही पूर्वी विरोध केला आहे व यापुढेही करीत राहू. ह्या दृष्टिकोणाने राष्ट्राच्या एकतेची, बंधुभावाची आणि आपसातील सामंजस्याची अपरिमित हानी झालेली आहे. हिंदुचेच स्वत:चे अहित झाले आहे. हिंदुणत्वाची पिछेहाट झाली आहे. अंतिमत: धर्मतत्त्वज्ञानसुद्धा, मग तो धर्म इतर धर्मांपेक्षा पुरातन असला तरी, काळाच्या गतीवरोवर, सामाजिक-सांस्कृतिक प्रगतिबरोबर, मानवी

भौतिक तथा अध्यात्मिक प्रगतिबरोबर उल्क्रान्त होत जाते. ह्याची प्रचिति इतिहासातील हिंदुधर्मांतर्गत चळवळीमध्ये तसेच बाह्य चळवळीमध्ये येते.

अतिउत्साही कम्युनिष्टांचा अेकांगीपणा

कदाचित्, बजरंगदल आणि विहिंप धर्तीच्या जातीयवाद्यांशी घडलेल्या शाब्दिक चकमकीत काही अतिउत्साही कम्युनिष्टांनी ओरखडे काढले असतील किंवा एकांगीपणा केला असेल. त्यातून विरोधकांना विपरार्थ करण्यासाठी निमित्तही पुरविले गेले असेल, अथवा श्रद्धाळूंच्या विशेषत : हिंदूश्रद्धाळूंच्या भावना दुखावल्या गेल्याचा समजही निर्माण झाला असेल. अर्थात मला , की, रा.स्व.सं.–भाजपा प्रचारकांच्या ठिकाणी स्विमित करणारे काहितरी आहे. अत्यंत सूक्ष्म तपशीलाला अत्यंत भिषण आरोपाचे वळण देण्यात, क्षुल्लंक 'घटनेच्या' भांडवलावर इतरांच्या विरोधात आरोपांचा नी अपशब्दांचा डोंगर रचण्यात ते अत्यंत तरबेज आहेत.

तेव्हा माझ्या शक्तीनुसार प्रयत्न करून या प्रश्नाची उकल मला करू द्या. प्रत्येक धर्माचा उदय,मग त्या धर्माची मूळे पुरातननेत कितीही खोलवर गडप झाल्यासारखी वाटत असली तरी,इतिहासाच्या एका टप्यावर, मानवी सामाजिक विकासाच्या एका विशिष्ट अवस्थेत झालेला आहे. धर्माचा उदय झाला आहे. तो मानवाला प्राप्त झालेल्या त्यावेळच्या अवस्थेतून; इहलोकीच्या आपल्या अस्तित्वाचे आणि आपल्या बाह्यत्कारी दर्शनाचे स्पष्टीकरण शोधणाऱ्या प्रयत्नातून; निर्सगातील अद्भुते आणि त्याची दैदिप्यमानता ह्यांच्याशी असलेल्या मानवाच्या सहसंबंधातून धर्माचा उदय झाला आहे तो, विश्वाच्या नियंत्रणातिल वास्तव आणि विवेकी हेतुतून आणि निसर्गाच्या शिस्तबद्ध सुसंवादी व्यवस्थेतून. धर्माने, मानवाचे त्याच्या सह-बांधवांशी आणि सह-प्राणीमात्रांशी असलेले संबंध नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. मानवी आपदामध्ये आणि कष्टामध्ये मन :शांति देण्याचा प्रयत्न केला. मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी एक नैतिक संहिता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. **अमर्याद अज्ञाताच्या शोधातील ती एक तत्त्वज्ञानीय महाकाय झेप होती.**

बौद्ध, ख्रिश्चन, किंवा इस्लाम धर्माचा उदय झाला. तो काळ, ज्या विशिष्ट सामाजिक संदर्भात त्यांनी आपल्या तत्वज्ञानाचा विस्तार केला तो संदर्भ, त्यांच्या संहिता आणि उपासना पद्धती सुविदित आहेत. त्याचप्रमाणे विविध राष्ट्रातील त्यांच्या विस्तारात आणि विकासांत कशाचे योगदान आहे हे आणि विविध पंथांच्या नी आयामांचा उदय ही ज्ञात आहे. मात्र ज्याला नंतर हिंदुधर्म म्हणून ओळखले गेले त्याच्या उगमाचा नेमका निर्देश करण्यातील अडचण ही आहे की, त्याचा मागोवा कुणा एकाच ग्रंथात, एकाच प्रेषिताच्या ठिकाणी, एकाच गुरुच्या ठिकाणी, एकाच अवतारात किंवा दैवतात किंवा एकाच धारणा पद्धतीत घेता येत नाही.

हिंदुधर्माचा काळ

तरीपण विविध शोधसाधनांच्या आधारावर हिंदुधर्म ज्या अति परातन पौराणिक साहित्याची बांधिलकी सांगतो त्या प्रमाण ग्रंथाचा जवळ पास बिनचुक काळ निश्चित करणे साध्य झाले आहे. त्यानुसार, असे सांगितले जाते की, श्रृति साहित्यापैकी ऋग्वेदाचा काळ इ.स. पूर्व १४००, सामवेदाचा व यजुर्वेदाचा काळ इ.स. पूर्व १४०० ते इ.स. पूर्व १००० अथर्ववेदाचा काळ इ.स. पूर्व १२०० असा आहे. ब्राम्हण, आरण्यके आणि अन्य उपनिषदे आणि स्मृति साहित्य हे त्यानंतर बऱ्याच कालांतराने आले- तसेच पुराणे देखिल. त्यांचा नी विविधपंधाचा त्यांच्या सर्व देवदेवतांसह आणि उपासना प्रकारांसह इतिहासात सहज मागोवा सापडतो.

मिथ

येथे असे सुचविण्याचा प्रयत्न नाही की, धार्मिक श्रद्धाविधी किंवा त्यामागील तत्वज्ञान धर्मशास्त्राच्या किंवा श्रृति-स्मृतिच्या निर्मितिच्या काळीच अस्तित्वात आले. वास्तवत : ते पुर्वीचे अस्तित्वात होते आणि नंतरच्या काळात त्याला आजचे स्वरुप प्राप्त झाले. हे बरोबरच आहे की पौराणिक कल्पना (मिथ) म्हणजे असत्य (मिथ्या) नव्हे. ती एक सामाजिक-मनोवैज्ञानिक संकल्पना आहे. ती एक अत्यंत गुंतागुंतीची वास्तवता आहे आपल्या प्राचीन इतिहासाचे आणि त्याहून प्राचीनतम भूतकाळाचे आकलन करण्यार्च सखोल दृष्टी त्यातून मिळते. आणि मग कोसंवी यांनी म्हटल्याप्रमाणे ''धर्म पौराणिक कल्पनांना हटवादाचे आवरण चढवितो...'' (डी.डी. कोसंबी :मिथ अँड रियालिटी).

स्वामी विवेकानंद प्रसंगोपाढ म्हणाले की, ''प्रत्येक धर्मात तुम्हाला तीन अवस्थांच आढळ होतो : तत्वज्ञान, पौराणिकता नी कर्मकांड'' (विवेकानंद :कलेक्टेड वर्क्स,खंड ६ प्र.६-७). धर्माच्या उत्क्रान्तिचे- त्याच्या तत्वज्ञानाचे, पुराणशास्त्रांचे, त्याच्या संस्कारांचे त्याच पंथांचे नी कर्मविधीचे मूल्यमापन केवळ धर्म ज्या नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीतून उगम पावला व जिच्यावर तो आपले वर्चस्व गाजवितो त्या परिस्थितीतून करता येते. त्यातूनच धर्माचा अर्थ स्पष्ट होतो. याचा अर्थ असा नव्हे की हे सर्व संबंध सुलभ आणि एकरेखीय आहेत. खरेतर, ते अत्यंत गुंतागुंतीचे आहेत. एकदा धार्मिक तत्वज्ञान निर्माण झाले व त्याने आकार घेतला की, ते मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र होत जाते. स्वत:च्या धारणांच्या नी स्वतंत्र अस्तित्वाचाभास असलेल्या विचार प्रक्रियांच्या आधारावर- केवळ प्रचलित आर्थिक व सामाजिक स्थितीच्या आधारावर नव्हे- विकसित होत जाने. हे सहज समजण्या सारखे आहे.' कारण सामाजिक विकासाचे द्वंद्व सुद्धा अशा अनेक प्रवृत्तीचा प्रसव करते की ज्यात अनेकदा केवळ परस्पर विरोधीच असतात असे नाही तर विसंवादीही असतात. ह्याचा सुस्पष्ट प्रत्यय भगवद्गीतेइतका अन्य कुठेही येत नाही. गीतेने परस्परविरोधी नी विसंवादी गोष्टींचा मेळ घालण्याचा किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्याचा

प्रयत्न केला आहे.

फ्रेड्रिक एंगल्स, मार्क्सवादाचा सह-संस्थापक, म्हणतो की, ''धर्म म्हणजे माणसाच्या मनात उमटलेले, दैनंदिन जीवनाचे निमंत्रण करणाऱ्या बाह्य शक्तीचे अद्‌भूत प्रतिबिंब आहे. असे प्रतिबिंब की ज्यात इहलोकीच्या शक्तीचे रुप घेतात. इतिहासाच्या प्रारंभकाळात, निसर्ग शक्तींनी असे रुप घेतले होते आणि पुढील उत्क्रान्तीबरोबर त्यात अनेक पटींनी अनेक प्रकारानी बदल होवून वेगवेगळ्या लोकात त्याचे भिन्न अविष्करण घडून आहे.

... पण लवकरच निसर्ग शक्तीबरोबर, सामाजिक शक्तीही कार्यान्वित होवू लागतात– ह्या शक्ती माणसाला तेवढ्याच परकीय असतात आणि सुरुवातीला तेवढ्यात अनाकलनीय असतात. आणि निसर्गशक्ती येवढ्याच स्वाभाविक गरजेने त्या माणसावर वर्चस्व गाजवित असतात.''

हिदू धर्माच्या संबंधात ह्याचे स्पष्ट दर्शन होते. येथे अनेक देव देवता आणि दिव्यत्वाच्या सर्व शक्ती माणसाप्रमाणेच वर्तन करीत असतात आणि सर्व मानवी भावनांप्रती अगदी ईश्वरी पातळीवर (अनेकदा ईश्वराला न साजेसाही) त्या शक्ती शरण असतात.

कार्लमार्क्सने मानवी अस्तित्वामध्ये धर्माची भूमिका आणि मानवी मनावरील त्याची पकड ह्या विषयी लिहिताना आपले सुप्रसिद्ध भाष्य केले आहे. ते अनेकदा पण केवळ असंदर्भ किंवा विकृत स्वरुपात उधृत केले जाते. मार्क्स म्हणतो; ''धार्मिक दुःख एकाचवेळी वास्तविक दुःखाचे अविष्करण आणि वास्तविक दुःखाच्या विरोधाचे निषेधीकरण आहे. धर्म म्हणजे, पीडित प्राण्याने सोडलेला, विश्वास, निहृदयी जगाचे हृदय त्याचप्रमाणे, चेतनाहीन परिस्थितीची चेतना आहे. लोकांसाठी ती अफू आहे''

धर्माचे महत्व

वस्तुस्थिती नाकारता येत नाही की, धर्म हा सामाजिक जाणीवांचे महानुमाप अविष्कारण आहे. विशेषतः त्यावेळी की ज्यावेळी विशाल समुदायाला सामाजिक जाणीवासाठी दुसरे रुप किंवा माध्यम गवसले नसते. धर्माचा प्रभाव वर्गातीत असतो. धर्मावर श्रद्धा असणारे लोक सर्व वर्गात अगदी परस्पर विरोधी वर्गातही असतात. अनेक धर्माच्या बाबतीत तर धर्म–प्रभावाने राष्ट्रीय सीमांनाही छेद दिलेला असतो.

ह्यो वहुविध परिणाम घडून येतात. त्यातून , धर्मघटकांना सामाजिक आणि राष्ट्रीय चळवळीत महत्वपूर्ण भूमिका बजावण्यास मदत होते. ह्याचा अनुभव देणारी अनेकउदाहरणे इतिहासात आहेत. एंगेल्सने, स्वतःच मार्टिन ल्यूथरची सुधारणावादी चळवळ कशारीतीने जर्मनीतील सरंजामशहांच्या विरोधातील शेतकरी लढ्यासाठी प्रेरणा रुप पताका ठरली होती हे स्पष्ट केले आहे. भारतीय स्वांतत्र्य चळवळीतील आरंभकाळात,

धार्मिक आव्हानानी, ह्या देशाच्या संस्कृतीवरील आणि उदात्ततेवरील लोकांचा विश्वास पुर्नस्थापित करण्यास आणि त्यांना वसाहतवादी परकीय सत्तेच्या विरोधात जागृत करण्यास मदत केली. अलिकडच्या काळात इराणी जनतेला, साम्राज्यवादाचा हस्तक असणाऱ्या शहाच्या विरोधातील उठावात इस्लामची मदत झाली.

दुसऱ्या बाजूने, शक्यता अशी आहे की, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या बलवान असणाऱ्या लोक ांसाठी की ज्यांची धर्मपीठावर व धार्मिकसंस्थावर (चर्च, मुल्ला,पंडे इत्यादीवर) पकड आहे, अशासांठी धार्मिक भावना ही, एकाला दुसऱ्याच्या विरोधात लढविण्यासाठी आणि त्याद्वारे, सर्वसामान्यांची हितसंबंधियांच्या विरोधातील चळवळ दुर्बल करण्याचे हत्यार होऊ शकते. अशा बाबतीत धर्म स्वत:; किंवा त्याच्या जातीय संस्थारुपी, परंपरारुपी अविष्कार; किंवा त्याचा विशिष्ट पंथा लोकातील एका समुहाला दुसऱ्याच्या विरोधात भडकविण्याचे कार्य करित असतो.

धर्माच्या ह्या वर्गातीत व राष्ट्रातीत प्रभावामुळे, आपण अनेकदा असे अनुभावतो की, एकाच धर्मातील लोक एकमेकांविरुद्ध कडवेपणाने लढत असतात. हे केवळ युद्धरत ख्रिश्चन नी मुस्लीम राष्ट्रांतच घडते असे नाही, तर हिंदू नेपाळ, ही बहुसंख्य हिंदू असलेल्या भारताविरुद्ध अनेक बाबतीत उभा ठाकतो.

ह्या मतभेदांच्या मूळात काही वास्तविक प्रश्न आहेत व ते धर्मबाह्य प्रश्न आहेत.

ह्या सर्वाचा निष्कर्ष की, धर्माने राष्ट्रीय, सामाजिकआणि राजकीय क्षेत्रात सामाजिक आणि राष्ट्रीय चळवळींच्या वेगवेगळ्या अवस्थेत घेतलेल्या भूमिकेचे मूल्यमापन आणि विश्लोषण प्रत्येक वेळी ठोस ऐतिसासिक संदर्भात होणे आवश्यक आहे.

धर्मावरील चर्चा ही अपरिहार्यपणे नैतिक कसोट्याशी, आणि समाजाला आणि व्यक्तीला मार्गदर्शन करणाऱ्या नैतिक संहिंताशी निगडित आहे. एंगल्सने लिहिले आहे की "...कृतीच्या सर्व नैतिक साधनांमध्ये प्रथम आणि अग्रगण्य साधन की ज्याचा प्रभाव लोकांवर पडतो व कायम राहतो--ते साधन म्हणजे धर्म"

बुद्धाने प्रतिपादलेला धम्म....त्रिशरण आणि पंचशील तत्वावरील निष्ठा, चार महान सत्याची जाण आणि अष्टसूत्री मार्गाचा अवलंब - हे बौद्ध धर्माचे सार आहे. आणि त्याने त्यानुसार वागणूक करणाऱ्याना दु:खद आणि गोंधळाच्या स्थितीपासून वाचविले होते. त्यानेच समाज आणि व्यक्तीना तारून नेले, टिकवून ठेवले होते. त्याला कोणत्याही 'ईश्वरी' सिद्धान्ताची आवश्यकता वाटली नाही किंवा कोणतेही सर्वसाक्षी, सर्वस्थित 'कर्त्याचे' अस्तित्व गृहित मानण्याची ही गरज वाटली नाही. बुद्धासाठी हा सिद्धान्त अनावश्यक होता कारण बुद्धाचे लक्ष आदीभौतिक किंवा तत्वज्ञानीय संवादात गुंतलेले नसून ते मानवी आणि सामाजिक प्रश्नात, मानवी दारिद्र्य आणि त्यांचे उच्चाटन ह्यांत गुंतले होते.

हिंदुधर्मातील नोंद

हिंदू धर्मग्रंथात सुद्धा नोंदी आहेत :''धारयति सः धर्मः'' किंवा 'उद्योगपर्व' सांगते, ''धर्मो धारयति प्रजः'' प्रो. कोसंबी, मात्र आपल्या ''मिथ अँड रिआलिटी '' ग्रंथात म्हणतात की, ''धर्माचा वैश्विक सिद्धान्त हा अर्थ किंवा 'रिलीजन' हा अर्थ ही बौद्ध धर्माबरोबर आलेली नावी संकल्पना होती. गीतेनंतरच्या काळातही समाजाने ती स्विकारली नव्हती. 'अनेक हिंदू प्रमाण ग्रंथाना ज्ञात असलेला धर्म म्हणजे आपल्या जातीबंधनात राहून कार्य करण्याचा व्यक्तीसाठीचा दंडक होय. तो समाजासाठी असलेला वैश्विक निर्बध नाही.'' कोसंबी पुढे म्हणतात, ''मनुःस्मृती (८.४१) नुसार : (राजाने) प्रत्येक जातीतील, जिल्ह्यातील (जनपदातील), श्रेणीतील आणि घरातील (कुळामधील) निर्बधांची (धर्माची) दखल घ्यावी, आणि मगच स्वतःचे (स्वधर्म) निर्बंधात्मक निर्णय घ्यावेत.'' स्वतःच्या धर्मातील मृत्यूही श्रेयस्कर आहे तर परधर्म ही आपत्ती आहे. हे वचन देखील प्रत्येकाच्या जातीय कर्तव्याकडेच निर्देश करते.

निःसंशयपणे, विविध स्मृति (मनु याज्ञवस्वय, वृहःस्पती, नारद विष्णू इत्यादी स्मृति) आणि आपस्तंभ, वशिष्ठ, गौतम इत्यादि धर्मसुत्रे शूद्र विरोधा निर्बधांनी ओतप्रोत भरलेली असून ती ब्राम्हणाच्या ऊच्चतेला उचलून धरणारी आहेत. त्यांनी वैश्विक नीतीमत्तेची आचारसंहिता सांगितली असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे धर्मसूत्रातील ''प्रकृती'' ची स्त्रीत्वाची, उपासना ही स्त्रीयांना नीच, सामाजिक दर्जा बहाल करण्याच्या संकल्पनेची सोबत करते. 'शक्तीला' पथाचे दैवत बनविल्यामुळे शास्त्र संमत अन्यायाची नुकसान भरपाई होत नाही. स्त्रीयांच्या दृष्टीने तो एक क्षीण प्रयत्न आहे.

ह्यावरून, स्पष्टपणे असे म्हणता येईल की, धर्मश्रद्धा ह्या के मानवी नैतिकतेसाठी अस्तित्वात येत नाहीत. अणि दुसऱ्या बाजूने मानवी नीतीमत्तेला आणि नैतिक प्रमाणतेला धर्मश्रद्धेवर विसंबण्याची गरज नाही. इतिहासात तसेच दैनंदिन जीवनात असे दिसून आले आहे की सखोल धार्मिकतेतून माणसाच्या ठिकाणी उच्च नैतिकता नेहमीच प्रस्तापित झाली आहे, असे नाही. असे अनेक आहेत की, जे धार्मिक नाहीत, ईश्वरावर मी विश्वास टाकण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही, पण ते अत्यंत उच्च दर्जाची दैतिकता बाळगून आहेत. जे, नर्काच्या शिक्षेच्या भीतीने किंवा स्वर्गप्राप्तिच्या अमिषामुळे, प्रामाणिकपणे व न्यायबुद्धीने वागतात त्यांना काही नैतिकतेचे ध्वजधारक मानता येणार नाही.

जो कोनीही नव मानवतावादी समाज उभारण्याच्या संकल्पात येवू इच्छितो, जं कुठल्यातरी अन्य जगापेक्षा पृथ्वीवरच स्वर्ग उभारू इच्छितो जो सामाजिक भेदभाव, दारिद्र्य नष्ट करून मानवी समाजात समता आणि बंधुत्व प्रस्थापित करू इच्छितो, मग त्याचा धर्म, त्याची धारणा आणि पंथ कोणताही असला तरी जो माणसालाच मूल्य मानतो, ज्याला मानवी जीवनाविषयी मानवाच्या प्रतिष्ठेविषयी, त्याच्या हिताविषयी आणि संस्कृतीविषयी

आदर आहे तो उच्चनैतिकतेची तत्वे मान्य केल्याशिवाय आणि त्यांना कृतीत उतरल्याशिवाय राहूच शकत नाही. ज्याच्या ठिकाणी अशा नैतिकतेचा अभाव असतो तो क्रान्तीकारी होवू शकत नाही, आणि त्याच्याकडून मानवी कल्याणाचे मूलभूत परिवर्तनाचे ''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' असे कार्य ही अपेक्षित नाही. नैतिक घटक हा प्रत्येक क्रान्तीत निर्णायक घटक असतो.अन्यथा ती विघट्टीत विकृत होत जाते..

अध्यामिकता म्हणजे काय ?

ह्या ठिकाणी मी सांगितले पाहिजे की, 'अध्यात्मिकता', जी काहींच्या मते धर्माचे सार आहे व धर्माचा 'आत्मा' आहे, ती अध्यात्मिकता म्हणजे मानवी भौतिक, सांघिक वास्तवतेचा नकार नव्हे किंवा केवळ अभौतिक नैतिक मुल्यांचा आग्रह नव्हे. अध्यात्मिकता मानवाच्या सर्वांगाना स्पर्श करते, मानवाचा भौतिक आणि अभौतिकत्वाचे ते एकीकरण आहे. स्वामी विवेकानंद ठामपणे म्हणतात, ''भुकेल्यांना धर्म सांगणे हा त्यांचा अपमान आहे; त्याला आदिभौतिकता शिकविणे हाही त्याचा अपमान आहे.'' (विवेकानंद: कलेक्टेड वर्क्स, खंड १,२०).

परमेश्वरावरील विश्वास आणि नैतिकवागणूक यांच्यातील सापेक्षता लक्षात घेत असतांना आमचा दृष्टिकोण अजिबात असा नाही की, मानवी जीवनाचा भविष्यकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक विकास म्हणजे एकूण ज्ञानाच्या समुच्चयातून धर्मसंकल्पनांचे आणि वारसाचे उच्चाटन करणे. अेकतर असे करणे पूर्णतः चुकीचे होईल आणि तो अनावश्यक प्रयत्न ठरेल. हे सत्यतर आहेच. ह्याशिवाय तो पूर्णतः अअनैतिहासिक दृष्टीकोण ठरेल. मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासातील योगादानाचे ते नष्टीकरण ठरेल भारतीय लोकांची सामाजिक मानसिकता आमच्या एकूण अध्यात्मिक , पौराणिक, आणि ऐतिहासिक परंपरांनी वनली आहे. मुद्दा आहे तो जे जे सामाजिक विभेदनाला अणि विषमतेला पावित्र्य बहाल करते, ज्याला दूर सारण्याचा आणि जे,जे सर्व उच्च उद्दात्त आणि मानवीय आहे ते उचलून धरण्याचा. आपण ते घटनेच्या आणि निर्वधांच्या मार्गाने तसेच सामाजिक जागृतिद्वारे आणि सुधारणाद्वारे करतो आहोत. या मार्गावरून परत फिरणे असंभव .डॉ. राधाकृणन ह्यांनी उचित विधान केले आहे.

''----आधुनिकता म्हणजे आमच्या प्राचीन वारसातून जे, जे मौलिक असेल ते राखून ठेवणे आणि जे नसेल त्याचा त्याग करणे, अशा अनेक गोष्टी आमच्याकडे आल्या आहेत की, ज्यात आमचा उदात्त सांस्कृतिक किंवा राष्ट्रीय ठेवा साठविलेला नाही. त्याचवेळी काही अन्य महत्त्वपूर्ण घटक आहे जे आमज्या राष्ट्राला टिकवून आहेत'' (राधाकृष्णन : अवर हेरिटाज)

मार्क्सने आपल्या आरंभाच्या काळात लिहिले की, ''माणसासाठी माणून हेच उच्चतम अस्तित्व आहे ह्या संकल्पनेतच धर्मावरील टीकेचा शेवट आहे. आणि ज्या सर्व

स्थितीत माणूस विद्रूप, गुलाम वंचित आणि तिरस्करणीय व्यक्ती असते त्या स्थितिला उलथून टाकण्याच्या सुस्पष्ट गरजेचे प्रतिपादन करुनच धर्मावरील टीकेचा शेवट होतो''

मार्क्सवादी आणि 'सश्रद्ध' ह्यांना एकत्र आणणारे व्यासपीठ ते आहे की, ज्या ज्या वेळी, आणि ज्या ज्या ठिकाणी दोघेही माणसाला आपल्या उपक्रमांचा, भौतिक व अध्यात्मिक मुक्तिचा केंद्र बिंदू बनवितात आणि त्याची दुःखे दूर करून ती नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. आपल्याला माहित आहेत की मानवी क्लेश केवळ भौतिक (दारिद्र्य, दुर्भिक्ष्य, अनारोग्य इत्यादिविषयक) नाहीत ते नैतिक व अध्यात्मिकही आहेत. सामाजिक अन्याय आणि दडपशाहीतून निर्माण झालेले क्लेश माणसाला अवमानीत, उपेक्षित आणि मायतळीच्या धूळीगत असल्याची जाणीव सातत्याने करून देत असतात.

आमच्या ऋषिंचा मानवतावार

मानवतावादी दृष्टिकोणावर भर देणारा, मन हलवून सोडणारा, एक विचार आमच्या प्राचीन ऋषींनी दिला आहे : ''मुह्यम् ब्रम्ह तद् इद्म वो ब्रव्हीमी । न मनुष्यात श्रेष्ठतरम् ही किंचित ।।'' (एक गुह्य मी तुम्हाला सांगतो की मनुष्यमात्रापेक्षा अन्य दुसरे कोणतेही सत्य नाही). डॉ. राधकृष्णन यांनी यावर भाष्य करताना लिहिले: ''हे या जगात मानवापेक्षा उच्चतम काहीही नाही. अलौकिकातील ईश्वर आमच्या कक्षेबाहेर आहे आणि लौकिकातला ईश्वर माणूस हाच आहे.''

हा मानवतावादी दृष्टिकोण, वेदात म्हटल्याप्रमाणे ह्या विश्वातील सर्वाना एक प्रकारच्या विश्वबंधुत्वात समावणारा आहे. ही काही उदाहरणे :

''आ नो भद्राः क्रतवो यान्तु विश्वतः ।।''
(विश्वातील उदात्त विचार सर्व दिशांनी आपल्याकडे येवोत)
''संज्ञानं स्वेमिः संज्ञानं आरण्येमिः ।।''
(स्वकीयांसोबत तथा परकिया सोबत सामजस्थ राहो)
''ज्ञानं विभ्रति बहुधां विवाचसम । नाना धर्माषाम् पृथ्वी ययौक्षम् ।।''
(अनेक भाषी अनेक धर्मीयसंस्काराचा प्रदेशानुरुप भिन्न अवलंब करणाऱ्यांना धारण कारणारी ही पृथ्वी मला संपत्तिच्या सहस्त्र धारांनी, अेखाद्या अक्षय दुधाळ गाईप्रमाणे सुमृद्ध करो.) सहस्त्र धारा द्रविणस्य मे दुहम । ध्रूवूव धनुरनापस्फुरति

या पार्श्वभूमीवर, एखाद्या व्यक्तिचा धर्म कोणता किवा त्याचा परेश्वरावर विश्वास आहे किंवा नाही ही त्याची व्यक्तिगत बाब होते.

पण दुर्देवाने , आमच्या अनेक पुराणग्रंथांची निर्मिती ब्राम्हण जातीचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी, अन्य लोकांवर पक्षपात करण्यासाठी, हिंदू समाजावर क्षणिय जाती व्यवस्थ लादण्यासाठी आणि अनेकांना वंचित करून समाजाच्या उंबरठ्याबाहेर ठेणण्याच्या उद्देशानेच झाली. ही वस्तुस्थिती उपरोक्त ग्रथांतील मानवतेचा आणि उच्च

प्रतिच्या भावनांचा निधृण अधिक्षेप करणारी आहे. स्मृतितील हे उतारे पहा.

"वेदाः कृत्स्नोऽ भिगन्तव्य सरहस्याः द्विजन्मानः ।।"

(वेदांचे त्यातिल रहस्यांसह पठण करण्याचा अधिकार फक्त द्विजांचा आहे)

"न शूद्राय मतिं दद्यात् ।।"

(शद्राना ज्ञान देवू नये)

"न शूद्रद्रो जनासानिध्यो"

(शूद्रांच्या सानिध्यात (वेद पठण) करू नये)

"वैश्यशूद्रौ प्रयत्नेन स्वातिकर्माणि कार्येत ।।"

"तौ हि च्युतौ स्वकर्मथ्यः क्षोभ्यतभियांजगत ।।"

(राजाने अत्यंत दक्षतेने हे पहावे की, शूद्र व वैश्य त्यांची नेमस्त कार्ये करतात का नाही. कारण त्यांनी तसे केले नाही तर जगात गोंधळ माजेल.)

धर्मसुधारकांचे कार्य

स्वामी विवेकानंदानी आपल्या कठोर भाष्याने या गोष्टीकडे लक्ष वेधले: पृथ्वीतलावरचा अन्य कोणताही धर्म हिंदुधर्माइतक्या उच्चार्णीवाने मानवी सन्मानाचा प्रचार करीत नाही आणि अन्य कोणताही हिदुधर्माप्रमाणे दरिद्री आणि दलित लोकांच्या माना पायदळी तुडवत नाहीत" (विवेकानंदः कलेक्टेड वर्क्स, ख. ६ पृ-१५).

नेमक्या ह्याच प्रकारच्या जातीभेदाच्या, दडपशाहीच्या, उच्चवर्णीय दांभिकतेच्या आणि निरर्थक कर्मकांडाच्या विरोधात बौद्ध, जैन धर्मांनी संघर्ष केला. संतानी आवाज उठविला आणि भक्तिपंथाचा उदय झाला. संतांचा हितोपदेश, त्यांच्या अंतःकरणातील वेदना जनसमुदायाच्या, उपेक्षित जातीच्या हृदयाला भिडल्या. त्यांनी ज्ञानी आणि विशेषाधिकारी लोकांचा एकाधिकार मोडला. लोकांच्या भाषेत, त्यांच्या वाणीत संतानी गायन केले. चैतन्य, चक्रधरस्वामी, कबीर, नानक, बसवेश्वर, ज्ञानदेव, जनाबाई, नामदेव, एकनाथ, नरसी मेहता, रविदास, तुकाराम, यांची आणि संत मालिकेतील अनेक संताची शिकवण म्हणजे मानवाला लाभलेल्या वारसातील एक अविभाज्य नितांत सुंदर ठेवा आहे. सुधारणावादाचाच तो एक वेगळा प्रकार होता, प्रेम, बंधुत्व आणि समतेचा तो संदेश होता. जातीय वर्चस्वाचा उद्दामपणा कमी करण्यासाठी आणि जातीय दडपशाहीचे दुष्परिणाम मिटविण्यासाठी केलेली ती विनंती होती. प्रचलित समाज व्यवस्थेत त्यांना ह्याहून अधिक काही करणे शक्य नव्हते. त्यामुळे सनातनवादाची पकड त्याला सोडविता आली नाही.

आधुनिक काळात राजमोहनरॉय, श्री नारायण गुरू, कुमारन आसान, दयानंद, रानडे आदि समाजसुधारकांनी आणि त्यांच्या चळवळींनी ही परंपरा पुढे चालविण्याचा प्रयत्न केला. सामाजिक चौकट कायम ठेवून सुधारणा आणण्याचा परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

नव-वेदान्तवादी स्वामी विवेकानंदानीशी जातिव्यवस्थेच्या विरोधात लेखन केले. ते म्हणतात, "पुरोहितांचा दुराग्रह काही असला तरी, जाती ही केवळ सामाजिक संस्था आहे. तिचे कार्य संपले आहे. ती आज भारतातील वातावरण आपल्या अस्तित्वाने दुर्गंधिमय करीत आहे, आणि तिचे उच्चाटन केवळ लोकांना त्यांचे सामाजिक व्यक्तीत्व परत करुनच होवू शकेल"(वर्क्स,५, पृ २३).

पण स्वामीजींचे एक अनुमान चुकले की "आधुनिक स्पर्धेच्या प्रवेशावरोवर जात अत्यंत वेगाने अंतर्धान पावते आहे !..."

तेव्हा; महाराष्ट्रात ज्योतिबा फुले आणि डॉ. आंबेडकर, दक्षिणेत रामास्वामी नायकर आणि त्यांचे अनुयायी ह्यांच्यावर पुरोहिती अन्यायाच्या विरोधात उघड हल्ला चढविण्याचे, धर्मग्रंथाच्या अधिकाराला आव्हान देण्याचे आणि वहुसंख्यांयकाना जोखडात ठेवण्यान जातीव्यवस्थेचे संपुर्ण उच्चाटन करण्याचे दायित्व आले. समकालीन आणि पूर्व कालीन सुधारणावाद्यांच्या तुलनेत हे सर्व समाज-क्रन्तिकारक होते. अशा सामाजिक क्रान्तीसाठी वातावरण परिपक्व होते. सामाजिक आर्थिक स्थितिही परिपक्व होती आणि राजकीय परिस्थिति दोलायमान होती.

मार्क्सवाद्यांना, 'संतपरंपरे'च्या सामाजिक सुधारणावाद्यांच्या आणि उपरोक्त समाज क्रान्तीकारकांच्या शिकवणीशी त्याच्या मर्यादा लक्षात घेऊनही आपले विचार एकात्मकरिता येतील. समाजक्रान्तीकारकांनी केलेले सामाजिक विश्लेषण, त्याची शास्त्रीयता, सत्यता या विषयीती ताज्या अनुभवावर, महितीच्या आधारावर आणि विक ासाच्या पार्श्वभूमीवर घडून येणारी चर्चा अशा एकात्मतेच्या आड येणार नाही.

विशाल हिंदू समुदाय हा भूतकाळाच्या अंध प्रेमामुळे , 'हिंदुत्वाच्या' 'हिंदू जाणीवांच्या नावाने, केवळ अन्न धर्मातील सनातन वादाचा प्रसार करणाऱ्या काही लोकांवर मात करण्यासाठी आपला समृद्ध वारसा विसरणार आहे का ? त्यामुळे, अन्य धर्मातील सनातनवादाचा मोड होणार आहे का ? त्यातून एक दुष्ट स्पर्धा निर्माण होणार नाही का ? स्वामी विवेकानंद काय म्हणतात ते आठवू या "प्रत्येक धर्म भौतिक मानवातून इश्वर निर्माण करतो आणि हाच समान परमेश्वर सर्वांची प्रेरणा असतो" (वर्क्स, १, पृ. १८). ते पुढे म्हणतात : "ज्यावेळी तत्वांचा पूर्णतः विसर होतो आणि भावना प्रबळ ठरतात, त्यावेळी धर्माची धर्मवेडात आणि पंथीय विघटनांत अवनति होते" (वर्क्स, ६, पृ. ८).

'हिंदुत्व', 'हिंदू जाणिव' ही श्रद्धा आणि पावित्र्याचा, हिंदुधर्माच्या उच्च तत्वावरील भक्तिचा पूर्नउदय नसून तो एक अन्य धर्माविरूद्ध आक्रमक लढावू पवित्रा आहे. 'हिंदू' राजकीय चळवळीचे ते एक हत्यार आहे. राष्ट्राचे आणि राजकाराणचे हिंदुकरण करण्याचे, सत्ता प्राप्त करण्याचे एक हत्यार आहे. हिंदुत्वाचे 'सार' एकच आहे, हिंदुत्वाचा आत्मा

नेहमीसाठी आहे. कारण सर्व हिंदूमध्ये धर्मग्रंथ समान आहेत, देवता समान आहेत, धारणा समान आहेत, आणि समान प्रथांनी हेच सिद्ध होते, मग त्याचे अविष्करण चुकीचे असले तरी.

मार्क्सवाद आणि हिंदुधर्म

तेव्हा मी पुन्हा सांगतो की संघर्ष मार्क्सवाद आणि धर्म (हिंदूधर्म अथवा अन्य धर्म) ह्यात नाही. संघर्ष आहे तो उपरोक्त (प्रकारच्या) शिक्क्याच्या हिंदुत्वात आणि मानवतावादी हिंदू धारणेत की जिने सामाजिक भेद त्यागले आहेत. आज गरज आहे तो "भिन्न प्रकारच्या धर्मातील लोकात बंधुभावाची" (विवेकानंद : वर्क्स, २, पृ. ६८).

शतकांपूर्वी, महान सम्राट अशोकाने शीलालेख लिहीला : "धर्मांबद्दल भांडू नका. त्याच्या आदर्शाचा समन्वय कार. आपणाला संपूर्ण सत्य गवसले आहे असे समजू नका. तुम्हाला ते प्राप्त झाले नसेल; कुणाही धर्माचा सत्याचा एकाधिकार नाही; तुम्ही सर्व देवांचा देव की जो विविध प्रकारात आणि विविध व्यक्तिमध्ये आविष्कृत होत असतो त्याला ओळखा." (अशोकः १२ वा शीलालेख).

स्वातंत्र्य चळवळीत धर्माचा सहभाग

मार्क्सवादी हे जाणतात की आपण व्यक्तिगत धर्म श्रद्धांचा आदर केलाच पाहिजे. आम्हाला आमच्यात आणि सर्व धर्मांच्या खऱ्या भक्तांमध्ये संघर्ष नको आहे. त्यांचा आपल्या श्रद्धा बाळगण्याचा हक्क आम्ही मानतो. आम्ही धर्मविषय विवाद टाळतो. जोपर्यंत हे विवाद सामाजिक अंगावर परिणाम करीत नाहीत, राष्ट्रीय आणि सामाजिक विकासाच्या विरोधात जात नाहीत, जोपर्यंत धर्म सत्तेचा उपयोग प्रतिक्रीयावादी शक्तीना प्रोत्साहन देण्यासाठी केला जात नाही आणि पीडीत समुदायाला गुलाम बनवून ठेलले जात नाही तोपर्यंत आम्ही धर्म विवादात पडत नाही. अशावेळी, संघर्ष धर्म विरोधात नसतो तर धर्माच्या दुरूपयोगाच्या विरोधात असतो. स्वतःचे जातीय आणि वर्गीय हितसंबंध धर्माच्या नावाने जोपासणाऱ्यांकडून होणाऱ्या दुरूपयोगाविरूद्ध संघर्ष असतो. आम्हाला जाणीव आहे की असा आम्ही आपणहून धर्माशी संघर्ष केला तर त्याची मदत प्रतिक्रीयावादी शक्तींनाच होणार आहे. बहुसंख्य जनसमुदायाला आमच्यापासून तोडण्यासाठी आणि आमच्या विरोधात अपसमज पसरविण्यासाठी त्याचा उपयोग केला जाईल.

भारतीय स्वांतत्र्याच्या चळवळीत, कष्टकरी प्रगतीच्या आणि सामाजिक न्याय आणि समानतेच्या संघर्षात, सामाजिक प्रगतीच्या आणि समाजवादी चळवळींच्या संघर्षात केवळ साम्यवाद्यांनी वा समाजवाद्यांनी नव्हे तर सर्व स्थरातून आलेल्या, सर्व धर्माच्या समान्य माणसानेही त्याग केला आहे, दमन नीतीला तोंड दिले आहे. आजही देत आहेत. त्यांच्या धर्म धारणा आणि त्यांचे सामाजिक न्यायाचे व सामाजवादाचे ध्येय ह्यात कुठेही

संघर्ष नाही. स्वाभाविकतःच त्यातील बहुसंख्य हिंदूच होते, आहेत. पण त्यात ख्रिश्चन, मुस्लीम, शीख, पारशी आणि अन्य सर्व धर्मातील लोक होते. साम्यवादी पक्षांची घटना कुणाही धार्मिक माणसाला प्रवेश नाकारित नाहीत व कुणालाही 'नास्तिक' होण्यास सांगत नाहीत.

एका धर्माच्या सच्या अनुयायाला दुसऱ्याच्या धर्मभावना बद्दल आदर असतो यावर आमचा विश्वास आहे. असा माणूस निधर्मी असतो आणि सर्व जातीयवाद्यांच्या विरोधात असतो.

या देशातील प्रत्येक नागरिकाला आणि म्हणून प्रत्येक हिंदूला, मग तो कोणत्याही पंथाचा, उपपंथाचा असो, त्याचा उपासना मार्ग कोणताही असो, त्याला स्वतंत्र भारताच्या घटनेच्या अंतर्गत आणि निर्बंधानी घालून दिलेल्या मर्यादेत म्हणजे सार्वजनिक नीतीमत्ता, आरोग्य विषयक आदि बंधनात स्वतःचा धर्म, स्वतःचा उपासना मार्ग चालू ठेवण्याचा अधिकार आहे. त्याच्या अन्य हक्कांप्रमाणेच जसे जगण्याचा हक्क, काम करण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क- ह्यांच्याप्रमाणेच त्याचा धर्मविषयक अधिकार आहे.

आम्ही, धार्मिक संस्थाना आणि उपासनाघरांना सरंक्षण देण्याच्या बाजूचे आहोत. त्यांनी ती आपल्या अनुयायासाठी स्वंतत्र्यपणे चालवावीत. ज्या काही सुधारणा व्हावयाच्या असतील त्या त्या संस्थार्गत आणि समुहांतर्गत व्हाव्यात. त्यावेळी सामाजिक प्रगतीची वाटचालही नजरेसमोर असावी.

हिंदुधर्मात सर्व परंपरांचा समावेश

मग मार्क्सवादातील "धर्म ही लोकांसाठी अफू आहे" ह्या उक्तीचे काय ?" मी पूर्वीच सांगितले आहे की या उक्तीचा संदर्भरहित उल्लेख एकांगी आहे. आमचे विरोधक तसा उल्लेख करतात. तसेच अनेक मार्क्सवादीही तसा उल्लेख करतात. ह्या विधानाला काही वैश्विक सिद्धान्ताच्या पातळीवर बसवून त्याचे ठाम सिद्धान्तात परिवर्तन करता येणार नाही. त्या विधानाचा उपयोग धर्म विरोधात आणि सर्व धर्मधारणांना त्याज्य ठरविण्यात करता येणार नाही. धर्माची भूमिका ठोस ऐतिहासिक संदर्भातच समजावून घेतली पाहिजे हे यापूर्वी अनेकदा सांगितलेच आहे. हाच खरा विरोधविकासवादी आणि इतिहासवादी भौतिक दृष्टिकोण आहे.

नास्तिकबद्दल काय ? हे सर्वश्रुतच आहे की, नास्तिकता, धर्मग्रंथाचा व वेदांच्या अधिकाराचा अस्विकार, परमेश्वर संकल्पनेवरिल अविश्वास किंवा न-विश्वास भारतात त्याचप्रमाणे अन्य राष्ट्रात मार्क्सवादाच्या पूर्वी तसेच मार्क्सवाद्यांचा या देशात उदय होण्यापूर्वी ही होता.

प्राचीन भारतात ज्या ज्या तत्वज्ञानांच्या महान विचारधारा विकसित झाल्या त्यात

सांख्य तत्वज्ञान भौतिक आणि 'नास्तिक' आहे. त्याचा संस्थापक कपिला हा आद्य विद्वान किंवा पहिला ज्ञानी म्हणविला जातो. लोकायत ही देखिल सातत्याने भौतिक परंपरा होती. नास्तिकता त्या तत्वज्ञानातून परिणाम रूपाने उगम पावली.

या उलट, महायान बौद्ध परंपरेचा विश्वास टोकाच्या तत्वज्ञानीय आदर्शवादावर आहे. पण ती परंपरा आस्तिक होती. जैन धर्माचा महान तत्ववेत्ता गुणरत्न आस्तिक्यवादाचा पुरस्कर्ता होता.

न्याय वैशेषिक भौतिकवादी होते, पण आस्तिक होते. पूर्व मीमांसक आस्तिकतेच्या आणि न्याय वैशेषिकांच्या विरोधात होते.

अद्वैत वेदान्ती परंपरा ही सर्वात आदर्श परंपरा, आणि महान शंकराचार्य तीचे प्रतिनिधी वेदांच्या सर्व शाखांनी सृष्टीचा 'कर्ता' आणि नैतिक 'नियंता' म्हणून परमेश्वर स्विकरला आहे. अद्वैत वेदान्ताने आत्यंतिक-आस्तिकतेचा स्विकार केला. ह्या तत्वज्ञान परंपरातील संघर्षनेच भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास बनला आहे. त्यातील काही संघर्ष मी उदाहरणादाखल येथे दिले. त्याचा उद्देश भारतीय आस्तिकता आणि भौतिकता परकीय नाहीत. हे दाखविणे आहे. भारतीय मातीत रूजलेल्या तत्वज्ञानीय आंदोलनाचे ते अविभाज्य भाग आहेत. हे वैचारिक धन दुर्लक्षिता येणार नाही. हया सर्वाची भावना, संवग, भडक, आत्मकेंद्री, अनैतिक, अविवेकी दृष्टीकोण करणे मूर्खपणाचे होईल.

मार्क्सवाद-लेनिनवाद आपले नास्तिकत्व शास्त्रीय विरोध विकासाच्या भौतिकवादी तत्वज्ञानातून स्वीकारतात. म्हणून ज्याने अशी शास्त्रीय तत्वज्ञानीय दृष्टिकोणाची उच्च पातळी गाठली आहे त्याच्याच जवळ नास्तिकतेचा सातत्यपूर्ण सुसंगत आधार असू शकतो. म्हणून मला वाटते की नास्तिकता ही तत्वज्ञानाची बाजू आहे. तिला धर्माप्रमाणे राबविता येणार नाही. त्यातून 'अधार्मिक' चळवळही उभारता येणार नाही. म्हणूनच ती मार्क्सवादी आणि धार्मिक हिंदू यांच्यातील विभाजक रेषा होऊ भकत नाही. तात्पर्य हिंदुत्व नास्तिक असू शकते. ते मार्क्सवादीही असू शकते.

तळटीपा

१. दुसऱ्या बाजूने धार्मिक आदर्शवादाच्या विकासाची ही प्रक्रिया केवळ तत्वज्ञाच्या पद्धतींचा अभ्यास करून स्पष्ट होणार नाही. त्यापलिकडे जावून ज्या सामाजिक स्थितिने त्याला जन्म दिला आणि त्याच्या विकासाला चालना दिली त्या स्थितीचा शोध आपल्याला घ्यावा लागेल

२. गीतेत केवळ १८ अध्यायांच्या आणि ७०० श्लोकांच्या (त्यातिल आरंभीचे ध्यान आणि शेवटचे 'महात्म्य' वगळता-) अल्पमर्यादेत युद्धाला प्रवृत करणारे उल्लेख वारंवार येतात. तसेच तेथे अहिंसा हे परमेश्वरी लक्षण आहे आणि स्थितप्रज्ञता आदर्श वागणूक आहे. 'निष्काम कर्माचा' आग्रह आहे आणि दुष्प्रवृत्तीच्या प्रसारकांशी संघर्ष करण्याची


गरज प्रतिपादन करित असताना स्वर्गातील सुखनिधानाचे आश्वासनही आहे. त्याचवेळी ती नियतीचीच योजना आहे व 'कर्ता' हा 'निमित्त मात्र' आहे हेही सांगितले आहे. गुणानुसार आणि कर्मानुसार चातुवर्ण्य निर्माण होते हे सांगताना वैश्यांना, शूद्रांना आणि स्त्रीयांनासुद्धा मुक्ती प्राप्त करता येते असे आश्वासनही दिले गेले आहे. प्रत्येकाने आपल्या धर्माला म्हणजेच जातिला चिटकून राहावे कारण परधर्मापेक्षा स्वधर्मातील मृत्यूदी श्रेष्ठ असतो इत्यादी उपदेशही आहे. सर्व परस्पर विरोधी विचारांच्या गुत्यांत सापडलेला अर्जुन आपल्या मनाचा गोंधळ मान्य करतो. केवळ सर्व शंकाबद्दल अत्यंत कठोर शब्दात त्याची निंदा झाल्यावरच आणि भगवंताने विश्वरूप दर्शन दिल्यावर तो ती शिकवण स्विकारतो.

३. भूतलावरील प्रत्येक समाजाच्या इतिहासात धार्मिकतेचा कोणत्या न कोणत्या स्वरूपात आढळ होतोच. विशेषतः आरंभीच्या काळात तो समाज-जाणीवाचा मापदंड असतो.

४. उदाहरणार्थ, गीतेने सुरूवातीला भारतीय क्रान्तीकारकांना त्यागाच्या आणि शौर्याच्या कृतीसाठी प्रेरणा दिली. पूढेही टिळक, गांधीजी सारख्या शोर्याच्या कृतीसाठी तो प्रेरणा स्रोत होता. राष्ट्रीय स्वातत्र्यांच्या चळवळीतील त्या अवस्थेत गीतेच्या शिकवणीनी राजकीय निषेध कार्यप्रवृत्त केला.

(मुळ आंग्लभाषीय लेखाचा अनुवाद)

संपादक



श्री. विक्रम सावरकर यांच्या जीवनातील ठळक घटना

जन्म :- दि. २ डिसेंबर १९३९ , खार, मुंबअी येथे

शिक्षण :- नागपूर विद्यापीठाचे एम्. कॉम. १९५६

(अध्ययन घेत असतानाताच १९५६-५७ व ५७-५८ या शैक्षणिकसत्रात न्यू इंग्लिश हायस्कूल मुख्य शाखा आणि सी. पी. अँड बेरार शाळा, नागपूर येथे नोकरी)

विवाह ११ मे १९५८

अन्य सेवा-चाकरी :- दांडेकर मशिन वर्क्स लि. भिवंडी येथे मुख्य लेखापाल.१९५८

दै. मराठा (नागपूर आवृत्ती) मुख्य लेखापाल. ऑगस्ट १९५८ ते ऑगस्ट १९५९

द्वि साप्ताहिक केसरीत विदर्भ विभाग विक्री संघटक व प्रतिनिधी सप्टेंबर १९५९

हिंदुमहासभेत क्रियाशील कार्यास प्रारंभ

नागपूर हिंदुमहासभेचे कार्यवाह म्हणून निवड १९५८

महाराष्ट्र प्रदेश हिंदुमहासभेचे प्रधान कार्यवाह म्हणून निवड ऑगस्ट १९६४

सा. प्रज्वलंतचा प्रकाशनारंभ विजया दशमी १९६८

महाराष्ट्र प्रदेश हिंदुमहासभेचे अध्यक्ष १९७३ आणि १९७५

अखिल भारत हिंदुमहासभेचे प्रधान कार्यवाह म्हणून निवड १९७२

अखिल भारत हिंदुमहासभेच्या अध्यक्ष पदी निवड नोव्हेंबर १९८०

(ग्वाल्हेर येथे संपन्न झालेल्या अधिवेशनात)

हिंदुस्थान श्रमिक सेनेची कल्याण येथील कामगार मेळाव्यात स्थापना, अध्यक्षपदी निवड १ जानेवारी १९८२

भीलवाडा येथील अधिवेशनात अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अद्दयक्षपदी पुनर्निवड, परंतु ऐनवेळी शासनाने अधिवेशनावर बंदी घातल्यामुळे, अखिल भारत हिंदुमहा संम्मेलन भरविले ११ ते १३ सप्टेंबर १९८२

जोधपूर येथील अखिल भारत हिंदुमहासभेच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी पुनर्निवड ३१ डिसेंबर १९८३

प्रकृति अस्वास्थामुळे अखिल भारत हिंदुमहासभेच्या अध्यक्ष पदाचे त्यागपत्र १९८७

भाग्यनगर हैद्राबाद येथील अखिल १ व २ जानेवारी १९८४

भारत हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदी पुनर्निवड जानेवारी १९८६

सुरक्षानिर्बंधा अन्वये अटक

१. भारत सुरक्षा निर्बंधा अन्वये (घ. '. इ.) नागपूर येथे अटक १८ नोव्हेंबर नाशिक करागृहात स्थंलातर १९६४

सुटका १८ फेब्रुवारी १९६५

२. दादार मुंबअी येथे भार सुरक्षा निर्बंधा अन्वये अंटक ११ मे १९८३
नाशिक कारागृहात स्थानबद्ध
मुंबअी न्यायालयात रिट अवेदन केल्यामुळे सुटका २३ मे १९८३

समारंभ

नागपूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा नागरिक
समितीच्या वतीने पुतळा अनावरण समारंभ प्रसंगी उपस्थित २५ मे १९८३
एकावन्नाव्या वाढदिवसानिमित्त मुंबअी येथे नागरिक समितीच्या वतीने सत्कार समारंभ
३ डिसेंबर १९८२

कौटुंबिक आघात

थोरले काका क्रांतिवीर गणेश दामोदर बाबाराव सावरकर यांचे सांगली येथे निधन १६
मार्च १९४५
वडील देशभक्त डॉ. नारायण दामोदर सावरकर यांचे
मुंबअी येथे निधन १९ ऑक्टोबर १९४९
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे मुंबअी
येथे निधन २६ फेब्रुवारी १९६६
मातोश्री श्रीमती शांताबाई नारायण सावरकर यांचे मुंबअी
येथे निधन २४ मे १९८७

REFBK-0026673



श्री. विक्रम सावरकर यांच्या षष्टयाब्दिपूर्तीच्या निमित्ताने प्रसिद्ध होत असलेल्या या गौरवग्रंथाचे संदर्भ ग्रंथाच्या इतिहासात अनन्यसाधारण स्थान आहे.

यात श्री. विक्रम सावरकरांसंबंधी गौरवात्मक आणि मूल्यमापनात्मक व्यक्तिदर्शन घडविणारे लेख आहेत. तसेच स्वतः श्री. सावरकरांनी चालविलेल्या 'प्रज्चलंत' साप्ताहिकातील निवडक घणाघाती लेखांची साक्षेपी निवड, त्यावरील विस्तृत निःस्पृह भाष्यसकट अहे.

हिंदुत्व– मीमांसा हा या ग्रंथाचा विशेष मौलिक भाग असून त्यात प्राचार्य राम शेवाळकर, मा. गो. वैद्य, श्री. भा. वर्णेकर, प्राचार्य श्री. म. पांडे, प्राचार्या डॉ. सौ. सुहासिनी वंजारी आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे श्री. अर्धेन्दू भूषण बर्धन यांचे लेख आहेत. विविध वैचारिक बांधिलकीच्या लेखकांनी मंडित केलेला हा गौरवग्रंथ म्हणूनच अेक संदर्भग्रंथ आणि विचारग्रंथ म्हणूनही महत्त्वाचा आहे.

लाखे प्रकाशन
मुकुंदराज पथ, महाल, नागपूर - २

अभ्यासकाला फार उपयुक्त होईल.

भक्तिमार्गी विविध सम्प्रदाय व त्यांतील ग्राहयांशः

(१) नारदपंचरात्र- वासुदेवाचा विग्रह हाच परब्रह्म असून अनेक साधनांनी त्याची प्राप्ती करावी ही भावना या संप्रदायातून ग्राहय आहे.

(२) पाशुपत - पशु म्हणजे जीव त्याचा पाश म्हणजे कर्म बंधन. या कर्मबंधनापासून विमुक्त असलेला, नित्य व मंत्रमय भगवान शिव हा उपास्य आहे, ही भावना या संप्रदायापासून ग्राहय आहे.

(३) शैव - सच्चिदानन्द विग्रह आणि उमेसहित असणाऱ्या पंचवदन शिवाची नित्य उपासना करावी ही शैवांची भावना ग्राहय आहे.

(४) शाक्त - सर्व स्त्रिया उमास्वरूप असून त्यांच्या ठिकाणी मातृभावना करावी ही भावना दक्षिणपंथी शाक्तांपासून ग्राहय आहे.

(५) पूर्णप्रज्ञा - भगवान विष्णु स्वतंत्र असून, इतर सर्व त्याच्या तंत्राने चालणारे आहेत ही भावना ग्राहय.

(६) रामानुज - विभवस्म, व्यूहस्म, सूक्ष्मरूप व अन्तर्यामी अशा श्रीहरीचे श्रौत व स्मार्त कर्मानुष्ठानासहित पंचविध अर्चन करून जीवाला परमेश्वरत्व प्राप्त होते ही भावना ग्राहय.

(७) निंबार्क- भगवंताला नैवेद्य दाखविणे, भगवंताप्रीत्यर्थ दान करणे, किंवा ज्या ज्या योगे भक्त तृप्त होतील असे करणे, हे दोन्ही प्रकार एकरूपच आहेत, ही भावना ग्राहय.

(८) राधिकावल्लभ - श्रीकृष्णाच्या चरणांची प्राप्ती करण्यासाठी गोपीश्रेष्ठ राधिकेची सेवा करावी ही भावना ग्राहय.

(९) चैतन्य - रासेश्वर भगवान कृष्ण वृंदावनात नित्य असतो आणि तो माधुर्य भक्तिनेच प्राप्त होऊ शकतो ही भावना ग्राहय.

(१०) .वल्लभ - बालस्वरूप श्रीकृष्णाची वात्सल्य प्रेमाने पण मर्यादा राखून सेवा करावी ही शिकवण ग्राहय.

(११) गाणपत्य - गणेश हा विघ्नहर्ता असल्यामुळे, नेहमी चिंता सोडून भगवद्भक्तीत मग्न राहावे ही शिकवण ग्राहय.

(१२) सौरागम - आदित्यामध्ये असलेला पुरूष तो मीच आहे ही धारणा ग्राहय.

(१३) प्रत्यभिज्ञा - शिव अव्दैतस्वरूप आहे, सर्वाच्या हृदयात स्फूर्तिरूपाने तोच आहे म्हणून सुलभही आहे व सर्वकर्ता आहे हे विवेचन ग्राहय.

(१४) रामानंद - अव्दैत व निर्गुण अशा ब्रह्माचे ध्यान करावे आणि प्रमादरहित अशा सद्गुरूची सेवा करावी हा विचार ग्राहय.

(१५) विठ्ठल - भगवान श्रीकृष्ण निजधामाला गेले नाहीत. ते पंढरपुरात आपल्या भक्तासाठी